अ

जुलै — सप्टेंबर 1991
खंड 15, अंक 2

# अर्थसंवाद

- भारतासाठी नवी विकास-नीती
- विकसनशील देशांचे विदेशी कर्ज
- भारताचे आर्थिक अरिष्ट
- उत्पादनक्षमतेचे मापन
- व्ही. के. आर. व्ही. राव

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 15, अंक 2

जुलै–सप्टेंबर 1991

■ प्रमुख संपादक
रवीन्द्र दोशी

■ सहायक संपादक
सु. गो. भानुशाली

■ सल्लागार मंडळ
विकास चित्रे
अ. रा. पडोशी
सु. दा. तुपे
दि. व्यं. जहागिरदार

■ संपादकीय पत्रव्यवहार
रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक व विभाग प्रमुख
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004

## अनुक्रमणिका

81 भारतासाठी नवी विकासनीती : नवे संदर्भ, समस्या आणि पर्याय
देवदत्त दाभोलकर

95 विकसनशील देशांचे विदेशी कर्ज : अभिवृद्धीचे अरिष्ट
जी. सी. द कोस्टा

111 भारताचे प्रचलित आर्थिक अरिष्ट : महत्त्वाचे पैलू
पुलिन नायक

122 उत्पादनक्षमता मापनपद्धती
लक्ष्मण बुरंगे

140 भारतीय अर्थव्यवस्थेतील अरिष्ट
विकास चित्रे

146 अर्थशास्त्रातील ज्ञानमहर्षी : व्ही. के. आर. व्ही. राव
दि. व्यं. जहागिरदार

153 भारतातील राजकोषीय व्यवस्थापन
बी. बी. भट्टाचार्य

166 आर्थिक वार्ता
सु. गो. भानुशाली

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

( वर्गणी व जाहिरात पाठविणे, अंकाविषयी चौकशी करणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, इत्यादी )

**त्र्यं. सु. पाटणकर**

कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,

'संपदा,' प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे - 424 002

■ **वर्गणीतील बदल :**

1 एप्रिल 1991 पासून वर्गणीच्या दरात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे याची परिषदेचे सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे वर्गणीदार यांनी कृपया नोंद घ्यावी.

**(अ) परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 (एकरकमी)
( 2 ) साधारण सदस्य : रु. 80 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 80 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

**(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 80 (वार्षिक)

( इ ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च.

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे धुळ्यास पाठवावी.

■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार**

( 1 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

( 2 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद

# भारतासाठी नवी विकासनीती : नवे संदर्भ, समस्या आणि पर्याय*

देवदत्त दाभोलकर**

1

महाराष्ट्रातील गेल्या पिढीतील एक अग्रगण्य ख्यातनाम वृत्तपत्र संपादक पां. वा. गाडगीळ यांच्या स्मृत्यर्थ आयोजित होत असलेल्या या व्याख्यानमालेत या वर्षीचे व्याख्यान देण्यासाठी मला आमंत्रित करण्यात आले याचा मला आनंद वाटतो.

पां. वा. गाडगीळ हे चतुरस्त्र पत्रकार होते. अनेकविध विषयात त्यांना रस होता. समाजवाद, साम्यवाद हे त्यांच्या प्रमुख आस्थेचे विषय होते. समाजपरिवर्तनासाठी त्यांच्या मनात असणारा आग्रह हा त्या आस्थेचा मूलस्त्रोत होता. आज हे वाद ज्या तात्त्विक व व्यावहारिक अडचणीत सापडले आहेत त्या संदर्भात त्यांची प्रतिक्रिया कशी झाली असती हे आता एक न शमणारे कुतूहलच राहणे अटळ आहे. परंतु मानवतेच्या मूल्याकडे जाणारे समाजपरिवर्तन हा चिंतनाचा विषय असणाऱ्या त्यांच्या मनोवृत्तीला आज जागतिक व भारतीय स्तरावर निर्माण झालेल्या नव्या संदर्भाचा मागोवा घेण्यात, त्यातील समस्यांशी झगडण्यात व नवीन पर्यायांचा शोध घेण्यात रस वाटला असता याविषयी माझ्या मनात शंका नाही. आज त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना ही भावना सहजच मनात निर्माण होते.

2

हे व्याख्यान मी आजचे उपस्थित श्रोते व ज्या ' अर्थसंवाद ' या नियतकालिकातून हे व्याख्यान प्रसिद्ध होणार आहे त्याचे वाचक यांना नजरेसमोर ठेऊन देणार आहे. त्यामुळे अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा केवळ निर्देश करून मला पुढे सरकता येईल व आज कदाचित कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या, परंतु भावी काळात ज्यांना महत्त्व प्राप्त होईल असे मला वाटते त्यांच्याविषयी काहीशा विस्ताराने सांगता येईल. परंतु हा भविष्यकथनाचा प्रयत्न नव्हे. 'फ्यूचरॉलॉजी'

* पां वा. गाडगीळ विश्वस्त निधी आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 30 जून 1991 रोजी मुंबई येथे झालेले कै. पां. वा, गाडगीळ स्मृती व्याख्यान ( वर्ष चौथे ).

** भूतपूर्व कुलगुरू, पुणे विद्यापीठ, पुणे.

म्हणजे 'अॅस्ट्रॉलॉजी' नव्हे. आजच्या परिस्थितीचा अभ्यास करून, वेध घेऊन भविष्यकालाविषयी अनुमाने काढण्याचा हा प्रयत्न असतो.

बाबा आमटे यांचे शब्द वापरावयाचे तर 'अवसर आणि आव्हाने यांनी तुडुंबलेला हा काळ आहे.' आजच्या सार्वत्रिक मानसिकतेत हेही एक मानसिक समाधान व आश्वासन असू शकते. हे अवसर आणि ही आव्हाने आज कृतीच्या क्षेत्रात आहेत त्याप्रमाणे वैचारिक क्षेत्रातही आहेत; आणि कृतिशीलांच्या व विचारशीलांच्या सुदैवाने समस्यांची नेमकी उत्तरे आज कोणाकडेच नाहीत.

या सर्व पार्श्वभूमीवरचा हा प्रयत्न आहे; आणि तरीही 'देवदूतही तेथे पाऊल टाकावयास कचरतात' आदि इशाऱ्यांची जाणीव विवेचनाला प्रारंभ करताना माझ्या मनात आहे.

## 3

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आपल्याला वेगवेगळ्या विस्फोटांची सवय झाली. अणुबाँबचा विस्फोट हा तर युद्धकालात व नंतरही आजवर मानवमात्रावर आपली भीषण छाया टाकणारा विस्फोट होता. पेनिसिलीन आदि शोधांनी व त्यांच्या सार्वत्रिक वापरामुळे शारीरिक व्याधींशी मुकाबला करण्याची मानवाची शक्ती वाढली. यामुळे दरिद्री तिसऱ्या जगातील राष्ट्रांतही मृत्यूचे प्रमाण घटले व जननाचे प्रमाण मात्र बहुतांश तसेच राहिले. साहजिकच त्या राष्ट्रांतून लोकसंख्येची पूर्वीपेक्षाही अधिक जलदगतीने वाढ झाली. आणि लोकसंख्येचा विदारक प्रश्न, लोकसंख्या विस्फोटाचा प्रश्न, त्या राष्ट्रांच्यासमोर उभा राहिला. कोणत्याही ठिकाणी दारिद्र्य अस्तित्वात असेल तर अन्य ठिकाणच्या समृद्धीला ते अखेर घातकच ठरते, हे जॉन केनेडी यांचे उद्‌गार जगात विचाराला काही चालना देऊन गेले, परंतु कृतीला मात्र तशी विशेष चालना नाही. जागतिक स्तरावर राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहारात त्यामुळे विशेष फरक पडला नाही, त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्रातील अंतर्गत वर्गावर्गातील व्यवहारातही फरक पडला नाही. व्यक्तिगत व सामूहिक, वर्गीय व राष्ट्रीय स्वार्थापलीकडे जाण्याची गरज काळाने समोर आणून उभी केली, परंतु मानवाचे मानस नवरचनेसाठी आवश्यक त्या नैतिक उंचीपर्यंत येऊन पोचू शकले नाही. यातून निर्माण होणाऱ्या समस्या आपल्या आजच्या अनेक समस्यांच्या मुळाशी आहेत. उत्तर–दक्षिण जगातील वाद, ऊर्जावापराचे प्रश्न, पर्यावरणविषयक प्रश्न ही यांची काही उदाहरणे आहेत.

ज्ञानाचा विस्फोट हा या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचा विस्फोट. दर दहा वर्षांत मानवाचे ज्ञानक्षेत्र दुपटीच्या गतीने विस्तारत गेले व आजही विस्तारत आहे. मानवतेच्या इतिहासात एकूण होऊन गेलेल्या शास्त्रज्ञांपैकी नव्वद टक्के शास्त्रज्ञ आज हयात आहेत ही वस्तुस्थिती आहे. उच्च तंत्रज्ञान हा शब्दप्रयोग या काळातच रूढ झाला. मानवाची वस्तूंची उत्पादनक्षमता वाढली, परंतु बेकारी व उपभोगवाद (Consumerism) या नव्या समस्या निर्माण झाल्या. एका दृष्टीने ही समस्या औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभापासूनच अस्तित्वात आहे. आणि अजूनही मानवाला या समस्येचे उत्तर सापडलेले नाही, अर्थशास्त्रज्ञ नसणाऱ्याही कोणत्याही सहृदय निरीक्षकाच्या लक्षात येईल अशी ही समस्या आहे. गोल्डस्मिथ हा इंग्लिश कवी जवळजवळ दोन शतकापूर्वीच वर्णन करून गेला : 'रचला इमला, पिचला मानव'. समृद्ध राष्ट्रांतही भौतिक समृद्धी असली तरी या समृद्धीबरोबरच आपण काहीतरी अमोल असे जीवनातील श्रेय हरवत आहोत अशी प्रकट किंवा अबोध जाणीव आहेच. प्रेसिडेंट निक्सन एकदा आपल्या 'स्टेट ऑफ दि युनियन'च्या वार्षिक अभिभाषणात म्हणाले : "संपत्ती आणि सुख हे पर्यायी शब्द नाहीत, हे अमेरिकेतील लोकांना अद्याप उमगावयाचे आहे." भारतात आलेल्या अमेरिकेतील विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना मी निक्सन यांच्या उद्‌गारांचा निर्देश केला तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. 'काय, इतर कोणी सोडून, निक्सन असे म्हणाले !' ही त्यांची प्रतिक्रिया आपण समजू शकतो. परंतु निक्सन यांचे उद्‌गार वस्तुस्थितीनिदर्शक होते याविषयी त्या विद्यार्थ्यांच्या मनात शंका नव्हती. आर्थिकदृष्ट्या अत्यंत प्रगत अशा सर्वच राष्ट्रांत या प्रकारचीच स्थिती आहे. या समस्येवरील उत्तरही मानवाला अजून सापडावयाचेच आहे. आल्विन टॉफलरच्या 'दि थर्ड वेव्ह' या पुस्तकातील 'गांधी वुईथ सॅटेलाइट' हे

प्रकरण याच समस्येचे दर्शन आहे. 'हा शोध अजून लागावयाचा आहे', व 'हा लागलाच पाहिजे' अशा निकराने याविषयी विचार–संशोधन करणारे विचारवंतही जगात फारच थोडे आहेत.

4

या अशा स्वरूपाच्या गेल्या युद्धोत्तर चार दशकांच्या कालखंडातील विस्फोटांना मागे टाकतील अशा स्वरूपाचे विस्फोट गेल्या तीन चार वर्षात घडून आले. त्या सर्वांचे स्वरूपही अद्याप स्पष्ट झालेले नाही; यामुळे त्यांचे नीट आकलन होऊन नव्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर योग्य उत्तरे सापडण्याची प्रक्रिया अद्याप अधांतरीच आहे. थोडक्यात या समस्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येईल.

(1) रशिया व अमेरिका यांमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर अखंड शीतयुद्ध व जीवघेणी शस्त्रास्त्रनिर्मिती स्पर्धा चालू होती. हे निरन्तर असेच चालू राहणार, याच परिस्थितीशी मिळतेजुळते घेऊन राहायला आपण शिकले पाहिजे अशीच जगात सर्वांची धारणा होती. या वातावरणात शस्त्रास्त्रमर्यादेची बोलणी यशस्वी झाली हे एक नवे मोठेच आशादायक चिन्ह होते.

(2) हा पालट करण्याचे श्रेय गोर्बाचोव्ह यांना प्रामुख्याने देण्यात येते व ते युक्तही आहे. त्यांना शांततेसाठी असलेले नोबेल पारितोषिक जाहीर झाले व 'टाइम' या विश्वविख्यात साप्ताहिकानेही आपले 'मॅन ऑफ द यिअर' हे शीर्षक बदलून 'मॅन ऑफ द डिकेड' असा त्यांचा निर्देश केला. 'पेरेस्त्रोयेका' व 'ग्लासनोस्त' हे शब्द जगाच्या सर्व भाषांत रूढ झाले.

परंतु आज गोर्बाचोव्ह यांचे रशियातील स्थान कितपत बळकट आहे याविषयीच शंका निर्माण व्हावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हे व्याख्यान होईपर्यंत किंवा ते प्रसिद्ध होईपर्यंत काही आकस्मिक घडले तरी कोणाला आश्चर्य वाटणार नाही अशी परिस्थिती आहे.

(3) 'जगातील सर्व कामगारांनो एक व्हा' असे मार्क्सचे आवाहन होते. साम्यवाद हा राष्ट्रवादाला भेदून पुढे जाणारा आहे, अशी ही संकल्पना होती. पहिल्या महायुद्धात त्या त्या राष्ट्रातील मजूर आपापल्या राष्ट्राच्या बाजूनेच युद्धाला उभे राहिले आणि या संकल्पनेला पहिला तडा गेला. 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल' अस्तित्वात होती, परंतु रशियाचे अन्य राष्ट्रांत हस्तक्षेप करण्याचे साधन असेच त्या संघटनेचे स्वरूप राहिले.

अन्य राष्ट्रांचे तर सोडाच, आज तर रशियात सामील असलेली घटक राष्ट्रेदेखील रशियातून (U. S. S. R.) बाहेर पडण्याच्या प्रयत्नात आहेत. आणि हे केवळ हिटलर–स्टॅलिन करारानंतर स्टॅलिनने रशियात सामील केलेल्या घटक राष्ट्रांपुरतेच मर्यादित आहे असे नाही. सुरवातीपासून रशियामध्ये अंतर्भूत असलेली काही घटक राज्येही बाहेर पडण्याच्या प्रयत्नात आहेत.

(4) रशियातील या विघटनाच्या प्रक्रियेत मार्क्सवादाने जीर्णशीर्ण व अपायकारक म्हणून त्याज्य ठरविलेली धर्म संकल्पनाही प्रभावी ठरत आहे. मुस्लिम बहुसंख्याक प्रदेशात हे ताण विशेष जाणवतात.

(5) रशियात असे विघटन होत आहे, तर याउलट पश्चिम युरोपमधील राष्ट्रे एकत्र येत आहेत. 1992 साली या प्रयत्नाला पूर्ण स्वरूप द्यावयाचे हेदेखील त्या राष्ट्रांनी ठरविले आहे. आज ना उद्या युरोपातील प्रगत औद्योगिक राष्ट्रे या पद्धतीने संपूर्णपणे एकजूट झाली तर युरोपची संयुक्त संस्थाने (United States of Europe) ही अमेरिकेतील संयुक्त संस्थानांना (U. S. A.) तोडीस तोड, किंबहुना वरचढ, ठरतील यात शंका नाही. सर्व जगाच्याच राजकारणावर व अर्थकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होणे अटळ आहे.

(6) दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी पुन्हा उभा राहू नये म्हणून त्याचे चार तुकडे करून एकेक तुकडा अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड व रशिया यांच्या हवाली करण्यात आला. पहिले तीन तुकडे एकत्र करून त्या तिघांनी पश्चिम जर्मनी आकारास आणला. पूर्व जर्मनी मात्र रशियाकडेच राहिला. या दोन जर्मनींचे पुन्हा एकत्रीकरण होईल, बर्लिनची भिंत कोसळेल असे भाकीत दोन-तीन वर्षांपूर्वी कोणी केले असते तर त्याला

लोकांनी वेढ्यात काढले असते. अकल्पित वेगाने या घटना घडून आल्या. अशा पुनर्मीलनाच्याही अनेकविध आर्थिक समस्या असतात, याचा अनुभव आज जर्मनी घेत आहे.

(7) हे एकत्रीकरण ज्या लोकमानसाच्या विस्फोटाने साम्यवादी सरकारे व साम्यवादी पक्ष कोसळत गेले त्याच उद्रेकाचा एक परिणाम होते. साम्यवाद बलशाली आहे, साम्यवाद रशियाच्या नेतृत्वाखाली युरोपमध्ये एकसंघ आहे, या कल्पनेचा अंत झाला.

(8) चीनमध्ये चिनी पद्धतीचा साम्यवाद अधिकारावर आहे व तेथील साम्यवादी पक्षाच्या हातात सर्वंकष सत्ता आहे असे चित्र आज दिसते. परंतु हे चित्र किती काळ टिकेल याचे भाकीत करण्याचे धाडस आज कोण करू शकेल ? आणि आज चीन आपला साम्यवाद आपण कायम ठेऊन आर्थिक विकासाच्यादृष्टीने आवश्यक अशा मुक्त बाजारपेठेच्या काही धोरणांचाही स्वीकार करू असे म्हणत आहे. साम्यवादी विचार व हुकुमशाही आचार याना या राष्ट्राने झिडकारलेले नाही. विद्यार्थ्यांचे आंदोलन ज्या पद्धतीने चिरडण्यात आले ती याची साक्ष आहे. 'सर्व जग साम्यवादाच्या विरोधात गेले तरी आम्हाला एकाकी वाटण्याचे कारण नाही; आमचीच लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या एक-पंचमांश आहे व तो आधार आम्हाला पुरेसा आहे,' हे चीनच्या पंतप्रधानांचे उद्‌गार हटवादीपणाचे मानावे की आत्मविश्वासाचे मानावे या प्रश्नाचे उत्तर आज तरी काळाच्या उदरातच दडलेले आहे.

एका परिच्छेदात मी कालपरवाच्या कालखंडापर्यंत येऊन पोहचण्याचा प्रयत्न करतो. (याहून मोठी महत्त्वाकांक्षा आजवर कोणी धरली नसेल). दुसरे महायुद्ध– अणुविस्फोट (अणुअस्त्र प्रथम जर्मनीला हस्तगत झाले असते तर!)– जपान हरला परंतु कोरिया, जर्मनी किंवा बर्लिन याप्रमाणे अमेरिका व रशियात वाटला गेला नाही. (अमेरिकेकडे तिसरा अणुबॉंब आता उरलेला नाही हे रशियाला माहीत असते तर !)– जर्मनीचे चार तुकडे झाले. पूर्व युरोपातील राष्ट्रे साम्यवादी झाली. चीनमधील साम्यवादी क्रांतीनंतर जगातील एक-तृतीयांश लोकसंख्या साम्यवादाच्या कक्षेत आली भारत आणि अन्य परतंत्र राष्ट्रेही क्रमाक्रमाने साम्राज्यशाही अधिसत्तांच्या जोखडाखालून मुक्त झाली (दुसरे महायुद्ध झालेच नसते तर !)– 'युनो'सारखी जागतिक राजकीय संघटना व जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या जागतिक आर्थिक संस्था अस्तित्वात आल्या. –शीतयुद्ध (जगाचा विध्वंस कोणत्याही क्षणी होऊ शकेल असा सततचा ताण)– युद्धाने उध्वस्त राष्ट्रे पुन्हा नव्या जोमाने उभी राहिली. आर्थिक सामर्थ्याच्या त्यांच्या क्रमवारीत काही फरक झाला, परंतु युद्धपूर्वकालाच्या तुलनेत प्रत्येकाचे उत्पादन खूप वाढले–दक्षिण कोरिया, सिंगापूर, तैवान, मलेशिया, इंडोनेशियासारख्या काही अप्रगत राष्ट्रांचा वेगाने विकास–उपभोगवादाचे प्राबल्य – पर्यावरण रक्षणाचा प्रश्न – सागरतळाच्या संपत्तीचा प्रश्न – अवकाशयात्रा व अवकाशनियंत्रणाचा प्रश्न – संगणक – यंत्रमानव (रोबो)– माहितीक्षेत्रातील क्रान्ती ( Information Revolution).

अगदी कालपरवा आपल्या डोळ्यादेखत काय घडले तेही आता एका परिच्छेदात सारांशरूपाने पाहू. वॉर्सा पॅक्टचे विसर्जन – साम्यवादी राष्ट्रात लोकशाहीचे व मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे – रशियात गोर्बाचोव्ह व येलत्सिन ( येलत्सिनचे समताल पाऊल, पुढचे पाऊल की आडवे पाऊल ? ) – पश्चिम युरोपच्या एकीकरणानंतर जगात तीनच आर्थिक महासत्ता राहतील : अमेरिका, युरोप व जपान – लष्करी अतिसत्ता काही काळ तरी अमेरिकेच्याच हाती राहील – आखाती युद्धाचा अनुभव : जागतिक स्तरावरची प्रभावी लष्करी कार्यवाही होऊ शकते. स्कड क्षेपणास्त्रांचा अंतरिक्षातच छेद. हे तंत्रज्ञान फक्त अमेरिकेकडेच असल्यामुळे एकमेकाविरुद्ध लढणाऱ्या सर्व शेजारी राष्ट्रांना अमेरिकेच्या या सामर्थ्याची व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची दखल घ्यावीच लागेल. (भारत–पाकिस्तान युद्ध झाले तर! ) – जर्मनीचे एकीकरण, त्यातील मानसिकता व समस्या : (आज बांगला देश पुन्हा पश्चिम बंगालशी जोडला जाणे जितके अशक्य वाटते तितकेच अगदी कालपर्यंत पूर्व जर्मनी पश्चिम जर्मनीबाबत वाटत होते. ) धार्मिक मूलतत्त्ववादाचा वाढता प्रभाव – धर्मसंकल्पनेचे साम्यवादी राष्ट्रांतही पुनरुज्जीवन : (इतर सर्व प्रश्नांवर धर्मभावना मात करू शकते हा उत्तर प्रदेशातील निवडणुकीचा अनुभव) – कॅथॉलिक चर्चची समाजपरि–

वर्तनाविषयीची संकल्पना – भारताच्यादृष्टीनेही गेल्या वर्षभरात अनेक घटनाविस्फोटांचे सांद्रीकरण झाले आहे. त्यांचा तपशील आपणा सर्वांच्या मनात आहे. त्यामुळे त्याचा वेगळा निर्देश नको.

## 5

आज जगाच्या राजकारणात, अर्थकारणात भारताचे स्थान नगण्य आहे. (क्रीडाक्षेत्रात ते किती नगण्य आहे हे ऑलिम्पिक स्पर्धांनी प्रत्येक भारतीयाला व जगातील प्रत्येकाला स्पष्ट केले आहे.) आपल्याच राष्ट्राविषयी आपण असे विधान करणे कोणाला स्वाभिमानशून्यतेचे, किंबहुना राष्ट्रद्रोहाचेही, वाटण्याची शक्यता आहे. परंतु वस्तुस्थितीला धीटपणे समजून घेण्याची शक्ती खऱ्या राष्ट्रभक्तीतूनच निर्माण होते. आपल्यातील उणिवांचा निर्देशही ज्याना नकोसा वाटतो अशा स्वकीयांच्या समुदायात तर अशी विधाने सामान्यपणे प्रक्षोभालाच कारणीभूत होतात. अनेकदा वस्तुस्थिती नाकारता येण्यासारखी नसल्यामुळे तिचा निर्देश लोक सहन करतात. परंतु अशी परिस्थिती का निर्माण झाली याची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा त्याना नको असते. कारण, त्यात काही दोषारोप आपल्यापर्यंत येऊन पोहोचण्याची शक्यता असते. अर्थव्यवहारात आज भारत दिवाळखोरीच्या काठावर उभा आहे हे आता सर्वचजण मान्य करतात. नंतर चालू होतो तो 'का रे मला टक्का दिला' हा 'पासिंग द बक' चा खेळ. आंतरराष्ट्रीय राजकारणातील आपले स्थान आखाती युद्धाने दाखवून दिले आहे. आपण कोणती भूमिका घेतो याविषयी जगात ना कोणाला हर्ष, ना खेद, ना किमान उत्सुकता. अंतर्गत अर्थकारण, राजकारण यातही कोणाला सुस्थिरतेचा, प्रभावी कार्यवाहीचा प्रत्यय येत नाही. आता भारत 'फंक्शनिंग अनार्की' राहिला नाही. 'ए डिसइंटिग्रेटिंग अँन्ड डिस्ट्रॉइंग अनार्की' असे त्याचे भयावह चित्र होऊ पहात आहे. 'पासिंग द बक' चा खेळ आता यापुढे चालू शकणार नाही असे ज्याना वाटते ते ते आत्मसमर्थनाचे अस्तर असलेली आत्मनिंदा करून आपले संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात. नेते अपुरे पडले असे नेतेच म्हणतात; राजकीय पक्ष दुर्बल राहिले असे राजकीय पक्षच सांगतात; बुद्धिवाद्यांनी आपली योग्य भूमिका पार पाडली नाही असे रडगाणे बुद्धिवादीच गातात आणि सर्वजण शेवटी आशेचा सूर लावावा व आपली जबाबदारीही झटकून मोकळे व्हावे या चलाख भावनेने आता जनतेपैकी प्रत्येकानेच हे काम आपले समजून केले पाहिजे म्हणून सांगतात. म्हणजे नेमके काय करावयाचे हे कोणीच सांगत नाहीत; कारण ते त्यांचे त्यानाच माहीत नसते. स्वतःची सदसद्विवेकबुद्धी स्वच्छ ठेवण्याचा एक आविर्भाव एवढेच अशा सूचनेचे महत्त्व.

आज भारत भयानक आर्थिक अरिष्टात उभा आहे हे सर्वमान्य आहे. (आपण या अरिष्टाला जबाबदार आहोत हे मात्र कोणालाच मान्य नाही.) चलनवाढ, काळा पैसा, उत्पादकतेत घट, भाववाढ, विदेशी चलनाची चणचण, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचा सर्वच अविकसित देशांकडे व भारताकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन, विदेशी कर्जाचा वाढता बोजा, श्रीमंत व गरीब यामधील वाढती दरी ही या आर्थिक संकटाची उपांगे आहेत. श्रीमंत आणि गरीब ही दोन राष्ट्रे आजच भारतात अस्तित्वात आलेली आहेत.

आपले सध्याचे भारताचे अर्थमंत्री मनमोहन सिंग यांचे या संदर्भातील विश्लेषण काय आहे? त्यांचे विश्लेषण असे आहे : (**टाइम्स ऑफ इंडिया**, मुंबई, 24–6–1991, पृ. 13) [चौकटीच्या कंसातील अतिसंक्षिप्त टिपणी माझी आहे.]

(1) देश आर्थिक संकटात उभा आहे. परंतु दोन वर्षांच्या कालावधीत देशाला या संकटातून बाहेर काढता येईल. आपण आर्थिक शिस्तीचे जे कठोर उपाय सुचवू त्याला शासनाचा पाठिंबा राहील असे पंतप्रधानांनी आपल्याला सांगितले आहे. Manmohan Singh said, the Prime Minister, while inviting him, had assured him of his full support of all "right measures" to put the economy back on the rails. ["right measures" चे 'कठोर' असे मी केलेले भाषांतर आपल्याला मान्य होईल अशी मला आशा आहे.]

(2) यासाठी उपभोगावर मर्यादा घालावी लागेल आणि सर्वत्र कठोर काटकसरीचे पालन करावे लागेल. [आयकर सवलतीची मर्यादा कमी होईल, तीच राहील की वाढेल? उच्च मध्यम वर्गाच्या

उपभोगाच्या वस्तूंवरील (मोटार, शीतकपाट, दूरदर्शन संच आदि) करांचे काय होईल? करचुकवेगिरीला किती कठोर शासन किती दक्षतेने दिले जाईल?]

(3) अंदाजपत्रकातील तूट खाली आणलीच पाहिजे. [हे करावयाचे तर आर्थिक शिस्त आणली पाहिजे. तरच काटकसर होईल व सामाजिक न्यायही सांभाळला जाईल.]

(4) जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, आशियाई विकास बँक यांचा दृष्टिकोन सहानुभूतीचा आहे. भारताची त्या वित्तसंस्थांकडे पत आहे. भारत दिवाळखोर होणार नाही. याबद्दलचा तपशील देण्याचे मात्र त्यांनी टाळले आहे. [हेच तर अवघड आहे. वैचारिकदृष्टचा व त्याहूनही कृतीच्यादृष्टीने.]

(5) भारतापेक्षा कमी साधनसंपत्ती असलेले देश भारतापुढे गेले आहेत. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरावयाचे तर हे अंतर आपण तोडले पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची कास आपण यासाठी धरली पाहिजे. [हे कसे करावयाचे? बेकारीच्या प्रश्नाचे काय?]

(6) श्रीमंत व गरीब यांच्यामधील दरी कमी केली पाहिजे. [हे अमान्य असणारा एकही अर्थमंत्री, नियोजन मंडळाचा उपाध्यक्ष, पंतप्रधान आजवर झाला नाही.] विकास, विभाजन व वितरण यांच्या संतुलनाचा यक्षप्रश्न कसा सोडवावयाचा याचे उत्तरही आजवर कोणी देऊ शकत नाही. राजकीय निर्धाराच्या अभावामुळे हे घडले. मग हा निर्धार आजचे सरकार अचानक कसा दाखवू शकेल? आणि दाखवला तर त्याला कोसळायला कितीसा अवधी लागेल? परकीय लष्करी आक्रमण झाले तर भावनात्मक आवाहन प्रभावी होऊ शकते. मंदिर–मशीद प्रश्नावर इतर सर्व विसरून लोक लढावयास, सोसावयास तयार होतात. आर्थिक प्रश्नाचे सामान्य जनतेला ना सोयर, ना सुतक. आपला रोजगार, आपले वेतनमान, भाववाढ एवढ्याच गोष्टी सामान्य जनतेला समजत असतात. जसे रुग्णाला ताप समजतो, आपले डोके व पोट दुखते हे कळते. परंतु, त्याची कारणे त्याला माहीत नसतात. [मग तो वेडेचार करतो किंवा विविध अंधश्रद्धांतून अनेक प्रकार करतो.]

अर्थमंत्री झाल्यानंतर साहजिकच त्या स्थानाच्या अनेकविध मर्यादा त्या व्यक्तीवर येतात. हे अटळही आहे. त्यामुळेच मनमोहन सिंग यांनी 20 मे 1986 रोजी केलेल्या भाषणातील उद्गार यादृष्टीने उद्बोधक आहेत. (उद्घाटनाचे भाषण : 'Preparing India for the Year 2000', इंडियन असोसिएशन ऑफ सोशल सायन्स इन्स्टिटयूशन्स यांच्या विद्यमाने आयोजिलेले आंतरशास्त्रीय चर्चासत्र, नवी दिल्ली, 20–22 मे, 1986, IASSI Quarterly Newsletter, खंड 5, अंक 1.) या भाषणात ते सांगतात : "It must be our aim to create by the year 2000 the conditions for self-sustaining growth internally and the development of technology. The long term goal should be to make India a modern, technologically progressive economy and a more just society, with an expanding capacity to provide basic material and cultural requisites of all people." [ऐकल्यानंतर 'Amen' म्हणण्याचा मोह होतो की नाही? ही प्रार्थना तर आजवर सर्वांनीच केली आहे.]

परंतु मनमोहन सिंग आणखीही काही सांगतात :

"The achievement of near full employment and the satisfaction of basic human needs, including universalisation of elementary education and reasonable health care facilities for all, would make heavy demands on the resources of the public sector. In order to sustain the large investments required for fulfilling the developmental objectives, the government would have to take major initiatives to improve the buoyancy and the elasticity of the tax system and in containing non-productive expenditure. Simultaneously, the internal resource generating capacity of public enterprises will need to be greatly improved. Priority attention will have to be given to improving the efficiency and the productivity of public sector enterprises. Simultaneously, fiscal and other policies will need to create a climate conducive to savings and their utilisation in high prio-

rity sectors. Effective control of inflation and curb on generation of black money would constitute important elements of such a strategy." [ Manmohan Singh had set for himself a very tall order indeed. ]

त्याच भाषणात मनमोहन सिंग यानंतर शेवटी सांगतात : " There are clearly new options and opportunities which, if seized, can hasten the process of structural change."

याचा तपशील ठरवणे आणि तो कार्यवाहीत आणणे हेच खरे आव्हान आहे. हे आव्हान केवळ मनमोहन सिंग यांच्यासमोरच आहे, किंवा शासनापुढे आहे वा अमूर्त संकल्पनेच्या आपल्या सर्व राष्ट्रासमोर आहे असेच मात्र नाही. ते तुम्हा आम्हा सर्वांसमोर, सामूहिक व व्यक्तिगतरीत्या, आपापल्या क्षेत्रातील कामाच्या संदर्भात व भारताचा एक नागरिक म्हणून सर्वसामान्य संदर्भातही आपल्यासमोर उभे आहे.

या आव्हानाला प्रतिसाद कसा देणार ?

## 6

## प्रतिसाद

### (1) राजकीय निर्धार

तीन आर्थिक महासत्ता, अमेरिकेची लष्करी अतिसत्ता, संयुक्त राष्ट्र संघटनेची (UNO) आपल्या निर्णयानुसार लष्करी कार्यवाही करण्याची क्षमता, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांचे सौम्य भाषेतील परंतु कठोर आग्रह या सर्वांशी स्वाभिमान राखून मुकाबला करावयाचा असेल तर निदान भावनात्मकदृष्ट्या एक एकात्म, एकसंध राष्ट्र अशी भारताची प्रतिमा जगासमोर उभी राहिली पाहिजे. (जशी आज चीनची आहे.) अंतर्गत विचार केला तरी आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्याकरिता ज्या कठोर आर्थिक शिस्तीची अंमलबजावणी करावी लागेल त्यासाठी लागणारा राजकीय निर्धार सर्वपक्षीय सह–मतीच्या आधारावरच प्रकट होऊ शकेल. यासाठी राजकीय संरचनेत बदल करावा लागेल. राजकीय अस्पृश्यतेच्या पलीकडे जावे लागेल. राष्ट्रीय सरकारात सर्वांचा समावेश ('भाजपा' सह) किंवा निदान ज्या किमान कार्यक्रमाबाबत एकमत होऊ शकेल (लोकसंख्या नियंत्रण, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण, प्रत्येक खेड्याला पाण्याचा पुरवठा, स्वावलंबी रोजगाराचा विकास आदि) अशा कार्यक्रमाला सर्वांचा पाठिंबा व जोपर्यंत असे कार्यक्रम पार पाडले जात आहेत तोपर्यंत सरकारला अन्य कोणत्याही कारणाने धोका निर्माण होणार नाही अशी दक्षता घेणे हे सर्वांनी आजचे राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मान्य करावे लागेल.

भारत–पाकिस्तान, भारत–चीन युद्धाच्यावेळी काही काळ आपण अशी एकात्मता प्रकट करू शकलो. हा युद्ध कालखंडही तसा अल्पच होता. स्वातंत्र्य संपा–दनाच्या आधीच्या दीर्घ ऐतिहासिक कालखंडात ही एकात्मता भारताने कधीच प्रकट केली नव्हती, हे दारुण सत्यही आपण विसरता कामा नये. आर्थिक अरिष्टाच्या पाठोपाठ चोरपावलांनी किंवा स्फोटकनिनादांनी राज–कीय अरिष्टही येत असते, याचे भान आपल्याला राहील काय ?

यादृष्टीने 'भाजपा' ची भूमिका या कालखंडात महत्त्वाची, किंबहुना निर्णायकही, ठरेल अशी शक्यता आहे. पक्षोपपक्षांची रस्सीखेच असेच केंद्रातील राज–कारणाचे स्वरूप राहिल्यास 'भाजपा' ला आपले वजन हवे तसे हवे त्या पारड्यात टाकून सत्तेचा समतोल उलटापालटा करून टाकता येईल. राष्ट्रहिताचा दूरगामी विचार करून 'भाजपा' चे नेते हा मोह टाळतील अशी आशा करावयास जागा आहे.

'भाजपा' ची याहून मोठी कसोटी उत्तर प्रदेशात लागणार आहे. या निवडणुकीत मुसलमानांची मतपेटी 'भाजपा'ने नाकारली आहे. परंतु हिंदू मतपेटी हेच आपले सामर्थ्यसर्वस्व राहावे असे धोरण 'भाजपा' चालविणार असेल तर ते राष्ट्राला व अंतिमतः 'भाजपा' लाही घातक ठरल्याखेरीज राहणार नाही. आपल्या राज्य–कारभाराने 'भाजपा' मुसलमानांच्या मनात त्यांच्या न्याय्य हक्कांना कोणतीही बाधा नाही, असा विश्वास निर्माण करू शकला तर ते त्यांचे सर्वात मोठे यश असेल. मंदिर–मशीद प्रश्नाची सामंजस्याने सोडवणूक ही अर्था–तच त्यातील आद्य कसोटी होईल. या कसोटीस 'भाजपा' उतरला नाही तर ते केवळ 'भाजपा' च्याचदृष्टीने नव्हे तर राष्ट्राच्यादृष्टीनेही दुर्दैवाचे ठरेल.

## (2) उच्च तंत्र स्वीकार – सामाजिक न्यायासाठी

उच्चतंत्र विरुद्ध सामाजिक न्याय (बेकारीमुळे निर्माण होणाऱ्या समस्येमुळे) अशी मांडणी बहुशः करण्यात येते. कामगार संघटना मजबूत व आक्रमक असल्या तर उच्च तंत्राचा स्वीकार अडविताही येतो. ही समस्या सोडविण्याचे तडजोडीचे मार्ग संभवू शकतात. त्यांचा शोध कामगार संघटनांच्या समंजसपणावर व आजच्या कामगारांच्या उचित अपेक्षा पूर्ण करण्याची प्रतिपक्षाची सिद्धता यावर अवलंबून असतो.

परंतु सामाजिक न्यायासाठीच उच्च तंत्राचा काही किमान स्वीकार आवश्यक आहे, ही मांडणी आपल्याकडे आग्रहाने करताना कोणी दिसत नाही. खेड्यांतील दप्तर संगणकावर आणले तर सामान्य शेतकरी तलाठी आदींच्या जंजाळातून मुक्त होईल की नाही? बँकांत संगणकाचा सरसहा वापर सुरू झाला तर त्यांची कार्यक्षमता वाढेल.

परिणामी अर्थव्यवहार विकसित होतील, संपन्नता येईल, नवे रोजगार निर्माण होतील हे खरे आहे की नाही? दूरदर्शनचा वापर उपभोगवादी जाहिरातींसाठी करण्याऐवजी जनशिक्षणासाठी प्रभावी पद्धतीने करता येईल की नाही? (रामायण, महाभारत मालिकांच्या दूरदर्शन जाहिरातकालाचा विचार करावा. खर्च कोण कसा करणार? खर्च केला नाही तर, जनशिक्षणाच्या अभावी निर्माण होणाऱ्या सामाजिक परिव्ययाचा विचार केला तर हा प्रश्नही भेडसावणार नाही.)

'गांधी वुईथ सॅटेलाइट' ची संकल्पना ॲल्व्हिन टॉफलरने आपल्या 'थर्ड वेव्ह' या ग्रंथात मांडली आहे. उपग्रह हे उच्च तंत्राचे उच्चतम प्रतीक आहे. दळण–वळण आणि माहिती संकलन व माहिती प्रसारण या तंत्रात जी प्रगती झालेली आहे त्यामुळे आज संपूर्ण जगच एक खेडेगाववजा घटक झाले आहे (global village). 'माणसाने अधिपती (master) बनावे, यंत्र बनू नये' एवढाच महात्मा गांधींचा इशारा होता. तपशील आपण भरावयाचा आहे.

## (3) समाजवादाचे काय?

'लोकशाही समाजवाद' हे पुस्तक मी तीस वर्षां–पूर्वी लिहिले. त्या पुस्तकाचा प्रारंभ मी 'समाजवाद हा आजचा युगधर्म आहे,' या वाक्याने केला होता. आज अनेकांना याचे हसू येईल. मला मात्र आजही त्यात फरक करावा असे वाटत नाही. हा केवळ अज्ञानी आडमुठेपणा असू शकेल काय? माझ्या मनाशीच मला या प्रश्नाचे उत्तर शोधावे असे वाटते.

आज कोणते संदर्भ बदलले हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच कोणते संदर्भ बदललेले नाहीत हेही महत्त्वाचे आहे. जगात दरिद्री राष्ट्रे अस्तित्वात आहेत हा संदर्भ बदलला काय? जगातील दोन–तृतीयांश लोकसंख्या या राष्ट्रांत राहते हा संदर्भ बदलला काय? केवळ आर्थिक प्रगतीने माणूस सुखी होणार नाही, व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित रसरशीत लोकशाहीचे अस्तित्व त्यासाठी आवश्यक आहे, हा संदर्भ बदलला काय? हे आणि असे संदर्भ जर बदलले नसतील तर 'लोकशाही समाजवाद' तरी हे संदर्भ बदलू शकतो काय एवढाच प्रश्न शिल्लक राहतो. दारिद्र्यापासून मुक्ती व लोकशाहीची उभारणी हीच लोकशाही समाजवादाची मूलभूत प्रतिज्ञा आहे, हे जर खरे असेल तर माझ्या पहिल्या वाक्याला मी एवढीच पुस्ती जोडेन : 'लोकशाही समाजवाद हा आजचा युगधर्म आहे व सदैव राहावयास हवा.' त्या त्या कालखंडात जे वारे वाहात असतात ते नेहमी युग–धर्माचेच असतात असे नव्हे. अनेक वेळा त्या प्रभावी, प्रभंजक परंतु केवळ वावटळीच असतात, याचे भान समाजधुरीणांनी ठेवणे आवश्यक आहे. यामुळे अंतिम ध्येय लक्षात ठेवून त्यांना आपल्या शिडांची दिशा बदलावी लागते; काही वेळा ती आवरून गुंडाळी करूनही ठेवावी लागतात. भारतीय समाजवादाची शोकान्तिका काही प्रयोग फसले असे नाही तर आपण तारू हाकारण्याचा कधी निर्धाराने प्रयत्नच केला नाही. केवळ भावना पुरेशी होईल व 'कोलंबसाचे गर्वगीत' आपण जोशाने गात राहिलो तर ते आपो–आप नवक्षितिजाचा किनारा गाठील, या मध्यमवर्गीय स्वप्नरंजनात आपण समाधान मानत राहिलो. असे झाले नसते तर, भांडवलशाहीच्या विरुद्धचे आक्षेप दूर झाले नसताना, व साम्यवाद झपाट्याने पराभूत होत असताना आता यापुढे मार्ग कोणता अशा विवंचनेत जग पडलेच नसते. भारतीय समाजवादी क्रान्तीचा आदर्श जगापुढे उभा राहिला असता. कारण अनिर्बंध

भांडवलशाही, व हुकुमशाही साम्यवाद हे दोन मार्ग टाळूनच लोकशाही समाजवाद भारतात आपले मार्गक्रमण करणार होता.

असा मार्ग शोधताना काही व्यावहारिक तडजोडी कराव्या लागतात. तशी सवलत सर्व विचारवंत नेत्यांनी आपल्या अनुयायांना दिलेली आहे. अगदी मार्क्सने देखील. "मार्क्स हा समीक्षक किंवा टीकाकार होता. समाजवादी समाजाच्या स्वरूपरचनेविषयी त्याने विचार केला नाही. भविष्यातील प्रश्न त्या त्या वेळी पाहून घेतले जातील अशी त्याची दृष्टी होती. भविष्याविषयी रचनात्मक विचार करणे हे त्याला स्वप्नरंजन वाटे; आणि तो त्याची निर्भत्सना करी. त्यामुळेच समाजवादी अर्थव्यवस्थेसंबंधी मार्क्सच्या लेखनात एक शब्दही आढळत नाही," असे उद्गार आपल्या नव्या आर्थिक धोरणाचे समर्थन करताना लेनिनने काढले. (मानवेन्द्रनाथ रॉय, नवमानवतावाद अनु. गोवर्धन पारीख, प्राज्ञ पाठशाळा, प्राज्ञमाला क्र. 1).

मार्क्स, गांधी, आंबेडकर ही भारतातील (विशेषतः महाराष्ट्रातील) समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कृतिशीलांची प्रेरणास्थाने आहेत. गांधीजींनी ही सवलत आपल्या अनुयायांना दिलेली होती. 'गांधीवाद' नावाचा माझ्या नावाचा काही 'वाद' बनवू नका, आणि माझ्या दोन मतात जर तुम्हाला फरक आढळला तर माझे नंतरचे मत हे अधिक परिपक्व आहे असे समजा, असे त्यांचे सांगणे असे. ('and if you are certain that I have retained my sanity in the meanwhile" असे पुरकही त्यांनी आपल्या विधानाला जोडले होते, व ते केवळ विनयात्मक शैलीचा एक आविष्कार म्हणून न करता मनापासून केले होते असे मानावयास हरकत नाही.) बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या भूमिका मांडल्या त्या त्यांच्या शिष्यांनी, अनुयायांनी तपासून पहाव्यात व शिष्याने गुरुविषयी योग्य आदर राखून गुरूचा वैचारिक क्षेत्रात प्रतिवाद केला तरी तो गुरूचा गौरवच आहे असे आंबेडकर यांचे सांगणे होते.

स्वतंत्र विचार करण्याच्या आपल्या उत्तरदायित्वापासून यामुळे तिघांपैकी कोणीही आपल्याला संरक्षण देऊ इच्छित नाही. गांधीजींनी कनवाळूपणे एक मंतरलेला ताईत मात्र आपल्या हाती दिला होता:

'मी एक मंतरलेला ताईत तुला देतो. ज्या ज्या वेळी हे करू की ते करू अशी शंका तुझ्या मनात निर्माण होईल त्या त्या वेळी तू आजवर कधी पाहिलेल्या अत्यंत दीन दरिद्री माणसाचे चित्र आपल्या नजरेसमोर आण, आणि स्वतःला असा प्रश्न विचार की, मी जे करीन ते या माणसाला उपयोगी होईल की नाही आणि त्या प्रश्नाचे उत्तर जर होकारार्थी आले तर तो मार्ग योग्य आहे असे तू समज.'

हा सनातन आणि तरीही अद्यतन संदर्भ आहे. आणि हा ताईत आपण हरवून आता जवळजवळ चार दशकांचा काळ उलटून गेला आहे.

अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना आल्फ्रेड मार्शल यांनी स्वतःविषयी सांगितलेल्या एका गोष्टीची आठवण होईल, मार्शल सांगतात :

"एके दिवशी बाजारात फिरत असता एका अत्यंत दीन दरिद्री माणसाचे चित्र मला आढळले. मी ते विकत आणले आणि माझ्या अभ्यासिकेत लावले, ज्या ज्या वेळी अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा मला कंटाळा येई त्या त्या वेळी मी त्या चित्राकडे पाही आणि स्वतःला म्हणे, 'तुझा अभ्यास या माणसाला उपयोगी पडू शकेल या श्रद्धेने तू तो चालू ठेवलाच पाहिजे,' आणि मी परत अभ्यासाकडे वळत असे." ( A. C. Pigou, MEMORIALS OF ALFRED MARSHALL )

अशी असंख्य हालती बोलती चित्रे पहावयास भारतात नुसती खिडकीतून बाहेर नजर टाकली तरी पुरेसे आहे.

### (4) जनतेचा सहभाग

हा ताईत जर आपण हरवला नसता तर आर्थिक विकासासाठी जो जनतेचा सहभाग आवश्यक आहे असे आपण मानतो तो उत्साहाने उपलब्ध करून घेण्यात आपण अपयशी झालो नसतो. 'सहभागी व्हा' असे आपण सतत सांगत राहिलो; परंतु 'अरे, कशासाठी ?' या त्यांच्या मूक प्रश्नाला आपल्याकडे उत्तर नव्हते.

अनेक गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत की, त्यांचा अधिक खुलासा करण्याची आवश्यकता असू शकते असेच आपण मानले नाही. 'साक्षर व्हा' – 'कशासाठी?' साक्षरतेचा प्रसार झाला की उत्पादनात वाढ होते असे जागतिक बँकेचे अभ्यासक सांगतात म्हणून ? की जागतिक बँक त्यासाठी काही खर्चाची तुम्हाला अट घालते म्हणून ? ती बँक तरी जनतेपर्यंत आपण काही पोचविण्याचा प्रयत्न केला या भ्रामक समाधानासाठी सांगते की, प्रत्यक्षात खरोखरच 'ग म भ न' चा आणि उत्पादनाचा काही संबंध आहे? माझ्या खेड्यात शिक्षणाच्या कोणत्या तरी स्तरावर तो तसा दिसतो का ? निदान साक्षरतेच्या व प्राथमिक शिक्षणाच्या तरी ? अशी मूक प्रश्नमाला कुटुंबनियोजन कार्यक्रमाविषयीही निर्माण होऊ शकेल. त्या प्रश्नांची पाळेमुळे केवळ आर्थिक नसतात तर समाजाला सर्व अंगाशी स्पर्श करणारी असतात, (गर्भाचे लिंग समजणे आज शक्य आहे; अनेक कारणांनी लोकांना, स्त्रियांनादेखील, मुलगी होणे नकोसे वाटते. त्या कारणांच्या पाळामुळांना हात घातला नाही तर स्त्रियांचे प्रमाणच भावी पिढ्यांत कमी होईल व लोकसंख्येच्या वाढीला आळा बसेल. हे इष्ट की अनिष्ट ? या मार्गाने हा आळा बसणे अनिष्ट आहे असेच सर्व सुजाण लोकांचे मत असेल. परंतु हे अनिष्ट टाळावयाचे असेल तर केवळ प्रचाराने ते टळणार नाही हे स्पष्ट असावयास हरकत नाही.

ज्या गोष्टीत लोकांचे हित स्पष्टपणे साठवलेले आहे त्या गोष्टी घडविण्याविषयी योग्य ती संघटनात्मक रचना केली की लोकांच्या कर्तृत्वाचा प्रवाह त्या दिशेने सहज वाहू लागतो. स्वयंसेवी संघटना त्या कामासाठी पुढे येतात. 'ग्राहक पंचायत' हा असाच महाराष्ट्रात एकदीड दशकापूर्वी एक प्रभावी प्रवाह राहिला, 'पाणी पंचायत' हा एक दुसरा प्रवाह. 'ग्राम पंचायत' हा तिसरा. 'प्रयोग परिवार' हा चौथा. महिलांना उद्योगासाठी अल्प भांडवल व्यक्तिगत हमीवर, बँकांच्या अडचणीत न आणता, आवर्ती ठेव म्हणून उपलब्ध करून देण्याचा युवा प्रबोधिनीचा प्रयत्न हा पाचवा, असे इतरही सांगता येतील. हे प्रवाह कसे सुरू होतात, कधी व का कुंठित होतात, ते प्रभावीपणे प्रवाही होण्यासाठी काय करावे लागेल या सारखे प्रश्न अर्थशास्त्राच्या महाराष्ट्रातील आजच्या अध्ययनात, अध्यापनात व संशोधनात आपण विचारात घेत नाही. जनतेच्या प्रश्नांशी बुद्धिजीवी वर्ग संपर्क साधून आहे असे आपण मग कसे म्हणू शकतो ?

या ठिकाणी मला एक आठवण होते एका लोकविलक्षण मोर्चाची. लोकविलक्षण यासाठी म्हणावयाचे की, असा मोर्चा अन्यत्र कुठेही (महाराष्ट्रात, भारतात वा जगात) व आजवर अन्य कधीही निघाल्याचे मला माहीत नाही. दुष्काळग्रस्त भागातील लोक शिवाजी विद्यापीठावर मोर्चा घेऊन आले होते. 'आमच्या प्रश्नां'चा अभ्यास करा, अन्यथा आमच्या अभ्यासासाठी तुमचे ग्रंथालय खुले करा, अशी त्यांची मागणी होती.

प्रथमदर्शनी हे आपल्याला विचित्र वाटते. परंतु तथाकथित विद्वत्तेच्या दुर्बोधीकरणाचा बुरखा दूर करण्यासाठी असेच व्हावे लागते. नर्मदा प्रकल्पाचे विरोधक तरी तुमच्याकडील सर्व माहिती अभ्यासासाठी आम्हाला उपलब्ध करून द्या असेच मागत होते व मागत आहेत की नाही ?

जनतेच्या सहभागाचे काही पैलू हे असे आहेत. काही समस्यांविषयी व त्या समस्यांच्या उत्तरांविषयीची सहमतीही या वातावरणनिर्मितीसाठी सर्वात पोषक ठरेल. ते उत्तरदायित्व राजकीय नेत्यांचे व राजकीय पक्षांचे आहे. परंतु केवळ त्यांचेच आहे असे नव्हे. हा केवळ दुसऱ्यावर दोषारोप करून आपण नामानिराळे होण्याचा प्रयत्न होऊ नये. 'तुम्ही एक बोट दुसऱ्यांकडे दाखवित असताना, तीन बोटे तुमच्याकडे बोट दाखवित असतात' या कडव्याची येथे आठवण होते. ती तीन बोटे, दुसऱ्याकडे एक बोट दाखवताना, आत दुमडलेली आपलीच बोटे असतात. आपले अंतर्मन आपल्यालाही नकळत आपला निर्णय देत असते.

## 7

## आपल्या हातातील पर्याय

मनमोहन सिंग यांच्या यापूर्वी निर्देश केलेल्या चर्चासत्र उद्घाटनाच्या भाषणात ते शेवटी म्हणाले होते : " Social science research can contribute a great deal to our understanding of the dynamics of social change and in helping

to evolve an integrated policy framework for dealing with the problems of poverty, ignorance and disease."

आपल्या भाषणात मनमोहन सिंग यांनी केलेले हे आवाहन ( किंवा सौम्य शब्दात दिलेले आव्हान ) अर्थातच अर्थशास्त्रज्ञांनाही लागू आहे. त्याचप्रमाणे एकूण बुद्धिजीवी वर्गालाही साक्षेपी अभ्यासाच्या आवश्यकतेचे त्यात सूचक आहे.

हे अभ्यास आंतरशास्त्रीय(Inter-disciplinary) पद्धतीने व्हावे लागतील. तुटवडा समस्यांचा नाही; अभ्यासकांचा व योग्य अभ्यासाचा आहे. खाली केलेले निर्देश केवळ उदाहरण म्हणून केलेले आहेत. माझ्या व्यक्तिगत माहितीप्रमाणे आर्थिक-सामाजिक परिवर्तनाचे हे पर्याय आता महाराष्ट्रात सिद्ध झालेले आहेत. इतरांच्या अनुभवातून अन्यही काही सुचू शकतील. येथे केलेल्या विधानांविषयीही मतभेद होऊ शकतील. अधिक वादविवाद प्रतिवाद यासाठी केलेली मांडणी यादृष्टीने त्यांच्याकडे पाहिले गेले तरी ते माझ्यादृष्टीने पुरेसे आहे.

अगदी आपल्या महाराष्ट्रातील असे आर्थिक व सामाजिक–शैक्षणिक काही प्रयोग सांगता येतील. एकेका व्यक्तीच्या नेतृत्वगुणावर व स्वार्थत्यागावर जर ते विसंबून असतील तर त्यांचे यश सार्वत्रिक करणे दुष्कर असते हे उघड आहे. परंतु अनेकदा ते तसे नसते. हे शोधून काढण्याच्यादृष्टीनेही हे अभ्यास व्हावयास हवेत. काही सामाजिक–शैक्षणिक प्रयोगांचा आर्थिक समस्येशी काय संबंध आहे असाही प्रश्न मनात उभा राहणे शक्य आहे. परंतु थोडया विचारांती या शंकेचे निरसन आपोआप होऊ शकेल असे वाटते.

महाराष्ट्रातील असे प्रयोग कोणते? काहींचा निर्देश यापूर्वीच आला आहे.

(1) विलासराव साळुंखे यांचा 'पाणी पंचायत'चा प्रयोग. सर्वोच्च स्तरापर्यंत मान्यता मिळूनही तो सार्वत्रिक का होऊ शकत नाही? कोणते राजकीय, सामाजिक, आर्थिक हितसंबंध आड येतात?

(2) अण्णासाहेब हजारे यांचा नवग्राम–निर्मितीचा राळेगाव शिंदीचा प्रयोग. हा सार्वत्रिक होऊ शकेल का? कसा, किंवा का नाही?

(3) आसपासच्या परिसरात परिवर्तनाचे प्रभावी काम करण्याचा म. वि. कौंडिण्य यांच्या संगमनेर महाविद्यालयातील प्रयोग. अन्य महाविद्यालयात असे कार्य होऊ शकेल काय? कसे, किंवा का नाही?

(4) अंधश्रद्धा निर्मूलनाचे नरेन्द्र दाभोलकर यांचे आंदोलन. याचा आणि आर्थिक परिवर्तनाचा संबंध येतो का? कसा? समाजपरिवर्तनाच्या या प्रयत्नासाठी विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षणसंस्था यांची शक्ती कशी वापरता येईल?

(5) अच्युतराव आपटे यांनी चालवलेले विद्यार्थी वसतिगृहांचे कार्य. स्वच्छ, शिस्तबद्ध, स्वस्त व विद्यार्थ्यांच्या अभ्यासेतर विकासाविषयीही प्रयत्नशील हेही सार्वत्रिक का होत नाही?

(6) शि. श्री. काळे यांच्या युवाप्रबोधिनीचे कार्य. ग्रामीण महिलांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी चाललेले प्रयोगशील प्रयत्न.

(7) श्रीपाद दाभोलकर यांचा 'प्रयोग परिवार' प्रयत्न. तीन दशकांच्या प्रयोगानंतर आता तो समाजापुढे आलेला आहे व जाणकारांत मान्यताही पावलेला आहे. आपल्याजवळील 10 गुंठे जागेत 5 माणसांच्या घराला एक वर्षासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू (धान्य, भाजी, जेवण, चारा, खत, अंडी, दूध, पाणी घर, कपडे, फळे, मसाला, लाकूड इत्यादी) घेता येतात व यासाठी लागणारे पाणी, सांडपाणी व वरखर्चाच्या पाण्यातून गाव पातळीवर (पावसाच्या पाण्यातूनच) सहज राखता येते, हा त्यांचा दावा (पृ. 57) कितपत युक्त आहे? (**केल्याने होत आहे रे**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मे 1991, पृ. 66.) तो खरा असल्यास किमान जीवनमानाचे, पर्यावरण संरक्षणाचे, स्वस्थ–समाधानी जीवनाचे अनेक आज अशक्यप्राय वाटणारे प्रश्न सुटण्याच्यादृष्टीने मार्गी लागू शकतील की नाही?

(8) आपल्याकडे महत्त्वाच्या प्रश्नांची साधी किंवा कडवी साक्षेपी चर्चाही होत नाही असा सततचा

अनुभव आहे. (रामजन्मभूमी–बाबरी मशीद वाद हा भावनात्मक क्षेत्रातील अपवाद). आर्थिक विकासाच्या संदर्भात महाराष्ट्रात नर्मदा प्रकल्पाविषयी झालेले आंदोलन व चर्चा हे एकमेव अपवादात्मक प्रभावी उदाहरण. 'माते नर्मदे' ने (दत्तप्रसाद दाभोलकर, राजहंस प्रकाशन पुणे, ऑगस्ट, 1990) शोधक पत्रकारितेच्या आक्रमक आवेशात एक भूमिका मांडली. अशा मांडणीत सामान्य माणसाला रस वाटेल अशी रंजकता असते परंतु अभ्यासकाला आवश्यक अशी तटस्थता नसते. 'नर्मदा : माता की बटीक' हे (वसंत पळशीकर, परिसर प्रकाशन, पुणे, डिसेंबर 1990), 'माते नर्मदे' ला उत्तर म्हणून लिहिले गेले. परंतु ते तात्त्विक स्तरावरून व्यावहारिक स्तरावर उतरलेच नाही. या माझ्या विधानांचेही हिरिरीने समर्थन किंवा प्रतिवाद करावा इतका रस किती जणांना आहे?

(9) **विकासनीतीचाच प्रश्न** : ही एक मूलभूत समस्या आहे. साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही या चर्चांच्याही पलीकडे जाऊ पाहणारी ही चर्चा आहे. टॉलस्टॉय, थोरो, गांधीजी, विनोबा, केन्स, शिलिंच आदींनी या चर्चेचे सूतोवाच करूनही पुष्कळच काळ लोटला आहे. परंतु आजही ती निर्णायक अवस्थेला आलेली नाही व कधी येईल असे दिसत नाही. कारण, येथे मूळ प्रश्न प्रत्येकाच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा व आपल्या तात्त्विक विचाराशी तो व्यक्तिगत जीवनात कितपत सुसंगत राहतो याचा आहे. हे तत्त्वज्ञान आकलन होणाऱ्या व्यक्ती थोड्या असतात व त्यांच्याशी सुसंगत असा आपला जीवनक्रम ठेवणाऱ्या तर विरळाच असतात. त्यांच्याशी चर्चा करावयास आलेल्या साम्यवादी लोकांना गांधीजी सांगत : "तुम्ही जर साम्यवादी असाल, तर स्वतःच्या जीवनात तावडतोब साम्यवादाच्या आचरणाला सुरवात करा." (गांधीजींचा हा आग्रह अयुक्त होता असे मला वाटते; साम्यवादाचा आग्रह अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनातून होणाऱ्या समाज परिवर्तनातून व्यक्तिपरिवर्तन असा असतो.) ही गांधीजींची अपेक्षा नव्या विकासनीतीच्या प्रवक्त्यांच्याबाबत मात्र अटळ आहे. (यामुळेच 'आपण सर्व सुखसोयी उपभोगणार व इतरांना मात्र गरजा मर्यादित ठेवा असा आग्रह धरणार", हा आक्षेप या तत्त्वज्ञानाच्या व्यावहारिक मर्यादा दाखवून देतो व म्हणूनच महत्त्वाचा आहे.) 'ज्यांना ही चर्चा करण्यात हौस आहे त्यांनी ती करावी व ज्यांना तसे आपले साधुशील जीवन घडवावयाचे असेल त्यांनी तसे घडवावेही. आमच्या मनात त्यांच्याविषयी नितान्त आदर राहील, परंतु संपूर्ण राष्ट्ररचना त्या संकल्पनेवर आधारित अशी करता येणार नाही,' असेच विकासक्रम आखणाऱ्यांचे व तो पार पाडणाऱ्यांचे या विषयीचे म्हणणे असेल. आय. जी. पटेल यांनी भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या रजत महोत्सवी भाषणामध्ये (1990) शेवटी सूचकपणे हे म्हटलेही आहे. या प्रश्नाच्या चर्चेत जगातील सर्व मान्यवर अर्थशास्त्रज्ञांना मनापासून रस राहिलेला आहे. कारण, मानवी जीवनाचीच ती मूलभूत समस्या आहे. याचे अवधान मात्र आपण ठेवलेच पाहिजे.

या यादीत आणखीही भर घालता येईल. तसे करण्याची आवश्यकता नाही.

भारत दुर्दैवीच असेल तर पुढील पाच वर्षांच्या काळात अनेक पंतप्रधान आणि त्यांच्याबरोबर नियोजन मंडळाचे उपाध्यक्षही येत राहतील आणि जात राहतील. पंजाब, काश्मीर, आसाम, तामीळनाडू यातील दहशतवादाच्या समस्या तशाच राहतील किंवा नवनवीन जागतिक तंत्रांनी अधिकच बिकट होत जातील. एखाद्या विपरीत कृतीने उत्तर प्रदेश व पर्यायाने भारतही त्याच खाईत लोटला जाईल. निर्धाराची पाऊले टाळणे अशक्य झाल्यामुळे आर्थिक अरिष्टही तसेच वाढत राहील.

राष्ट्र पूर्णपणे कोसळल्यानंतरच नवनिर्मितीच्या निर्धाराने उभे राहू शकते असाही जगाच्या इतिहासाचा एक भयानक दिलासा देणारा निष्कर्ष आहे. परंतु कधी कधी त्याआधीच गोर्बाचेव्हना सुचले त्याप्रमाणे आपापल्या संदर्भातील नवपरिवर्तनाचे शहाणपण नेत्यांना सुचते व आपले स्थान धोक्यात आणूनही ते योग्य ती पाऊले उचलू शकतात. नवयुगातला सॉक्रेटीस साखारोव्हसारखा विचारवंत आपले सर्वस्व पणाला लावून काळोख्या कालखंडातही आपली ज्योत तेवत ठेवू शकतो. ही आपली आशास्थाने व प्रेरणास्थाने असावयास हरकत नाही.

माझे व्याख्यान येथे संपले.

परंतु प्रतिपादनाचा सूर नीट थांबवावयाचा असेल

तर मला एका आश्वासनाचा व आवाहनाचा उच्चार केला पाहिजे. 'Programme ASSET' असे माझे या कार्यक्रमाचे अभिधान आहे. (ASSET हे Action for Simultaneous Social and Educational Transformation या शीर्षकाचे संक्षिप्त रूप आहे.) शिक्षक–प्राध्यापकांनी समाज प्रबोधन, पुरोगामी कायद्याचे प्रत्यक्ष समाजजीवनात परिपालन, व समाजपरिवर्तनासाठी संशोधन या स्वरूपाच्या कार्यात सहभागी व्हावे अशी यामागील संकल्पना आहे. केवळ दुःखनिवारणाचे विमोचन (relief) पद्धतीचे कामही महत्त्वाचे असले तरी त्याचा यात समावेश नाही. परिवर्तनासाठी संशोधन व प्रयोग ही मुख्य प्रेरणा असली पाहिजे. ध्येयवादी शिक्षक–प्राध्यापकांची स्वतःची शक्ती ज्या ठिकाणी अपुरी पडेल त्या ठिकाणी पूरक आर्थिक साहाय्याचीही तरतूद आहे. याविषयीची विशेष माहिती 'मैत्रीच्या पलीकडे' (Beyond Friendship) या षण्मासिकाच्या मार्च 1986, सप्टेंबर 1986, सप्टेंबर 1988 व सप्टेंबर 1990 च्या अंकात आली आहे (प्रकाशक : विद्यार्थी सहाय्यक समिती, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे 5.) या संदर्भात कोणी माझ्याशी संपर्क साधल्यास मला आनंदच होईल.

## संदर्भ सूची


1 AVARD Newsletter, WHITHER SOCIAL JUSTICE : OUR RESOLVES VS. THE REALITY (debates in the Indian Parliament). Vol. VI, No. 1-2, January-April, 1964.

2 Bellow, Walden, BRAVE NEW THIRD WORLD ? STRATEGIES FOR SURVIVAL IN THE GLOBAL ECONOMY, Institute for Food and Development Policy, San Fransisco, 1989.

3 Brown, Lester R. et. al., STATE OF WORLD, 1991, A Worldwatch Institute Report on Progress Toward a Sustainable Society.

4 Chakravarty, Sukhamoy, DEVELOPMENT PLANNING : THE INDIAN EXPERIENCE, Clarendon Press, Oxford, 1987.

5 Cole, J. P., THE DEVELOPMENT GAP : A SPATIAL ANALYSIS OF WORLD POVERTY AND INEQUALITY, 1981.

6 Dabholkar, Devdatta, INDIAN ECONOMISTS AND THE PROBLEM OF INDIAN POVERTY, Dubhashi Lecture, University of Poona, 1984.

7 Elkins, Paul (Ed.), THE LIVING ECONOMY : A NEW ECONOMICS IN THE MAKING, Routledge and Kegan Paul, 1986.

8 Henshaw, Stanlex K., INDUCED ABORTION : A WORLD REVIEW, 1990, Family Planning Perspeetives, March/April 1990.

9 I. M. F., PRIVATISATION AND PUBLIC ENTERPRISES, Occasional paper No. 56, January, 1988.

10 I. M. F., WORLD ECONOMIC OUTLOOK, October 1990.

11 Madison, Anguss, THE WORLD ECONOMY IN THE TWENTIETH CENTURY, OECD, Paris, 1989.

12 Ministry of Finance (Economic Division) Government of India, ECONOMIC SURVEY : 1989-90.

13 National Academy, U. S. Committee, TECHNOLOGY AND EMPLOYMENT : INNOVATION AND GROWTH IN THE U. S. ECONOMY, National Academy Press, 1987.

14 Nossiter, Bernard D., THE GLOBAL STRUGGLE FOR MORE : THIRD WORLD CONFLICTS WITH RICH NATIONS, A Twentieth Century Fund Essay, 1987.

15 O E C D, OECD ENVIRONMENTAL DATA COMPENDIUM, 1989 (Paris, 1989).

16 Patel, I. G., ECONOMIC POLICY AT THE CROSS ROADS, IDBI Silver Jubilee Commemoration Lecture, April 20, 1990.

17 Planning Commission, Government of India, TOWADS SOCIAL TRANSFORMATION : APPROACH TO THE EIGHTH FIVE YEAR PLAN, 1990-95 (Placed in the Parliament on 24-5-1990).

18 Porter, Michael E, THE COMPETITIVE ADVANTAGE OF NATIONS, 1990.

19 SARVEKSHANA, April-June 1990, "Class and Social Group Profile", NSSO, Vol. XIII, No. 4, Issue No 43

20 Shachatr, Arie and Oberg, Sture (Eds.), THE WORLD ECONOMY AND THE SPATIAL ORGANISAION OF POWER. 1990.

21 Singh, Tarlok (Ed.), SOCIAL SCIENCE RESEARCH AND THE PROBLEM OF POVERTY, Concept Publishing House, New Delhi, 1990.

22 Spaeth Anthony, " A Thriving Middle Class is Changing the Face of India", WALL STREET JOURNAL, May, 19, 1988.

23 UNDP, HUMAN DEVELOPMENT REPORT 1990, New York, OUP, 1990.

24 World Bank, WORLD DEBT TABLES, 1989-90, Washington D. C., 1989.

25 World Bank, WORLD DEVELOPMENT REPORT, 1990, New york, OUP, 1990.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य व हितचिंतक यांना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील व कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे व परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून व परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या / अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद'चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य व अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील व परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट, मनिऑर्डर इत्यादी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत व ते धुळे येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

**त्र्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

# विकसनशील देशांचे विदेशी कर्ज : अभिवृद्धीचे अरिष्ट *

जी. सी. द. कोस्टा **

अनुवाद :

स्वाती जोशी ***

* दिनांक 23 फेब्रुवारी 1991 च्या Economic and Political Weekly मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'External Debt of Developing Countries : Crisis of Growth' या लेखाचा अनुवाद.

** आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे भूतपूर्व प्राध्यापक, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

*** आर्थिक सहायक, आर्थिक विश्लेषण व नीती विभाग, भारतीय रिझर्व बँक, मुंबई.

(लेखाचा अनुवाद प्रसिद्ध करण्यास अनुमती दिल्याबद्दल लेखक जी. सी. द. कोस्टा आणि नियतकालिकाचे संपादक कृष्ण राज यांची मी आभारी आहे.

– अनुवादक )

## 1

### प्रास्ताविक

1980 च्या दशकामधील महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींमध्ये 'विदेशी कर्जाचे अरिष्ट' ह्याची प्रामुख्याने नोंद घ्यावी लागेल. विदेशी कर्जाच्या या अरिष्टाने साहजिकच अर्थतज्ज्ञ, विश्लेषक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे. प्रस्तुत लेखाच्या पूर्वार्धात आपण या विदेशी कर्जबाजारीपणाची व्याप्ती, त्याचे मूळ तसेच त्याशी निगडित असे आर्थिक परिणाम, हा कर्जभार निवारण्यासाठी केलेल्या व अमलात आणलेल्या उपाययोजना व त्यांच्या परिणामांचा, विशेषेकरुन या देशांच्या आर्थिक अभिवृद्धीवरील परिणामांचा, विचार करणार आहोत. उत्तरार्धात कर्जनिवारणाच्या प्रयत्नांचा विचार मुख्यत्वेकरुन आर्थिक समायोजन व समता ( economic adjustment and equity ) या तत्त्वांच्या संदर्भात केला आहे. या आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या अनुभवापासून भारतासारख्या वाढती विदेशी कर्जे घेणाऱ्या देशांनाही काही शिकण्यासारखे आहे हे दिसून येईल.

सन 1989 च्या अखेरीस सर्व विकसनशील देशांचे एकूण विदेशी कर्ज, 1290 महापद्म (billion) (1 महापद्म = 1,000 अब्ज डॉलर्स) इतके होते.[1] येथे एक नमूद करणे जरूरीचे वाटते की, विदेशी कर्जाच्या गंभीर समस्येने सर्वच विकसनशील देशांना भेडसावलेले नाही तर काही विशिष्ट देशांपुरता हा प्रश्न गंभीर बनला आहे. विदेशी कर्जाच्या चिंतेने

ग्रासलेल्या देशांचे दोन गट करता येतील. एक 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांचा गट, व दुसरा उपसहारा प्रदेशीय (sub-Saharan) आफ्रिकी देशांचा. पहिल्या गटात लॅटिन अमेरिकेतील अर्जेंटिना, बोलिव्हिया, ब्राझिल, चिली, कोलंबिया, कोस्टारिका, इक्वेडोर, मेक्सिको, पेरू, उरुग्वे व व्हेनिझुएला हे 11 देश, कॅरिबियन द्वीपसमूहातील जमेका, आशियातील फिलिपाइन्स उत्तर आफ्रिकेतील मोरोक्को, दक्षिण सहारा प्रदेशातील कोटे द'आयव्होएर व नायजेरिया (त्यांच्या अतिशय कर्जबाजारीपणामुळे या गटात समावेश केले आहेत) व युरोपमधील युगोस्लाव्हिया हे देश आहेत.[2] दुसऱ्या गटात, आफ्रिकेतील सहारा प्रदेशाच्या दक्षिणेकडील देश येतात. ते सर्व कमी उत्पन्न असलेले देश आहेत.[3] 1988 मध्ये 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांचे एकूण विदेशी कर्ज 508.6 महापद्म डॉलर, म्हणजे सर्व विकसनशील देशांच्या त्या वर्षातील एकूण कर्जाच्या 39.4 टक्के इतके होते. याच वर्षात, उपसहारा प्रदेशीय गटातील देशांचे एकूण विदेशी कर्ज 67.07 महापद्म डॉलर, म्हणजे सर्व विकसनशील देशांच्या एकूण कर्जाच्या 5.7 टक्के, होते. या दोन्ही गटांचे मिळून 1988 तील कर्ज सर्व विकसनशील देशांच्या एकूण कर्जाच्या 44.6 टक्के होते.

विदेशी कर्जाबाबतीतील प्रश्नांचे स्वरूप या दोन्ही गटातील प्रत्येक देशाच्या संदर्भात निरनिराळे होते असे दिसते. यानुसार, उपसहारा प्रदेशीय आफ्रिकी गटातील देशांचे एकूण कर्ज जरी 17 कर्जबाजारी देशांच्या एकूण कर्जाच्या तुलनेत व्याप्तीने कमी असल्याचे आढळले तरी त्यांच्या कर्ज परतफेडीचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा असल्याचा दिसतो. याची प्रमुख कारणे म्हणजे त्यांचे कमी उत्पन्न व निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नातील अस्थिरता. यामुळे स्वाभाविकतःच या देशांच्या कर्जाचा बराच विचार, काही कर्ज रद्द करण्याच्या सूचनांसह केला गेला आहे. अर्थात, या लेखात आपण केवळ फक्त याच देशांचा विचार न करता आत्यंतिक कर्जबाजारी देशांचा ढोबळमानाने व त्यातील अर्जेंटिना, ब्राझिल, मेक्सिको व व्हेनिझुएला या चार प्रमुख कर्जदार देशांचा विशेषत्वाने विचार करणार आहोत. या चार देशांचाच अंतर्भाव येथे करण्यामागचा हेतू हा की, 1980 च्या दशकातील आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या एकूण दीर्घकालीन कर्जापैकी सरासरीने दोनतृतीयांश कर्ज या चार देशांनी मिळून घेतलेले होते. त्यांच्या अनुभवावर आधारित कर्जसमस्येशी संबंधित असे काही उपयुक्त अनुमान काढणे व धडा घेणे शक्य होईल. या लेखातील सांख्यिकी माहिती जागतिक बँकेच्या World Debt Tables आणि " World Development Report तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ' International Financial Statistics ' मधून घेतली आहे.

## 2

## विदेशी कर्जाचे मूळ व त्याचा आकार
( Magnitude )

विदेशी कर्जाच्या समस्येचे मूळ हे विकसनशील देशांच्या आर्थिक अभिवृद्धीसाठी, विशेषेकरून आर्थिक अभिवृद्धीचा दर वाढविण्यासाठी, चाललेल्या प्रयत्नात देशाबाहेरील साधनसंपत्तीचा वापर करण्यात दडलेले आहे. 1960 च्या दशकाच्या मध्यापासूनच जागतिक व्यापाराच्या वाढीच्या उच्च दराचा फायदा घेऊन विकसनशील देशांनी विकासाच्या अंतर्गत अभिमुखतेच्या ( inward-oriented ) धोरणाकडे पाठ फिरवून बहिर्गत–अभिमुखता ( outward–oriented ) धोरणाचा स्वीकार करण्यास सुरवात केली. सन 1965-73 या कालावधीत 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांची आर्थिक वाढ अतिशय प्रभावीपणे, म्हणजे वार्षिक सरासरी 6.6 टक्के दराने, झाली. या कालखंडात आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरण अतिशय अनुकूल असे होते. उच्च उत्पन्न असलेल्या औद्योगिक देशांच्या वास्तव उत्पन्नाची वाढ वार्षिक सरासरी 4.5 टक्के दराने झाली, तर औद्योगिक देशांच्या वाढीशी अतिशय निकटपणे निगडित असलेल्या जागतिक व्यापाराच्या प्रमाणात भरीव अशी सरासरी 9 टक्के वार्षिक दराने वाढ झाली. तसेच उत्पादनक्षेत्रातील संरक्षणवाद या काळात कमीत कमी राहिला. या काळात व्यापार हा विकसनशील देशांच्यादृष्टीने वाढीचा वरदहस्त ठरला.

याविरुद्ध 1973 ते 80 हा कालखंड अतिशय अस्थिर कालखंड होता. अतिरिक्त आंतरराष्ट्रीय रोखता व औद्योगिक देशांतील चलन अतिवृद्धी ( Inflation ) यामुळे विनिमय दरविषयक ताण वाढला व याची

**तक्ता 1**

**आत्यंतिक कर्जबाजारी देशांचे एकूण विदेशी कर्ज ( 1970–88 )**

(महापद्म अमेरिकी डॉलर)

| | 1970 | 1975 | 1980 | 1981 | 1982 | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) **एकूण दीर्घकालीन कर्ज** | | | | | | | | | | | |
| (अ) संवितरित व अदत्त कर्ज | 28.8 | 76.6 | 204.1 | 244.8 | 277.6 | 334.3 | 360.3 | 377.1 | 414.1 | 461.2 | 443.1 |
| (आ) संवितरणे | 7.1 | 21.7 | 53.2 | 69.9 | 60.3 | 40.6 | 33.9 | 24.4 | 23.6 | 23.6 | 27.3 |
| (इ) मुख्य परतफेडी | 3.7 | 9.3 | 24.6 | 26.2 | 25.6 | 19.0 | 18.3 | 18.0 | 18.4 | 18.0 | 20.2 |
| (ई) व्याज देणी | 1.5 | 5.5 | 19.8 | 25.4 | 30.8 | 29.0 | 33.1 | 32.5 | 30.0 | 28.9 | 33.7 |
| (उ) एकूण ऋण परिव्यय | 5.3 | 14.8 | 44.4 | 51.6 | 56.4 | 48.0 | 51.4 | 50.5 | 48.4 | 46.9 | 53.9 |
| (ऊ) निव्वळ हस्तांतरणे | 1.8 | 6.9 | 8.8 | 18.4 | 3.9 | –7.5 | –17.5 | –26.1 | –24.9 | –23.3 | –26.6 |
| (2) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जाचा उपयोग | 0.2 | 1.3 | 3.0 | 4.1 | 6.2 | 12.3 | 14.7 | 18.3 | 20.1 | 22.0 | 18.0 |
| (3) अल्पकालीन कर्ज | — | — | 80.5 | 100.7 | 105.9 | 74.4 | 62.6 | 56.8 | 37.5 | 45.3 | 47.5 |
| (4) एकूण कर्ज | 29.0 | 77.9 | 287.6 | 349.6 | 389.7 | 421.0 | 437.6 | 452.2 | 471.7 | 528.5 | 508.6 |
| (5) अमेरिकेचा डॉलर लिबॉर (LIBOR) षण्मासिक दर (टक्के) | — | 7.75 | 14.03 | 16.72 | 13.60 | 9.93 | 11.29 | 8.64 | 6.85 | 7.30 | 8.10 |

**संदर्भ** : World Bank, WORLD DEBT TABLES ( विविध खंड ).

**तक्ता 2**

**17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांचे एकूण दीर्घकालीन विदेशी कर्ज** (1970–88) : कर्ज गुणोत्तरे

( टक्के )

| | कर्ज गुणोत्तरे | 1970 | 1975 | 1980 | 1981 | 1982 | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | **अ. क. सं क.** / स्थू. रा. उ. | 15.8 | 18.4 | 23.8 | 26.0 | 33.0 | 46.0 | 48.3 | 50.3 | 53.5 | 54.5 | 44.8 |
| (2) | **अ. क. सं. क.** / व. से. नि. | 124.8 | 122.7 | 124.5 | 146.1 | 191.6 | 242.5 | 233.8 | 247.1 | 314.6 | 305.2 | 257.4 |
| (3) | **ए. ऋ. प.** / स्थू. रा. उ. | 2.9 | 3.6 | 5.2 | 5.5 | 6.7 | 6.6 | 6.9 | 6.9 | 6.2 | 5.5 | 5.5 |
| (4) | **ए. ऋ. प.** / व. से. नि. | 22.9 | 24.0 | 27.2 | 30.9 | 38.9 | 34.8 | 33.4 | 33.9 | 36.6 | 30.8 | 31.6 |
| (5) | **व्या. दे.** / ए. ऋ. प. | 28.3 | 37.1 | 44.6 | 49.3 | 54.6 | 60.5 | 64.4 | 64.3 | 62.0 | 61.6 | 62.5 |
| (6) | **व्या. दे.** / व. से. नि. | 6.5 | 8.9 | 12.1 | 15.2 | 21.2 | 21.1 | 21.5 | 21.8 | 22.7 | 19.0 | 19.8 |
| (7) | **नि. ह.** / स्थू. रा. उ. | 1.0 | 1.7 | 1.0 | 2.0 | 0.5 | –1.0 | –2.3 | –3.5 | –3.2 | –2.8 | –2.7 |

**अ. क. सं. क.** = अदत्त कर्ज व संवितरित कर्ज, **व्या. दे.** = व्याज देणी, **ए. ऋ. प.** = एकूण ऋण परिव्यय, **नि. ह.** = निव्वळ हस्तांतरणे, **व. से. नि.** = वस्तू व सेवांची निर्यात, **स्थू. रा. उ.** = स्थूल राष्ट्रीय उत्पादन.

## तक्ता 3

### व्याज व चलन अतिवृद्धि दर (1973–87)

| | कालखंड | वार्षिक सरासरी (टक्के) |
|---|---|---|
| (1) पैशातील व्याजदर[अ] | 1973-80 | 9.3 |
| | 1980-87 | 10.5 |
| (2) चलन अतिवृद्धी दर[ब] | 1973-80 | 8.2 |
| | 1980-87 | 4.1 |
| (3) वास्तव व्याज दर [क] | | |
| (प) .... | 1973-80 | 1.3 |
| | 1980-87 | 5.6 |
| (फ) .... | 1976-80 | – 3.0 |
| | 1981-86 | 15.1 |

**टीपा :** (अ) सरासरी वार्षिक अमेरिकी डॉलर युरो–करन्सी दर.

(ब) स्थानिक चलनात दर्शविलेली औद्योगिक देशांच्या स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या मूल्य संकोचकांची (GDP deflators) भारित सरासरी ( weighted average ).

(क) सरासरी षण्मासिक अमेरिकी डॉलर युरो–करन्सी दर खालील प्रमाणे संकोचित ( deflated ) केला :

3 (प) अमेरिकेसाठी स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या मूल्यसंकोचकाने;

3 (फ) विकसनशील देशांसाठी निर्यात मूल्य निर्देशांकातील बदलांनी.

**संदर्भ :** World Bank, WORLD DEVELOPMENT REPORT, 1988, पृ. 29 आणि 37.

परिणती ब्रेटन वूड्सच्या समायोज्य–कीलन पद्धतीच्या ( adjustable-peg system ) ऱ्हासात व नियंत्रित तरत्या विनिमय दरपद्धतीच्या ( managed floating exchange rate system) उदयात झाली. तेला–व्यतिरिक्त इतर वस्तूंच्या तेजीची जागतिक बाजारात लाट येऊन त्यामुळे चलन अतिवृद्धीस अधिक प्रोत्साहन मिळून खनिज तेलाच्या किंमती भरमसाठ वाढल्या. औद्योगिक देशातील आर्थिक अभिवृद्धीचा दर या काळात सरासरी वार्षिक फक्त 2.8 टक्के इतकाच होता, आणि जागतिक व्यापारातील मंदीच्या स्थितीमुळे औद्योगिक देशांचा संरक्षणवादी धोरणाकडे कल वाढला. हे सर्व वातावरण विकसनशील देशांना अत्यंत निराशाजनक होते. तथापि अशा वातावरणातही 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांमध्ये या आठ वर्षात सरासरी वार्षिक 5.2 टक्के दराने आर्थिक वाढ झाली. ही वाढ मागील टप्प्याच्या तुलनेत जरी सरासरी वार्षिक 1.4 टक्केवारी अंकानी कमी असली तरी या काला–वधीत औद्योगिक देशांनी संपादलेल्या वार्षिक सरासरी वाढीच्या दरापेक्षा जवळजवळ दुपटीने जास्त होती. मंदीच्या व अनिश्चिततेच्या जागतिक वातावरणात या विकसनशील देशांनी जवळजवळ 5 टक्के आर्थिक वाढीचा दर राखणे हे नक्कीच स्पृहणीय म्हणावे लागेल.

1970 ते 1981 या काळात या देशाच्या पैसारूप दीर्घकालीन विदेशी कर्जात 28.8 महापद्म डॉलरपासून 244.8 महापद्म डॉलरपर्यंत म्हणजे सरासरी वार्षिक 21.5 टक्के दराने, वाढ झाली (तक्ता 1). यावेळी आंतरराष्ट्रीय वातावरण विक-सनशील देशांना कर्ज घेण्यास अनुकूल होते. याची कारणे पाहता असे दिसते की, 1973 व 1979 सालच्या तेलाच्या भाववाढीमुळे तेल निर्यातदार देशांनी औद्योगिक देशातील बँकामध्ये ठेवलेल्या ठेवीत प्रचंड वाढ झाली होती. परंतु आर्थिक मंदीच्या स्थितीपोटी औद्योगिक देशाकडून या बँक कर्जांना अतिशय कमी मागणी होती. या ठेवींचा विनियोग करण्याचा बँका–पुढे दुसरा उपाय म्हणजे त्यांचा ओघ विकसनशील देशांकडे वळविणे हाच होता. याचा परिणाम, प्रथमच विकसनशील देशांना मोठ्या प्रमाणावर खाजगी कर्जे उपलब्ध होण्यात झाला. या शिवाय, औद्योगिक देशातील चलन विस्तार व अतिरिक्त रोखतेमुळे चलन अतिवृद्धी दराच्या तुलनेत पैशातील व्याजाचे दर कमी

**तक्ता 4**

**17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांतील स्थूल आंतर्देशीय बचत व गुंतवणूक** (1965–1987)

| वार्षिक सरासरी (टक्के) | 1965-73 | 1973-80 | 1980-87 |
|---|---|---|---|
| (1) बचत / स्थूल राष्ट्रीय उत्पादन | 18.1 | 20.1 | 15.6 |
| (2) गुंतवणूक / स्थूल राष्ट्रीय उत्पादन | 21.7 | 25.0 | 20.9 |

**टीप** : 17 देशांची साधी सरासरी

**संदर्भ** : World Bank, World Development Report, 1989, तक्ता A 11 पृ. 139

ठेवले गेले. याचा परिणाम कर्जावरील कमी व्याज-दरात व अनेक वर्षे वास्तव व्याजदर ऋण राहण्यात प्रतीत झालेला दिसतो. (तक्ता 3). कमी व्याजदरात सुलभतेने भरपूर कर्ज मिळण्याची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आर्थिक विकासाला गती देण्यासाठी साहजिकच विकसनशील देश व्यापारी कर्जाची उभारणी करण्याकडे प्रवृत्त झाले. 1982 ते 88 या काळात पैसारूपी दीर्घकालीन कर्जाच्या दरसाल दर शेकडा वाढीचा दर 8.1 टक्क्यांइतका खाली आला. कारण, या कालखंडात वार्षिक संवितरणात (disbursement) तीव्र घट झाली.

1970 ते 81 या कालावधीत एकूण ऋण परिव्ययात (debt service) वार्षिक 23 टक्के दराने वाढ झाली. हा दर 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या दीर्घकालीन कर्जाच्या वाढीच्या तुलनेत विचार अंशतःच (Marginally) जास्त होता. याउलट, एकूण व्याज देणी सरासरी वार्षिक 29.1 टक्के दराने वाढली. मोठी वार्षिक संवितरणे व पैसारूप व्याजदरातील वाढ ही याची कारणे होत. तथापि, 1982 ते 87 या काळात जेव्हा दीर्घकालीन कर्ज वाढले, तेव्हा संवितरणात मात्र वार्षिक 17.1 टक्क्यांनी घट झाली. या पाच वर्षांत एकूण ऋण परिव्यय व एकूण व्याज देणी ही अनुक्रमे वार्षिक सरासरी 8.6 टक्के व 1.3 टक्के एवढ्या दराने घटली. या देशांच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनातला दीर्घकालीन कर्जाचा सरासरी वाटा 1970 ते 81 या काळात 24.9 टक्के होता, तो 1982 ते 88 या काळात जवळजवळ दुपटीने वाढला. कर्जातील वाढ व देशांच्या उत्पन्नात हळूहळू झालेली घसरण ही याच्या मागील कारणे सांगता येतील, (तक्ता 2). एकूण ऋण परिव्ययाचे वस्तू व सेवांच्या एकूण निर्यातीशी प्रमाण 1970–81 या काळात सरासरीने 29.1 टक्के इतके होते. तर 1982–88 या काळात ते 35.5 टक्के इतके वाढले. 1970–81 या काळात व्याज देणी एकूण ऋण परिव्ययाच्या सरासरी 47 टक्के इतकी होती, ती 1982 ते 86 या काळात 61.2 टक्क्यांवर गेली. या आकडेवारीवरून एकूण ऋण परिव्ययाचा वाढता हिस्सा व्याजाच्या देण्यांच्या रूपात असलेला दिसून येतो. यातून या देशांवरील परकी कर्जाच्या गंडातरात कर्जावरील व्याजाच्या दरांनी प्रमुख भूमिका बजावली असल्याचे लक्षात येते.

## 3

## विदेशी कर्ज व त्याचे आर्थिक परिणाम

17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांची संवितरणे 1975 ते 81 या कालखंडात सरासरी वार्षिक 21.6 टक्के दराने वाढली. स्थूल अंतर्देशीय बचत 1965–73 या काळात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या 18.1 टक्क्यांनी वाढली होती. तर 1973–80 या काळात ती 20.1 टक्क्यांनी वाढली. यावरून असे सिद्ध होते की, या देशांची विदेशी कर्जे ही त्यांच्या बचतीस संपूरक (complementary) अशी असून पर्यायी नव्हती. (तक्ता 4) या दोन्ही कालखंडात सरासरी स्थूल अंतर्देशीय गुंतवणुकीच्या (gross domestic investment) स्थूल अंतर्देशीय उत्पादनाशी असलेल्या टक्केवारीत वेगाने, म्हणजे 21.7 ते 25 टक्के, वाढ झाली, तर 1973–80 या काळात वास्तव उत्पन्न वार्षिक सरासरी 5.2 टक्क्यांनी आणि लोकसंख्या 2.4 टक्क्यांनी वाढली. त्यामुळे दरडोई वास्तव उत्पन्नात वार्षिक सरासरी 2.6 टक्के वाढ होऊ शकली. (तक्ता 5). या देशांनी या काळात आंतर्देशीय बचती-

तक्ता 5

1980 च्या किमतीनुसार स्थूल आंतर्देशीय उत्पादन (1965–88)

| सरासरी वार्षिक शेकडा बदल | 1965–73 | 1973–80 | 1980–85 | 1985–88 |
|---|---|---|---|---|
| **(अ) औद्योगिक देश** | | | | |
| (1) स्थूल आंतर्देशीय उत्पादन | 4.5 | 2.8 | 2.4 | 3.2 |
| (2) लोकसंख्या | 1.0 | 0.7 | 0.6 | 0.6 |
| (3) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन | 3.5 | 2.1 | 1.7 | 2.7 |
| **(आ) 17 आत्यंतिक कर्जबाजारी देश** | | | | |
| (1) स्थूल आंतर्देशीय उत्पादन | 6.6 | 5.2 | 0.2 | 2.2 |
| (2) लोकसंख्या | 2.6 | 2.4 | 2.4 | 2.3 |
| (3) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन | 4.2 | 2.6 | –2.6 | 0.4 |

**संदर्भ :** World Bank, WORLD DEVELOPMENT REPORT, 1989, तक्ते A2 आणि A4, पृ. 146–47.

साठी संपूरक म्हणून व गुंतवणुकीची पातळी उंचावण्यासाठी जर विदेशी कर्जाची मदत घेतली नसती तर हे अजिबात शक्य झाले नसते. हे वास्तव व्याज दर, म्हणजे पैसारुपी षण्मासिक अमेरिकी डॉलर–युरोकरन्सी दर (अमेरिकेच्या चलन अतिवृद्धीच्या दराशी समयोजित), 1.3 टक्के वार्षिक सरासरी दराने 1973–80 मध्ये बदलले. विकसनशील देशांच्या निर्यातीच्या एकक मूल्य निर्देशांकातील (index of unit value of exports) बदलाशी समयोजित करता वास्तव व्याजाचे दर उणे 3 टक्के या वार्षिक सरासरी दराने 1976–80 या काळात बदलले (तक्ता 3). पश्चिम गोलार्धातील देशांचे निर्यात एकक मूल्य 1975–81 या काळात ऋण परिव्ययातील वाढीपेक्षा थोड्या कमी गतीने, म्हणजे प्रतिवर्षी 15.8 टक्के दराने, वाढले. 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या निव्वळ वस्तु-विनिमयाच्या मूल्यतुल्यता दरात (net barter terms of trade) 1965 ते 73 मध्ये सरासरी 1.4 टक्क्यांनी तर 1973 ते 80 या काळात सरासरी 3.5 टक्क्यांनी सुधारणा झाली. 1965–80 या कालावधीत आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या निर्यात परिमाणात (export volume) प्रतिवर्षी सरासरीने 2.2 टक्के तर आयात परिमाणात सरासरी 5.1 टक्के वाढ झाली. निर्यात परिमाणातील वाढीचा प्रत्यक्ष फायदा आर्थिक अभिवृद्धीला चालना मिळण्यात व या गटाची आयात क्षमता वाढण्यात झाला तर आयात परिमाणातील वाढीचा फायदा अप्रत्यक्षपणे वाढीव आयातीमुळे गुंतवणुकीत वाढ होण्यात मिळाला. 1973 ते 82 या वर्षांत या 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांची सरासरी वार्षिक व्यापार तूट (trade debicit) फक्त 2 महापद्म अमेरिकी डॉलर इतकी होती. आयातवाढीपेक्षा निर्यातवाढ तुलनेने कमी असली तरीसुद्धा या काळात या देशांच्या मूल्यतुल्यता दरात वार्षिक 3 टक्क्यांपेक्षा जास्त वाढीमुळे हे शक्य झाले.

## 4

## कर्जाचे अरिष्ट व ते आटोक्यात आणण्याविषयीचा व्यूह (Strategy)

जगाच्या आर्थिक रंगमंचावरची कर्जाच्या अरिष्टाची पहिली चाहूल काहीशा आश्चर्यकारकपणे

तक्ता 6

**17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांचे बाह्य क्षेत्र**
(1965–88)

| | कालखंड | दरसाल दर शेकडा |
|---|---|---|
| **(अ) सरासरी बदल :** | | |
| निर्यात परिमाणात | 1965-80 | 2.2 |
| | 1980-85 | 2.4 |
| | 1986-88 | 1.9 |
| आयात परिमाणात * | 1965-80 | 5.1 |
| | 1980-85 | 8.2 |
| मूल्यतुल्यता दर | 1965-73 | 1.4 |
| | 1973-80 | 3.5 |
| | 1980-85 | – 1.3 |
| | 1986-88 | – 5.1 |
| | | **महापद्म अमेरिकी डॉलर** |
| **(आ) सरासरी वार्षिक (शेष) व्यापार** | 1973-82 | – 2.0 |
| | 1983-86 | 32.7 |
| चालू खाते | 1973-80 | –23.1 |
| | 1983-86 | – 5.8 |

**टीप :** * 17 देशांची साधी सरासरी

**संदर्भ :** (1) World Bank, WORLD DEVELOPMENT REPORT, 1989, तक्ता A 8, पृ. 150 आणि तक्ता 14, पृ 190-91.
(2) International Monetary Fund, INTERNATIONAL FINANCIAL STATISTICS, विविध खंड.

मेक्सिको या तेलनिर्यातदार देशाकडून लागली. तेलाला मिळालेल्या अनुकूल आंतरराष्ट्रीय किमतीमुळे मेक्सिकोच्या निर्यात उत्पन्नात वेगाने वाढ झाली. त्या आधारावर मेक्सिकोने आपले स्थूल अंतर्देशीय उत्पादनाशी असलेले गुंतवणुकीचे प्रमाण 1973–78 मध्ये 22.8 टक्के होते ते विदेशी कर्जाच्या सहाय्याने 1979–81 मध्ये 27.7 टक्क्यांपर्यंत वेगाने वाढविले. 1981 साली तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा खाली गेल्या व हे उच्च गुंतवणूक प्रमाण टिकाव धरू शकले नाही. वाढते व्यवहार, उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांतील घटती आर्थिक अभिवृद्धी आणि मालाच्या घटणाऱ्या किमती यातून निर्माण झालेल्या बिघडत्या जागतिक आर्थिक परिस्थितीमुळे इतरही मोठी विदेशी कर्जे घेतलेल्या कर्जदारांची परिस्थिती यासारखीच वा कठीण झाली. व्यापारी बँकांनी या देशांची देशांतर्गत उपभोग व बचत या बरोबर घेतलेली कर्जे फेडण्याची क्षमता याची सांगड घालताना होणारी कुचंबणा लक्षात घेऊन कर्ज देण्याचे प्रमाण कमी केले. याच बँका 'ओपेक'च्या शिलकी (surpluses) विकसनशील देशांकडे वळविण्यासाठी सहाय्यभूत झाल्या होत्या. 1982 पर्यन्त आत्यंतिक कर्जबाजारी देशाकडे येणारे भांडवली प्रवाह जवळजवळ आटले होते. विशेषतः यामुळेच कठीण (difficult) परिस्थिती निर्णायक (critical) बनली.

विकसनशील देश 1980 च्या दशकात कर्जाच्या अरिष्टाप्रत पोहोचण्याचे कारण त्यांनी 1970 च्या दशकात अतिरिक्त कर्जे घेण्यात आहे असे अनेकांचे मत आहे. यावरील अॅन ओ क्रुगर ( Anne O Krueger ) यांचे मत मार्मिक आहे. त्या नमूद करतात, " लक्षणीय नवीन कर्ज असतानासुद्धा 1977 मधील अदत्त कर्जाचे (outstanding debt) वास्तव मूल्य 1972 मधील पातळीपेक्षा कमी होते. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी टक्केवारी पाहता विकसनशील देशांच्या कर्जात 1977 पर्यंत लक्षणीय वाढ नव्हती."[4] त्या पुढे म्हणतात, "... जगभर व्यापलेली चलन अतिवृद्धीची परिस्थिती पाहता, 1973–78 मधील भांडवली प्रवाह टिकाऊ नाहीत हे सांगायला एकूण आकडेवारी पुरेशी आहे."[5] खरे पाहता, 1980–81 पर्यंत या 17 देशांतील दोन महत्त्वाची प्रमाणे, स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी असलेले कर्जाचे प्रमाण व वस्तू व सेवांच्या निर्यातीशी असलेले कर्जाचे प्रमाण ही त्यांच्या निर्णायक पातळीच्या खाली होती, तर त्यांचे ऋण परिव्ययाचे निर्यातीशी असलेले प्रमाण व व्याजाच्या देण्यांचे निर्यातीशी प्रमाण, ही प्रमाणे अतोनात कर्जबाजारीपणामुळे तुलनेने खालच्या पातळीला होती (तक्ता 2). शिवाय, दीर्घकालीन कर्जातील वाढीची गती 1970 ते 1975 या दरम्यान

जेवढी होती तेवढीच ती 1975 ते 1981 दरम्यान होती. याचा अर्थ, सत्तराव्या दशकाच्या उत्तरार्धात या देशांच्या दीर्घकालीन कर्जाच्या वाढीत त्वरण (acceleration) नव्हते. अर्थात, अल्पकालीन कर्जाच्या वाढीत 1975–81 या दरम्यान जरा उचल खाल्ली होती हे खरे आहे. तथापि, 1980–81 मध्ये या देशांचे अल्पकालीन कर्ज एकूण विदेशी कर्जाच्या सरासरीने फक्त 24.8 टक्के होते.

विकसनशील देशांनी सत्तराव्या दशकाच्या मुख्य कालखंडात अतिरिक्त कर्ज घेतले हा जर त्यांचा दोष मानता येत नाही, तर मग त्यांच्यापैकी बऱ्याच देशांवर ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीस कब्जा मिळविणाऱ्या या कर्ज अरिष्टाची उकल कशाने करता येईल? याचे उत्तर पुढीलप्रमाणे देता येते. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात दोन प्रभावी घटकांमुळे विकसनशील देशांवरील कर्जाचा भार नाट्यमयरित्या वाढला. पहिला घटक असा की, 1979 च्या तेलाच्या भाववाढीला औद्योगिक देशांनी संकोचक (contractionary) पैसाविषयक व विस्तारवादी (expansionary) राजकोषीय अशा मिश्र धोरणाने उत्तर दिले. त्यामुळे जरी चलन अतिवृद्धीचा दर कमी झाला तरी पैसारूप व्याजदरात तीव्रतेने वाढ झाली. वास्तव व्याजाचे दर सत्तराव्या दशकात कमी किंवा ऋणात्मकसुद्धा होते, ते झपाट्याने धनात्मक झाले आणि कर्जदार देशांची वार्षिक ऋण परिव्यय दायित्वे (debt service obligations) मोठ्या प्रमाणात वाढली. वास्तव व्याजाचा दर 1980–87 मध्ये अमेरिकेच्या चलन अतिवृद्धीच्या दराच्या संदर्भात प्रतिवर्षी सरासरी 5.6 टक्के तर विकसनशील देशांच्या निर्यात किमतींच्या संदर्भात 1981–86 मध्ये 15.1 टक्के होता. दुसरा घटक असा की, औद्योगिक देशांनी अनुसरलेल्या चलन अतिवृद्धीविरोधी उपायांची परिणती म्हणून या देशांतील मंदी गडद झाली. आणि जागतिक व्यापार घटला. अ–तेल (non-oil) व तेलजन्य वस्तूंच्या किमतीत घट होण्यास कारणीभूत असलेल्या घटकांमध्येही हा घटक येतो. कर्जदार देशांच्या मालाच्या किमतीत व मागणीत तीव्र घट झाल्याचा परिणाम म्हणजे या देशांच्या ऋण परिव्ययाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी निर्यात वाढविण्याच्या संधींवर मर्यादा पडली.

या नवीन आर्थिक परिस्थितीत अनेक प्रमुख कर्जदार देशांच्या ऋण परिव्यय जबाबदारीची पूर्तता करण्याच्या अचानक निर्माण झालेल्या या अशक्यतेत, कर्ज प्रश्न सोडविण्याच्या उपाययोजना आंतरराष्ट्रीय नाणे निधीने मध्यवर्ती बँकांच्या व या स्थितीच्या परिणामाखाली आलेल्या व्यापारी बँकांच्या सहकार्याने आखल्या व कार्यान्वित केल्या. त्या उपाययोजनांच्या तपशिलात देशादेशांमधील स्थानिक परिस्थितीनुसार फरक असला तरी, विदेशी कर्जाच्या प्रश्नांची अंतिम जबाबदारी कर्जदार देशांची स्वतःचीच आहे असाच सर्वसाधारण दृष्टिकोन मांडला गेला. यावरून ध्वनित होणारे धोरण असे : कर्जदार देशांनी देशांतर्गत साधनसामग्रीचा वापर वाढविला पाहिजे, अर्थसंकल्पातील तूट कमी केली पाहिजे, अर्थव्यवस्थेतील भाववाढीच्या वेगाला आळा घातला पाहिजे आणि विनिमय दराचा मूल्य–ऱ्हास (depreciation) करून त्याद्वारे आपल्या विदेशी खात्यात वाढावा निर्माण करून आपल्या विदेशी देण्यांच्या जबाबदाऱ्या पुऱ्या केल्या पाहिजेत. 'समायोजन' (adjustment) हा येथे परवलीचा शब्द झाला आणि कर्ज अरिष्टाचे निवारण करण्याची, किंवा किमान त्याची तीव्रता कमी करण्याची, जबाबदारी संपूर्णपणे विकसनशील देशांच्या खांद्यावरच टाकण्यात आली. आंतरराष्ट्रीय नाणे निधी आपल्या बाजूने, औद्योगिक देशांतील बँकांच्या सहाय्याने अदत्त देणी पुनर्सूचित (rescheduling) करण्यासाठी तसेच तातडीच्या ऋण परिव्ययाची रास्त व्यवस्था करण्यासाठी काही वित्त पुरवठा करू शकेल.

## 5

## कर्जविषयक व्यूहाची आर्थिक परिणती

आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदावरून (balance of payments) स्पष्ट होते की, हे देश विदेशी कर्जाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी व्यापारातील वाढावा निर्माण करण्यात यशस्वी झाले. 17 कर्जबाजारी देशांचा वस्तू व्यापार शेष 1973–82 या कालावधीत वार्षिक सरासरी –2 (उणे दोन) महापद्म अमेरिकी डॉलर होता, तो 1983–86 या काळात अनुकूल तर झालाच, त्याखेरीज त्याने वार्षिक सरासरी 32.7 महापद्म डॉलरची उंची गाठली. चालू खात्यातील शेष 1973–82 मध्ये

वार्षिक सरासरी 23.1 महापद्म डॉलर होता तो 1983–86 या काळात झपाट्याने सुधारून सरासरीने फक्त –5.8 महापद्म डॉलरपर्यंत खाली आला. व्यापारशेषातील भरघोस बदल व चालू खात्याच्या शेषातील तुटीतील वेगवान घसरण हे या देशांच्या चलनाच्या तीव्र मूल्यऱ्हासाचे फळ होते. उदाहरणार्थ, ब्राझिलचा पैसारूप विनिमय मूल्य दर, 1973 ते 1977 या काळात स्थिर होता व 1980 त जरासा खाली आला होता, तो 1983 मध्ये 1,160 टक्क्यांनी घसरला व 1985 त त्यात आणखी 1,069 टक्क्यांनी घसरण झाली. मेक्सिकोत पैसारूप विनिमय दर 1973–75 च्या दरम्यान स्थिर होता, तो 1980 पर्यंत 183.6 टक्क्यांनी व 1985 पर्यंत 119.3 टक्क्यांनी घसरला. 1980 ते 86 या वर्षात वास्तव विनिमय दर ब्राझिलमध्ये 100 पासून 68 पर्यंत तर मेक्सिकोत 100 पासून 47.7 पर्यंत घसरला. कर्जदार देशांचे व्यापारशेष व चालू खाते शेष एका बाजूला आणि वास्तव विनिमय दर दुसऱ्या बाजूला, यातील संबंध सरळ सरळ व्यस्त राहिला आहे, ही गोष्ट या ठिकाणी प्रकर्षाने आढळते. सत्तराव्या दशकाच्या उत्तरार्धात अनेक कर्जदार देशांचे विनिमय दर अतिमूल्यांकित होते हे निर्विवाद आहे. तथापि, ऐंशीच्या दशकात त्यांनी ज्या प्रमाणात आपल्या चलनांचे अवमूल्यन केले ते निश्चितपणे अतिरिक्त आणि अनावश्यक होते.

लॅटिन अमेरिकेतील देश उच्च चलन अतिवृद्धी दरासाठी प्रसिद्ध आहेत. ब्राझिल व मेक्सिकोमध्ये 1965 ते 1980 मध्ये अतिवृद्धीचे (inflation) वार्षिक सरासरी दर अनुक्रमे 31.3 टक्के व 13 टक्के होते, ते 1980 ते 1987 मध्ये वाढून अनुक्रमे 166.3 टक्के व 68.9 टक्के झाले. अर्थात येथे नमूद करावयास हवे की, चलन अतिवृद्धीच्या दरातील ही तीव्र वाढ या देशांना भासणाऱ्या देशी व विदेशी साधनसंपत्तीच्या तीव्र चणचणीचा परिपाक होता. विदेशी साधनसंपत्तीचा तुटवडा हा भांडवली अंर्तप्रवाहांच्या ठप्प होण्यामुळे, तर देशी साधनसामग्रीचा तुटवडा अंतर्गत बचतीचा ओघ बाह्य देणी फेडण्यासाठी वळविल्यामुळे आणि वास्तव उत्पन्नातील घटीमुळे निर्माण झालेला होता. साधनसामग्रीच्या तुटवड्याच्या कारणाने अंतर्गत पैशाच्या पुरवठ्यात वेगाने वाढ करण्यात आली. ती वाढ 1973-80 या काळातील वार्षिक सरासरी 44.5 टक्क्यांपासून 1981–85 मध्ये 97.6 टक्क्यांपर्यंत झाली. ही वाढ व चलनाचे तीव्र अवमूल्यन या दोहोंच्या परिणामाने चलनवाढीस चालना मिळाली. जसा चलनफुगवट्याचा दबाव वाढू लागला तसे बाह्य खाते क्षेत्राच्या अपेक्षित गरजा पूर्ण करण्याच्यादृष्टीने वास्तव विनिमय दराची योग्य पातळी राखावी म्हणून चलनाचे पुनःपुन्हा अवमूल्यन करणे जरूरीचे बनले. अशा तऱ्हेने चलन अतिवृद्धी आणि अवमूल्यन यांचे दुष्टचक्र सुरू झाले.

भांडवली अंर्तप्रवाहांची स्थगिती व विदेशी कर्जाच्या देण्यासाठीचा वाढता दबाव यामुळे विदेशी गंगाजळीच्या पातळीत घट होऊन कर्जदार देशांच्या आयात पातळ्याही खाली गेल्या. ब्राझिल, मेक्सिको व व्हेनिझुएला या देशांतील जे आयात परिमाण 1965-80 मध्ये अनुक्रमे 8.2, 5.7 व 8.7 टक्के वार्षिक सरासरी दराने वाढले होते ते 1980–87 या काळात अनुक्रमे –4.2, –8.1 व –7.0 टक्के इतक्या तीव्रतेने घटले. 17 देशांच्या गटात आयात परिमाणातील वाढ (तक्ता 6) 1965–80 मध्ये वार्षिक सरासरी 5.1 टक्के होती, ती 1980–85 मध्ये –8.2 टक्के इतकी झाली. सरासरी स्थूल अंतर्गत गुंतवणुकीचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण 1973–80 या काळाशी तुलना करता 1980–87 मध्ये 25 टक्क्यांपासून 20.9 टक्क्यांपर्यंत घटले (तक्ता 4). याची कारणे दोन आहेत. एक म्हणजे ज्या अंतर्गत बचतीतून बऱ्याच देशांच्या एकूण गुंतवणूक शक्य निधीच्या 90 टक्के भाग उपलब्ध होऊ शकत असे, त्या ऋण परिव्ययाची गरज भागविण्याकडे वळविल्या गेल्या. दुसरे असे की, 1982 पूर्वी 17 आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या जवळजवळ 2 टक्के भाग साधनसामग्रीच्या रूपाने परदेशातून मिळत असे. त्यानंतर या देशातून स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा जवळजवळ 3 टक्के भाग प्रतिवर्षी देशाबाहेर पाठविला जाऊ लागला. या देशांच्या आर्थिक अभिवृद्धीचा दर 1973–80 तील वार्षिक सरासरी 5.2 टक्क्यांपासून 1980–85 त सरासरी 0.2 टक्के इतका खाली आला (तक्ता 5). हा दर 1986 मध्ये 3.5 टक्क्यांपर्यंत वाढला परंतु 1987–89 यामध्ये तो सरासरी 1.6 टक्क्यांपर्यंत घसरला. 1988 मध्ये या देशांतील आर्थिक वाढ औद्योगिक देशातील बेताच्या उच्च वाढीला व जागतिक

व्यापारातील तीव्र वाढीला प्रतिसाद देऊ शकली नाही. 1981–83 या वर्षात महत्त्वाच्या कर्जदार देशांपैकी बऱ्याच देशांमध्ये वाढीचे ऋणात्मक दर प्रस्थापित झाले : अर्जेंटिना –2.9, ब्राझिल –1.6 व व्हेनिझुएला –1.7 टक्के प्रतिवर्ष. शिवाय, 17 कर्जबाजारी देशांमध्ये स्थूल आंतर्देशीय उत्पादनातील वार्षिक सरासरी दरडोई बदल 1973–80 तील +2.6 टक्क्यांपासून 1980–85 त –2.6 टक्के व पुढे 1985–88 मध्ये (थोडा धनात्मक) म्हणजे 0.4 टक्के असा झाला. या दर डोई उत्पन्नातील घसरणीचा तडाखा साहजिकच या कर्जबाजारी देशांतील लोकसंख्येच्या दुर्बल घटकांनी सोसला.

## 6

## कर्जविषयक व्यूहाचे मूल्यमापन

आपण मागे असे म्हटले आहे की, कर्जविषयक धोरणाने समायोजनाचे सर्व ओझे पूर्णपणे कर्जदार देशांवर टाकले. औद्योगिक देशांचा समायोजनातील सहभाग फक्त परतफेडीच्या कालावधीचा विस्तार करणे व कर्जफेडीस साहाय्य करण्यासाठी थोड्याफार पैशांची व्यवस्था करणे एवढाच मर्यादित राहिला. या दृष्टिकोनामधून विदेशी कर्जबाजारीपणाचे खापर सर्वस्वी या कर्जदार देशांच्याच माथी फोडले गेले असे दिसते. परंतु सर्वसाधारणपणे पाहता, कर्ज अरिष्ट निर्माण करणारे अनेक घटक कार्यरत होते आणि हे सर्वच घटक काही कर्जदार देशांच्या बाजूने काम करीत नव्हते. शिवाय विकसनशील देशांनी सत्तराव्या दशकात अतिरिक्त कर्जे घेतली हा आरोप निखालसपणे सिद्ध झाला नाही. विकसनशील देशांनी मोठी विदेशी कर्जे घेतली हे खरे होते, व त्यांच्या गुंतवणुकीची प्राधान्यस्थळे नेहमी अचूक होतीच असेही नव्हते. शिवाय, ऐंशीच्या दशकात या देशांवरील विदेशी कर्जाच्या ओझ्यात वेगाने वाढ झाली होती. हे सर्व पाहता आत्यंतिक कर्जबाजारी झालेले देश या न पेलवणाऱ्या परिस्थितीत येऊन पडले याचे कारण त्यांनी अतिरिक्त कर्जे घेतली असा निष्कर्ष काढण्याचा येथे मोह होणे साहजिक आहे.

परंतु हा निष्कर्ष योग्य आहे असे वाटत नाही. कारण, कर्जे घेण्याच्या वेळची आंतरराष्ट्रीय परिस्थिती अशी होती की, घेतलेली कर्जे परत करण्याची पूर्ण क्षमता विकसनशील देशांमध्ये होती. पैसारूप व वास्तव व्याजाचे दर कमी होते व कर्जावरील पैसारूप व्याजाच्या दरातील वाढीपेक्षा या देशांच्या निर्यातमालाच्या किमतीतील वाढ जास्त वेगाने होती. असे असूनही, सत्तराव्या दशकात विकसनशील देशांनी अतिरिक्त कर्जे घेतली असे मान्य करूनदेखील ऐंशीच्या दशकातील कर्जाचे अरिष्ट ही त्याची परिणती आहे असे म्हणता येणार नाही. खरे पाहता, पूर्णतः बदललेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणानेच कर्ज अरिष्ट ओढवले आहे. विशेषतः औद्योगिक देशांनी अनुसरलेल्या संकोचक पैसाविषयक धोरण व विस्तारक राजकोषीय धोरण यांच्या सहयोगामुळे विकसनशील देशांनी घेतलेल्या कर्जावरील पैसारूपी व वास्तव व्याजाचे दर वेगाने वाढले. त्याचबरोबर औद्योगिक देशांच्या अर्थव्यवस्थातील मंदीच्या लाटेमुळे कर्जदार देशांच्या निर्यातीची मागणी घटली व जागतिक व्यापारातील कुंठिततेमुळे (stagnation) निर्यातीचे एकक मूल्य तसेच मूल्यतुल्यता दर हेही घटले. यातून फारतर असे अनुमान काढता येईल की, आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणात पुढे घडू शकणाऱ्या नाट्यपूर्ण घडामोडींचा अदमास घेण्यास व त्यांच्या कर्जभारावर होऊ शकणाऱ्या परिणामांचा अंदाज करण्यास विकसनशील देश चुकले, हा त्यांचा दोष आहे. हे खरे मानले तर, हीच गोष्ट धनको देशांनाही तितकीच लागू पडते.

कोणतेही समायोजन हे एखाद्या विशिष्ट प्रश्नाला तोंड देणाऱ्या सर्व पक्षांनी केले पाहिजे हे एक सर्वसंमत तत्त्व आहे. कर्ज अरिष्टामुळे ज्याप्रमाणे कर्जबाजारी देशांची बाह्य अटी पूर्ण करण्याची क्षमता अडचणीत आली त्याचप्रमाणे औद्योगिक देशांतील व्यापारी बँकांच्या स्थैर्यालाही त्यामुळे धोका पोहोचला. शिवाय, जसे विकसनशील देशांचे अतिरिक्त कर्ज घेणे हे कर्ज अरिष्टाच्या कारणांपैकी एक होते त्याचप्रमाणे विकसित जगाची आर्थिक धोरणेही कर्ज अरिष्टाला तितकीच मोठ्या प्रमाणावर जबाबदार होती. सर्वसाधारणतः औद्योगिक देशांमधून, विशेषतः अमेरिकेमधून या विकसनशील देशांच्या कर्ज अरिष्टाला कार्यान्वित करणारे घटक प्रामुख्याने निर्माण झाले. यामुळेच जर विदेशी कर्जबाजारीपणा निवारण्यासाठी, किंबहुना तो कमी करण्यासाठीच्या, कर्जविषयक धोरणाने औद्योगिक

देशांनाही समायोजन करायला लावले असते तर ते जास्त सयुक्तिक ठरले असते. परंतु कर्ज धोरणतज्ज्ञांनी या कर्ज प्रश्नाचा विचार त्यादृष्टीने केलेलाच नाही. त्यांच्या मते, कर्ज अरिष्टामुळे औद्योगिक देशांतील व्यापारी बँकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, म्हणून कर्ज धोरण असेच हवे की त्यामुळे औद्योगिक देशांतील व्यापारी बँकांना विकसनशील देशांत उघडे पडण्यापासून (exposure) मुक्त करता येईल. आपल्या व्यापारी बँकांचे हितसंबंध जपण्याव्यतिरिक्त औद्योगिक देशांनी समायोजनाला जागतिक आर्थिक वातावरण सुधारण्याच्यादृष्टीने मदत करण्यासाठी जवळजवळ काहीच प्रयत्न केलेले दिसत नाहीत. खरोखर, ऐंशीच्या दशकात बेल्जियम, स्पेन व युनायटेड किंग्डम हे देश वगळता कुठल्याही औद्योगिक देशात वास्तव विनिमय दर व चालू खाते शेष यातील ऋणात्मक संबंध दिसून आलेले नाहीत. हे कर्जदार देशांत दिसून आलेल्या वास्तव व्याजाचा दर व चालू खाते शेष यातील व्यस्त संबंधाच्या सरळसरळ विरुद्ध परिस्थिती दाखवते.

याव्यतिरिक्त, समायोजनाची अर्थपूर्ण संकल्पना असे सुचविते की, समायोजन करणाऱ्या देशांतील अंतर्गत व बाह्य तोल एकाचवेळी साधला गेला पाहिजे. म्हणजेच, बाह्य तोल अंतर्गत तोलाच्या बदल्यात वा अंतर्गत तोल बाह्य तोलाची किंमत देऊन मिळवून चालणार नाही. जर एक तोल साधण्यासाठी दुसऱ्या तोलाचे मोल द्यावे लागत असेल तर ते समायोजनाची मूळ संकल्पनाच निष्प्रभ करते. जवळजवळ 40 वर्षांपूर्वी रॅग्नर नर्क्स यांनी त्यांच्या समतोल विनिमय दराच्या संकल्पनेवरील लेखात ह्याशी अगदी मिळतेजुळते असे निरीक्षण मांडले आहे. "एखादा देश आपला व्यापारशेष समतोलात ठेवण्यासाठी एकूण आंतर्देशीय पैसारूप उत्पन्नाच्या पातळीचे उत्पादनक्षमतेशी असलेले प्रमाण मुद्दाम खाली राखून आयातीची मागणी कमी ठेवेल तर व्यापारशेष समतोलात राहील; परंतु तरीही अशा विनिमय दराला खरा विनिमय दर असे संबोधणे उचित होणार नाही, कारण त्यासाठी देशाने मंदी वा बेकारी या रूपाने किंमत मोजलेली असेल."[6] ते पुढे म्हणतात, "अर्थात राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी आणखी दबलेली ठेऊन व त्यायोगे आयातीची मागणीही कमी राखून हा देश त्याच्या व्यापारशेषात वाढावाही निर्माण करू शकेल. परंतु हे अनावश्यक स्व–पीडन होईल."[7] या त्यांच्या निरीक्षणाधारे असे नक्कीच म्हणता येईल की, कर्जदार देशांतून केवळ ऋणपरिव्ययाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी म्हणून कर्जदार देशांच्या शिलकी पिळून बाहेर काढणारे आणि परिणामी त्यांचे वास्तव उत्पन्न घटविणारे असे आत्ताचे हे कर्जविषयक धोरण नर्क्स यांनी नक्कीच अमान्य केले असते.

एकंदरित असे वाटते की, कर्जविषयक धोरणातील मूळ त्रुटी कर्जाची समस्या काय आहे–म्हणजे ती निव्वळ वित्तीय समस्या नसून हस्तांतरणाची समस्या आहे–हे समजून न घेण्याची चूक करण्यात आहे. अनेक वर्षांपूर्वी जर्मन हानिपूर्तीच्या (reparation) वादप्रश्नावरील बर्टिल ओहलिन यांच्याबरोबरील गाजलेल्या वादात जॉन मेनार्ड केन्स यांनी प्रतिपादन केले होते की, हस्तांतरणाची समस्या ही अंदाजपत्रकी समस्येच्या फार पलीकडची समस्या आहे व त्यांनी असा इशाराही दिला होता की, जर्मनीत हानिपूर्ती करण्यास आवश्यक असलेला वाढावा निर्माण करण्यासाठी वास्तव मजुरीत आत्यंतिक घट करावी लागेल. त्यांनी लिहिले आहे, माझ्या मते एखाद्या देशाची आर्थिक संरचना शेजारी देशांच्या आर्थिक संरचनेच्या तुलनेत निर्यातीची एक नैसर्गिक पातळी ठरविते; कृत्रिम मार्गांनी सरधोपटपणे या पातळीत मौलिक बदल घडविणे अत्यंत कठीण आहे."[8] केन्स हे लादलेली जर्मन हानिपूर्ती देणी भागविण्यासाठी वाढावा निर्माण करू शकण्याच्या क्षमतेबाबत निराशावादी होते. पण कर्जविषयक धोरणाच्या पुरस्कर्त्यांच्या मनात असा कोणताही निराशवादी विचार डोकावला नाही. त्यांनी बेधडकपणे, अत्यंत प्रतिकूल असे आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरण असतानाही, ऋण परिव्ययासाठी गरज असलेल्या प्रचंड शिलकी या कर्जदार देशांतूनच शक्य असेल तेवढ्या जलदपणे त्यांच्या अर्थव्यवस्थांचे अंतर्गत समायोजन करून पिळून काढता येतील असे मानले. अशा एकेरी हेतूने त्यांनी या आपल्या उद्दिष्टाचा पाठपुरावा केला. दुर्दैवाने ते त्यात यशस्वी झाले. आपण पाहिले की, कर्जदार देशांच्या व्यापारशेषात मोठा उलटा बदल झाला व त्यांच्या चालू खात्यातील शेषातील तूट वेगाने कमी झाली. हे सर्व मूल्यतुल्यता दरात घट होऊनसुद्धा त्यांच्या निर्यात परिमाणात थोडीशी वाढ व आयात परिमाणात बरीच घट होऊन प्राप्त झाले ( तक्ता 6 ). पण या सर्व बाह्य खात्याच्या

रुपांतराची किंमत, पूर्वी नोंद केल्याप्रमाणे, या देशांच्या दरडोई उत्पन्न व आर्थिक अभिवृद्धीच्या प्रचंड घसरणीत मोजावी लागली. ब्राझिलमध्ये वास्तव दर डोई उत्पन्नाची 1980 ची पातळी पुन्हा त्या स्थितीस आणणे 1987 मध्ये शक्य झाले; मेक्सिकोमध्ये 1987 मध्येही वास्तव दरडोई उत्पन्न 1980 च्या पातळीच्या अजूनही 9 टक्क्यांनी खाली होते.

कर्जधोरण सपशेल फसल्याची जाणीव योजनाकारांना 1980 च्या दशकाच्या मध्यास व्हायला सुरुवात झाली. 1988 मध्ये बेकर योजना सादर केली गेली. या योजनेमध्ये प्रगत जगातील व्यापारी बँकांचे कर्जदार देशांतील व्यवहार, 1985–88 या काळात, प्रतिवर्षी 7 महापद्म डॉलरनी वाढविणे आणि जागतिक बँक व प्रादेशिक विकास बँकांची संवितरणे प्रतिवर्षी दुपटीने वाढवून 3 महापद्म डॉलर या पातळीवर आणणे, हे मुद्दे मांडले होते. 1989 मध्ये ब्रॅडी योजना मांडली गेली. त्यात मुद्दलाचे पुनर्सूचन व वित्तीय प्रवाहांची तरतूद या व्यतिरिक्त कर्जदार देशांच्या एकूण कर्ज साठ्यात सावकाश घट करण्याचा प्रस्ताव होता. या योजनांची व्याप्ती मर्यादित असली तरीही बरेच नुकसान अगोदरच होऊन गेल्यानंतर त्या आल्यामुळे त्यांची उद्दिष्टे सफल होऊ शकली नाहीत. विशेषतः या योजना कर्जदार देशांकडून विकसित देशांकडे गेलेल्या निव्वळ हस्तांतरणाचा प्रवाह पुन्हा उलटा वळविण्यात अपयशी ठरल्या. 1983–88 या कालखंडात कर्जदार देशांतून प्रतिवर्षी सरासरी 21 महापद्म डॉलर इतक्या प्रचंड प्रमाणात विदेशी विनिमय देशाबाहेर गेल्यामुळे या देशांच्या गुंतवणूक करण्याच्या व आर्थिक अभिवृद्धीला चालना देण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला होता (तक्ता 1). अलीकडेच जागतिक बँकेला नाईलाजाने कबूल करावे लागले आहे की, "पद्धतशीर कोसळणे हे जरी टाळता आले असले तरी, बऱ्याचशा अतिशय कर्जबाजारी देशांच्याबाबतीत कर्ज अरिष्ट हे आर्थिक अभिवृद्धीवरील अरिष्ट ठरले आहे."[9]

या सर्वांतून कर्जधोरणाचे पुनर्मूल्यांकन करण्याकडे लक्ष गेले. नवीन कर्जधोरणाचे सार असे आहे: कर्ज कमी करण्यास आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक यांचा अधिकृत पाठिंबा राहील तसेच त्यांच्याकडून अधिकृतपणे वित्तपुरवठा होईल; मात्र त्यासाठी कर्जदार देशांनी समर्थ व परिणामकारक समायोजना कार्यक्रमाची त्याला जोड दिली पाहिजे.[10] आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणाची सध्याची उदवर्धकता (buoyancy) लक्षात घेता असे धोरण उपयुक्त ठरू शकेल. याउलट, जागतिक आर्थिक वातावरणात शिथिलपणा टिकून राहू लागला तर कर्जदार देशांची गुंतवणूक वाढविण्याची क्षमता वाढणार नाही व त्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थांची वाढ नव्यानव्या धोरणामुळे खुंटून राहील. या देशांची कर्जविषयक समस्या हलकी करण्यासाठी एकमेव महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांची आर्थिक अभिवृद्धी हाच होय.

1965–73 या काळात कर्जदार देशांच्या आर्थिक अभिवृद्धीचा दर औद्योगिक देशांच्या आर्थिक अभिवृद्धीच्या दरापेक्षा जास्त होता. 17 आत्यंतिक कर्जदार देशांत वार्षिक सरासरी अभिवृद्धीचा दर 6.6 टक्के तर औद्योगिक देशांत तो 4.5 टक्के होता. कर्जदार देशांच्या दर डोई उत्पन्नात 4.2 टक्के वार्षिक दराने वाढ झाली तर औद्योगिक देशांच्या दर डोई उत्पन्नात 3.5 टक्के वार्षिक दराने वाढ झाली. या दोन गटांच्या दर डोई उत्पन्नामधल्या तफावतीतील अंतर कमी होण्याची ही घटना म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याला पोषक ठरणारी विकासाची प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. सत्तराव्या दशकात हा कल असाच राहिला, तथापि ऐंशीव्या दशकात हे चित्र बदलले. 1980–85 दरम्यान औद्योगिक देशांत दर डोई स्थूल आंतर्देशीय उत्पादन व स्थूल राष्ट्रीय उत्पादन यातील सरासरी वार्षिक वाढीत किरकोळ घट झाली. याच वेळी 17 आत्यंतिक कर्जदार देशांत जवळजवळ काहीच वाढ झाली नाही, आणि लोकसंख्येतील वार्षिक 2.4 टक्के वाढ लक्षात घेता, दर डोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन वार्षिक सरासरी 2.6 टक्क्यांनी घसरले. 1985–88 या काळात या परिस्थितीत अगदी नाममात्र सुधारणा झाली. परिणामी, साठाव्या दशकाच्या मध्यापासून ते सत्तराव्या दशकाअखेरपर्यंत संकोचणारी वास्तव उत्पन्नातील दरी ऐंशीव्या दशकात पुन्हा रुंदावू लागली. जगामध्ये समन्यायी व स्थिर व्यवस्था यावयास हवी आहे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठी ही घटना गंभीर मानावी लागेल.

# 7

## भविष्याबद्दलचा दृष्टिकोन

कर्जदार देशांचे समायोजनाचे प्रयत्न पाहता, कर्ज अरिष्टाची उकल करण्याची मदार आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणातील सुधारणांवरच आहे. विशेषेकरून चार गोष्टी जरूरीच्या आहेत. एक, औद्योगिक देशांनी त्यांची आर्थिक अभिवृद्धी समाधानकारकपणे होईल अशा तऱ्हेच्या योजना राबविल्या पाहिजेत. त्यामुळे विकसनशील देशांच्या निर्यातीस मागणी निर्माण होईल. दुसरे, व्याजाचे दर कमी पातळीस ठेवण्याची जरूरी आहे. विकसनशील देशांच्या विदेशी कर्जाच्या परिव्ययाचा खर्च सुसाध्य पातळीवर राहण्यासाठी हे जरूर आहे. ह्या एका घटकाला कर्ज समस्येत अनन्यसाधारण महत्त्व आहे; कारण आपण पाहिलेच आहे की, मोठ्या कर्जदारांची व्याजाची देणी (एकूण ऋण परिव्ययाच्या सरासरी 60 टक्के) भांडवली अंतर्प्रवाहांच्या व्याजदराशी संबंधित आहेत. ब्राझिल व मेक्सिकोमध्ये, ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीस जेंव्हा भांडवली अंतर्प्रवाह आटले तेव्हा त्यांच्या कर्जावरील व्याज देणी व्याजाच्या दराबरोबर एकाचवेळी व समानपणे 1985–87 या काळात कमी झाली. तिसरे, विकसनशील देशांच्या निर्यात किंमतीतील अधोमुख प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी असे काही उपाय शोधले पाहिजेत की ज्यामुळे या देशांच्या निर्यातीची क्रयशक्ती संपुष्टात येणार नाही. शेवटी, जागतिक व्यापाराचे वातावरण अनुकूल असायला हवे, कारण केवळ अशाच वातावरणात विकसनशील देशांकडून त्यांच्या अर्थव्यवस्था खुल्या करण्याची तसेच आर्थिक अभिवृद्धीच्या बहिर्मुख धोरणाचा पाठपुरावा करण्याची अपेक्षा करता येईल.

या संदर्भातला सध्याचा अनुभव संमिश्र आहे. 1977–83 या काळात औद्योगिक देशांची आर्थिक अभिवृद्धी वार्षिक सरासरी 2.5 टक्क्यांनी झाली. ही वार्षिक वाढ 1980–82 या मंदीच्या वर्षांमध्ये 1.3 टक्के इतकी कमी होती. केवळ 1984 या वर्षात अभिवृद्धीचा दर 1976 मधील दराइतका, म्हणजे 4.5 टक्के इतका, गाठला गेला. दुर्दैवाने 1985–87 या काळात औद्योगिक देशातली वाढ वार्षिक सरासरी 3 टक्के दराच्या भोवतीच घुटमळत राहिली. दुसऱ्या बाजूने, समाधानाची बाब म्हणजे, पैसारूप व्याजाचा दर [अमेरिकी डॉलर ठेवींवरील षण्मासिक लिबॉर (LIBOR) दर] 1980–84 तील सरासरी 13.1 टक्क्यांपासून 1985–89 मध्ये सरासरी 8 टक्क्यांपर्यंत घसरला. तथापि, औद्योगिक देशांतील चलन अतिवृद्धीचा दरही – स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या चलनसंकोचकानुसार मोजला असता–या दोन्ही काळात वार्षिक सरासरी 7 टक्क्यांवरून 3.5 टक्क्यांपर्यंत घटला. पैसारुप व्याज दरातील घट चलन अतिवृद्धीच्या दराशी तुलना करता कमी दराने होती. या पार्श्वभूमीवर या दोन्ही काळांच्या दरम्यान सरासरी वास्तव व्याजाचे दर वार्षिक 6.2 पासून 4.6 टक्क्यांपर्यंतच कमी झाले. ही घटना निश्चितपणे अभिनंदनीय होती. तथापि, ऐंशीच्या दशकातील कर्जदार देशांच्या निर्यातमूल्यात वेगाने झालेल्या घसरणीमुळे ती निष्प्रभ झाली. याच कालखंडांच्या दरम्यान विकसनशील देशांच्या निर्यातमूल्यांच्या संदर्भात सरासरी व्याजाचा दर 11.4 टक्क्यांपासून 8.1 टक्क्यांपर्यंत घसरला असला तरी अजूनही तो बराच अधिक होता. ज्यावेळी औद्योगिक देशांतील आर्थिक अभिवृद्धी अधिक समाधानकारक असेल आणि संरक्षणवादाचा आघात (incidence) कमी केला जाईल त्याचवेळी व्यापारउदीमाच्या वातावरणात सुधारणा होऊ शकेल.

कर्जदार देशांवर त्यांच्या अंतर्गत अर्थव्यवस्थांचे समायोजन करणे जर लादले गेले आहे तर कर्जसमस्या सुलभ करण्यासाठीची मोठी जबाबदारी उच्च उत्पन्न असलेल्या देशांवर येऊन पडते. केवळ हेच देश आर्थिक अभिवृद्धीला चालना देऊ शकणाऱ्या व जागतिक व्यापारात सातत्य राखू शकणाऱ्या योग्य गुंतवणुकीच्या योजनांद्वारे कर्जदार देशांच्या निर्यातीस मागणी व निर्यात किंमतींना उद्वर्धकता (buoyancy) पुरवू शकतील, आणि योग्य पैसाविषयक व राजकोषीय उपायांद्वारे पैसारूप व वास्तव व्याजाचे दर अर्थपूर्ण पातळीवर राखू शकतील. कुणी विचारू शकेल की, कर्जदार देशांना कर्जबाजारीपणावर मात करण्यासाठी साहाय्यकारी योजना उच्च उत्पन्न असलेल्या देशांनी का म्हणून अमलात आणाव्यात ? या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. ह्या योजना उच्च उत्पन्न असलेल्या देशांनाच प्रामुख्याने व प्रत्यक्षपणे फायदेशीर आहेत. अधिक वास्तववादी व्याज दरामुळे

गुंतवणुकीस चालना मिळेल व आर्थिक अभिवृद्धीच्या कारणाने या देशांतील बेकारीची पातळी खाली येऊ शकेल. या देशांतील आर्थिक अभिवृद्धीचा दर जागतिक व्यापारास गतिशील बनवितो, संरक्षणवादाचा दबाव टाळतो आणि त्यामुळे या देशांतील साधनसामग्रीच्या अधिक चांगल्या पुनर्वाटपाला मदत करतो. शिवाय, औद्योगिक देशांतील या योजना अप्रत्यक्षपणे कर्जदार देशांतील अभिवृद्धीस व त्यांच्या निर्यातमूल्यात सुधारणा घडवून आणण्यास जितकी मदत करतील तितकी उच्च उत्पन्न देशांतील आर्थिक अभिवृद्धी व रोजगार वाढ यांचे भवितव्य उजळ होईल.

एकूण औद्योगिक देशांपैकी अमेरिकेलाच कर्ज-समस्या हलकी करण्याकरिता जशी विशेष भूमिका बजावणे आवश्यक आहे तसेच त्यासंबंधीची वाढती जबाबदारीही पेलायला हवी आहे, कारण या कर्जसमस्येने अमेरिकेच्या मागील दारीच, लॅटिन अमेरिका उपखंडातच, ठाण मांडले आहे. इसाह फ्रँक ( Isaiah Frank ) यांनी एकीकडे अमेरिका आणि दुसरीकडे सर्वसाधारणपणे विकसनशील देश, त्यातही विशेषेकरून कर्जदार देश, यांच्यातील दुव्याच्या स्वरूपाचे सुस्पष्ट वर्णन केले आहे.[11] त्यांनी नमूद केले आहे की, ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीस अमेरिकेच्या एकूण निर्यातीच्या जवळजवळ 40 टक्के निर्यात विकसनशील देशांना होत होती आणि ती युरोपीय समुदाय व जपान यांना अमेरिका करीत असलेल्या एकत्रित निर्यातीपेक्षाही जास्त होती. विकसनशील देशांच्या उत्पन्नातील 1981–83 च्या गंभीर कर्ज अरिष्ट काळातील तीव्र घसरणीमुळे अमेरिकेची सरासरी वास्तव निर्यात 17 महापद्म डॉलरनी घटली. याचा परिणाम या देशांतील हजारो लोक बेकार होण्यात झाला. अमेरिकेच्या वाढत्या व्यापार तुटीला अमेरिका व विकसनशील देशांच्यामधील बिघडलेले व्यापारसंबंध मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत असे त्यांनी म्हटले आहे. या कालखंडात अमेरिकेला प्रत्यक्ष गुंतवणुकीद्वारे मिळणारे उत्पन्न वार्षिक सरासरी 7 महापद्म डॉलरनी घटले. त्यांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत लॅटिन अमेरिकेचे असलेले महत्त्व स्पष्ट केले आहे. अमेरिकेच्या विकसनशील देशांशी असलेल्या एकूण व्यापारापैकी 40 टक्के व्यापार लॅटिन अमेरिकेशी आहे, आणि तेथील प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या 60 टक्क्यांवर गुंतवणूक लॅटिन अमेरिकेत आहे. लॅटिन अमेरिकेतील देशांची परिस्थिती 1979-80 सालच्या तेलाच्या किमतीतील वाढ, ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीची जागतिक आर्थिक मंदीची स्थिती आणि व्याज दरातील तीव्र वाढ या तीन घडामोडींमुळे नियंत्रणाबाहेर गेली, हे सत्य विशद करताना फ्रँक म्हणतात, "अमेरिकेवर लॅटिन अमेरिकेच्या कर्ज समस्येच्या सोडवणुकीचा परिणाम काय होईल हे आर्थिक अभिवृद्धी, व्याजाचे दर व संरक्षणवादाचे काय होते यावर अवलंबून आहे."[12]

1988 मधील उद्वर्धकतेला (औद्योगिक देशांच्या अर्थव्यवस्थांतील वाढीचा 4.2 टक्के दर व जागतिक व्यापार परिमाणातील वाढीचा 9 टक्के दर ) 1989 मध्ये जास्त मर्यादा पडल्या. त्या वर्षी औद्योगिक देशांच्या वाढीचा दर गतवर्षीच्या तुलनेत 3.5 टक्के व जागतिक व्यापार परिमाणातील वाढ 6.7 टक्के इतकी राहिली. कर्जदार देशांच्या कर्ज परिस्थितीवर याचा थोडासाच परिणाम झाला. यातून स्पष्टपणे ध्वनित होते की, कर्जदार देशांना त्यांच्या गुंतवणूक पातळ्या उंचावण्यास मदत केली असता या देशांतील आर्थिक अभिवृद्धीची प्रक्रिया मार्गस्थ होईल. अर्थसंकल्पातील तूट व पैसारूप व्याज दरात आढळलेले व्यस्त संबंध लक्षात घेता, अमेरिकेची अर्थसंकल्पातील तूट कमी करणे हे प्रधान उद्दिष्ट राहिले पाहिजे. यामुळे कर्जदार देशांसाठी कर्जाच्या शर्ती सौम्य होऊ शकतील. याचबरोबर, विशेषेकरून अनिश्चित व अस्थिर आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणात तरत्या व्याजाचे दर असलेल्या मोठ्या कर्जाऊ रकमांनी आर्थिक विकासाला वित्त उपलब्ध करून देण्याच्या कोणत्याही प्रयत्नामध्ये असलेल्या खाचखळग्यांबद्दल विकसनशील देशांनी आत्यंतिक कर्जबाजारी देशांच्या, विशेषतः लॅटिन अमेरिकेच्या, अनुभवावरून सावधान राहायला हवे. विशेषतः जे देश कर्जाच्या सापळ्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत त्यांनी या कर्जबाजारी देशांच्या उदाहरणावरून स्वतःला योग्य असे धडे घ्यायला हवेत.

## संदर्भ टीपा

1 World Bank, WORLD DEBT TABLES, 1989-90, EXTERNAL DEBT OF THE DEVELOPING COUNTRIES, VOL. I, ANALYSIS AND SUMMARY TABLES, Washington D. C., 1989, पृ. 2.

2 अगदी अलीकडील एका विभागणीनुसार या गटा-तील देशांची संख्या 19 पर्यंत वाढली आहे. त्यामध्ये मूळच्या 17 देशांतील कोलंबिया, जमैका, नायजेरिया आणि युगोस्लाव्हिया हे चार देश वगळले असून कांगो प्रजासत्ताक, होंडुरास, हंगेरी, निकाराग्वा, पोलंड आणि सेनेगल यांचा नव्याने समावेश केला आहे. या नव्या विभागणीमध्ये या देशांचे पुढे दिलेल्या कर्ज गुणोत्तरांपैकी कमीत कमी तीन गुणोत्तरे त्यांच्यापुढे कंसात दिलेल्या मर्यादेत असायला हवीत : [अ] स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी असलेले कर्जाचे प्रमाण [30 ते 50 टक्के], [आ] वस्तू व सेवांच्या निर्यातीशी असलेले कर्जाचे प्रमाण [165 ते 275 टक्के], [इ] निर्यातीशी असलेले उपार्जित [accrued] ऋण परिव्ययाचे प्रमाण [18 ते 30 टक्के]; [ई] निर्यातीशी उपार्जित व्याजाचे प्रमाण [12 ते 20 टक्के]. World Bank, तत्रैव, पृ. XIX.

3 या गटातील देश पुढीलप्रमाणे : मध्य आफ्रिकी प्रजासत्ताक, कांगो, इक्वेटोरियल गिनी, गबन, द. गांबिया गिनी, लायबेरिया, मादागास्कर, मालावी, मॉरिटानिया, मोझांबिक, नायजेर, सेनेगल, सिएरा लिओन, सोमालिया, सुदान, टांझानिया, टोगो, युगांडा, झैरे आणि झांबिया. यापैकी कांगो व सेने-गल आता 17 देशांच्या गटात गेले आहेत.

4 "Debt, Capital Flows and LDC Growth," ECONOMIC IMPACT, 1987, पृ. 7.

5 तत्रैव.

6 Nurkse, Ragnar, "Conditions of International Monetary Equilibrium," in American Economic Association, READINGS IN THE THEORY OF INTERNATIONAL TRADE, George Allen & Uniwn, London, 1950, पृ. 10.

7 तत्रैव, पृ. 12.

8 Keynes, John Maynard, "The German Transfer Problem" in READINGS IN THE THEORY OF INTERNATIONAL TRADE, उपरोक्त, पृ. 167.

9 World Bank, WORLD DEVELOPMENT REPORT, 1989, पृ. 17.

10 तत्रैव, पृ. 19.

11 Frank, Isaiah, "Financing Third World Economic Growth," ECONOMIC IMPACT, 1988, पृ. 11.

12 तत्रैव.

□□

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्यांची यादी

( एप्रिल–जून 1991 अंकावरून पुढे चालू )

575 प्रा. रमेश ल. बिडवाई, उमरखेड (जि. यवतमाळ)

576 प्रा. अनंत नाना लोखंडे, सावे (ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर)

# भारताचे प्रचलित आर्थिक अरिष्ट : महत्त्वाचे पैलू *

**पुलिन नायक** **

अनुवाद :

**संतोष दास्ताने** ***

## 1

### प्रस्तावना

भारत सध्या फार मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. स्वातंत्र्यानंतर देशापुढे आलेल्या आर्थिक संकटांपैकी हे सर्वात अधिक गंभीर असे संकट आहे. आपल्या वित्तीय क्षेत्राची सध्या अगदी कठीण परीक्षा आहे. विदेशी बाजाराचे क्षेत्रही अगदी तीव्र संकटात आहे. गेल्या तीन–चार वर्षांत आपल्या निर्याती मुबलक वाढल्या अशा अधिकृत घोषणा अधुनमधून होत असल्या तरी अशी परिस्थिती आहे. गेली सुमारे दहा वर्षे आपल्या उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च कितीतरी जास्त आहे व यामुळे सरकारला मोठे देशांतर्गत विदेशी कर्ज उभारावे लागत आहे. केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकाचा सर्वात मोठा भाग आता केवळ कर्जावरील व्याजासाठी खर्च होतो, इतके आपले कर्ज फुगले आहे. कोणत्याही समर्थनामध्ये न बसणारे अनावश्यक खर्च अखंडपणे वाढत चालले आहेत. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि काही प्रशासकीय अडचणी यामुळे उत्पन्नावर जादा कर वसूल केला जाण्याची शक्यताही दिवसेंदिवस मंदावत चालली आहे. कराचे स्थूल देशांतर्गत उत्पन्नाशी असणारे प्रमाण आताच कितीतरी जास्त आहे आणि आता अल्प काळात तरी ते वाढण्याची शक्यता नगण्य वाटते. शासनाच्या भांडवली आणि चालू खर्चात लक्षणीय कपात करणे एकतर अनिष्ट वाटत आहे किंवा अर्थातच दोन्हीही ! तथापि, दुसरा कोणता पर्यायही उरला नाही आणि कितीतरी महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये खर्च कमी करणे आता भाग आहे.

1970 नंतरच्या दशकातील एखाददुसऱ्या वर्षाचा अपवाद वगळता विदेशी व्यापारक्षेत्रात आयाती या निर्यातीपेक्षा सतत अधिक राहिल्या आहेत. त्यामुळे आज विदेशी व्यवहारतोलाचे जे संकट उद्‌भवले आहे त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे असे

---

* इंडियन इकनॉमिक असोसिएशन ट्रस्ट फॉर रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे येथे 'Fiscal Management in the Indian Economy : Issues and Policy Options' या विषयावर 17 ऑगस्ट, 1991 रोजी झालेल्या चर्चासत्रात सादर केलेला प्रमुख निबंध.

** प्राध्यापक, दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली.

*** अर्थशास्त्र विभाग प्रमुख व उप-प्राचार्य, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.

कित्येक वर्षे घडत आले आहे. 1985 च्या सुमारास जे शिथिलीकरणाचे युग आले त्यामुळे ही समस्या अधिक विकट बनली यात शंका नाही. या काळात आयाती झपाट्याने वाढल्या आणि निर्याती मात्र अगदी धीम्या वेगाने वाढत होत्या. त्यामुळे अशा निर्यातीचा व आयातीचा मेळ बसेना. गेल्या दहा वर्षांच्या काळात आयाती या निर्यातीपेक्षा सतत जास्त राहिल्या आहेत. इतकेच नव्हे तर, त्यांच्यातील तफावत खास करुन गेल्या पाच वर्षांत रुंदावत गेली आहे. सन 1990–91 या वर्षातील विदेशी व्यापारातील तूट रु. 10,644 कोटी अशा उच्चांकाला पोचली. जानेवारी 1991 च्या मध्यास आपला परकीय चलनाचा साठा न्यूनतम पात-ळीला पोचला व जेमतेम दहा दिवसांच्या आयाती भागविता येतील इतका तुटपुंजा साठा शिल्लक राहिला. अशा अगतिक झालेल्या परिस्थितीतच आपण आंतर-राष्ट्रीय नाणे निधीकडून 1.8 महापदम डॉलर कर्ज घेण्याचे ठरविले. पण ही अगदी तात्पुरती उपाययोजना होती हे उघड आहे. विदेशी चलनातील तुटीचा व्यवहार अखंडपणे चालूच आहे. परदेशस्थ भारतीयांनी येथे पैसे पाठविणे जवळजवळ बंद केल्याने या हालात आणखीनच भर पडली. ही सर्व घसरगुंडी थांबविण्या-साठी रिझर्व्ह बँकेने रोख सीमा मर्यादा वाढवून आयातीवर कडक निर्बंध घातले. त्यामुळे विदेशी चल-नाचा देशाबाहेरील ओघ थोडासा कमी झाला, पण त्यापेक्षा जास्त काही घडले नाही. देशाला पुन्हा नाणे निधीकडे सुमारे 5 ते 7 महापद्म इतक्या महाप्रचंड कर्जासाठी हात पसरावे लागले. अर्थव्यवस्थेत संरचनात्मक सुधारणा करण्यासाठी हे मागितले गेले. या खेपेस नाणे निधीच्या अटी जादा कडक बनल्या. इतर अटींबरोबर विशेष म्हणजे विदेशी व्यापारक्षेत्रात शिथिलीकरण, चलनाचे अवमूल्यन, अर्थसाहाय्यामध्ये (subsidy) घट, व खाजगीकरणाची प्रक्रिया या अटींचा समावेश होता.

वित्तीय आणि व्यापारक्षेत्रातील ज्या प्रक्रियांमुळे सध्याचे संकट उभे ठाकले आहे ते सर्व समजावून घेणे हा या निबंधाचा उद्देश आहे. जुलैच्या पहिल्या आठव-ड्यात सरकारने दोन हप्त्यांमध्ये रुपयाचे अवमूल्यन केले व व्यापारविषयक धोरणात मोठे बदल केले. अधिक व्यापक व मूलगामी सुधारणांचाच तो एक भाग होता व नाणे निधीच्यादृष्टीने काही खंबीर व आवश्यक पावले उचलायची होती. आपल्या अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करावयाच्या प्रक्रियेचा तो एक भाग होता. या उपायांनी अपेक्षित यश कसे काय मिळते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. या उपायांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न या निबंधात केला आहे.

## 2

### वित्तीय क्षेत्र : काही पैलू

नजिकच्या काही वर्षांमध्ये आपल्या अर्थव्यवस्थेत जो पराकोटीचा वित्तीय असमतोल दिसून आला त्या-मध्येच आजच्या आर्थिक अरिष्टाचे मूळ आहे यात शंका नाही. जर केंद्र सरकारच्या गेल्या दहा वर्षांतील अंदाजपत्रकावर एक धावती नजर टाकली तर दिसून येईल की, त्यातील महसुली खात्यामध्ये सतत तूट दिसून येत आहे (तक्ता 1). स्वातंत्र्यानंतरची पहिली तीन

**तक्ता 1**

**केंद्र सरकारचा अर्थसंकल्पीय महसुली वाढावा/तूट**

| वर्ष | वाढावा/तूट ( स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी – GDP-टक्केवारी ) |
|---|---|
| 1951–52 | 1.27 |
| 1952–53 | 0.40 |
| 1953–54 | 0.08 |
| 1954–55 | 0.33 |
| 1955–56 | 0.41 |
| 1956–57 | 0.76 |
| 1957–58 | 0.34 |
| 1958–59 | –0.04 |
| 1959–60 | 0.29 |
| 1960–61 | 0.31 |
| 1961–62 | 0.73 |
| 1962–63 | 0.61 |
| 1963–64 | 0.88 |

| | |
|---|---|
| 1964–65 | 1.11 |
| 1965–66 | 1.22 |
| 1966–67 | 0.77 |
| 1967–68 | 0.30 |
| 1968–69 | 0.20 |
| 1969–70 | 0.31 |
| 1970–71 | 0.38 |
| 1971–72 | –0.22 |
| 1972–73 | 0.03 |
| 1973–74 | 0.38 |
| 1974–75 | 1.04 |
| 1975–76 | 1.13 |
| 1976–77 | 0.35 |
| 1977–78 | 0.45 |
| 1978–79 | 0.28 |
| 1979–80 | –0.61 |
| 1980–81 | –0.57 |
| 1981–82 | –0.18 |
| 1982–83 | –0.71 |
| 1983–84 | –1.16 |
| 1984–85 | –1.52 |
| 1985–86 | –2.12 |
| 1986–87 | –2.65 |
| 1987–88 | –2.75 |
| 1988–89 | –2.69 |
| 1989–90 | –2.80 |
| 1990–91 (अंदाजित) | –2.59 |

**संदर्भ** : INDIAN ECONOMIC STATISTICS ( Public Finance ), Ministry of Finance, 1990.

दशके पाहता, तेव्हा मात्र दोन वर्षांचा अपवाद वगळता महसुली खात्यावर आपण थोडी का होईना पण शिल्ल–कच दाखविली आहे. 1979–80 या वर्षी मात्र हे चित्र पालटले व नंतर अखंडपणे महसुली खात्यावर तूट दिसून येऊ लागली. 1979–80 यावर्षी ही तूट त्या वर्षीच्या स्थूल आंतर्देशिय उत्पादनाच्या 0.61 टक्के होती, तर आता तिचे ते प्रमाण अंदाजे 3 टक्क्यां-पर्यंत वाढले आहे. केंद्र सरकारला भांडवल बाजारातून आता सारखे भांडवल उभारावे लागते व चालू खर्च भागवावे लागतात; तथापि, त्यातून उत्पन्न मात्र काही मिळत नाही असा सगळा याचा अर्थ आहे. तुटीचा अर्थभरणा व खुल्या बाजारातील कर्जे यामुळे जी एकूण वित्तीय तूट दिसते ती यामुळे वाढत गेलेली आढळून येते. 1980–81 साली आंतर्देशीय उत्पादनाच्या ती 6.9 टक्के होती तर 1988–89 यावर्षी ती 8.9 टक्क्यांपर्यंत वाढली. याचा आणखी एक निराळा परि-णाम म्हणजे सरकारचे अंतर्गत व बाह्य कर्ज प्रचंड प्रमाणात फुगत गेले (तक्ता 2). आता हे कर्जाचे प्रमाण स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या 60 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. विदेशी साह्य, आंतरराष्ट्रीय नाणे निधी कडील कर्ज, परदेशातील व्यापारी कर्ज व परदेशस्थ भारतीयांच्या ठेवी अशी विदेशी कर्जाची व्यापक व्याख्या स्वीकारली तर आपले एकूण विदेशी कर्ज स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या 20 टक्क्यांपेक्षा जास्त दिसते (तक्ता 4).

या सर्वांचा एक तात्काळ परिणाम म्हणजे आपले व्याजाचे देणे वेगाने वाढत गेले. सध्या आपल्या केंद्र सरकारच्या खर्चांच्या बाबींपैकी ती सर्वात मोठी बाब आहे. आता हे कुठंपर्यंत घेत रहायचे असा रास्त मुद्दा उपस्थित होतो आहे. सरकारचे नवी कर्जे उभारणे असेच चालू राहिले तर आपल्या सर्व सरकारी यंत्रणेच्या सक्षमतेचाच प्रश्न कालांतराने निर्माण होईल. विशेषेकरून जेव्हा नवे कर्ज फक्त पूर्वीची कर्जे भाग–विण्यासाठीच असेल व त्यातून काही खास विकासात्मक साधनसामग्री देशात हाती लागत नसेल तर नक्कीच असे घडेल. सरकारला आता एक तर खर्चातील वाढीचा दर उतरवावा लागेल किंवा कर उत्पन्नातील वाढीचा दर आणखी वर न्यावा लागेल किंवा दोन्हीही करावे लागेल.

कर उत्पन्नाच्या बाबतीत पाहता कराचे स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी असलेले प्रमाण गेल्या चाळीस वर्षांत वाढले आहे. 1950–51 साली ते 6.69 टक्के होते तर 1989–90 साली ते 17.7 टक्क्यां–पर्यंत वर गेले. भारतात सध्या विकासाची धामधूम चालू आहे. त्यावरून आजचा हा 17.7 टक्के दर

तक्ता 2

भारताचे स्थानिक कर्ज (स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी – GDP – टक्केवारी)

| | 1950 –51 | 1955 –56 | 1960 –61 | 1965 –66 | 1970 –75 | 1975 –80 | 1980 –85 | 1985 –86 | 1986 –87 | 1987 –88 | 1988 –89 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 एकूण आंतर्देशीय कर्ज (केंद्र व राज्यें) | 31.62 | 36.57 | 41.80 | 39.76 | 35.77 | 37.73 | 43.63 | 51.31 | 55.81 | 57.81 | 57.87 |
| 2 विदेशी कर्ज | 0.33 | 1.10 | 6.67 | 13.07 | 14.09 | 9.93 | 7.66 | 6.95 | 6.96 | 6.98 | 6.45 |
| **3 एकंदर कर्ज (आंतर्देशीय व विदेशी)** | **31.95** | **37.67** | **48.47** | **52.83** | **49.86** | **47.66** | **51.29** | **58.27** | **62.77** | **64.79** | **64.32** |

**संदर्भ :** Government of India, Ministry of Finance, INDIAN ECONOMIC STATISTICS, विविध खंड.

तक्ता 3

ऐंशीच्या दशकातील भारताचे विदेशी कर्ज

(कोटी रुपये)

| मार्चअखेर | विदेशी साहाय्य | आंतरराष्ट्रीय नाणे निधी | विदेशी व्यापारी कर्जे | एकूण (1)+(2)+(3) | अनिवासी भारतीयांच्या ठेवी | एकूण (4)+(5) | स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी रकाना (4)ची टक्केवारी | स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी रकाना (6)ची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1980 | 12,178 | – | 1,252 | 13,430 | 1,090 | 14,520 | 10.95 | 11.84 |
| 1985 | 24,004 | 4,888 | 6,908 | 35,800 | 3,819 | 39,619 | 17.34 | 19.19 |
| 1986 | 26,638 | 5,271 | 8,075 | 39,984 | 5,650 | 45,634 | 17.18 | 19.62 |
| 1987 | 32,312 | 5,548 | 11,243 | 49,103 | 3,847 | 56,950 | 16.73 | 19.41 |
| 1988 | 36,578 | 4,732 | 13,543 | 54,853 | 10,054 | 64,907 | 16.59 | 19.64 |
| 1989 | 46,838 | 3,696 | 19,147 | 69,681 | 14,154 | 83,835 | 17.84 | 21.46 |

**संदर्भ :** Reserve Bank of India, ANNUAL REPORT, 1988-89 आणि ECONONIC SURVEY, 1988-89.

निश्चितच स्पृहणीय आहे. पण यात एक वेगळी समस्या दिसून येऊ लागली आहे. याच कालखंडात प्रत्यक्ष करांचे प्रमाण जवळजवळ तितकेच राहिले आहे. प्रत्यक्ष करांचे स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी प्रमाण 1950-51 साली 2.47 टक्के होते, 1963–64 साली 3.26 टक्के या पातळीला पोचले व नंतर मात्र 1988–89 साली ते 2.49 टक्क्यांपर्यंत खाली आले (तक्ता 4). त्यामुळे कर : स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या गुणोत्तरात जी सगळी वाढ दिसते ते ओझे अप्रत्यक्ष करांमुळे आहे. प्रत्यक्ष करांमध्येदेखील, व्यक्तिगत उत्पन्न कराचे जे घटते महत्त्व आहे ते लक्षणीय आहे. हा कर म्हणजे 1950–51 साली एकूण कर संकलनाच्या 21 टक्के होता, तर आता ते प्रमाण 5 टक्क्यांपर्यंत उतरले आहेत.

व्यक्तिगत उत्पन्न कर हे सापेक्ष परिस्थितीनुसार कमीजास्त बदलता येतात हे सर्वमान्य आहे. समन्याय तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होतो. अप्रत्यक्ष कर (उदाहरणार्थ, अबकारी कर) मात्र याच्या उलट काम करतात. त्यामुळे व्यक्तिगत उत्पन्न कराचा पाया रुंद करून या कराची कक्षा वाढविण्याचे प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरते. सध्या उत्पन्न कर भरणाऱ्यांची संख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या

**तक्ता 4**

**करांचे स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी गुणोत्तर**

| वर्ष | भारताचा एकूण कर महसूल | | |
|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष कर | अप्रत्यक्ष कर | एकूण |
| 1950–51 | 2.47 | 4.23 | 6.69 |
| 1960–61 | 2.48 | 5.85 | 8.38 |
| 1970–71 | 2.34 | 8.67 | 11.01 |
| 1980–81 | 2.41 | 12.21 | 14.61 |
| 1985–86 | 2.38 | 14.10 | 16.48 |
| 1988–89 | 2.49 | 41.62 | 17.11 |

**संदर्भ :** INDIAN ECONOMIC STATISTICS (Public Finance), Ministry of Finance, 1990.

जेमतेम एक टक्काही नाही. जे उत्पन्न कर देण्याच्या पात्रतेत आहेत त्या सर्वांना या कराच्या छत्रीखाली आणणे हे भगीरथ काम सरकारला करावे लागणार आहे. पण देशात फार बळकट अशी समांतर अर्थ–व्यवस्था अस्तित्वात असल्याने हे काम अवघड होऊन बसले आहे. या समांतर अर्थव्यवस्थेतील लोकांना उत्पन्न कराच्या जाळ्यात ओढता येत नाही. तसेच संख्येने मोठे असलेले लहान व्यापारी किंवा स्वयं–रोजगारी व्यक्तींवर उत्पन्न कर बसविणे आवश्यक आहे, पण तो बसविणे अवघडही आहे. शेवटचा मुद्दा म्हणजे, कर मोजताना ज्या अनेक मार्गांनी वजावटी, माफी, सवलती दिल्या आहेत त्यामुळे उत्पन्न कराचा पाया अरुंद होत जातो. कर यंत्रणेतील या सगळ्या गळत्या व त्रुटी शोधून काढून नाहीशा केल्या पाहिजेत. उत्पन्न करा–मध्ये फार मोठी कर चुकवेगिरी आणि बुडवेगिरी चालते हे ध्यानात घेतले पाहिजे. यासाठी करसंकलन व्यवस्था अधिक परिदृढ करून यातून मार्ग काढण्याचे प्रयत्न व्हायला हवे आहेत.

एकूण कर संकलनाच्या फार मोठा, म्हणजे जवळ जवळ 85 टक्के, भाग अप्रत्यक्ष करांमधून येतो. या मार्गाने इतक्या भरघोस प्रमाणात कर उभारण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. विशेषेकरून अप्रत्यक्ष करांवर भिस्त ठेवताना काही तात्पुरता जुजबी विचार आणि प्रशासकीय सोय हेच फक्त पाहिले जाते. 1986 मध्ये अमलात आणलेल्या सुधारित मूल्यवाढ कराने (MODVAT) अबकारी कर पद्धतीत वाजवीकरण आणण्याचा प्रयत्न केला, पण या कराचा आवाका मर्यादित व अपुर्ण आहे. अबकारी करांनी औद्योगिक खर्चाच्या संरचनेत वाढच दिसून येते.

अबकारी कराच्या एकूण उत्पन्नापैकी जवळजवळ 70 टक्के रक्कम आदाने (inputs) आणि अंतरिम किंवा मध्यस्थ वस्तूंवर कर बसवून मिळते. या कराच्या दरांमध्ये भिन्नता खूप प्रमाणात आहे. या दोन्ही गोष्टींमुळे या करांचा भार व त्या करांचे नेमके आर्थिक परिणाम याबाबत संदिग्धता व गोंधळाची परिस्थिती दिसते. केंद्र सरकारच्या अबकारी करांबाबच्या अशा घोटाळ्यामध्ये विक्री कर आणि जकाती यांच्यामुळे आणखीनच अडचणी निर्माण होतात. विविध सरकारी

पातळ्यांवरील विविध करांमध्ये सारखेपणा आणण्याची गरज यामुळे स्पष्ट होते.

आता केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि केंद्र-शासित प्रदेशांच्या महसुली खर्चाची बाजू पाहू. 1980 च्या दशकात त्यांचा हा खर्च वार्षिक 17.8 टक्के या संयुक्त दराने (compound rate) वाढत गेला. पण त्यांची महसुली जमा मात्र वार्षिक 15.5 टक्के या संयुक्त दराने वाढली आहे. अनावश्यक खर्चाला कात्री लावून महसुली खर्चातील वाढीला लगाम घालण्याची अगदी तातडीची गरज आहे.

भारताची वित्तीय संरचना संघराज्यीय आहे हा तिचा आणखी एक विशेष आहे. या संदर्भात गेल्या चाळीस वर्षांत आणखी एक प्रवृत्ती दिसून आली आहे. लवचिक आणि वर्धिष्णु उत्पन्न देणारे कर हे केंद्राकडे आहेत तर वेगाने वाढत जाणाऱ्या खर्चाच्या बाबी राज्यांकडे आहेत, अशी असमान वाटणी आहे. खर्चाच्या बाबींमध्ये आरोग्य, शिक्षण, सामाजिक सेवा हे मोडतात. या अशा असंतुलित परिस्थितीमुळे घटक राज्ये पैशासाठी केंद्रावर वाढत्या प्रमाणात अवलंबून राहू लागली आहेत. नवव्या वित्त आयोगाने 1990-95 या मुदतीसाठीचा आपला अहवाल डिसेंबर 1989 मध्ये सादर केला. या आयोगाने यापूर्वीच्या वित्त आयोगां-पेक्षा निःसंशय निराळी भूमिका घेतली. विविध राज्यांच्या गरजा व त्यांची करउत्पन्नांची क्षमता याबाबत एकूण धोरणात्मक भूमिका या आयोगाने घेतली व त्यानुसार वित्तीय हस्तांतरण राज्यांकडे कसे करावयाचे त्याची पद्धती व रकमा या नव्या तत्त्वांच्या आधारे ठरविल्या. बिगर-योजना बाबींवरील जमेतील जी तूट आहे त्याकरिताच नव्हे तर 1990–95 या काळातील योजना जमाखर्चातील तूट भरून काढण्या-साठी आयोगाने अनुदानांची शिफारस केली.

वित्त आयोगामार्फत निधीचे वाटप करण्याचा उद्देश एकीकडे राज्याराज्यांमध्ये जो सरळसरळ वित्तीय असमतोल दिसून येतो तो दुरुस्त करण्याचा आहे. तसेच दुसरे म्हणजे, राज्यांमध्ये निधीचे वाटप होत असताना एका सम पातळीवर संतुलन राखले जावे असाही अंदाज यामागे आहे. प्रत्येक राज्याने काही किमान अपेक्षित सार्वजनिक सेवा निश्चितपणे द्याव्यात व राज्यातील जनतेचे कल्याण वाढावे हाच या सर्व प्रयत्नांमागील हेतू आहे. वित्त आयोगामार्फत निधीचे वाटप सुरू केल्याने शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सेवांच्याबाबतीत राज्याराज्यां-मध्ये जी दरी होती ती आता खूप जुळत आली आहे. तथापि दरडोई कर उत्पन्नातील वाढाव्यामध्ये राज्या-मधील मोठ्या तफावती अजूनही शिल्लक आहेत. यामुळे राज्याराज्यांमधील जो प्रादेशिक असमतोल आहे तो वाढतच गेलेला दिसतो.

एकूणच कर पद्धतीमधील समन्याय तत्त्वाचा मुद्दा शिल्लक राहतोच. हाताशी असलेल्या पुराव्यावरून असे दिसते की, देशातील अप्रत्यक्ष करांचा भार अगदी सौम्य प्रमाणात प्रगतीशील आहे (पहा : अप्रत्यक्ष कर चौकशी आयोग अहवाल, 1978). उत्पन्नाच्या दृष्टि-कोनातून अप्रत्यक्ष कर अवप्रमाणित होत जातात. त्यामुळे प्रमाणशीरता तत्त्व अमलात आणण्यासाठी करांचे दर आणि त्यातील सूट यातील एक गुंतागुंतीचे सूत्र शोधून काढावे लागते. पण यात यामुळे अकार्य-क्षमता शिरते, प्रशासकीय खर्च वाढत जातात आणि कर उत्पन्न घटते. देशातील प्रत्यक्ष कराच्या पद्धतीनुसार ते प्रगतीशील आहेतच. पण प्रचंड प्रमाणावर जी कर बुडवेगिरी चालते किंवा समांतर अर्थव्यवस्थेत जे बेसु-मार बेहिशेबी उत्पन्न तयार होते त्याच्याबद्दलचे काय? जर एकूण कर व्यवस्थेमध्ये समन्याय तत्त्व अमलात आणावयाचे असेल तर प्रत्यक्ष करांचा वाटा वाढायला हवा, त्या करांची अमलबजावणी अधिक कडक हवी, व्यक्तिगत उत्पन्न कराचा पाया अधिक रुंद हवा, कर बसविण्यास अवघड अशा गटांनाही कराच्या छत्राखाली आणायला हवे व काळा पैसा निर्माण होण्यास पायबंद घातला जावा.

केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकातील खर्चाच्या बाजूस आता मोठा वाटा अर्थसाहाय्य (subsidy) यांचा असतो. (तक्ता 5). अन्नधान्य, खते, निर्याती यांच्या अर्थ-साहाय्याचे आता कठोर मूल्यमापन होत आहे. या प्रत्यक्ष अर्थसाहाय्याच्याबरोबरीने शिक्षण, आरोग्य, सिंचन व्यवस्था, वीज दर, वाहतुकीचे दर यातील सवलतींमुळे एक प्रकारचे अप्रत्यक्ष अर्थसाहाय्य चालूच असते. रोख प्रतिस्थापक आधार (cash compensatory supp-ort) योजना स्थगित ठेवल्याने आता निर्यातींवरील

तक्ता 5

**केंद्र सरकारकडून दिले जाणारे अर्थसाहाय्य** (Subsidies)

(कोटी रुपये)

| | | 1988–89 | 1989–90 (सुधारित) | 1990–91 (अंदाजित) |
|---|---|---|---|---|
| [अ] | **प्रमुख अर्थसाहाय्य** | **6,287** | **9,166** | **8,516** |
| | 1 धान्ये | 2,200 | 2,476 | 2,200 |
| | 2 रासायनिक खते | 3,201 | 4,601 | 4,000 |
| | 3 निर्यातप्रवर्तन आणि बाजार विकास | 13,86 | 2,089 | 2,316 |
| [आ] | **इतर अर्थसाहाय्य यापैकी** | **945** | **1,511** | **2,108** |
| | 1 रेल्वे | 207 | 234 | 279 |
| | 2 व्याजरूपाने | 420 | 932 | 391 |
| | **एकूण ( अ + आ )** | **7,732** | **10,677** | **10,624** |

**संदर्भ :** REPORT ON CURRENCY AND FINANCE, 1989-90, Volume I, Reserve Bank of India.

अर्थसाहाय्य बंद झाले आहे. खतावरील अर्थसाहाय्यामध्ये कपात केल्याने अन्नधान्याच्या अधिप्राप्ती किमतीत ( procurement prices ) नक्कीच वाढ करावी लागेल. तुलनेने सधन शेतकरी खते जास्त वापरतात हे पाहता येथे समन्याय तत्त्व अमलात येऊ शकेल. मात्र याच वेळेस अन्नधान्याच्या अर्थसाहाय्यामध्ये कपात करता कामा नये. नाही तर तावडतोब विषमतेच्या दिशेने लंबक झुकेल. वितरणात्मक न्याय अमलात आणण्यासाठी सरकारच्या हातात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे एक प्रभावी हत्यार आहे. अन्नधान्याच्या अर्थसाहाय्या-मधून योग्य त्या गोष्टी साधण्याचे अधिक चांगले प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रशासकीय अडथळे विचारात घेऊन सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या फायद्यांमधून नागरी भागातील श्रीमंतांना वगळणे क्रमप्राप्त बनले आहे. यातून वाचलेली साधनसामग्री ग्रामीण भागातील गरिबांकडे व आदिवासी लोकांकडे वळविता येईल. त्यामुळे अन्नधान्यावरील अर्थसाहाय्य कमी करावे असे कोणतेही कारण मला दिसत नाही.

शेवटचा महत्त्वाचा मुद्दा सार्वजनिक क्षेत्राच्या भूमिकेबद्दल. पूर्व युरोपमधील समाजवादाचा अस्त आणि जगभरातील खाजगीकरण आणि बाजार यंत्रणेच्या दिशेने होणारी दमदार वाटचाल यामुळे या मुद्यास विशेष महत्त्व आले आहे. करोत्तर नक्त नफ्याचे गुंतविलेल्या भांडवलाशी जे गुणोत्तर असते ते 222 केंद्र सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांच्या बाबतीत 1988–89 साली फक्त 4.4 टक्के होते. राज्यपातळीवर वीजमंडळे व परिवहन मंडळे प्रचंड प्रमाणात तोटा दाखवीत आहेत. या वीज मंडळांचा आणि परिवहन मंडळांचा एकूण संचित तोटा 1988–89 वर्षी अनुक्रमे 2,705 कोटी व 251 कोटी रुपये इतका होता. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची कार्य-

दक्षता सुधारण्यास प्रचंड वाव आहे हे जरी एका बाजूस ध्यानात घेतले तरी या उपक्रमांचे सरसकट खाजगीकरण करावे असे मला वाटत नाही. अनेक तज्ज्ञ तशी भूमिका मात्र सध्या मांडत आहेत. नफा मिळविणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांची मालकी, केवळ त्यातून बाढावा मिळतो म्हणून, खाजगी क्षेत्राकडे सोपविणे सर्वस्वी अनुचित होईल.

सन 1985 च्या दीर्घकालीन वित्तीय धोरण मसुद्यात एका ठिकाणी म्हटले आहे, "गरिबी दूर करणे आमच्या पंचवार्षिक योजनांच्या केंद्रस्थानी आहे." त्याच मसुद्यात पुढे असे म्हटले आहे की, उत्पादकतेत सतत सुधारणा केली तरच गरिबी हटविण्याच्या काही आशा आहेत. ही मोक्याची भूमिका प्रभावीपणे पार पाडायची असेल तर गरिबी निर्मूलनाच्या कार्यक्रमासाठी जादा निधी गोळा करण्याचे काम वित्तीय धोरणास पार पाडावे लागेल. गरीब ज्यावर बहुतांशी अवलंबून असतात त्या सामाजिक व आर्थिक सेवांमध्ये सुधारणा करावी लागेल. शेती व उद्योगधंद्यामधील वाढीत सातत्य राखण्यासाठी पायाभूत सेवांमध्ये मोठ्या गुंतवणुकी करण्याची जबाबदारीही वित्तीय धोरणावर येऊन पडते. उत्पादक रोजगार वाढविण्याचे कामही वित्तीय धोरणास पार पाडावे लागेल. अतिरेकी किंमतवाढ ताब्यात ठेवण्याचे काम ही वित्तीय धोरणाची आणखी एक जबाबदारी असणार आहे. अंदाजपत्रकी तुटीवर मर्यादा घालून हे साधावे लागेल. यामुळे या तुटीचा जो चलनावर होणारा परिणाम आहे तो सुरक्षित मर्यादेमध्ये ठेवता येईल. असंघटित क्षेत्रातील मोठी लोकसंख्या आणि गरीब लोकांनाच विशेषेकरून अतिरेकी किंमतवाढीचा तडाखा बसतो.

भारताच्या लोकसंख्येचा सुमारे तिसरा हिस्सा आजही भयानक दारिद्र्यामध्ये जीवन कंठित असतो. 1980 नंतरच्या दशकात स्थूल आंतर्देशीय उत्पादनात सुमारे 5.5 टक्क्यांनी वाढ झाली तर रोजगारातील वाढ फार तर 1.5 टक्के इतकी होती. 1960 च्या आसेपास संघटित क्षेत्रातील रोजगार सुमारे 5.08 टक्के या वार्षिक दराने वाढला तर 1977–83 या काळात तो 2.4 टक्के दराने व 1983–88 या काळात तो तो फक्त 1.4 टक्के दराने वाढला. हा वाढीचा दर असा पायरीपायरीने उतरतोच आहे. 1983–88 या काळात खाजगी संघटित क्षेत्रातील रोजगार जवळजवळ कायम राहिला होता; नव्हे, त्यात –0.2 टक्क्यांनी वाढ दिसून आली. किंमतपातळीच्या आधारावर म्हणाल तर आपल्याकडे दोन आकडी किंमतवाढीचा दर आता येऊन स्थिरावलाच आहे. सध्या हा दर सुमारे 14 टक्के आहे. या सर्वांमुळे वित्तीय धोरणाचे काम सध्या तितकेसे लक्षणीय वाटत नाही.

## 3

## बाह्य क्षेत्र आणि नवे धोरणात्मक बदल

गेल्या पाच वर्षांत देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदावर फार मोठा ताण पडला आहे (तक्ता 6). यामुळे आपला विदेशी चलनसाठा रोडावला आहे व विदेशी कर्ज प्रचंड फुगले आहे. भारत सरकारच्या अर्थतज्ज्ञांच्या सल्लागार समितीने (1989) ही समस्या या चिघळण्याच्या अवस्थेला पोचण्याची बरीच कारणे दिली आहेत. त्यातील प्रमुख कारणे म्हणजे : (1) 1985–88 या काळातील अतिशय उदार असे आयात–निर्यात धोरण, (2) विदेशातून येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पैशाचा आटलेला ओघ, (3) पेट्रोलियम पदार्थांची झपाट्याने वाढलेली मागणी व देशांतर्गत उत्पादनातील खुंटलेली वाढ आणि (4) आपल्या निर्यातीमध्ये अनुस्यूत असलेला आयातींचा वाटा.

**तक्ता 6**

**भारताची वस्तू व्यापारातील तूट**

(कोटी रुपये)

| वर्ष | वस्तू व्यापारातील तूट |
|---|---|
| 1985–86 | 8,763 |
| 1986–87 | 7,644 |
| 1987–88 | 6,570 |
| 1988–89 | 8,004 |
| 1989–90 | 7,735 |
| 1990–91 (तात्पुरती) | 10,644 |

आपल्याकडील कारखानदारी ग्राहक वस्तूंमध्ये आयात केलेल्या वस्तूंचा वाढता वाटा अनुस्यूत असल्याने आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे यात आता संशय नाही. सध्याच्या व्यापार शिथिल करण्याच्या धोरणामागे गेल्या काही वर्षांतील कारखानदारी ग्राहक वस्तूंच्या उत्पादनाची जी लाट आली ती उचलून धरण्याचाच विचार होता. आयाती-वरील निर्बंध उठविणे किंवा सुटे भाग, भांडवली वस्तू, अंतरिम वस्तू यावरील आयात कर कमी करणे या रुपात शिथिलीकरण अमलात आणले गेले. आपल्या-कडील आयातीची आकडेवारी नीट पाहिली तर ध्यानात येईल की, गेल्या काही वर्षांतील आयातीच्या वाढीमागे भांडवली वस्तू या बाबीतील वाढ अगदी उच्च प्रमाणात आहे. 1980–81 मध्ये या आयाती 1,910 कोटी रुपयांच्या होत्या तर 1989–90 मध्ये त्या 8,881 कोटी रुपये होत्या.

याच काळात व विशेषेकरुन गेल्या 3–4 वर्षांत परदेशातून भारतात पाठविल्या जाणाऱ्या पैशाचा प्रवाह कमालीचा रोडावला आहे. गेल्या काही महिन्यात बहु-तेक परदेशस्थ भारतीयांनी त्यांच्या विदेशी चलनातील संबंधित खात्यांचे नूतनीकरण केलेलेच नाही. 1985 साली या खात्यातील एकूण रकमा 955 कोटी रुप-यांच्या जवळपास होत्या. आता त्या रकमा 17,000 कोटी रुपयांपर्यंत फुगल्या आहेत. या बहुतेक खात्यांची मुदत तीन वर्षे होती व 1988 मध्ये त्यांची मुदतपूर्ती होऊ लागली. पूर्वी त्यांचे नूतनीकरण सहज विनासायास केले जात असे. आता ते खातेदार आपल्या खात्यांचे नूतनीकरण करण्यास नाखूष आहेत. आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या 1.8 महापद्म अमेरिकी डॉलरचे कर्ज पूर्ण उचलून झाले असून आता संरचनात्मक सुधारणा या सदराखाली नाणे निधीकडून 5 ते 7 महापद्म अमे-रिकी डॉलरचे नवे कर्ज भारत आता उभारू पाहात आहे या कर्जाच्या अटी मात्र अगदी कडक आहेत.

गेल्या महिन्यात भारताच्या रुपयाचे दोन हप्त्यां-मध्ये एकूण 18 टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. याच्याबरोबरीने विदेशी व्यापाराच्या धोरणात मूलभूत बदल करण्यात आले. रोख प्रतिस्थापक आधार योजना स्थगित ठेवण्यात आली व पुर्तीकरण परवाना ( replenishment licensing–REP ) पद्धतीची मर्यादा वाढविण्यात आली असून आता सर्व बिगर-आवश्यक वस्तूंचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. निर्यातीशी निगडित आयातीबाबतच्या धोरणा-साठी ही परवाना पद्धती वापरली जाणार आहे. आता वाहतूक भार मूल्याच्या 30 टक्केपर्यंत सरसकट परवाना शुल्क असणार आहे. सध्या हा दर 5 टक्के ते 20 टक्के असा निरनिराळा आहे.

या सर्व उपायांचा हेतू एकच, तो म्हणजे आयाती महाग व निर्याती स्वस्त व्हाव्यात; यामुळे कालांतराने आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद परिस्थिती सुधारणार आहे. अवमूल्यनाची घटना तेवढ्यापुरती निराळी पाहून चालणार नाही. व्यापार व औद्योगिक क्षेत्रातील व्यापक उपाययोजनेचा तो एक भाग आहे. त्याबरोबरीने चलन-विषयक व वित्तीय सुधारणा आहेतच. देशात आमूलाग्र संरचनात्मक बदल व्हावेत व यामुळे अर्थव्यवस्था लव-चिक आणि जागतिक पातळीवर स्पर्धात्मक व्हावी असे यामागे उद्दिष्ट आहे. सुमारे तीन वर्षांच्या काळात रुपया पूर्णपणे परिवर्तनीय केला जाणार आहे असा अंदाज आहे.

आपल्या विदेशी क्षेत्राची अधिक सावध व पर-खड चिकित्सा करता असे दिसते की, या आशावादात फारसा अर्थ नाही. भारताच्या निर्याती मुख्यतः प्राथमिक स्वरुपाच्या वस्तूंच्या आहेत. त्यांची किंमत लवचिकता अगदी कमी असते. जरी ती लवचिकता अशी कमी नसली तरी व्यापार करीत असलेले मोठे देश संरक्षणा-त्मक व्यापार धोरणाचा अवलंब करीत असल्याने भारताला या वस्तूंची ताठर मागणी असल्याचाच अनुभव येतो. आयातीवरील निर्बंध उठविल्याने आया-तीवरील खर्च कमी होण्याची शक्यता नगण्य दिसते. त्यामुळे नव्या व्यापार धोरणाने आंतरराष्ट्रीय व्यापा-रातील तूट भरून निघण्याची शक्यता अगदीच कमी आहे. अवमूल्यनाचे इतरही अनिष्ट परिणाम होतील : (1) आयाती महाग झाल्याने किंमतवाढीला चांगलेच खतपाणी मिळेल; (2) पेट्रोलजन्य पदार्थांच्या आयात किमती वाढल्यामुळे सरकारला तज्जन्य पदार्थांच्या प्रशासित किमतीही वाढवाव्या लागतील, कारण सर-कारचा खर्च त्या प्रमाणात वाढणार आहे; अन्यथा मंदीच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. सरकारने काही सामाजिक व आर्थिक सेवांवरील खर्च कमी केला तर

मंदीच्या दिशेने पावले पडतील. जर तुटीचा अर्थभरणा केला तर किमती भडकतील. किंवा दोन्हींची एकत्र घटना घडेल.

भारताची अर्थव्यवस्था एका मोक्याच्या टप्प्या-वर उभी आहे. वित्तीय आणि व्यापार क्षेत्रात जे गंभीर संकट उभे ठाकले आहे त्यामुळे देशाची सक्षमताच पणाला लागली आहे. देशात अनेक क्षेत्रात राजकीय व सामाजिक घटनांचे वेगवान प्रवाह वाहत असताना आर्थिक बाबींचे धोरण अधिक चतुरपणाचे व समंजस असणे हिताचे आहे. त्यामुळे सर्व यंत्रणेला स्थैर्य मिळ-णार आहे.

**संदर्भ टीपा**


1 Government of India, Ministry of Finance, 1978, ( Jha Committee ), REPORT OF THE INDIRECT TAXATION ENQUIRY COMMITTEE, New Delhi.

2 Government of India, Ministry of Finance, 1985 LONG TERM FISCAL POLICY, New Delhi.

3 Government of India, 1989, REPORT OF THE ECONOMIC ADVISORY COUNCIL ON THE CURRENT ECONOMIC SITUATION AND PRIORITY AREAS FOR ACTION, Ministry of Finance, New Delhi.


□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

नी. वि. सोवनी : **अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध** * (1977) : पृष्ठे 226, किंमत 20 रुपये.

मो. वि. भाटवडेकर : **शिक्षणाचे अर्थशास्त्र** (1978), पृष्ठे 157, किंमत 20 रुपये, (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, 381 क, शनिवार पेठ, पुणे 411 030.)

भ. ग. बापट : **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण** * (1982), पृष्ठे 333, किंमत रु. 50 (वितरक : काँटिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी. पुणे 411 030)

नी. वि. सोवनी : **स्त्राफा विचारसरणी : चार व्याख्याने,*** पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे.

* ही पुस्तके म. अ. परिषदेच्या धुळे येथील कार्यालयाकडून मिळू शकतील.

# उत्पादनक्षमता मापनपद्धती*

लक्ष्मण बुरंगे **

व्यष्टीय अथवा समष्टीय पातळीवर गुंतवणूक, उत्पन्न, किमती, उत्पादकता इत्यादी चलांमधील बदलांचा अभ्यास करताना बऱ्याचदा उत्पादनक्षमतेच्या आकडेवारीचा उपयोग केला जातो. तसेच व्यापार-चक्रीय बदलांचे आकलन होण्यासाठी उत्पादनक्षमतेचे मापन उपयोगी ठरू शकते. म्हणूनच उत्पादनक्षमतेच्या संकल्पनेबरोबरच उत्पादनक्षमतेच्या मापनालाही महत्त्व आहे. सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध उत्पादन-साधनांच्या साहाय्याने प्राप्त होणारे कमाल उत्पादन म्हणजे उत्पादनक्षमता असे म्हणता येईल. तथापि ही उत्पादनक्षमता मोजण्याचा निश्चित असा एकमेव अथवा नेमका दृष्टिकोन नाही. परिणामत: उत्पादन-क्षमता मापनाचे विविध दृष्टिकोन अस्तित्वात आहेत. या विविध दृष्टिकोनांचा थोडक्यात आढावा घेणे हा या लेखाचा उद्देश आहे. सोयीसाठी या लेखाचे तीन भाग केले असून पहिल्या भागात उत्पादनक्षमता मापन-पद्धतींचे प्रकारनिष्ठ वर्गीकरण (topology), तर दुसऱ्या भागात या सर्व पद्धतींची सविस्तर चर्चा केली आहे. शेवटच्या तिसऱ्या भागात समारोप केला आहे.

उत्पादनक्षमता मापनाच्या प्रमुख पद्धती खालील-प्रमाणे आहेत :

(1) स्थापित क्षमता (Installed Capacity) पद्धती

(2) भांडवल-उत्पादन गुणोत्तर ( Capital–Output Ratio ) पद्धती

(3) व्हॉर्टन (Wharton) पद्धती

(4) भांडवली साठ्यावर (Size of capital stock ) आधारित पद्धती

(5) उत्पादन फलन ( Production Function ) पद्धती

(6) मॅग्रॉहिल अर्थशास्त्र विभाग ( McGraw-Hill Department of Economics ) पद्धती

* ''Concept and Measurement of Capacity : A Review'' या विषयावर पी. वेंकटरामय्या, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली एम्. फिल. पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर केलेल्या लघुप्रबंधावर आधारित लेखाचा दुसरा भाग

** अधिव्याख्याता, भिकुसा यमासा क्षत्रिय वाणिज्य महाविद्यालय, नाशिक.

(7) फेडरल रिझर्व्ह बोर्ड ( Federal Reserve Board ) पद्धती

(8) संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन ( Potential GNP) पद्धती

(9) आदान–प्रदान रचना आधारित समष्टी पातळीवरील क्षमता मोजमाप ( Macro Capacity Measure Using Input-Output Frame )

(10) रेषीय प्रायोजना ( Linear Programming) पद्धती

(11) यंत्र–तास ( Machine-Hours ) पद्धती

## 1

## उत्पादनक्षमता मापनपद्धतीचे प्रकारनिष्ठ वर्गीकरण

वर उल्लेखिलेल्या पद्धतींचे विविध प्रकारांनी वर्गीकरण करणे शक्य आहे. हे वर्गीकरण उत्पादनक्षमतेची संकल्पना, व्याप्ती, उत्पादन प्रक्रिया, उत्पादनक्षमतेची व्याख्या करताना विचारात घेतलेले महत्त्वाचे चल ( dominant variable ) इत्यादी निकषांवर केले जाऊ शकते.

## 1.1

## उत्पादनक्षमता संकल्पना

उत्पादनक्षमता संकल्पनेचे दोन प्रमुख दृष्टिकोन म्हणजे, (अ) तांत्रिक अथवा अभियांत्रिकी दृष्टिकोन आणि (आ) अर्थशास्त्रज्ञांचा अथवा उत्पादन परिव्ययावर आधारित दृष्टिकोन हे आहेत.

### (अ.1) विशुद्ध अभियांत्रिकी दृष्टिकोनावर आधारित मापनपद्धती

या पद्धतीमध्ये उत्पादनक्षमतेशी संबंधित तांत्रिक बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो. स्थापित क्षमता पद्धती आणि उत्पादन कार्यकाल ( operating time) पद्धतींचा या गटात समावेश होतो.

### (अ.2) सुधारित अभियांत्रिकी दृष्टिकोनावर आधारित मापनपद्धती

या प्रकारात तांत्रिक बाबींबरोबरच बिगर-तांत्रिक (उत्पादन परिव्यय सोडून) बाबींवर आधारित उत्पादनक्षमता मापनपद्धतींचा समावेश होतो. यामध्ये उत्पादन फलन, भांडवल साठा व आदान–प्रदान पद्धती प्रमुख होत.

### (आ) क्षमतेचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन

या गटात उत्पादनक्षमतेच्या अर्थशास्त्रीय दृष्टिकोनावर आधारित पद्धतींचा समावेश होतो. व्हॉर्टन, भांडवल-उत्पादन गुणोत्तर आणि रेषीय प्रायोजना या पद्धती प्रमुख म्हणता येतील. या सर्व पद्धती उत्पादन परिव्ययावर आधारित आहेत.

## 1.2

## उत्पादनक्षमता मापनाची व्याप्ती

उत्पादनक्षमतेची मोजणी संयंत्राच्या पातळीवर, उद्योगाच्या पातळीवर किंवा संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर केली जाऊ शकते. अशा प्रकारे उत्पादनक्षमता मापनाच्या व्याप्तीच्या आधारावर ( व्यष्टीय किंवा समष्टीय पातळीवर ) क्षमता मापनपद्धतीचे वर्गीकरण करता येते.

### (अ) क्षमतेची व्यष्टीय पातळीवरील मोजणी

संयंत्र किंवा उद्योगाच्या पातळीवर उपयुक्त ठरणाऱ्या उत्पादनक्षमता मापनपद्धतींमध्ये रेषीय प्रायोजना, स्थापित क्षमता, फेडरल रिझर्व्ह बोर्ड, मॅग्रॉहिल इत्यादी पद्धतींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

### (आ) क्षमतेची समष्टीय पातळीवरील मोजणी

संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर उत्पादनक्षमतेचे मापन करण्याच्या पद्धतींचा या प्रकारात समावेश करता येईल. उदाहरणार्थ, संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन पद्धती, आदान-प्रदान पद्धती इत्यादी.

## 1.3

### उत्पादन / उत्पादन प्रक्रिया

व्यष्टीय पातळीवर उद्योगांचे एकच वस्तू उत्पादन करणारे / एकच उत्पादन प्रक्रिया असणारे उद्योग किंवा बहु-वस्तू / बहु-उत्पादन प्रक्रिया असणारे उद्योग असे वर्गीकरण करता येते. या आधारावर क्षमतामापन पद्धतींचेदेखील वर्गीकरण केले जाते.

**(अ) एक वस्तू / एक उत्पादन प्रक्रिया**

ज्या उद्योगांमध्ये एकाच वस्तूचे उत्पादन होते अथवा एकच उत्पादन प्रक्रिया वापरली जाते अशा उद्योगांची उत्पादनक्षमता मापन करण्यासाठी काही विशिष्ट पद्धती उपयुक्त ठरतात. उदाहरणार्थ, उत्पादन फलन, फेडरल रिझर्व्ह बोर्ड, मॅग्रॉहिल, यंत्र–तास या पद्धती.

**(आ) बहु-वस्तू / बहु-प्रक्रिया उद्योग**

काही उद्योगांमध्य एकापेक्षा जास्त वस्तू उत्पादित केल्या जातात व उत्पादन प्रक्रियादेखील एकापेक्षा जास्त असतात. अशा उद्योगांची उत्पादन–क्षमता मोजण्यासाठी काही विशिष्ट पद्धती वापरल्या जातात. उदाहरणार्थ, रेषीय प्रायोजना पद्धती.

## 1.4

### उत्पादन कार्यकाल किंवा कामाच्या पाळ्या

उत्पादन कार्यकाल अथवा कामाच्या पाळ्यांच्या आधारावर ज्या पद्धतींमध्ये क्षमतेचे मापन केले जाते, अशा पद्धती या गटात समाविष्ट होतात.

**(अ) कामाच्या पाळ्यांवर आधारित क्षमतेचे मापन**

ज्या मापनामध्ये कामाच्या पाळ्यांची संख्या हे प्रमुख चल वापरले जाते अशा क्षमता मापनपद्धती, ( उदाहरणार्थ, स्थापित क्षमतापद्धती ) या प्रकारात मोडतात.

**(आ) कामाच्या पाळ्यांवर आधारित नसलेले क्षमतामापन**

उत्पादनक्षमता मोजताना काही पद्धतींमध्ये कामाच्या पाळ्यांचा विचार केला जात नाही. अशा पद्धती या गटात मोडतात. उदाहरणार्थ, उत्पादन फलन, आदान-प्रदान पद्धती.

## 1.5

### महत्त्वाचा चल ( Dominant Variable)

या क्षमता मापनप्रकारांमध्ये मापनपद्धतींचे क्षमतेच्या व्याख्येत विचारात घेतल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या चलांच्या आधारावर वर्गीकरण केले जाते.

**(अ) भांडवल**

ज्या क्षमता मापनपद्धतींमध्ये भांडवल हा महत्त्वाचा चल ठरतो अशा पद्धती एका गटात मोडतात. उदाहरणार्थ, भांडवल साठा पद्धती, भांडवल–उत्पादन गुणोत्तर पद्धती इत्यादी.

**(आ) रोजगार**

या गटात रोजगार दर किंवा बेकारीचा दर या महत्त्वाच्या चलावर आधारित क्षमता मापनपद्धतींचा समावेश होतो. उदाहरणार्थ, संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन पद्धती.

ज्या क्षमता मापनप्रकारांमध्ये कोणताही एक असा महत्त्वाचा चल उपलब्ध नसेल अशांचा समावेश बहु–चल ( Multi-Variable ) पद्धतींमध्ये केला जाईल.

## 2

### उत्पादनक्षमतेच्या मापन पद्धती

प्रस्तुत लेखाच्या पहिल्या भागात उल्लेख करण्यात आलेल्या विविध पद्धतींची सविस्तर चर्चा या भागात केली आहे.

## 2.1

### स्थापित क्षमता मापन

उद्योगांची उत्पादनक्षमता मोजण्यासाठी स्थापित क्षमता प्रमाणाचा भारतात मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. (नियोजन मंडळाचा अर्थशास्त्रीय विभाग 1955, NCAER 1966, RBI 1969), त्याच–प्रमाणे MSP, DGTD ह्यांकडूनदेखील विविध उत्पादनांच्या संदर्भात स्थापित क्षमतेची आकडेवारी प्रसिद्ध केली जाते. क्षमतेचे प्रमाण मोजताना या पद्धतीमध्ये प्रत्येक वस्तूच्या संदर्भात उत्पादनक्षमता मोजली जाते. हे क्षमतामापन उद्योगातील प्रतिदिन कामाच्या पाळ्यांच्या आधारावर केले जाते. सर्वसाधारणपणे एक अथवा दोन कामाच्या पाळ्या असणाऱ्या उद्योगात 300 दिवस हा उत्पादन कार्यकाल (working period) समजला जातो; तर उत्पादन प्रक्रिया सातत्य असणाऱ्या उद्योगात (तीन पाळ्या) उत्पादन कार्यकाल 330 ते 365 दिवस समजला जातो. उत्पादनाच्या तांत्रिक बाबी (technical relations), रोजच्या कामाच्या पाळ्या, एकूण उत्पादन कार्यकाल लक्षात घेऊन कच्च्या मालाच्या अखंड पुरवठ्याच्या गृहितावर स्थापित क्षमता मोजली जाते. थोडक्यात, संबंधित उद्योगातील प्रचलित उत्पादन कार्यकाल ध्यानात घेऊन संयंत्राची/व्यवसाय–संस्थेची कमाल उत्पादनपातळी म्हणजे स्थापित क्षमता होय (Sriniwasmurthy A. P., 1979).

अशा प्रकारे प्रत्येक उद्योगाची स्थापित क्षमता मोजून योग्य भारांच्या (Weights) साहाय्याने उत्पादनक्षमतेचा (एकूण) निर्देशांक काढता येऊ शकतो. तसेच प्रत्यक्ष उत्पादन निर्देशांकाचे स्थापित क्षमता निर्देशांकाशी गुणोत्तर काढून उत्पादनक्षमतेच्या वापराचा दर निश्चित करता येतो. उत्पादनक्षमतेचे स्थापित क्षमता प्रमाण व्यष्टी तसेच समष्टी पातळीवरदेखील लागू होते. स्थापित क्षमता प्रमाण हे प्रामुख्याने अभियांत्रिकी संकल्पनेवर आधारित असून, एकच वस्तू उत्पादित करणाऱ्या उद्योगांच्या–बाबतीत निःसंदिग्धपणे वापरता येते, परंतु बहु-वस्तू व्यवसायसंस्थांच्या संदर्भात प्रत्येक वस्तूच्या बाबतीतील स्थापित उत्पादनक्षमता सारासार विचारबुद्धीने निश्चित करावी लागते.

उत्पादनक्षमतेचे स्थापित क्षमता प्रमाण गृहीत धरलेल्या कामाच्या पाळ्यांच्या पद्धतीवर अवलंबून असते. सॅम्युअल पॉल (1974) यांच्या निरीक्षणाप्रमाणे एम. एस. पी.ने कामाची एक पाळी असलेले उद्योग असे वर्गीकरण केलेल्या उद्योगांमध्ये प्रत्यक्षात मात्र दोन किंवा अशा काही उद्योगात तर तीन पाळ्यांमध्ये उत्पादन केले जाते. परिणामतः अशा उद्योगांमधील संभाव्य उत्पादनक्षमता (Potential capacity) ही एकच पाळी गृहीत धरून मोजण्यात आलेल्या स्थापितक्षमता प्रमाणापेक्षा कितीतरी अतिरिक्त आहे. थोडक्यात, स्थापितक्षमता प्रमाण पद्धतीत येणारी महत्त्वाची अडचण म्हणजे प्रत्येक उद्योगाच्या स्वरुपाप्रमाणे कामाच्या पाळ्यांचे योग्य प्रमाण निश्चित करणे होय. या पद्धतीने क्षमतेची मोजणी केल्यास उत्पादनक्षमता वापराचा दर काही वेळा 100 टक्क्यांपेक्षा जास्त मिळतो. (RBI, 1969, NCAER, 1966) व हे काहीसे अतिरंजित (unrealistic) वाटते.

## 2.2

### भांडवल–उत्पादन गुणोत्तर पद्धती

भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या साहाय्याने उत्पादनक्षमता मोजणी करण्याचा प्रयत्न नॅशनल इंडस्ट्रियल कॉन्फरन्स बोर्डाने केलेला आहे. या ठिकाणी भांडवलाचे उत्पादिताशी गुणोत्तर निश्चित करण्यासाठी फक्त स्थिर भांडवलाचा विचार केला जातो (यंत्रे, संयंत्रे व इमारती). उद्योगाच्या ताळेबंदाच्या व नफा–तोटा पत्रकाच्या आधारावरून (घसारा वजा जाता) निव्वळ भांडवलमूल्य मोजले जाते. अशा प्रकारे निव्वळ भांडवलमूल्य मोजून त्याचे उत्पादनाशी गुणोत्तरमूल्य काढले जाते. अशा प्रकारे कोणत्याही कालावधीसाठी, प्रत्येक वर्षाचे भांडवल–उत्पादन गुणोत्तरमूल्य मोजून (स्थिर किमती गृहीत धरून– at constant prices), ज्या वर्षी ते सर्वात कमी असेल ते वर्ष पायाभूत वर्ष (bench-mark year) मानले जाते. म्हणजेच दुसऱ्या शद्वात, ज्या वर्षी भांडवल–उत्पादन गुणोत्तर सर्वात कमी असेल त्या वर्षीचे उत्पादन जवळजवळ पूर्ण क्षमता उत्पादन (capacity output year) असेल. या वर्षाचे गुणोत्तर हे भांडवल-क्षमता उत्पादनगुणोत्तर असेल. या भांडवलक्षमता उत्पादन गुणोत्तराचा वापर करून

कोणत्याही वर्षाची क्षमता खालील सूत्रांच्या साहाय्याने मोजता येते (Phillips Almarin, 1963).

$$FC_t \div \frac{FC_o}{CO_o} = CO_t \quad (2.1)$$

$\frac{O_t}{CO_t}$ = t या कालावधीचा (वर्षाचा) उत्पादन–क्षमता वापराचा दर (2.2)

$FC_o$ = पायाभूत वर्षातील स्थिर भांडवल मूल्य

$CO_o$ = पायाभूत वर्षातील पूर्ण क्षमता उत्पादन

$FC_o/CO_o$ = पायाभूत वर्षातील भांडवल–क्षमता उत्पादन गुणोत्तर

$CO_t$ = t या कालावधीसाठी (वर्षासाठी) मोजली जाणारी उत्पादनक्षमता

$O_t$ = t या कालावधीतील (वर्षातील) प्रत्यक्षातील उत्पादन

संपूर्ण वस्तू उत्पादनक्षेत्राचा (manufacturing sector) उत्पादनक्षमता वापराचा दर मोजावयाचा असल्यास सर्व उद्योगांच्या मूल्यरूपातील उत्पादनाची बेरीज करून त्याला त्याच उद्योगांच्या मूल्यातील क्षमता उत्पादनाच्या (capacity output in value terms) बेरजेने भागावे लागेल.

भांडवल–उत्पादन गुणोत्तराच्या साहाय्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमतादेखील मोजता येऊ शकते. 1978 मध्ये या पद्धतीचा अधिक विकास पॅनिक यांनी केला. तथापि त्यांच्या पद्धतीमध्ये भांडवल–उत्पादन गुणोत्तराऐवजी त्यांनी उत्पादन–भांडवल गुणोत्तराचा विचार केला आहे. त्यांनी उत्पादन–भांडवल गुणोत्तराची श्रेणी (series) तयार केली (Christiano Lawrence J., 1981). $Y_t / K_t$, t = 1 ..... T [$Y_t$ = उत्पादन, $K_t$ = भांडवल साठा, t = कालावधी (वर्ष) ] मानल्यास, खालील समीकरणाच्या साहाय्याने त्यांनी उत्पादनक्षमता मोजली :

$$\frac{Y_t}{K_t} = a_o + a_{1t} + \hat{U}_t \quad (2.3)$$

$$t = 1 \ldots\ldots T$$

वरील (2.3) समीकरणातील $Y_t/K_t$ हे मूल्य उत्पादन-भांडवल गुणोत्तर दर्शविते. विशिष्ट कालावधीसाठी प्रत्येक वर्षाचे हे गुणोत्तरमूल्य घेऊन एक रेषा काढता येईल. आता प्रत्यक्षातील उत्पादन–भांडवल गुणोत्तर घेऊनदेखील एक प्रवृत्ती वक्र काढला जातो. या प्रत्यक्षातील उत्पादन–भांडवल वक्रावरील असा बिंदू निवडायचा की जो $a_1$ इतक्या मूल्याने वाढविल्यास $Y_t/K_t$ रेषेवरील एका विशिष्ट बिंदूला स्पर्श करेल. असा बिंदू $(Y_t/K_t)^c$ पूर्ण क्षमता उत्पादन–भांडवल गुणोत्तर दर्शवितो. $(Y_t/K_t)$ चे $(Y_t/K_t)^c$ शी गुणोत्तर काढल्यास क्षमता वापराचा दर काढता येतो. म्हणजेच $\left[ (Y_t/K_t) / (Y_t/K_t)^c \right] \times 100$ = क्षमता वापराचा शेकडा दर होय.

क्षमता मापनाच्या या पद्धतीचा महत्त्वाचा दोष म्हणजे, या ठिकाणी उत्पादनाचे गुणोत्तर निव्वळ भांडवलमूल्याशी मोजले जाते. प्रत्यक्षात उत्पादन हे निव्वळ भांडवलापेक्षा स्थूल भांडवलाशी जास्त संबंधित असते. या पद्धतीतील आणखी एक प्रमुख अडचण म्हणजे भांडवलसाठ्याची मोजणी करणे होय.

## 2.3

### व्हॉर्टन पद्धती (Trends through peaks)

या पद्धतीमध्ये उद्योगाच्या औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक बिंदू घेऊन त्यांच्या पाठोपाठच्या शिखर बिंदूंतून (Peaks) एक सरळ रेषा स्थापित केली जाते. पुढच्या प्रत्येक शिखर बिंदूपासून स्थापित केलेल्या सरळ रेषेला पुढे खेचले (extrapolated) जाते (नवीन निर्देशांक बिंदू या प्रवृत्ती रेषेपेक्षा वर (exceed) नसल्यास). परंतु नवीन शिखर बिंदू (peak) आधीच्या शिखर बिंदूपेक्षा अधिक उंचीवर असल्यास, भिन्न उताराची एक वेगळी रेषा प्राप्त होईल. अशा प्रकारे पूर्वीच्या रेषेत, उद्योगाच्या उत्पादन निर्देशांकात चक्रीय घट होईपर्यंत पुनरीक्षण (revision) केले जाते.

या पद्धतीत प्रत्येक उद्योगातील भांडवलाचा साठा स्थिर आहे व बदलत्या उत्पादनघटकांचा पुरवठा अमर्याद आहे, ही गृहिते अनुस्यूत आहेत. तसेच प्रत्येक उद्योगाची उत्पादनपातळी ही अन्य उद्योगांच्या उत्पा–

दनावर अवलंबून नाही, असेही मानले जाते. याशिवाय असेही गृहीत धरले जाते की, उद्योगाचे प्रत्यक्षातील सर्वोच्च उत्पादन (peak output) हेच पूर्ण क्षमता उत्पादन आहे (Klein L. R. and Summers R., 1966).

उत्पादनक्षमता मापनाच्या या पद्धतीमध्ये शिखर बिंदूंच्या प्रवृत्तीच्या आधारे क्षमतामापन केले जाते. हे शिखर बिंदू प्रस्थापित करताना उद्योगाच्या प्रत्येक तीन महिन्याच्या उत्पादननिर्देशांकांची सरासरी काढून प्रत्येक तिमाहीचा निर्देशांक निश्चित केला जातो (उत्पादनातील हंगामी बदलांचे समायोजन (adjustment) करून). अशा प्रकारे प्रत्येक तिमाहीच्या (सरासरी) निर्देशांकांची श्रेणी (series of indices) मिळते, त्यालाच व्हॉर्टन श्रेणी (Wharton series) असे म्हणतात. आता या निर्देशांकांच्या आकडेवारीवरून खालील नियमांच्याआधारे शिखर बिंदू निश्चित करता येतात (Krishnamurthy K.,1961).

(1) कोणत्याही तिमाहीचा निर्देशांक जर आधीच्या सलग दोन तिमाहींच्या निर्देशांकाइतका अथवा त्यापेक्षा जास्त असेल, तर त्या तिमाहीचा निर्देशांक शिखर बिंदू (peak) समजावा.

(2) जर सलग दोन तिमाहींचे उत्पादननिर्देशांक सर्वोच्च पातळीचे असतील (peak level), तर त्यातील दुसऱ्या तिमाहीच्या उत्पादनाचा निर्देशांक हा शिखर बिंदू समजावा.

(3) जर सलग तीन तिमाहींचे उत्पादननिर्देशांक समान असतील (उत्पादन पातळीत बदल नसेल), तर मधल्या तिमाहीचा उत्पादननिर्देशांक शिखर बिंदू समजावा.

(4) एका शिखर बिंदूपासून उत्पादननिर्देशांक त्यापुढील एकापेक्षा जास्त तिमाही काळात घटून पुन्हा वाढल्यास त्यापैकीच्या दुसऱ्या तिमाही उत्पादननिर्देशांकाला शिखर बिंदू समजावे.

(5) पूर्वीच्या दोन शिखर बिंदूंना जोडून (सांधून) काढलेल्या प्रवृत्ती रेषा पातळीपेक्षा प्रत्यक्षातील उत्पादन (पुढील तिमाहीत) वाढल्यास नवीन शिखर बिंदू अस्तित्वात येतो.

प्रत्यक्षातील उत्पादनाचे शिखर बिंदू सांधणाऱ्या प्रवृत्ती रेषेशी गुणोत्तर काढल्यास उत्पादनक्षमतेच्या वापराचा दर कळतो. प्रत्येक तिमाहीसाठी असे गुणोत्तर काढून त्यांची भारित सरासरी काढता येते. अशा तऱ्हेने संपूर्ण वर्षाच्या कालावधीतील वस्तू उत्पादन क्षेत्राच्या उत्पादनक्षमता वापराचे प्रमाण निश्चित करता येते. उत्पादनक्षमता मापनाच्या या पद्धतीचे फायदे म्हणजे,

(1) या पद्धतीमध्ये आवश्यक असणारी आकडेवारी सहज उपलब्ध असते आणि

(2) भांडवलाबरोबरच संयोजन, व्यवस्थापन इत्यादी मर्यादांचाही विचार केला जातो.

या पद्धतीचा उपयोग अनेक देशांमध्ये व्यष्टीय व समष्टीय पातळीवर केलेला आढळतो (पहा : Taylor Jim, Winter David and Pearce David, 1970; Briscoe G., O'Brien P., Smyth D. J., 1970; RBI, 1970; Sastry D. U., 1984).

उत्पादनक्षमतेची ही मापनपद्धती सोपी व सुटसुटीत असून तिच्या साहाय्याने विविध उत्पादनांच्या संदर्भात उत्पादनक्षमता मापन सहज शक्य होते. वरील कारणांमुळे ही पद्धती आकर्षक वाटत असली तरी तिच्यात काही अंगभूत दोषसुद्धा आहेत. या पद्धतीमध्ये जो प्रमुख शिखर बिंदू आहे तो पूर्ण क्षमता उत्पादन (म्हणजेच उत्पादनक्षमतेचा 100 टक्के वापर) दर्शवितो, हे अनुस्यूत गृहीत अवास्तव वाटते. तसेच दोन शिखर बिंदूंमधील फरक जरी दाखविता येत असला तरी त्यांच्या तीव्रतेमधील फरक मोजणे शक्य होत नाही. शेवटची मर्यादा म्हणजे, या पद्धतीत येणारा बेरजेचा प्रश्न (problem of aggregation) होय. कारण, एका उद्योगाचा शिखर बिंदू दुसऱ्या उद्योगाच्या शिखर बिंदूशी जुळेलच (synchronise) असे नाही.

## 2.4

### भांडवलसाठ्याच्या साहाय्याने उत्पादनक्षमतेचे मापन (use of capital stock)

उत्पादनक्षमता मापनासाठी बर्ट जी. हिकमन (1963) यांनी गुंतवणूक फलन पद्धती सुचविली आहे.

त्यांनी अशा प्रकारचे गुंतवणूक फलन मांडले आहे की, त्यामध्ये भांडवलसाठा व उत्पादनक्षमता यांच्यात नेमका परस्परसंबंध ध्वनित होतो. त्यांनी सुचविलेले मूलभूत गुंतवणूक परागमन समीकरण ( basic investment regression equation ) खालीलप्रमाणे तयार करता येते.

(1) प्रथमत: असे गृहीत धरले जाते की, कोणत्याही वर्षातील अपेक्षित भांडवलसाठा व प्रत्यक्षातील भांडवलसाठा यातील फरकाचा निव्वळ स्थिर गुंतवणुकीशी प्रमाणशीर संबंध असतो. भांडवलाचा अपेक्षित साठा ( desired capital stock ) म्हणजे t या काळात प्रचलित परिस्थितीत दीर्घकालीन समतोलाकरिता अपेक्षित असणारा भांडवलसाठा होय. म्हणजेच,

$$K_t - K_{t-1} = b\ (\overset{*}{K}_t - K_{t-1}) \qquad (4.1)$$

$$o < b \leq 1$$

$K_t$ = t या वर्षातील प्रत्यक्ष भांडवलसाठा

$\overset{*}{K}_t$ = t या वर्षाच्या शेवटी अपेक्षित असलेला भांडवलसाठा

t = कालावधी (वर्षे)

(2) हिकमन यांनी मानलेले दुसरे गृहीत म्हणजे, अपेक्षित भांडवलसाठा हा दीर्घकाळातील अपेक्षित अथवा 'सर्वसाधारण' उत्पादन पातळी ( $\overline{Y}$ ) आणि t या वर्षातील सापेक्ष (तौलनिक) किमती ( $\overline{P}$ ) यांचे फलन आहे. म्हणजेच,

$$\overset{*}{K}_t = a_1 + a_2 \overline{Y_t} + a_3 \overline{P_t} + a_4 T$$

T = उत्पादनतंत्र पातळी (4.2)

आता (4.1) व (4.2) या समीकरणांवरून आपणास खालील समीकरण मिळते :

$$K_t - K_{t-1} = ba_1 + (ba_2)\overline{Y}_t + (ba_3)\overline{P}_t + (ba_4)\ T - b\ K_{t-1} \qquad (4.3)$$

या समीकरणात दोन प्रकारच्या तौलनिक किमतींचा विचार केलेला आहे. (अ) भांडवलाच्या किमतीच्या तुलनेत उत्पादनाची किंमत किंवा (आ) भांडवलाच्या किमतीच्या तुलनेत श्रमाची किंमत म्हणजे मजुरी.

या परागमन समीकरणात अपेक्षित भांडवलसाठ्याचा सर्वसाधारण उत्पादन व किमतीशी संबंध प्रस्थापित केलेला आहे. हिकमन यांनी अशा वार्षिक दराचे मापन केले की ज्यामुळे अपेक्षित भांडवलसाठा व प्रत्यक्षातील भांडवलसाठा यांच्यातील प्रतिशत फरक नाहीसा होतो. अशा दराचा वापर करून खालील समीकरणाच्या साहाय्याने उत्पादनक्षमता ( क्षमता उत्पादन ) दर्शविता येते :

$$Y_t^c = \frac{K_{t-1} - a_1 - a_3 \overline{P_t} - a_4 T}{a_2} \qquad (4.4)$$

$Y_t^c$ = t या वर्षातील उत्पादनक्षमता

समीकरण (4.4) वरून क्षमता उत्पादन ( capacity output ) हे भांडवलसाठा, तंत्रज्ञान पातळी व तुलनात्मक किमतीवर अवलंबून असते, हे स्पष्ट होते. या समीकरणातील $a_2$ हे अनुमापी अनुकूलता (economies of scale ) दर्शविते. परिव्यय मापन व उत्पादन फलन याशिवाय हे क्षमता उत्पादन अर्थशास्त्रीय सिद्धान्तातील पर्याप्त उत्पादन सिद्धान्ताशी सुसंगत आहे.

या पद्धतीतील दोन प्रमुख अडचणी म्हणजे, भांडवलसाठा मोजणीचा प्रश्न, आणि मरे ब्राऊन ( Hickman Bert G., 1963) यांनी म्हटल्याप्रमाणे या पद्धतीतील परागमन संबंध फलनात्मक संबंधाप्रमाणे नेमके नाहीत. म्हणून सैद्धान्तिकदृष्ट्याच हे मापन उत्तम ठरते.

## 2.5

### उत्पादन फलन

क्षमता मापनाच्या या पद्धतीमध्ये क्षमता उत्पादन निश्चित करताना सर्व उत्पादनघटकांचा विचार केला जातो. या ठिकाणी "श्रमशक्तीच्या पूर्ण वापराबरोबर भांडवल व अन्य उत्पादनसाधनांच्या आदानाने प्राप्त होणाऱ्या उत्पादनप्रवाहाला क्षमता उत्पादन म्हटले आहे" ( Klein L. R., 1960). या पद्धतीत उत्पादन

साधने व प्रत्यक्ष उत्पादन यामधील संबंध प्रस्थापित करून या संबंधाच्या साहाय्याने उत्पादनसाधनांचा पूर्ण वापर लक्षात घेऊन क्षमता उत्पादन मोजले जाते.

प्रत्यक्षातील उत्पादनाची व्याख्या खालीलप्रमाणे करता येईल ( Klein L. R. and Preston R. S., 1967) :

$$X_t = A e^{rt} L_{et}^{\alpha} K_{ut}^{\beta} v_t \qquad (5.1)$$

$X_t$ = प्रत्यक्षातील उत्पादन

$L_{et}$ = वापरलेले मनुष्य–तास (श्रम–तास)

$K_{ut}$ = वापरलेले भांडवल

$e^{rt}$ = तंत्रज्ञानातील बदल

$V_t$ = चूक निर्देशक संज्ञा ( error term )

$t$ = कालावधी (वर्षे)

यावरून क्षमता उत्पादन खालीलप्रमाणे दर्शविता येईल :

$$X_t^c = A e^{\hat{r}t} L_t^{\hat{\alpha}} K_t^{\hat{\beta}} \qquad (5.2)$$

$X_t^c$ = क्षमता उत्पादन

$L_t$ = उपलब्ध मनुष्य–तास ( श्रम-तास ) (संघर्षात्मक बेकारी वगळून)

$K_t$ = उपलब्ध भांडवलसाठा

$e^{rt}$ = तांत्रिक बदल

$A$, $\hat{r}$, $\hat{\alpha}$ आणि $\hat{\beta}$ ही (5.1) या समीकरणातील मापनाची प्राचले (parameters) आहेत, आणि $V_t = 0$ आहे. आता उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या (श्रम) मनुष्य तासांची ($L_t$) आकडेवारी सर्वसाधारणपणे सहज उपलब्ध होऊ शकते, परंतु भांडवलसाठ्याच्या ($K_t$) मोजणीत मात्र प्रश्न निर्माण होतो. भांडवलसाठ्याचे मापन करण्यासाठी कार्ल ख्राइस्ट (1951) यांनी होणाऱ्या नवीन गुंतवणुकीचा पर्याय म्हणून वापर केला. त्यांच्या विचारानुसार होणारी नवीन गुंतवणूक ही भांडवलाचा वापर न होण्याच्या प्रतिशत (percentage unutilised capital) प्रमाणावर अवलंबून असते. भांडवल मोजणीच्या प्रश्नाला दुसरा पर्याय रॉबर्ट सोलो (1957) यांनी वापरला आहे. त्यासाठी त्यांनी मनुष्यशक्ती वापराचा दर पर्याय म्हणून वापरला. याकरिता त्यांनी खालील गृहीत मानले आहे :

$$\frac{K_{ut}}{K_t} = \frac{L_{et}}{L_t} \qquad (5.3)$$

क्लाइन व प्रेस्टन (1963) यांनी सोलो यांच्या पर्यायाचा स्वीकार केलेला आहे. (5.3) या समीकरणाचे गृहीत म्हणजे, प्रत्यक्षात भांडवल व श्रम यांचा वापर समान दराने होतो. अर्थात या गृहिताला वास्तवतेचा आधार (empirical basis) आहे.

आता, (अ) कॉब–डग्लस उत्पादन फलन, (आ) समीकरण (5.2) मधील क्षमता उत्पादनाची व्याख्या आणि (3) समीकरण (5.3) मधील $K_{ut}$ ची व्याख्या गृहीत धरून खालील समीकरण मिळते :

$$\left(\frac{X_t}{X_t^c}\right) = \left(\frac{L_{et}}{L_t}\right)^{\alpha + \beta} \cdot V_t \qquad (5.4)$$

(5.4) या समीकरणात $L_t$ हे मूल्य प्रथम श्रमिकांच्या प्रमाणात घेऊन नंतर त्याचे रूपांतर (श्रम) मनुष्यतासांच्या प्रमाणात केल्यास $L_t$ ची व्याख्या खालीलप्रमाणे होईल :

$$L_t = L_{et} + L_{vt} + L_{ft} + \delta (L_t - L_{et} - L_{ft}) \qquad (5.5)$$

$L_{et}$ = सेवा नियुक्त श्रमिकांची संख्या

$L_{vt}$ = अनैच्छिक बेकारी प्रमाण

$L_{ft}$ = संघर्षात्मक बेकारी प्रमाण

$\delta$ = रोजगार संधींना असलेल्या श्रमपुरवठ्याच्या प्रतिसादाचा सहगुणक.

समीकरण ( 5.5 ) सोडविल्यास,

$$(1-\delta)(L_t - L_{ft}) = (1-\delta) L_{et} + L_{vt} \qquad (5.5\text{ अ})$$

$$L_t - L_{ft} = L_{et}\left[1 + \frac{1}{(1-\delta)}\left(\frac{L_{vt}}{L_{et}+L_{vt}+L_{ft}} \Big/ \frac{L_{et}}{L_{et}+L_{vt}+L_{ft}}\right)\right] \quad (5.5\ \text{ब})$$

$$L_t - L_{ft} = L_{et}\left\{1 + (u_t - u_{ft}) / [(1-\delta)(1-u_t)]\right\} \quad (5.5\ \text{क})$$

येथे,

$$u_t = (L_{vt}+L_{ft})/(L_{et}+L_{vt}+L_{ft}) \quad (5.5\ \text{ड})$$

आणि

$$u_{ft} = L_{ft}/(L_{et}+L_{vt}+L_{ft}) \quad (5.5\ \text{इ})$$

$u_t$ = एकूण बेकारीचा दर

$u_{ft}$ = संघर्षात्मक बेकारीचा दर

संभाव्य (श्रम) मनुष्य–तास वजा संघर्षात्मक (श्रम) मनुष्य–तास बरोबर प्रत्यक्षातील उपलब्ध (श्रम) मनुष्य–तास, म्हणजेच पूर्ण रोजगार दर्शविल्यास,

$$L_t - L_{ft} = L_{et}\left\{1 + (u_t - u_{ft}) / [(1-u_t)(1-\delta)]\right\} \quad (5.6)$$

$u_{ft}$ व $\delta$ यांची मूल्ये माहीत असल्यास हा समायोजना घटक (adjustment factor) प्रकाशित रोजगार आकडेवारीवरून माहीत करता येतो. त्यावरून उपलब्ध (श्रम) मनुष्य–तास $(L_t - L_{ft})$ मोजता येईल. अशा प्रकारे विशिष्ट कालावधीतील (श्रम) मनुष्य–तास उपलब्धतेच्या आकडेवारीचे बिंदू प्रस्थापित करून येणाऱ्या शिखर बिंदूंना सांधून वाढत्या (श्रम) मनुष्य–तास पुरवठ्याची प्रवृत्ती रेषा (trend line) मिळते. प्रत्येक उद्योगाच्या श्रम मागणीच्या अत्युच्च शिखर बिंदूत उत्पादनघटकांच्या हिश्यावरून सरळ रेषेच्या आधारे विविध उद्योगात क्षमता आदानाच्या प्रमाणाला (श्रम) मनुष्य–तासांची विभागणी करता येते. अशा तऱ्हेने आलेल्या प्रतिशत आकडेवारीला रोजगाराच्या श्रेणीने गुणून प्रत्येक उद्योगातील क्षमता (श्रम) मनुष्य-तास प्रवृत्ती मिळते.

उद्योगांचे उद्दिष्ट उत्पादन परिव्यय किमान ठेवण्याचे आहे असे मानून $\beta / \alpha$ हे मूल्य उत्पादक घटक हिश्याच्या (factor share) आकडेवारीवरून मोजल्यास,

$$\frac{q_t \cdot K_{ut}}{w_t \cdot L_{et}} = \beta / \alpha + Z_t \quad (5.7)$$

$q_t \cdot K_{ut}$ = बिगर–मजुरी उत्पन्न (non–wage income)

$w_t \cdot L_{et}$ = मजुरी स्वरूपातील उत्पन्न (wage income)

t = कालावधी वर्षे

$Z_t$ = चूक निर्देशक संज्ञा (error term)

$$\left(\frac{\beta}{\alpha}\right) = \frac{1}{T} \sum_{t=1}^{T} \frac{q_t \cdot K_{ut}}{w_t \cdot L_{et}} \quad (5.8)$$

आता परागमनाने (regression) A, $\alpha$ व $\gamma$ यांची मूल्ये मोजून,

$$\log e^{(X_t)} = \log e^{(A)} + \gamma_t + \alpha \left[\log e^{(L_{et})} + \left(\frac{\hat{\beta}}{\alpha}\right) \log e^{(K_{ut})} + \log e^{v_t}\right] \quad (5.9)$$

येथे $\hat{\beta} = \hat{\alpha}\,(\widehat{\beta/\alpha})$ व $\hat{A}$, $\hat{\gamma}$ आणि $\hat{\alpha}$ या प्रमाणांच्या (estimates) व प्रत्येक उद्योगाच्या $K_t$ व $L_t$ यांच्या साहाय्याने समीकरण (5.2) चा उपयोग करून उद्योगाच्या क्षमतेचे मापन करता येते. या मापनाप्रमाणे $X_t$ व $X_t^c$ यांचे गुणोत्तर म्हणजे क्षमता वापराचा दर होय. कॉब–डग्लस फलनाबरोबरच अन्य उत्पादन फलनाने (सी. इ. एस.) देखील उत्पादनक्षमता मापन करता येते. (Nayar and Kanbur, 1976).

क्षमतामापनाची ही पद्धती व्यष्टीय तसेच समष्टीय अशा दोन्ही पातळ्यांवर वापरता येते. (अ) पूर्ण क्षमता स्थितीतील उद्योगांमध्ये श्रमशक्तीचे (labour force) वाटप योग्य पद्धतीने होत आहे; (आ) उत्पादनघटक बाजार स्पर्धात्मक असून व्यवसाय संस्था उत्पादन खर्च किमान ठेवण्याचा प्रयत्न करतात; (इ) सुयोग्य फलनात्मक संबंधाचा विचार केला आहे आणि

(ई) निरीक्षित उपलब्ध आकडेवारी आर्थिक संकल्पनांचे योग्य मापन करते, अशी गृहिते मानल्यास उत्पादन फलनाचा अभियांत्रिकी दृष्टिकोन व उत्पादनक्षमतेचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन एकमेकाशी सुसंगत होतात (Klein L. R., 1960). उत्पादनक्षमतेचे उत्पादन फलन संबंधावर आधारित मापन संकल्पनात्मकदृष्ट्या सुयोग्य आहे, कारण पूर्ण क्षमता उत्पादन हे फक्त भांडवल या एकाच नव्हेतर श्रम, संयोजन, तांत्रिक बदल अशा इतरही अनेक चलांचे फलन आहे. या पद्धतीमधील प्रमुख अडचण म्हणजे भांडवल मोजणी होय. त्याशिवाय जोन रॉबिन्सन (1953–54) व स्राफा (1959) यांनी आपल्या लिखाणात मांडल्याप्रमाणे एकूण भांडवलाच्या मोजणीचा प्रश्न म्हणजेच एकूण भांडवलसाठ्याच्या मोजणीचा (aggregate capital) प्रश्न होय. जर भांडवलाच्या एकूण साठ्याची मोजणी होऊ शकली नाही, तर एकूण उत्पादन फलन निरर्थक ठरते.

## 2.6

## मॅग्रॉहिल अर्थशास्त्र विभाग पद्धती

मॅग्रॉहिल संस्थेच्या अर्थशास्त्र विभागाकडून उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (survey) केले जाते. या सर्वेक्षणात उद्योगसंस्थांना विविध प्रश्न विचारून माहिती गोळा केली जाते. गेल्या वर्षीच्या अखेरीस वस्तुरूपात उत्पादनक्षमता कशी मोजली ? त्यापूर्वीच्या वर्षीच्या उत्पादनक्षमतेशी तुलना करा. कारखान्यांना कोणत्या दराने उत्पादन करावयास आवडेल (Philips Almarin, 1963). या पद्धतीत उद्योगांचे सर्वेक्षण करताना उत्पादनक्षमतेची कोणतीही नेमकी अशी व्याख्या उद्योगांना देण्यात येत नाही, केवळ काही मार्गदर्शक सूचना (hints) देण्यात येतात. या प्रश्नांची उद्योग संस्थांनी जी उत्तरे दिली त्या आकडेवारीचे एकत्रीकरण करून अर्थव्यवस्थेच्या पातळीवर उत्पादनक्षमतेचे मापन केले जाते, त्याचप्रमाणे पूर्ण क्षमता उत्पादन व प्रत्यक्षातील उत्पादन यांचे गुणोत्तर काढून क्षमता वापराच्या दराने मापनदेखील केले जाते.

उत्पादनक्षमतेच्या सर्वेक्षणाबरोबरच या विभागातर्फे उद्योगांच्या क्षमता वापराचे सर्वेक्षण ठराविक कालांतराने केले जाते. (Perry George L., 1973). या सर्वेक्षणामध्ये उत्पादनक्षमतेऐवजी क्षमता वापराच्या संदर्भात उद्योगांना प्रश्न विचारले जातात. क्षमता वापरांची ही आकडेवारी गोळा करताना भांडवल-श्रम गुणोत्तरातील बदल, तसेच इतर रचनात्मक बदलही विचारात घेतले जातात. पेरी जॉर्ज यांच्या शब्दात, "It appears that respondents 'find' capacity when output rises sharply, and 'lose' it when output slackens." या सर्वेक्षणातील माहितीच्या आधारावर उद्योजकांच्या दृष्टिकोनातून अतिरिक्त क्षमता म्हणजे काय हे समजणे शक्य होते. उत्पादनक्षमता मापनाच्या या पद्धतीचा महत्त्वाचा दोष म्हणजे, उद्योगांच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे किंवा केवळ मोठ्या उद्योगांच्या प्रतिमानावरून निष्कर्ष काढल्यामुळे निर्माण होणारे पूर्वग्रह (biases) होय. बहु-वस्तू व्यवसायसंस्थांच्या बाबतीत उत्पादनाच्या बेरजेचा प्रश्न सोडविताना पूर्वग्रह निर्माण होणे शक्य असते. याशिवाय, या पद्धतीमध्ये क्षमतेची कोणतीही निश्चित व्याख्या न करता 'क्षमता' म्हणजे काय हे सर्वेक्षण केल्या जाणाऱ्या व्यवसायसंस्थांनीच ठरवायचे असल्यामुळे विविध उद्योगांच्या वैविध्यपूर्ण प्रतिसादामुळे क्षमतेचे विविध दृष्टिकोन निर्माण होतात. संभाव्य उत्पादनाऐवजी अल्पकालीन साधनसामग्रीच्या कोंडीविषयी माहिती पुरविणारा एक उत्तम स्रोत आहे. विशेषतः आर्थिक मंदीच्या सखोलतेचे नेमके मापन ही पद्धत करीत नाही (Artus J. R. 1977,). या सर्वेक्षण पद्धतीचा एक सरळ सरळ गुण म्हणजे, 'या पद्धतीमध्ये उत्पादनक्षमता म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर माहीत असण्याची शक्यता असणाऱ्यानाच या संदर्भातील प्रश्न प्रत्यक्षात विचारले जातात' (Philips Almarin, 1963).

## 2.7

## फेडरल रिझर्व्ह बोर्ड पद्धती

वस्तू निर्माणक्षेत्रातील (manufacturing sector) उद्योगांची उत्पादनक्षमता मापन करण्यासाठी फेडरल रिझर्व्ह बोर्डाकडून विविध मार्गांनी माहिती गोळा केली जाते. हे बोर्ड (अ) वस्तू निर्माणक्षेत्रातील उत्पादकांच्या स्थिर भांडवल–

साठ्याच्या निर्देशांकांचे वाणिज्य विभागाचे अंदाज, (आ) मॅग्रॉहिलने तयार केलेली या क्षेत्रातील उद्योगांच्या उत्पादनक्षमता निर्देशांकांची आकडेवारी आणि (इ) मॅग्रॉहिल अर्थशास्त्र विभागाने उद्योगांच्या सर्वेक्षणात गोळा केलेली उत्पादनक्षमतेची माहिती, या तीन मार्गांनी मिळणाऱ्या माहितीचा उत्पादनक्षमता मापनासाठी वापर करते ( De Leeuw Frank-U S Congress, 1962). माहितीच्या या तीन स्रोतांमध्ये निर्माण होणारे पूर्वग्रह टाळण्यासाठी बोर्ड या तिन्हींचे एकत्रीकरण करते. या प्रक्रियेतून खालील दोन समीकरणे मिळतात :

$$Y_{3t} / Y_{1t} = a_1 b_1^t u_t \quad (7.1)$$

$$Y_{3t} / Y_{2t} = a_2 b_2^t v_t \quad (7.2)$$

$Y_1$ = वाणिज्य विभागाचे भांडवलसाठ्याचे अंदाज

$Y_2$ = मॅग्रॉहिल क्षमता निर्देशांक

$Y_3$ = मॅग्रॉहिल क्षमता वापराचा निर्देशांक

$u, v$ = चूक निर्देशक संज्ञा ( error terms )

$a, b$ = परागमन सहगुणक

$t$ = कालावधी (वर्षे)

a आणि b या सहगुणकांच्या मूल्यांवरून प्रत्येक समीकरणातील $Y_3$ ची दोन मूल्ये ( क्षमता मापनाच्या कालावधीतील सर्व वर्षांकरिता) मिळतात. $Y_3$ च्या या दोन मूल्यांची सरासरी काढली असता पूर्ण क्षमता उत्पादन मोजता येते, आणि या क्षमता उत्पादनाशी प्रत्यक्ष उत्पादनाचे गुणोत्तर काढले असता उत्पादन–क्षमता वापराचा दर मिळतो. मूल्य निर्मिती भारांच्या (value added weights) साहाय्याने संपूर्ण अर्थ–व्यवस्थेच्या (समष्टीय) पातळीवरील क्षमता वापराचा दर मोजता येतो. क्षमता मापनाच्या या पद्धतीमध्ये अन्य स्रोतांच्या माध्यमातून मिळविलेल्या माहितीचा वापर केला जातो. तथापि भांडवलसाठ्याच्या मोज–णीची प्रमुख अडचण, तसेच मॅग्रॉहिल सर्वेक्षण पद्धती–मधील अंगभूत अडचणी, या पद्धतींच्या मर्यादा स्पष्ट करतात. या अडचणींमुळे निर्माण होणारे विविध पूर्वग्रह व चुका (errors) दूर करण्यासाठी बोर्डाकडून विविध पद्धतींचा वापर केला जातो ( De Leeuw Frank, 1966). विशेषतः वस्तुनिर्मिती उद्योगांच्या भांडवल–साठ्याचे मापन करण्यासाठी 'कंपनी' पातळीवरील आकडेवारीची श्रेणी (data series) न वापरता आस्थापना (establishment) पातळीवरील भांडव–लाची आकडेवारीची श्रेणी वापरली जाते. त्याचप्रमाणे भांडवलाचे निवर्तन (retirement) भांडवलाचा स्थिर अंश (constant fraction) आहे हे गृहीत धरले जाते, म्हणजेच,

$$S_{t+1} = (1-k)S_t + I_t$$

$S_t$ = t या कालावधीच्या सुरुवातीचा भांडवलसाठा

$I_t$ = t या कालावधीतील गुंतवणूक खर्च

$k$ = भांडवल निवर्तन दर

$t$ = कालावधी (वर्षे)

या ठिकाणी निव्वळ भांडवलाऐवजी स्थूल भांडवलसाठ्याचा वापर केला जातो, हे लक्षात घेतले पाहिजे.

मॅग्रॉहिल अर्थशास्त्र विभागाकडून प्राप्त होणाऱ्या क्षमता निर्देशांकाचे प्राथमिक प्रक्रिया उद्योग आणि विकसित प्रक्रिया उद्योग अशा दोन गटांमध्ये फेडरल बोर्डाकडून वर्गीकरण केले जाते. या प्रत्येक गटातील उद्योगांची क्षमता त्यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाला क्षमता वापराच्या प्रतिशत दराने भागून मोजता येते. हे खालील समीकरणांवरून स्पष्ट होते.

$$X_1 / X_2 = a_1 b_1^t u_t \quad (7.3)$$

$$X_1 / X_3 = a_2 b_2^t v_t \quad (7.4)$$

$X_1$ = बोर्डाचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक भागिले मॅग्रॉहिल क्षमता वापर दर

$X_2$ = मॅग्रॉहिल क्षमता निर्देशांक

$X_3$ = स्थूल भांडवलसाठा

$X_i$ = i च्या (i = 1, 2 ) समीकरणासाठी छेद–परागमन (intercept regression) सह–गुणकाचा अँटीलॉगॅरिथम.

$u_t, v_t$ = चूक निर्देशक संज्ञा (error terms)

$t$ = कालावधी (वर्षे)

अंतिमतः समीकरण (7.3) मधील परागणित मूल्यांना (calculated values) $X_2$ ने गुणून, आणि समी-

करण (7.4) मधील परागणित मूल्यांना $X_3$ ने गुणून त्या दोहोंची सरासरी घेतल्यास उत्पादनक्षमता निश्चित होते. आता प्रत्यक्षातील उत्पादन आणि ही उत्पादन–क्षमता यांचे गुणोत्तर घेतल्यास क्षमता वापराचा दर काढता येतो. या पद्धतीमध्ये प्राथमिक व विकसित प्रक्रिया उद्योगासाठी पूर्ण क्षमता व क्षमता वापर दराचे स्वतंत्र मापन केले आहे. या पद्धतीतही एक दोष उरतो, तो म्हणजे क्षमता वापराचे हे सर्वेक्षण गतकालीन सांख्यिकी माहिती व परस्परसंबंधावर आधारित आहे व त्यांच्यात कालौघात लक्षणीय बदल होणे सहज शक्य असते.

या पद्धतीच्या सुधारित दृष्टिकोनानुसार क्षमता वापराच्या दराचे पुनरिक्षण केले असता संपूर्ण वस्तू–निर्मिती क्षेत्राच्या पातळीवर 1954–65 या काला–वधीतील क्षमता वापराच्या दरात बदल दिसला नाही ( Edmonson Nathan, 1971 ). तथापि, फेडरल रिझर्व्ह बोर्डाने क्षमता वापराच्या दराचे अंदाज सात–त्याने उपलब्ध केले आहेत ( Rost Ronald F., 1983).

क्षमता मापनाच्या या पद्धतीचा उपयोग फक्त एक पर्यायी पद्धत म्हणूनच आहे.

## 2.8

### संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन पद्धती

अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील क्षमता वापराची ही पद्धती आर्थर एम. ओकून (1962) यांनी विक–सित केलेली आहे. या पद्धतीत, बेकारीच्या दरातील एकक बदल (प्रतिशत) आणि स्थूल राष्ट्रीय उत्पाद–नातील एकक बदलाच्या संबंधांचा वापर केलेला आहे. दुसऱ्या शब्दात, या पद्धतीमध्ये, सीमांत उत्पादनाचा बेकारीच्या सीमांत बदलाशी संबंध जोडलेला आहे.

गतकालीन आकडेवारीवरून परागमन तयार केल्यास प्राचले (parameters) खालीलप्रमाणे मोजता येतात ( Christiano Lawrence J., 1981 ).

$$\Delta U_t = d\,(t) + a_0\,\Delta \log Y_t + a_1\,\Delta \log Y_{t-1} + a_2\,\Delta \log Y_{t-2} + a_3\,\Delta \log Y_{t-3} + e_t \qquad (8.1)$$

$\Delta$ = अनुजात (deviation)

$U_t$ = बेकारीचा दर

$Y_t$ = t कालावधीतील वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पादन

$e_t$ = यादृच्छिक चूक निर्देशक संज्ञा ( random error term ).

t = कालावधी (वर्षे)

समीकरण (8.1) व्यस्त करून $\Delta \log Y_t$ हे मूल्य प्राप्त करता येऊ शकते.

$$\Delta \log Y_t = \sum_{i=o}^{n} a'_i\,\Delta U_{t-1} \qquad (8.2)$$

n च्या कोणत्याही मूल्यासाठी i = o, 1, ... n

समीकरण (8.1) मधील सहगुणकांच्या आधारावरून,

$$\log Y_t = \sum_{i=o}^{n} a'_i\,U_{t-1} + c \qquad (8.3)$$

c = स्थिर मूल्य (constant)

अशा प्रकारे समीकरण (8.3) हे प्रत्यक्ष वास्तव उत्पा-दन आणि प्रत्यक्ष बेकारीचा दर यांच्यातील गतसंबंध स्पष्ट करते.

$$\Delta \log\left(\frac{Y_t}{Y^f_c}\right) = \sum_{i=o}^{n} a'_i\,(U_{t-1} - U^f_{t-1}) \qquad (8.4)$$

येथे $U^f_t$ = पूर्ण रोजगार/बेकारी आणि t = कालावधी (वर्षे). समीकरण (8.4)मधील डाव्या बाजूचा अँन्टि-लॉग घेऊन त्याला 100 ने गुणल्यास (पूर्ण रोजगार पातळी उत्पादन व प्रत्यक्ष रोजगार पातळी उत्पादन यातील ) उत्पादन अंतर मोजता येते. ओकून यांनी बेकारीचा दर व उत्पादनातील प्रतिशत बदल यांच्या–तील संबंधांचा वापर करून पूर्ण क्षमता उत्पादन पातळी मोजली. या पद्धतीत बेकारी या एकाच चलाच्या उत्पादनावर होणाऱ्या परिणामाचा विचार केलेला आहे. परंतु प्रत्यक्षात रोजगाराव्यतिरिक्त अन्य उत्पादन घट–कांचाही उत्पादनावर परिणाम होत असतो, या वास्त–वतेकडे ओकून यांनी दुर्लक्ष केलेले दिसते.

एडविन कूह (1966) यांनी रोजगार ( प्रमुख चल ), भांडवल साठा, पश्चायनात्मक उत्पादन

(lagged output) आणि पश्चायनात्मक रोजगार (lagged employment) यांचा उपयोग करून साध्या गतिशील उत्पादन फलनाच्या साहाय्याने संभाव्य उत्पादनाचा (potential output) अंदाज करण्याचा प्रयत्न केला, परंतु बहुविध-रेखितेमुळे (multi-collin-earity) त्यांना मिळालेले परिणाम मात्र ओकून यांच्या पद्धतीपेक्षा निकृष्ट ठरले.

## 2.9

### आदान–प्रदान पद्धती

व्यष्टीय पातळीवरील क्षमतेच्या मापनावरून समष्टीय पातळीवरील क्षमता निश्चितीची पद्धती एकत्रीकरणाच्या (aggregation) प्रश्नामुळे (योग्य भार निश्चितीच्या अडचणीमुळे) अडचणीची ठरते. समष्टीय पातळीवर उत्पादनक्षमता मापनासाठी एल. आर. क्लाइन (1960) यांनी आदान–प्रदान आकृती-बंधाचा वापर केला आहे. यासाठी कोणत्याही उत्पादन क्षमता मापनाच्या पद्धतीनुसार उद्योगाच्या मिळालेल्या क्षमता वापराच्या आकडेवारीनुसार उद्योगांची उतरत्या क्रमाने मांडणी केली जाते. म्हणजेच, सर्वाधिक क्षमता वापराचा दर असणाऱ्या उद्योगाचा प्रथम क्रमांक असेल, तर सर्वात कमी क्षमता वापराचा दर असणारा उद्योग शेवटच्या क्रमांकावर असेल. आता 100 टक्के क्षमता वापराच्या सर्वात जवळ असणाऱ्या उद्योगाला (अर्थ–व्यवस्थेत अतिरिक्त गुंतवणूक न करता) पूर्ण क्षमता वापरायला लावल्यास इतर उद्योगांच्या उत्पादनात प्रमाणशीर वाढ होईल. अंतिम मागणीत होणारी वाढ क्षमतेच्या वापराच्या वाढीच्या प्रमाणाइतकी होते, असे गृहीत धरलेले आहे.

आदान–प्रदान पद्धती $AX=f$ या समीकरणाची अट पूर्ण करते.

$AP_1 X = P_1 f$

A = आदान–प्रदान सारणी * (input–output matrix)

X = उत्पादन सदिश (output vector)

f = अंतिम मागणी सदिश (final demand vector)

$P_1$ = पहिल्या उद्योगाच्या क्षमतेच्या वापराच्या प्रतिशत दराचा व्यस्त

[ * A हा या ठिकाणी नेहमीची आदान–प्रदान सारणी नाही. क्लाइन यांनी आपल्या विश्लेषणात याबाबत खुलासा केला नसला तरी A म्हणजे (I-A) आहे.]

(f) अंतिम मागणी $P_1 f$ इतकी वाढल्याने अल्पकाळात $P_1 X$ हा क्षमता उत्पादनाचा सदिश मिळतो. याप्रमाणे प्रथम क्रमांकाच्या उद्योगाचे उत्पादन वाढवून त्याच्या क्षमता उत्पादनाइतके झाल्यामुळे इतर उद्योगांचे उत्पादनदेखील वाढते.

आता पूर्ण क्षमता वापराच्या सर्वात जवळच्या क्रमांक दोनच्या उद्योगाचा क्षमता वापराचा दर, पहिल्या क्रमांकाच्या उद्योगात गुंतवणूक वाढवून वाढीव क्षमता निर्माण केल्याशिवाय वाढविता येणार नाही. यासाठी लागणारी गुंतवणूक क्षमता प्रवेश सहगुणकाच्या साहाय्याने निश्चित करता येते. म्हणजेच,

$$I_i = a_i \triangle (X_c)_i$$

$I_i$ = i व्या उद्योगातील निव्वळ गुंतवणूक

$\triangle (X_c)_i$ = i व्या उद्योगातील क्षमता उत्पादनातील वाढ

$a_i$ = i व्या उद्योगाचा क्षमता उत्पादन प्रवेश सहगुणक

$I_i$ ह्या गुंतवणुकीमुळे दुसऱ्या उद्योगाचा क्षमता वापर दर 100 टक्के होतो.

आता तिसऱ्या उद्योगाची क्षमता 100 टक्के वापरण्यासाठी पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या उद्योगांमध्ये गुंतवणुकीची गरज निर्माण होईल. ही गुंतवणूक किती रकमेची असेल हे त्या उद्योगांच्या क्षमता–उत्पादन गुणकाच्या साहाय्याने निश्चित करता येते. अशा प्रकारे एका पाठोपाठ एक उद्योगांची क्षमता पूर्ण वापरून मशिनरी (गुंतवणूक किंवा भांडवली वस्तू) क्षेत्राची क्षमता पूर्ण वापरात येईपर्यंत अशा फेऱ्या चालू राहतील. जेव्हा मशिनरी उद्योगाची क्षमता 100 टक्के वापरली जाते, तेव्हा मिळणारी एकूण उत्पादन पातळी म्हणजे अर्थव्यवस्थेचे ते क्षमता उत्पादन होय. अर्थात ही क्षमता उत्पादन पातळी अर्थ–

व्यवस्थेला एकदम गाठणे शक्य नाही, परंतु काही निश्चित अशा कालावधीत ती पातळी प्राप्त करणे शक्य आहे. अशा प्रकारे क्षमता वापराच्या वाढीच्या प्रक्रियेत काही भांडवली वस्तू उद्योग असल्यास अधिक गुंतवणूक संधी निर्माण होतील. अशा स्थितीत भांडवली वस्तू उद्योग उत्पादन वाढविण्यास मर्यादा (constrainfs) ठरणार नाहीत. थोडक्यात, भांडवली वस्तू उद्योगांच्या क्षमतेत वाढ झाल्याने एकूणच अर्थ–व्यवस्थेच्या उत्पादनक्षमतेच्या विस्तारास हातभार लागतो (Klein L. R., 1960).

अर्थव्यवस्थेच्या एकूण क्षमता मापनाची ही पद्धत संकल्पनात्मकदृष्ट्या खूप आकर्षक असली तरी, या पद्धतीमध्ये अन्य पद्धतीनुसार मिळणाऱ्या उद्योगांच्या क्षमता वापर दरांच्या आकडेवारीवर अवलंबून राहावे लागते. म्हणजेच, या पद्धतीचा खात्रीशीरपणा हा प्रारंभी वापरलेल्या उद्योगांच्या क्षमता–वापर दरांच्या खात्रीशीरतेवर अवलंबून असतो. परंतु या पद्धतीचा महत्त्वाचा फायदा म्हणजे, यामुळे कोणता उद्योग अन्य उद्योगांच्या क्षमता–वापराचा दर वाढविण्यात पुरवठा–अडथळा (supply constraint) आहे हे शोधता येते. असे उद्योग लक्षात आल्यास औद्योगिक क्षेत्रातील क्षमता वापराच्या कार्यक्रमाचे नियोजन करणे सुलभ होते. या पद्धतीचा विशेष उपयोग औद्योगिक उत्पादनाचे संरचनात्मक नियोजन करण्यासाठी होतो.

## 2.10

## रेषीय प्रायोजना पद्धती

ज्या उद्योगांमध्ये एकापेक्षा जास्त वस्तू उत्पादित केल्या जातात (multi-product industries) किंवा एकापेक्षा जास्त उत्पादन प्रक्रिया (multi–process industries) वापरल्या जातात, त्या उद्योगांच्या संदर्भात उत्पादनक्षमता मापनाच्या इतर सर्वसामान्य पद्धतींचा वापर करता येणे शक्य होत नाही. उदा–हरणार्थ, रासायनिक उद्योग पेट्रोकेमिकल्स उद्योग इत्यादी.

कोणत्याही उत्पादनप्रक्रियेत वेगवेगळ्या वस्तू (m) उत्पादनासाठी वेगवेगळी यंत्रे (n) वापरली जातात. प्रत्येक वस्तूच्या उत्पादनासाठी प्रत्येक यंत्र काही कालावधीसाठी (तास) वापरले जाते. म्हणजे प्राप्त होणाऱ्या कालावधी सहगुणक सारणीचा (time coefficient matrix) क्रम n x m असेल. हा कालावधी–सहगुणक तासांच्या प्रमाणात मोजून प्रत्येक यंत्र एका वर्षात किती तास काम करते हे निश्चित करता येते. कामांच्या पाळ्यांच्या व प्रत्येक पाळीमध्ये प्रत्येक यंत्राच्या उत्पादनकाळाचा (तास) विचार करून प्रत्येक यंत्राला उपलब्ध होणाऱ्या एकूण यंत्र-तासांचा हिशेब करता येतो. हे एकूण यंत्र–तास संरोध (constraint) समजून पर्याप्त उत्पादित–मिश्र (optimum product-mix) असे प्राप्त केले जाते की, ज्यामुळे मूल्य निर्मिती महत्तम करण्यात येते.

हा प्रायोजनाचा (programming) प्रश्न आहे. कारण, प्रत्येक यंत्राचे एकूण उपलब्ध तास हा संरोध आहे, तर उद्दिष्ट फलन मूल्य निर्मिती किंवा नफा आहे. उपलब्ध असणाऱ्या एकूण यंत्र–तासांच्या साहाय्याने कमाल नफा देणारे उत्पादन म्हणजे क्षमता उत्पादन होय. ( Mathur P. N., Valavade S. P. and Kirloskar M. V., 1967). तसेच प्रत्यक्ष उत्पादनाचे क्षमता उत्पादनाशी असलेले गुणोत्तर म्हणजे उत्पादनक्षमता वापराचा दर होय.

हेलेन मालेनबॉम (1969) यांच्या मते अपूर्ण स्पर्धेच्या जगात 'किमान परिव्यय' संकल्पना ही उद्योगातील गुंतवणूक योजनांचे उपयुक्त निदर्शक मानणे अवास्तव आहे. परिणामत: यंत्र व संयंत्रांची संभाव्य महत्तम उत्पादनक्षमता मोजणे शक्य होत नाही. त्यांच्या मते विविध उत्पादित–मिश्रांच्या संदर्भात क्षमता उत्पादन म्हणजे, शक्य असणाऱ्या विविध उत्पादित-मिश्रांच्या रेषांवरील अशा बिंदूंचा संच की ज्या बिंदूपाशी सीमांत परिव्यय विशिष्ट (prescribed) पातळीपर्यंत वाढलेला असेल.

जेम्स ग्रिफिन (1972) यांनी बहु–वस्तू व बहु-प्रक्रिया उद्योगांसाठी 'किमान सरासरी परिव्ययावर' आधारित क्षमतेच्या अर्थशास्त्रीय व्याख्येचा उपयोग 'उत्पादनक्षमता' मापनासाठी केला आहे. पेट्रोलियम शुद्धीकरण उद्योगाची क्षमता मापनासाठी त्यांनी या पद्धतीचा अवलंब केला. उत्पादित–मिश्र स्थिर ठेऊन

त्यांनी रेषीय प्रायोजना पद्धतीचा उपयोग करून किमान परिव्ययांच्या विविध पातळ्यांचा शोध घेतला.

उत्पादनक्षमता मापनाच्या रेषीय प्रायोजना पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे, या पद्धतीमध्ये अर्थशास्त्रीय आणि अभियांत्रिकी या क्षमतेच्या दोन्हीही दृष्टिकोनांचा वापर करता येतो. उदाहरणार्थ, जर आदान संरोध घेऊन महत्तम उत्पादन उद्दिष्ट समोर ठेवल्यास तो क्षमतेचा अभियांत्रिकी दृष्टिकोन होईल, तर किमान परिव्यय संरोध घेऊन ( किंमत संरोध ) मूल्य निर्मिती (नफा) महत्तम करण्याचे उद्दिष्ट मानल्यास हा क्षमतेचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन होईल.

## 2.11

## यंत्र–तास पद्धती

राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने (National Productivity Council, 1976) कापड उद्योगातील क्षमता वापराच्या दराचे अंदाज घेण्यासाठी यंत्र–तास पद्धतीचा वापर केला आहे. आठ तासांच्या तीन कामाच्या पाळ्या ( 24 तास हा स्थिरांक ) गृहीत धरून एकूण यंत्र–तासांची मोजणी केली ही त्या उद्योगाची यंत्र–तास क्षमता होय. प्रत्यक्षात वापरल्या जाणाऱ्या यंत्रांची संख्या लक्षात घेऊन, कामाच्या प्रत्यक्ष पाळ्यांचा विचार करून एका विशिष्ट वर्षातील प्रत्यक्ष यंत्र–तास मोजले. प्रत्यक्ष यंत्र–तासाचे एकूण यंत्र-तासांशी घेतलेले गुणोत्तर म्हणजे उत्पादन–क्षमता वापराचा दर होय.

क्षमतेचे यंत्र-तास मापन हे एकजिनसी व वास्तव मापन आहे. या पद्धतीत असे गृहीत धरले जाते की, उदाहरणादाखल 1900 साली स्थापन केलेल्या यंत्रांची कार्यक्षमता, व 1950 मध्ये स्थापन केलेल्या यंत्रांची कार्यक्षमता सारखीच आहे, त्याचप्रमाणे विभिन्न यंत्रांची (स्वयंचलित, निम–स्वयंचलित वगैरे) कार्यक्षमतादेखील समान आहे ( Sastry D. U. 1984 ). परंतु ही दोन्ही गृहिते अवास्तव आहेत. याशिवाय ही पद्धत एक वस्तू/एक प्रक्रिया उद्योगांसाठीच योग्य ठरू शकेल, परंतु बहु–वस्तू/बहु–प्रक्रिया उद्योगांची क्षमता या पद्धतीने मोजणे कठीण ठरते. तसेच या पद्धतीमध्ये क्षमता या संकल्पनेचा अर्थ व्यापक अर्थाने न घेता मर्यादित अर्थाने घेतलेला दिसतो. म्हणून या पद्धतीत फक्त भांडवलाचाच (यंत्रांचाच) विचार करून अन्य उत्पादनघटकांकडे दुर्लक्ष केलेले दिसते. परिणामतः ही पद्धती सैद्धांतिकदृष्टया परिपूर्ण ठरत नाही.

## 3

## समारोप

क्षमतामापनाच्या विविध पद्धतींपैकी क्षमतेच्या अर्थशास्त्रीय संकल्पनेवर आधारित पद्धती क्षमतेच्या अभियांत्रिकी संकल्पनेवरील आधारित पद्धतींपेक्षा तुलनेने सरस आहेत. याचे कारण म्हणजे तांत्रिकदृष्टया जे (उत्पादन) शक्य आहे ते अर्थशास्त्रीयदृष्टया योग्य असेलच असे नाही. (Griffin James M., 1972). क्षमतेच्या अर्थशास्त्रीय संकल्पनेवर आधारित क्षमता मापनपद्धतींमध्ये उत्पादनप्रक्रियेच्या सर्वसाधारण परि–स्थितीचा जसा विचार केला जातो तसा तो अन्य पद्धतीमध्ये केला जात नाही. परंतु त्यासाठी लागणारी आकडेवारी अतिशय काटेकोर असावी लागते, व परि–णामतः त्या अडचणीमुळे या पद्धती व्यापक प्रमाणावर अवलंबिता येत नाहीत. व्हॉर्टन पद्धती, भांडवल-उत्पादन गुणोत्तर, रेषीय प्रायोजना इत्यादी पद्धती उत्पादन फलन, स्थापित क्षमता मापनपद्धती इत्यादींपेक्षा संकल्पनात्मक-दृष्टया सरस आहेत. क्षमतेच्या अभियांत्रिकी संकल्पने–वर आधारित पद्धतीमध्येदेखील स्थापित क्षमता माप–नापेक्षा उत्पादन फलन पद्धती जास्त उजवी ठरते, कारण या पद्धतीमध्ये अर्थशास्त्रीय संकल्पनेवर आधारित मापनाशी बरेचसे साम्य आहे.

समष्टीय पातळीवरील मापन पद्धतीविषयी (उदाहरणार्थ, संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन पद्धती) थोडक्यात सांगायचे झाल्यास, ही मापन पद्धती स्थूल राष्ट्रीय उत्पादन आणि रोजगार या एकाच चलासधील गतसंबंधाचा वापर करते. यामध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनावर होणाऱ्या अन्य चलांच्या प्रत्यक्ष परिणामांचा विचार होत नाही. त्याचप्रमाणे स्थूल राष्ट्रीय उत्पादन व रोजगार यांच्यातील गतसंबंध प्रत्यक्षात वर्तमानात तसेच असतील असे मानणेदेखील वास्तव वाटत नाही. आदान–प्रदान पद्धतीला तिच्या स्वतःच्या काही मर्यादा

**क्षमता मापनपद्धतींची थोडक्यात वैशिष्ट्ये**

| अनुक्रम | मापन पद्धती | क्षमता संकल्पना | व्यष्टीय/समष्टीय/दोन्ही | कामाच्या पाळ्यांचा प्रभाव | महत्त्वाचा चल | आकडेवारीचे स्वरूप/अडचणी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्थापित क्षमता | अभियांत्रिकी | दोन्ही | होय | भांडवल | उत्पादनक्षमतेची नियमित आकडेवारी |
| 2 | भांडवल–उत्पादन गुणोत्तर | अभियांत्रिकी | दोन्ही | नाही | भांडवल | भांडवलसाठा मोजणी |
| 3 | व्हॉर्टन | अर्थशास्त्रीय | दोन्ही | नाही | कोणतेही एक चल नाही | उत्पादनाची आकडेवारी |
| 4 | भांडवलसाठा | अर्थशास्त्रीय | दोन्ही | नाही | गुंतवणूक | गुंतवणूक फलन मापन |
| 5 | उत्पादन फलन | अभियांत्रिकी | दोन्ही | नाही | सैद्धान्तिकदृष्ट्या विविध चले प्रत्यक्षात रोजगार पातळी | अर्थमितीय अंदाज आणि क्षमतेची आकडेवारी |
| 6 | मॅग्रॉहिल | अर्थशास्त्रीय | दोन्ही | होय | उद्योजकांचे उत्पादनक्षमतेचे अंदाज | सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली आकडेवारी |
| 7 | फेडरल रिझर्व्ह बोर्ड | अर्थशास्त्रीय | दोन्ही | होय | उद्योजकांचे उत्पादनक्षमतेचे अंदाज | सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली आकडेवारी |
| 8 | संभाव्य स्थूल राष्ट्रीय उत्पादन | अर्थशास्त्रीय (ऐतिहासिक) | समष्टीय | नाही | कोणताही एक चल नाही | चलांच्या गत संबंधाची योग्यता |
| 9 | आदान–प्रदान | अभियांत्रिकी | समष्टीय | – | उत्पादनक्षेत्रांची अनुसमता | आदान–प्रदान तक्त्याची उपलब्धता |
| 10 | रेषीय प्रायोजना | अभियांत्रिकी/ अर्थशास्त्रीय | व्यष्टीय | होय | यंत्र–तास | व्यष्टीय पातळीवरील प्राथमिक आकडेवारी |
| 11 | यंत्र–तास | अभियांत्रिकी | व्यष्टीय | होय | यंत्र–तास | व्यष्टीय पातळीवरील प्राथमिक आकडेवारी |

आहेत. परंतु धोरण निश्चितीच्या दृष्टिकोनातून या पद्धतीचे काही फायदे आहेत; याचे कारण म्हणजे, विविध उत्पादनक्षेत्रांमधील आदान अडचणींचे (input bottlenecks) यामुळे ज्ञान होते.

रेषीय प्रायोजना पद्धती वगळता इतर व्यष्टीय पातळीवरील मापनपद्धती बहु–वस्तू/बहु–प्रक्रिया उद्योगांमधील क्षमता मोजण्यासाठी निरुपयोगी ठरतात.

क्षमता मापनासाठीच्या सर्वेक्षण पद्धतीचा विचार केल्यास असे दिसते की, प्रचलित उत्पादनपातळीवर (current output level) आधारित उत्पादकांच्या आशावादाचा किंवा निराशावादाचा क्षमता मापनावर प्रभाव पडतो. क्षमतेची संकल्पना व क्षमता मापनातील चलांचा विचार केल्यास सर्वेक्षण पद्धतीपेक्षा क्षमता मापनाच्या बिगर–सर्वेक्षण पद्धती श्रेयस्कर ठरतात. स्थापित क्षमता मापनात तांत्रिकदृष्ट्या न्यूनता आहे, तर व्हॉर्टन पद्धती तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. परंतु तिच्यामध्ये संकल्पनात्मक न्यूनता आहे. उत्पादन फलन पद्धती संकल्पनात्मकदृष्ट्या सरस आहे, परंतु यामध्ये वापरली जाणारी दोन महत्त्वाची चले, भांडवल व श्रम, यांची मोजणी अडचणीची ठरते. भांडवलाच्या मोजणीची अडचण भांडवल–उत्पादन गुणोत्तर पद्धती व भांडवल साठा पद्धती या दोन्ही पद्धतींमध्येदेखील येते. या दोन्ही पद्धती व यंत्र–तास पद्धतीमध्ये क्षमतेची मर्यादित संकल्पना वापरली जाते, कारण येथे क्षमता वापर व भांडवल साठा वापर या दोन्ही संकल्पना समानार्थाने वापरल्या जातात.

थोडक्यात, सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, क्षमता मापनाची कोणतीही एक पद्धती आदर्श मानता येणार नाही. उत्पादनासंबंधीची आकडेवारी व अन्य बाबींचा विचार करता व्हॉर्टन पद्धती (trend through peaks) प्रत्यक्षात वापरण्याच्यादृष्टीने सोयीची वाटते, कारण या पद्धतीच्या साहाय्याने क्षमता वापराची श्रेणी (capacity utilisation series) सहज तयार करता येऊ शकते.

[टीप : या लेखाच्या मूळ मसुद्यावर चर्चा करून काही उपयुक्त सूचना केल्याबद्दल लेखक पी. वेंकट–रामय्या आणि लतिका अरगडे यांचा ऋणी आहे. तथापि, लेखातील उणीवांची जबाबदारी सर्वस्वी लेखकाची आहे. मूळ इंग्रजी मसुद्याचे मराठीकरण करण्यात संजय घपळगावकर यांनी मोलाची मदत केल्याबद्दल आणि रवीन्द्र दोशी यांनी मराठीकरणाच्या संदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. ]

## संदर्भ सूची

1 Artus, Jacques R. (1977), MEASURES OF POTENTIAL OUTPUT IN MANUFACTURING FOR EIGHT INDUSTRIAL COUNTRIES, 1955–78, International Monetary Fund Staff Papers, 24 (1), pp. 1–35.

2 Briscoe, G., O'Brien, P., Smyth, D. J. (1970), THE MEASUREMENT OF CAPACITY UTILIZATION IN THE UNITED KINGDOM, Manchester School of Economics and Social Studies, Vol. 38, pp. 91–117.

3 Christ, Carl (1951), A TEST OF AN ECONOMETRIC MODEL FOR UNITED STATES, 1921 47, Conference on Business Cycles' New York, National Bureau of Economic Research.

4 Christiano, Lawrence J. (1981), A SURVEY OF MEASURES OF CAPACITY UTILIZATION, International Monetary Fund Staff Papers, 28 (1), pp. 144–98.

5 De, Leeuw Frank (1966), A REVISED INDEX OF MANUFACTURING CAPACITY, Federal Reserve Bulletin, 52 (11), pp. 1605–15.

6 Edmonson, Nathan (1971), REVISED MEASURES OF MANUFACTURING CAPACITY UTILIZATION, Federal Reserve Bulletin, 57 (10), pp. 779–81.

7 Economic Division, Planning Commission (1955), INSTALLED CAPACITY AND ITS UTILIZATION IN INDIAN INDUSTRIES, Papers Relating to the Formulation of the Second Five Year Plan, Government of India, Planning Commission.

8 Griffin, James M. (1972), AN ECONOMIC MEASURE OF CAPACITY IN A JOINT–PRODUCT, MULTI-PROCESS INDUSTRY, Journal of Political Economy, 80 (4), pp. 703–23.

9 Hickman, Bert G. (1963), A NEW METHOD OF CAPACITY ESTIMATION, Proceeding of Business and Economic Statistics Section, American Statistical Association, pp. 208–30.

10 Klein, L. R. (1960), "Some Theoretical Issues in the Measurement of Capacity," ECONOMETRICA, Vol. 28, pp. 272–86.

11 Klein, L. R. and Preston, R. S. (1967), "Some New Results in the Measurement of Capacity Utilization," AMERICAN ECONOMIC REVIEW, pp. 34-58.

12 Klein, L. R. and Summers, R. (1966), THE WHARTON INDEX OF CAPACITY UTILIZATION, Studies in Quantitative Economics, No. 1, University of Pennsylvania.

13 Krishnamurthy, K. (1961), INDUSTRIAL UTILIZATION OF CAPACITY, Proceedings of the Business and Economic Statistics Section, American Statistical Association, pp. 314-19.

14 Kuh, Edwin (1966), "Measurement of Potential Output," AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 56, pp. 758-76.

15 Malenbaum, Helen (1969), "Capacity Balance in the Chemical Industry", Essays in Industrial Econometrics, Vol. II, Edited by L. R. Klein, STUDIES IN QUANTITATIVE ECONOMICS, No. 4, pp. 147-202.

16 Mathur, P. N., Valavade, S. P., Kirloskar, M. V. (1967), "Optimum Capacity and Imbalance of Capital Structure: The Case of Machine Manufacturing Industries," ARTHA VIJNANA, Vol. 9, pp. 428-36.

17 National Council for Applied Economic Research (1966), UNDERUTILIZATION OF INDUSTRIAL CAPACITY, NCAER, New Delhi.

18 National Productivity Council (1976), PRODUCTIVITY TRENDS IN COTTON TEXTILE INDUSTRY IN INDIA, National Productivity Council, New Delhi, pp. 20-34.

19 Nayar, N. P. and Kanbur, M. G. (1976), "Measurement of Capacity Utilization in Indian Manufacturing Industries," INDIAN JOURNAL OF ECONOMICS, 57:2, pp. 221-39.

20 Okun, Arthur M. (1962), "Potential GNP: Its Measurement and Significance," PROCEEDINGS OF THE BUSINESS AND ECONOMIC STATISTICS SECTION, American Statistical Association, pp. 98-104.

21 Panic, M. (1978), CAPACITY UTILIZATION IN U. K. MANUFACTURING INDUSTRY, Discussion Paper No. 5, National Economic Development Office.

22 Paul, Samuel (1974), "Industrial Performance and Government Controls," THE INDIAN ECONOMY: PERFORMANCE AND PROSPECTS, Edited by J. C. Sandesara, pp. 612-42.

23 Perry, George L. (1973), "Capacity in Manufacturing," BROOKINGS PAPERS ON ECONOMIC ACTIVITY, 8(3), pp. 701-42.

24 Phillips, Almarin (1963), "An Appraisal of Measures of Capacity," AMERICAN ECONOMIC REVIEW, Papers and Proceeding, pp. 275-92.

25 Reserve Bank of India (1969), "Excess Capacity and Production Potedntial in Selected Industries in India," RESERVE BANK OF INDIA BULLETIN, 23:4, pp. 471-92.

26 Reserve Bank of India (1970), "Index of Potential Production and Potential Utilization Ratio for Manufacturing Industries," RESERVE BANK OF INDIA BULLETIN, 25:4, pp. 574-601.

27 Robinson, Joan (1953-54), "The Production Function and Theory of Capital," REVIEW OF ECONOMIC STUDIES, Vol. 21, pp. 81-106.

28 Rost, Ronald F. (1983), "New Federal Reserve Measures of Capacity Utilization," FEDERAL RESERVE BULLETIN, 69(7), pp. 515-21.

29 Sastry, D. U. (1984), THE COTTON MILL INDUSTRY IN INDIA, Oxford University Press, Delhi, pp. 24-51.

30 Solow, R. M. (1957), "Technical Change and the Aggregate Production Function," REVIEW OF ECONOMIC STUDIES, (39), pp. 312-20.

31 Sraffa, Piero (1959), PRODUCTION OF COMMODITIES BY MEANS OF COMMODITIES, PRELUDE TO A CRITIQUE OF ECONOMIC THEORY, Vora & Co. Publishers Pvt. Ltd., Bombay.

32 Srinivasmurthy, A. P. (1979), "The Problem of Underutilization of Productive Capacity in Indian Industry," INDIAN ECONOMIC DEVELOPMENT AND POLICY (Essays in Honour of V. L. D'Souza), Edited by P. R. Brahmananda, pp. 149-70.

33 Taylor, Jim, Winter, David and Pearce, David (1970), "A-19 Industry Quarterly Series of Capacity Utilization in United Kingdom 1948-1968," BULLETIN OF OXFORD UNIVERSITY INSTITUTE OF ECONOMICS AND STATISTICS, Vol 32, pp. 113-31.

34 U. S. Congress, Joint Economic Committee (1962), MEASUREMENT OF PRODUCTIVE CAPACITY, Hearings before the Sub-Committee on Economic Statistics, 87th Congress, Second Session, Washington.

□ □

# भारतीय अर्थव्यवस्थेतील अरिष्ट *

**विकास चित्रे** **

अनुवाद :

**प्रदीप आपटे** ***

## 1

विदेशी चलनतुटीच्या संकटरूपातून भारतीय अर्थव्यवस्थेचा गंभीर दुबळेपणा उघड झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून प्रथम अंश ( First Tranche ) आणि आकस्मिकता तरतूद वित्त सुविधा ( Contingency Compensatory Financing Facility (CCFF) ) या दोन स्रोतानुसार जानेवारी 1991 मध्ये 2,850 कोटी रुपये (1.8 अब्ज डॉलर) इतके आहरण करूनदेखील जुलै 1991 मध्ये देशाकडचा विदेशी विनिमय राखीव निधी फक्त 2,500 कोटी रुपये इतका कमी होता. आयात निर्बंध, सोन्याची विक्री इत्यादी उपाय अवलंबूनदेखील कर्ज व व्याजाच्या परत-फेडीचा हप्ता चुकवावा लागेल इतकी परिस्थिती बिकट होती. अर्थात परतफेडीचा हप्ता चुकण्याची नामुष्की पुन्हा नाणे निधीकडून 220 दशलक्ष डॉलर एवढे कर्ज उचलून टाळण्यात आली. याशिवाय CCFF खाली आणखी 300 दशलक्ष डॉलर, पुनर्रचना कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून 500 दशलक्ष डॉलर आणि हरघडी तरतूद निधीखाली (Standby) 2.3 अब्ज डॉलर इतके नाणे निधीकडून कर्ज मिळावे यासाठी वाटाघाटी चालू आहेत. अधिक विदेशी चलन उभे करण्याचा प्रयत्न करण्याच्यादृष्टीने रिझर्व्ह बँकेला स्वतःकडच्या सुवर्ण साठ्यापैकी जितके सोने कायद्याने बाहेर नेता येईल, जवळपास तेवढे सोने बँक ऑफ इंग्लंडकडे पाठ-विण्यात आले. जुलै 1991 च्या अखेरीस दोन टप्प्यात रुपयाचे 20 टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले आहे.

## 2

1980–81 ते 1988–89 या काळातील 1980–81, 1984–85, 1985–86, 1988–89 या चार वर्षांत आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाच्या चालू खात्यावर जी परिस्थिती दिसून येते ती तक्ता 1 मध्ये दिली आहे. पहिल्या चार वर्षांत देशांतर्गत उत्पादन वाढल्यामुळे पेट्रोल व तेलजन्य पदार्थांची आयात आटो-

* इंडियन इकनॉमिक असोसिएशन ट्रस्ट फॉर रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे येथे 'Fiscal Managemet in the Indian Economy : Issues and Policy Options' या विषयावर 17 ऑगस्ट, 1991 रोजी झालेल्या चर्चासत्रात सादर केलेला निबंध.

** प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

*** अधिव्याख्याता, फर्गसन महाविद्यालय, पुणे.

**तक्ता 1**

**आंतरराष्ट्रीय ताळेबंद (चालू खाते)**

(महापद्म अमेरिकी डॉलर)

| | 1980–81 | 1984–85 | 1985–86 | 1988–89 |
|---|---|---|---|---|
| 1 आयात | 15.9 | 15.7 | 17.3 | 23.6 |
| | | (–.003) | (10.19) | (10.9) |
| 2 निर्यात | 8.3 | 10.1 | 9.5 | 14.3 |
| | | (5.03) | | (14.6) |
| 3 व्यापार शेष [ तूट (–) ] | –7.6 | –5.6 | –7.8 | –9.4 |
| 4 अदृश्य मिळकत | | | | |
| (अ) मिळकत | 7.5 | 6.9 | 6.4 | 7.6 |
| (आ) अदा | 2.0 | 3.7 | 3.5 | 5.4 |
| | | (16.62) | | (15.55) |
| पैकी व्याज व परती अदा रक्कम | 0.4 | 1.1 | 1.1 | 1.8 |
| | | (28.78) | | (17.84) |
| (इ) निव्वळ [ (अ)–(आ) ] | 5.5 | 3.2 | 2.9 | 2.2 |
| 5 चालू खाते (निव्वळ) | –2.1 | –2.4 | –4.9 | –7.2 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1990–91.

वयात राहिली व त्यामुळे आयात जराशी घटलेलीच दिसते. निर्यात अगदी मंद दराने वाढली याचे एक कारण म्हणजे जागतिक बाजारपेठेतील मंदी. दुसरे म्हणजे इतर जगापेक्षा आपल्या देशात अधिक भाववाढ झाली त्यामुळे रुपयाचे मूल्य कमी करून होणारा निर्यातीतला जोम या भाववाढीने नाहीसा झाला (पहा तक्ता 2). मात्र या काळातील व्यापार तूट मंदावली असली तरी त्यापेक्षा अदृश्यमान चालू देण्यात मात्र त्याहीपेक्षा फार वेगाने वाढ झाली. 1985–86 च्या सुमारास भारत सरकारने उद्योग व आंतरराष्ट्रीय व्यापार यात उदार–मुक्त धोरण अंगीकारलेले दिसते. त्यामुळे या धोरणाअगोदरची काही (उदाहरणार्थ, चार) वर्षे व त्यानंतरची काही वर्षे अशी तुलना या धोरणाचे परिणाम पडताळण्याच्यादृष्टीने उद्बोधक होईल. उदार धोरणाने आयातीचे मूल्य डॉलरमध्ये 10 टक्क्यांनी तर रुपयामध्ये 14 टक्क्यांनी वाढले. रुपयात मोजल्यास भांडवली वस्तूंची आयात 35 टक्क्यांनी, खते व रसायने यांची आयात 17.5 टक्क्यांनी, लोखंड व पोलाद यांची आयात 48 टक्क्यांनी तर लोहेतर धातूंची आयात 31.5 टक्क्यांनी वाढलेली दिसते. निर्यात वाढली नाही; उलट काहीशी घटली. परंतु पुढील तीन वर्षांत मात्र डॉलरमध्ये मोजल्यास निर्यात–वाढीचा चक्रवाढी वेग दरसाल 14.3 टक्के इतका होता. या काळात माफक वा सौम्य रुपात केलेला मूल्यऱ्हासदेखील प्रभावी ठरून निर्यातीला चालना देणारा ठरला. मात्र कर सवलती, अनुदान इत्यादी विचारात घेतल्यास मूल्यऱ्हासाचा खरा दर बराच जास्त होतो; तो येथे लक्षात घेतलेला नाही. वर सांगितल्याप्रमाणे या काळात भांडवली वस्तु, रासायनिक वस्तु, लोखंड व पोलाद, लोहेतर धातु, मोती,

**तक्ता 2**

**विनिमय दर व किंमत निर्देशांक**

| | | 1980–81 | 1984–85 | 1985–86 | 1988–89 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पैसारूप विनिमय दर<br>( दर अमेरिकी डॉलरसाठी रुपये ) | 7.91 | 11.89<br>(10.73) | 12.24<br>(2.94) | 14.48<br>(5.76) |
| 2 | घाऊक किंमत निर्देशांक<br>(भारत : 1985 = 100) | 73.63 | 97.25<br>(7.2) | 102.70<br>(5.6) | 124.94<br>(6.75) |
| 3 | उत्पादक किंमत निर्देशांक<br>(अमेरिका : 1985 = 100) | | 100.24 | 98.55<br>(–1.7) | 106.25<br>(2.54) |
| 4 | वास्तव विनिमय दर<br>(1984–85 च्या दर डॉलरमागे<br>1984–85 मधील रुपये) | | | 11.39 | 11.95 |
| 5 | वास्तव परिणामकारक विनिमय दर *<br>(दर रुपयामागे किती परकीय चलन<br>(निर्देशांक : 1980–81 = 100) | 100 | 100 | 94 | 73<br>(1987–88 मध्ये) |

* इकॉनॉमिक टाइम्समधील आलेखाप्रमाणे

**टीप :** कंसातील आकडे त्या त्या कालखंडातील वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर दर्शवितात.

**संदर्भ :** आर्थिक सर्वेक्षण, 1990-91 आणि International Financial Statistics, मार्च 1991.

मौलिक अर्धमौलिक खडे यांची आयात बरीच वाढली. आयातीचा एकूण वृद्धी दर डॉलर मूल्यात 11 टक्के इतका होता. आयातीचे निव्वळ मूल्य निर्यातीपेक्षा बरेच जास्त आहे. परिणामी निर्यातीचा वृद्धी दर आयातीच्या वृद्धी दरापेक्षा जास्त असूनही एकूण व्यापार-तूट मात्र वाढली. गेल्या चार वर्षांतील अनुभवाबद्दल सारांशाने सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, अंतर्गत भाववाढ आटोक्यात ठेऊन रुपयाचा मूल्यऱ्हास केला आणि आवश्यक भांडवली व अंतरिम वस्तूंची आयात वाढू दिली तर निर्यात वाढेल पण व्यापार तुटीचे निव्वळ आकारमानही वाढेल.

## 3

अदृश्य व्यवहारामधील वाढावा घटण्याचे एक कारण म्हणजे विदेशी कर्जांच्या परतफेडीच्या हप्त्याची व व्याजाची वाढलेली देय रक्कम. इतर देय रकमांमध्ये ( व्याज व परतफेड देयता वगळून ) मुख्यतः विदेशी प्रवास, वाहतूक, गुंतवणूक उत्पन्न यांचा समावेश होतो. 1980–81 ते 1984–85 या काळात यात सुमारे 1 महापद्म डॉलर इतकी वाढ झाली. जवळपास तेवढीच वाढ 1984–85 ते 1988–89 या काळातही झाली. 1984–85 पासून व्याज देयतेपोटीची रक्कम वाढते आहे. म्हणजे हा अगदी अलीकडेच उद्भवलेला प्रश्न आहे असे नव्हे. देयता सेवा गुणोत्तराची व्याख्या व्याज व सेवा देयता रक्कम अधिक भांडवल खात्यावरील मुद्दलफेड भागिले निर्यात आणि अदृश्य आय यांची बेरीज अशी केली जाते. हे गुणोत्तर 1980–81 मध्ये 9.4 टक्के होते ते 1989–90 आणि 1990–91 मध्ये 21 टक्के इतके वाढले.

## 4

भारताचे एकूण मध्यम व दीर्घकालीन विदेशी कर्ज 1989–90 च्या अखेरीस 80,000 कोटी रुपये इतके होते. परदेशस्थ भारतीयांच्या ठेवींसकट सगळ्या अल्प, मध्यम, दीर्घकालीन कर्जाची रक्कम 98,000 कोटी रुपये इतकी होती. या एकूण कर्जाचे स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी गुणोत्तर बघितल्यास ते 20 टक्के एवढे होते.

## 5

जर हप्ता न चुकविता परतफेड करावयाची असेल तर त्यासाठी पुढील शर्त पाळली गेली पाहिजे. असे मानू की, सर्व कर्ज लघु मुदतीचे (म्हणजे एक वर्षासाठीचे आहे.

(D) = कर्ज

$D_{-1}$ = आदल्या वर्षीपर्यंतची देय रक्कम

$-\triangle$ = विदेशी चलनात करावी लागणारी घट

(X+IR) = निर्यात अधिक अदृश्य उत्पन्न

(M+IP) = आयात अधिक अदृश्य खर्च देणे

r = विदेशी कर्जावरील सरासरी व्याज दर

वरील व्याख्याप्रमाणे परतफेड क्षमता असण्याची शर्त अशी होईल.

$$D - \triangle R + (X+IR) \geqq (M+IP) + (1+r)\, D_{-1}.$$

यावरून लक्षात येईल की, समस्येचे मुख्य स्वरूप म्हणजे निर्यात व अदृश्य उत्पन्नातील वाढ, आंतर्देशीय उत्पादनाची आयातघनता आणि आंतर्देशीय उत्पादनाचा वृद्धी दर हे तीनही घटक अशा रीतीने नियमित करावयाचे की, जेणेकरून आपण कर्जाच्या सापळ्यात न अडकता विदेशी कर्जावरील सरासरी व्याज दराने परतफेड करू शकू. कर्ज सापळ्यात न अडकता निर्यातप्रणित वृद्धी साधता येईल का ?

## 6

वरील चर्चेवरून निर्यातवाढीसाठी देशांतर्गत भाववाढीचा दर रोखणे (फक्त निर्यात वाढीसाठीच नव्हे तर एरवीसुद्धा भाववाढ आटोक्यात ठेवणे तितकेच आवश्यक आहे) आणि शक्यतोवर आयातीची वाढ रोखणे अतिशय महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट झाले आहे. व्यापारतुटीने विदेशी कर्ज वाढते. त्यावरील व्याज (व मुद्दल परतफेडीचा) बोजा पुन्हा चालू खात्यावर वाढतो. व आणखी कर्ज काढण्याची पाळी येते. शिवाय अन्य देशांपेक्षा भाववाढीचा दर जास्त राहिल्यास देशी चलनाचा मूल्यऱ्हास (Depreciation) होण्याच्या भीतीने भांडवलाचा ओघ पण कमी होतो. गेल्या काही महिन्यात आर्थिक पेच अधिक गंभीर होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. गेल्या नजीकच्या वर्षातील बराचसा कर्जाचा भाग आंतरराष्ट्रीय वाणिज्य स्रोतां–कडून घेतलेला आहे. या कर्जदारांनी कर्जाची मुदत संपल्यावर त्याच्या नूतनीकरणास नकार दिला आहे. तसेच अलीकडच्या काही महिन्यात परदेशस्थ भारतीयांच्या ठेवींचा बहिर्गामी प्रवाहही वाढला आहे.

## 7

भारत सरकारची राजकोषीय तूट मोठी असल्यामुळे भारत सरकार रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेते. त्यातून राखीव पैशाच्या पुरवठ्याचा वृद्धी दर वाढतो व त्याच्या परिणामी चलनवाढ व भाववाढ होते. या भाववाढीचे विदेशी व्यवहारावरील परिणाम अगोदर सांगितलेच आहेत. अशा रीतीचे विदेशी व्यवहारातील पेच राखीव पैशाच्या वृद्धी दरामार्फत व्यवस्थापन आणि समष्टीय असमतोलाशी जोडला गेला आहे.

## 8

अर्थसंकल्पातील तुटीच्या तीन संकल्पना आहेत : (1) महसुली तूट, (2) अर्थसंकल्पीय तूट आणि (3) राजकोषीय तूट. या तीनही प्रकारच्या 'तुटीं' मध्ये घट येणे अगत्याचे आहे. महसुली तुटीमध्ये सरकारचा चालू योजना व योजनाबाह्य खर्च व चालू कर व करेतर उत्पन्न यातील तफावत मोजली जाते. या तफावतीच्या मूल्याइतके कर्ज सरकारला जनतेकडून व रिझर्व्ह बँकेकडून घ्यावे लागते. किंवा रिझर्व्ह बँके–कडील ठेवी कमी कराव्या लागतात. थोडक्यात, या तुटीमध्ये सरकारने केलेला बचतऱ्हास (dissaving)

व्यक्त होतो. पूर्वीच्या कर्जावरील व्याज, अर्थसाहाय्य (Subsidy) संरक्षण खर्च, आणि सरकारी उपभोग खर्च यांच्या वाढत्या दबावामुळे हा बचतऱ्हास होतो. 1990–91 च्या सुधारित अंदाजानुसार ही महसुली तूट 17,585 कोटी रुपये, म्हणजेच आंतर्देशीय उत्पादिताच्या 3.4 टक्के होती. 1991-92 च्या अर्थसंकल्पानुसार ती 13,854 कोटी रुपयांपर्यंत कमी केली जाणार आहे.

अर्थसंकल्पीय तूट म्हणजे एकूण महसुली व भांडवली खर्च आणि एकूण महसुली उत्पन्न अधिक भांडवली जमा यांतील तफावत म्हणजे सरकारने जनतेकडून घेतलेली कर्जे धरूनही जी तूट राहते ती तूट. ही भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे राखीव पैशाचे प्रमाण वाढते. जर सरकारने अर्थसंकल्पात योजल्याप्रमाणे कर्जरोखे बाजारात विकता आले नाहीत तर रिझर्व्ह बँकेकडून घ्यावे लागणारे कर्ज (व त्यामुळे राखीव पैशात पडणारी भर) जास्तच वाढते. पण प्रत्यक्षात या रोख्यांवरील व्याज दर कमी असल्यामुळे लोकांकडून त्यांची फारशी खरेदी होत नाही व सर्व उर्वरित भाग न खपता रिझर्व्ह बँकेकडे राहतो. परिणामी, रिझर्व्ह बँकेने सरकारला केलेला निव्वळ कर्जपुरवठा वाढतो; म्हणजे राखीव पैसा वाढतो. 1990–91 साठीच्या सुधारित अंदाजानुसार अर्थसंकल्पीय तूट 10,722 कोटी रुपये, किंवा एकूण आंतर्देशीय उत्पादनाच्या 2.1 टक्के, होती. 1991–92 च्या अर्थसंकल्पानुसार ती 7,719 कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात येणार आहे.

राजकोषीय तूट म्हणजे अर्थसंकल्पातील तूट अधिक सरकारने घेतलेले सार्वजनिक कर्ज. यामधून काय दिसते ? तर एकूण संसाधनांपैकी किती भाग खाजगी (गैरसरकारी) क्षेत्राकडून सरकारी क्षेत्राकडे वळविला गेला आहे ते कळते. ज्या अर्थव्यवस्थेत व्याज दर बाजारतत्त्वाने ठरतात तेथे अर्थसंकल्पामुळे घडून येणारे संसाधनांच्या ओघाचे हे वळण व्याज दर व किमतींच्या वाढीमध्ये प्रतिबिंबित होते. याशिवाय आपल्या देशाच्या आताच्या संदर्भात त्याचे आणखी एक महत्त्व आहे. यामुळे पुढील काळातील अर्थसंकल्पात व्याजरूपाने येणारा खर्च वाढल्याने महसुली तुटीत भर पडणार आहे. सरकारला कर्जाच्या सापळ्याकडे नेणारे ते एक कारण आहे. 1990–91 च्या सुधारित अंदाजानुसार राजकोषीय तूट 43,331 कोटी रुपये किंवा स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या 8.4 टक्के होती. 1991–92 मध्ये ही तूट 37,727 कोटी रुपये (किंवा स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या 6.5 टक्के) इतकी खाली येईल असा अंदाज आहे.

## 9

1991–92 च्या अंदाजपत्रकात वित्तमंत्र्यांनी या तीनही प्रकारची तूट भरून काढण्यासाठी कर महसुलात 2,617 कोटी रुपयांची वाढ योजिली आहे. वाढत्या उत्पन्नामुळे वाढणाऱ्या करमहसुलातील (ऊर्ध्वगामी) वाढ वगळून हा वाढीव कर महसूल गोळा केला जाणार आहे. त्यासाठी कंपन्यांवरील आयकरात वाढ, कंपन्यांच्या कररचनेत गुंतवणूक–सवलत योजनेतील रक्कम कमी करणे, बँक व्याज उत्पन्नावर कर, आयात कर 5 टक्क्यांनी कमी केल्याने होणारी महसूल घट भरून काढण्यासाठी निवडक चैनीच्या वस्तूंवर अधिक अबकारी कर, खत अर्थसाहाय्यात कपात, साखरेवरील अर्थसाहाय्यात कपात (पण अन्नधान्यावरील अर्थसाहाय्याचे वाजवीकरण केले जाईल असेही स्पष्ट केले आहे) आणि सार्वजनिक क्षेत्रातील भाग भांडवल गुंतवणुकीपैकी 20 टक्के गुंतवणूक ऱ्हास या सर्व उपायांच्या मार्गाने ही तूट कमी करण्याचा प्रस्ताव आहे. निर्यातीवरील रोख भरपाई अनुदान योजना विदेशी व्यापार धोरणाच्या पुनर्रचनेच्या वेळीच काढून टाकण्यात आली होती.

## 10

विदेशी धोरण, औद्योगिक धोरण, वित्तीय व्यवस्था यामध्ये जाहीर केलेल्या सुधारणांमुळे सुरू झालेल्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेच्या संदर्भात अर्थसंकल्पीय तरतुदींची चर्चा करणे उचित ठरेल. या पुनर्रचनात्मक धोरणव्यूहात अर्थसंकल्पामार्फत साधला जाणारा कार्यभाग म्हणजे अर्थसंकल्पातील विविध स्वरूपाच्या तुटी भरून काढणे व भाववाढीचा वेग नियंत्रणात ठेवणे. उद्योग, विदेशी व्यापार, वित्तव्यवस्था याना नोकरशाही नियंत्रणाच्या जंजाळातून मुक्त करणे, उत्पादनव्यय कमी करणे, उत्पादनाची

गुणवत्ता सुधारणे व अंतर्गत स्पर्धा वाढवून या दोन्हीबद्दल उत्पादकात जागृती आणणे, उद्योगांना आकार व प्रमाणाचे आर्थिक लाभ साधण्याची संधी देणे आणि विदेशी भांडवल आणि तंत्रज्ञानासाठी अर्थव्यवस्थेत खुलेपणा आणणे ही या सुधारणांची मूळ उद्दिष्टे आहेत.

## 11

ही आर्थिक पुनर्रचना देशाच्या आर्थिक इतिहासात मोक्याचे वळण ठरण्याची शक्यता आहे. म्हणूनच त्यासाठी अगोदर जाहीर झालेल्या पुनर्रचनात्मक उपाययोजनांचे अल्पकालीन परिणाम तसेच अभिवृद्धी धोरणाचे मध्यम व दीर्घकालीन परिणाम यांची बारकाईने व काळजीपूर्वक पारखणी व्हायला हवी. निर्यातप्रणित अभिवृद्धी विरुद्ध अंतर्मुखी अभिवृद्धी यांचाही पुर्नविचार व्हायला पाहिजे. ग्रामीण व शेती विकासाच्या जोडीने निर्यातप्रणित अभिवृद्धी कशी साधायची ? तसेच विकासाची गुणवत्तादेखील विचारात घेतली पाहिजे. अधिक अभिवृद्धी दर व कार्यक्षमता साधण्याचे धोरण ग्रामीण व शेती विकास, दारिद्र्य निर्मूलन, सार्वजनिक आरोग्य, साक्षरता, शिक्षण इत्यादी बाबींवर भर देणाऱ्या धोरणाविरुद्ध आहे का ? गुंतवणूक, उत्पादन इत्यादींच्या नियमातून व नियोजनविषयक जोखडातून मोकळे झाल्यावर सरकारकडील संसाधने सामाजिक आधारभूत संरचना यांच्या विकासाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी अधिक प्रमाणात व सढळपणे उपलब्ध होऊ शकतील. नव्या आर्थिक व्यूहधोरणात नियोजनाचे स्थान काय असेल ? खाजगीकरण कुठल्या मर्यादेपर्यंत जाऊ द्यावे ? मध्यम व दीर्घकालीन धोरणाच्या दृष्टिकोनातून हे प्रश्न पारखले पाहिजेत.

## 12

नव्या धोरणामुळे उद्भवणारे प्रश्न व त्यांचा लगोलगच्या अल्पावधीत पडणारा परिणाम, ते आटोक्यात ठेवण्यासाठी घ्यावयाची खबरदारी योजना यांचाही सुस्पष्ट विचार केला पाहिजे. मुख्यत: अधिक भाववाढ, मंद अभिवृद्धी ( कमी अभिवृद्धी दर ) अकार्यक्षम उद्योग बंद पाडणे व त्यातून निर्माण होणारी बेकारी आणि व्यापार तूट अधिक खालावण्याची शक्यता या समस्या लगोलग परिणाम म्हणून उद्भवण्याची शक्यता आहे. भाववाढीच्या परिणामांची तीव्रता रोखण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पुनर्संघटन प्राधान्याने हाती घेतले पाहिजे. विशेषत: ग्रामीण भागात त्याची पुनर्रचना होणे अत्यावश्यक आहे. जे उद्योग बंद पडतील त्यातील कामगारांचे पुनर्वसन व त्याकरिता त्यांचे प्रशिक्षण तसेच फेररचनेत अगोदरच्या कामगारांना प्राधान्य, जेथे रोजगार टिकविणेच अशक्य आहे अशा व्यवसायसंस्थांतील कामगारांना भरपाई इत्यादी पर्यायांचा नीट विचार करायला हवा. उदाहरणार्थ, संघटित औद्योगिक क्षेत्रात बेकारी विम्यासारखी योजना करता येईल का ? नव्या व्यूहरचनेत ग्रामीण व शेती विकास, ग्रामीण भागातील रोजगार हमी कार्यक्रम यांचे महत्त्व तर अधिकच वाढेल. त्याचबरोबरीने श्रम व भांडवलाची उत्पादकता वाढविण्यावरही भर द्यावा लागेल. उत्पादनघटकांच्या किंमतीविषयीचे धोरण, कदाचित उत्पन्न धोरणही, वास्तवतेला अनुसरून करणे भाग पडेल. उदाहरणार्थ, वेतन आणि उत्पादकता यांची सांगड घालता येईल का ? अशा प्रश्नांचा, तसेच कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग यासारख्या अनेक श्रमविषयक नीतीशी संबंधित अनेक प्रश्नांचा विचार करणे भाग आहे. पुनर्रचनेचे धोरण यशस्वीपणे राबविणे ही राजकीय व आर्थिक दृष्टीने दोरीवरची कसरत आहे. त्याच्या नियोजनातील व व्यवस्थापनातील अपयश अधिक भयावह आर्थिक दुरवस्था आणू शकेल.

□ □

# अर्थशास्त्रातील ज्ञानमहर्षी : व्ही. के. आर. व्ही. राव

वि. व्यं. जहागिरदार *

व्ही. के. आर. व्ही राव यांचे दिनांक 26 जुलै, 1991 रोजी बंगलोर येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. गेल्या काही महिन्यापासून ते आजारी होते. त्यांच्या निधनाने एका ऋषितुल्य अर्थशास्त्रज्ञास भारत सदैव मुकला आहे.

व्ही. के. आर. व्ही यांचे पूर्ण नाव विजयेंद्र कस्तुरी रंगा वरदराजा राव असे होते. 8 जुलै, 1908 साली त्यांचा जन्म कांचीपुरम येथे एका पुरोहित कुटुंबात झाला. मुंबई येथील विल्सन महाविद्यालयात त्यांनी एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनात ते अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणू ओळखले जात होते. उच्च शिक्षणासाठी ते केंब्रिज येथे गेले. त्यावेळी केंब्रिज विद्यापीठ जे. एम. केन्स, ए. सी. पिगू, डेनिस रॉबर्टसन यांसारख्या अर्थतज्ज्ञांमुळे नावाजले जात होते. तेथे त्यांनी ' राष्ट्रीय उत्पन्न ' या विषयावर प्रबंध लिहून पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली. 'National Income of British India, 1932-33' असे त्यांच्या प्रबंधाचे शीर्षक होते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन योग्य अशा पद्धतीने प्रथमतः करण्याचा मान राव यांना मिळाला. तेथे त्यांना ॲडम स्मिथ पारितोषिक मिळाले. ॲडम स्मिथ पारितोषिक प्राप्त करणारे बी. एन. अडारकर हे पहिले भारतीय तर राव हे दुसरे. केंब्रिजमधील वास्तव्यात पं. नेहरूंशी त्यांचा पहिल्यांदा परिचय झाला. केंब्रिज येथून परतल्यावर त्यांनी कर्नाटक विद्यापीठ, धारवाड आणि आंध्र विद्यापीठ, वॉल्टेर येथे काही काळ अध्यापनाचे कार्य केले, त्यानंतर वयाच्या केवळ अठ्ठाविसाव्या वर्षी अहमदाबाद येथील महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा त्यांनी सांभाळली.

सन 1949 मध्ये राव यांनी दिल्ली विद्यापीठात ' दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ' ची स्थापना केली. त्यापूर्वी भारतात पी. सी. महालनोबीस यांनी ' इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूट ' ची आणि धनंजयराव गाडगीळ यांनी " गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड

* अधिव्याख्याता अर्थशास्त्र विभाग,
विदर्भ महाविद्यालय, अमरावती.

इकॉनॉमिक्स ' ची स्थापना केली होती. ' लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ' च्या कार्याने प्रभावित झाल्याने भारतातही अशी संस्था आपण काढावी असे राव यांना तीव्रतेने वाटत होते. सुरुवातीस त्यांनी या संस्थेत आंतरविद्या दृष्टिकोन म्हणून अर्थशास्त्रासोबत समाज–शास्त्र, मानवी भूगोल व वाणिज्य हे विषय सुरू केले होते. यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा व कार्याचा केवळ अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनाच नव्हे तर विविध क्षेत्रा–तील तज्ज्ञांनाही परिचय झाला. के. एन. राज, अमर्त्य सेन, बी. व्ही. कृष्णमूर्ती, जगदीश भगवती, ए. एम. खुस्रो, सुखमय चक्रवर्ती इत्यादी आज नामवंत गणले जात असलेले अर्थशास्त्रज्ञ रावांमुळे या संस्थेत आले.

' दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ' शिवाय दिल्ली विद्यापीठातीलच ' इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ ' आणि बंगलोर येथील ' इन्स्टिटयूट फॉर सोशल अ‍ॅन्ड इकॉनॉमिक चेंज ' या संस्थांचे जनकत्व राव यांच्याकडे जाते. याखेरीज इतरही अनेक संस्थांच्या उभारणीत राव यांचे योगदान महत्त्वाचे आहे. अशा संस्थांमध्ये इंटरनॅशनल सेंटर फॉर पॉप्युलेशन स्टडीज ( मुंबई ), दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ फॉरेन ट्रेड (दिल्ली), दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट (बेंग-लोर), आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (दिल्ली) यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. राव यांनी स्वतः उभारलेल्या तीन संस्थांचे वैशिष्टय म्हणजे, या संस्थांमध्ये त्यांनी तज्ज्ञ व्यक्तींची निवड केली. तसेच सुसज्ज ग्रंथालय प्रथम उभारले. एकाच व्यक्तीने अर्थशास्त्राच्या अध्ययनासाठी व संशोधनासाठी तीन संस्था उभारल्याचे उदाहरण विरळाच.

संस्थांचा व्याप सांभाळत असताना त्यांचे अध्या-पन, अध्ययन–संशोधन सतत चालू होते. आपल्या या व्यापक कार्यात त्यांनी 38 लहान-मोठे ग्रंथ लिहिले; त्यापैकी 4 ग्रंथ अन्य सहकाऱ्यांसमवेत लिहिलेले आणि 5 ग्रंथ संपादित केलेले आहेत. विविध प्रकारच्या संशो-धन पत्रिकांमधून त्यांनी 130 संशोधनपर लेख लिहिले आहेत. विशेष गोष्ट ही की, त्यांचे पहिले पुस्तक त्यांनी वयाच्या तेवीसाव्या वर्षी (सन 1931 मध्ये) प्रसिद्ध केले. सन 1960 ते 1980 या वीस वर्षांत त्यांनी 20 पुस्तके लिहिली, आणि 85 संशोधनपर लेख प्रसिद्ध केले. विविध सन्मानही त्यांना याच कालखंडात प्राप्त झाले.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNO) तज्ज्ञ समितीचे अध्यक्षपद राव यांनी भूषविले आहे. या समितीने 1954 साली 'International Distribution and Measurement of Standards and Levels of Living' हा अहवाल प्रसिद्ध केला. या व्यतिरिक्त चार आयोग व समित्यांचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. त्याखेरीज ज्या काही इतर आयोग/समित्यांचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. त्यामध्ये राष्ट्रीय उत्पन्न समिती, कर चौकशी आयोग आणि पहिले वृत्तपत्र आयोग यांची खास नोंद घ्यावी लागेल. ते दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू होते. वेगवेगळ्या विद्यापीठांच्या पदवीदान समारंभात त्यांनी प्रमुख भाषण दिले. विविध शैक्षणिक अधिवेशने, चर्चासत्रे इत्यादींमध्ये त्यांनी अध्यक्षीय भाषणे दिली. ' इंडियन इकॉनॉमिक असो–सिएशन ' च्या बत्तीसाव्या वार्षिक अधिवेशनाचे (1949) ते अध्यक्ष होते. 1961 साली पिलानी येथे झालेल्या ' इंडियन सोसायटी ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स ' च्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. डिसेंबर 1986 मध्ये नवी दिल्ली येथे ' वर्ल्ड इकॉनॉमिक काँग्रेस ' च्या आठव्या अधिवेशनात त्यांनी उद्घाटनपर भाषण दिले. प्रकृती पुरेशी साथ देत नसतानाही त्यांनी ' इंडियन सोसायटी ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स ' च्या मुंबई येथे भरलेल्या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी अधिवेशनात (1989) उद्घाटनाचे भाषण केले.

जुने काँग्रेस नेते एस. निजलिंगप्पा यांच्या सूचने–वरून राव यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यावेळी केंद्रीय मंत्रीमंडळात अर्थमंत्री म्हणून त्यांचा समावेश होईल असे सर्वांना वाटत होते. तथापि त्यांच्याकडे वाहतूक आणि नौकानयन हे खाते देण्यात आले. पुढे त्यांच्याकडे शिक्षण खाते दिले गेले. या खात्यात त्यांनी प्रौढ शिक्षण आणि साक्षरता प्रसाराचे धोरण ठरविण्याचे भरीव कार्य केले. भारत सरकारने त्यांना ' पद्मभूषण ' हा सन्माननीय किताब देऊन त्यांच्या एकंदर कार्याचा मोठा गौरव केला.

भारतात अर्वाचीन आर्थिक विचारवंतांची परं–परा जुनी आहे. या शतकात जन्मलेले, अर्थशास्त्राचे अध्ययन–अध्यापन व संशोधन करणारे या दृष्टीने विचार केल्यास सर्वप्रथम धनंजयराव गाडगीळ आणि

व्ही. के. आर. व्ही. राव यांची नावे समोर येतात. राव यांनी विविध विषयांवर विपुल लिखाण केले आहे. त्यांच्या काही प्रमुख आर्थिक विचारांचा येथे थोडक्यात विचार केला आहे.

राव हे राष्ट्रीय उत्पन्न या विषयावरील त्यांच्या संशोधनकार्यामुळे सर्वांना परिचित आहेत. त्यांनी नियोजन, विकास, विविध आर्थिक प्रश्न, पर्यावरण इत्यादी महत्त्वाच्या विषयातही संशोधनकार्य आणि नवीन अभ्यासकांना दिशा दर्शविण्याचे कार्य केले आहे. मात्र, राष्ट्रीय उत्पन्नावर त्यांचे मूळातून व खरे प्रेम होते. 'An Essay on India's National Income, 1925–29' हे त्यांचे पुस्तक 1936 मध्ये प्रसिद्ध झाले. पीएच. डी. साठी त्यांनी ब्रिटिश भारताचे 1931-32 मधील राष्ट्रीय उत्पन्न हाच विषय निवडला. या प्रबंधात त्यांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनाचे विश्लेषण केले आहे. प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध आकडेवारी आणि स्वतः केलेले सर्वेक्षण यांच्या साहाय्याने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले. 1940 मध्ये हा प्रबंध ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाला. राष्ट्रीय उत्पन्नाच्या अध्ययनामुळे राव यांना भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप जवळून न्याहाळता आले. विशेषेकरुन, अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांचे वा क्षेत्रांचे स्वरूप, त्यांच्या समस्या आणि या क्षेत्रांचा परस्परसंबंध याविषयी त्यांना वेगळीच अन्तर्दृष्टी प्राप्त झाली. पुढील काळात राव यांनी विविध विषयांचा अभ्यास केला तरी राष्ट्रीय उत्पन्न या त्यांच्या आवडत्या विषयाचे अध्ययन–संशोधन करण्यासाठी निवांत वेळ त्यांना मिळू शकला नाही. वयाची सत्तरी गाठतागाठता 'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' ने नॅशनल फेलोशिप दिली. पुन्हा एकदा नव्या दमाने, तरुणाला लाजवेल इतक्या उत्साहाने त्यांनी राष्ट्रीय उत्पन्न या आवडत्या विषयाला हात घातला यावेळी राष्ट्रीय उत्पन्न मापन करावयाचे नव्हते किंवा मापनपद्धतीत सुधारणा करावयाच्या नव्हत्या. राव यांनी अभिवृद्धीचे आर्थिक विश्लेषण राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून केले. 'India's National Income 1950–80 : An Analysis of Economic Growth and Change' ह्या नावाने आपले नवीन संशोधन त्यांनी 1983 साली प्रसिद्ध केले. मूळातून वाचावे असे हे पुस्तक. स्पष्ट व मुद्देसूद विश्लेषण. सहज, सोपी व अर्थवाही भाषा. फारसे गणितीय विश्लेषण न करता विषय स्पष्ट करण्याची त्यांची हातोटी. विषयावरील घट्ट पकडीतूनच इतक्या सहजतेने विश्लेषण होऊ शकते याची खात्री पुस्तक वाचल्यावर पटते. उण्यापुऱ्या 12 प्रकरणांतून आणि 142 तक्त्यांच्याद्वारे रावांनी स्पष्टीकरण केले. 'Capital Formation and National Income' आणि 'Productivity and Growth' ही दोन प्रकरणे दर्जेदार असून अशा प्रकारची माहिती व त्याबाबतचे विश्लेषण वाचकांना प्रथमच उपलब्ध होऊ शकले.

केन्सप्रणित अर्थशास्त्र न्यून विकसित देशांना लागू पडते का हा 25–30 वर्षांपूर्वी चर्चेचा विषय होता. राव यांनी हे अर्थशास्त्र न्यून विकसित देशांना लागू पडत नाही, हे स्पष्टपणे दाखवून दिले; विशेषेकरून छुप्या बेकारीची समस्या दूर करण्यासाठी केन्स–प्रणित विवेचन अपर्याप्त आहे. पहिल्या पंचवार्षिक काळात तुटीच्या अर्थप्रबंधनाचा प्रश्न अत्यंत आवेशाने चर्चिला गेला. राव यांनी फेब्रुवारी 1953 च्या 'इंडियन इकॉनॉमिक रिव्ह्यू' मध्ये 'Defcit Financing, Capital Formation and Price Behaviour in Under-developed Economy' हा संशोधनपर लेख लिहिला. तुटीच्या अर्थप्रबंधनाची संकल्पना अतिशय योग्य प्रकारे त्यांनी स्पष्ट केली. तुटीच्या अर्थप्रबंधनामुळे भाववाढ होईल की नाही हे नऊ घटकांवर अवलंबून असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

व्ही. के. आर. व्ही. राव यांनी 'इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स' च्या एकविसाव्या वार्षिक अधिवेशनात अध्यक्षीय भाषणातून शेतीमाल उत्पादनाचे स्रोत, त्यातील वाढीचे स्रोत व त्यातील बदल यावर आपले विचार मांडले. शेतीमालाच्या उत्पादनातील वाढ अभ्यासताना त्यात विविध पिकांचे तुलनात्मक महत्त्व कोणते, तसेच देशातील विविध भौगोलिक क्षेत्रांचा शेतीमालाचे उत्पादन वाढविण्यात सहभाग कोणता या विषयांचा ऊहापोह त्यांनी या संदर्भात केला आहे. भारतात शेती उत्पादनात दिसून येणाऱ्या प्रादेशिक विषमतेवर त्यांनी बोट ठेवले. या विविध विषयांवर नंतरच्या काळात जी व्यापक सर्वेक्षणे झाली, त्यावर जी भाष्ये झाली आणि ज्या उपाययोजना सुचविल्या गेल्या त्यांचे श्रेय बऱ्याच अंशी राव यांच्या

विचार व कृतीप्रवर्तक विचारांना दिली जाते. दिल्ली येथे भरलेल्या आठव्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेच्या आपल्या उद्घाटनपर भाषणात राव यांनी शेती व उद्योगाच्या संतुलनाचा विचार, पर्यावरण व जीवनाचा दर्जा या संदर्भात व्हावा असे सुचविले.

राव यांनी पं. नेहरूंच्या सूचनेवरून निर्वासितांसाठी वसविण्यात आलेल्या गावांचे सर्वेक्षण केले. पंजाबमधील फरिदाबाद, त्रिपुरी, राजपुरा आणि निलोखेरी ही चार गावे आणि दिल्लीतील किंग्जवे कॅम्प या आठ ठिकाणचे सर्वेक्षण केल्यानंतर पुनर्वसन करताना सात बाबी कटाक्षाने पाळाव्यात असे त्यांनी स्पष्ट केले. या बाबी कोणत्याही गावाच्या संदर्भात वापरल्या जाव्या इतक्या महत्त्वाच्या आहेत. दिल्लीचे सामाजिक–आर्थिक सर्वेक्षण त्यांनी केले आणि त्यातून या शहरातील दारिद्र्य व विषमतेचे भीषण स्वरूप स्पष्ट केले. देशाच्या विकास प्रक्रियेत शहरीकरणास अवास्तव महत्व दिले जात आहे असे त्यांना वाटते.शहरीकरणाचे अर्थव्यवस्थेवर जणू वर्चस्व स्थापन होत आहे असे जाणवल्याने गांधीवादी दृष्टिकोनाची शिफारस त्यांनी केली. मात्र केवळ खेड्यात चला असे म्हणणे पुरेसे नाही. खेड्यात विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक न्याय असले पाहिजेत. ग्रामीण जीवनाचा दर्जा वाढविण्यावर त्यांचा भर होता.

पहिल्या वृत्तपत्र आयोगाची स्थापना 1952 मध्ये न्यायमूर्ती राज्याध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली झाली. राव त्याचे सभासद होते. या आयोगाच्या अहवालातील चौथे प्रकरण 'Economics of Newspaper, असे आहे. ते तयार करण्यात राव यांचा सिंहाचा वाटा आहे. किंमत–पृष्ठ सारणीची संकल्पना त्यात राव यांनी मांडली असून अन्यत्र नेमलेल्या आयोगांनी वा समित्यांनी ह्या पुरोगामी विचाराचा कधी पुरस्कारही केला नव्हता.

राव यांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या अध्ययन–संशोधनातून अर्थशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात केली. शुद्ध अर्थतज्ज्ञाची त्यांची भूमिका अनुभवातून, अधिक अध्ययनातून आणि वैचारिक बैठकीतून बदलत गेली. विविध विषयांच्या परस्पर देवाणघेवाणीतून त्यांनी मानवी जीवनाकडे व्यापक दृष्टीने बघितले. एखादा प्रश्न अर्थशास्त्राच्या कक्षेबाहेर येतो म्हणून तो सोडून देणे त्यांना मानवणारे नव्हते. समाजापुढे येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्याची क्षमता आपल्यात असली पाहिजे असे त्यांना वाटे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत गुणात्मक मूल्यांकनावर त्यांची दृष्टी स्थिरावली. मानवी घटकांचा पूर्ण विचार झाला पाहिजे असे त्यांना वाटले. एका लेखात ते लिहितात, "आर्थिक विकासाची प्रक्रिया अनेक देशांमधून व पिढ्यांमधून आपल्याला प्राप्त झालेल्या मूल्यांशी निगडित आहे. ही मूल्ये आपल्या जगण्याच्या आनंदाला स्वाद व सौरभ प्रदान करतात. ही मूल्ये प्राप्त करण्यासाठी केलेले प्रयत्न मानवी अस्तित्वाच्या सातत्याला आशय व हेतू प्रदान करतात. अशा मूल्यांशी ही विकास प्रक्रिया निगडित असली पाहिजे."

व्ही. के. आर. व्ही. राव यांना सभा–संमेलनातून आपल्यापैकी अनेकांनी पाहिले आहे. उंच शरीरयष्टी, उभा चेहरा, मोठे नाक, सोनेरी फ्रेमचा चष्मा व त्यांच्या चेहऱ्यावरील विद्वत्तेची झाक ही नजरेत भरत. ज्ञानाच्या क्षेत्रात सतत साठ वर्षे कार्य करणारे, विविध संस्थांची स्थापना करून त्यांना यशाच्या शिखरावर नेणारे, किमान दोन पिढ्यांवर आपल्या विचारांची छाप पाडणारे, भारतीय अर्थव्यवस्थेत कशा प्रकारे बदल होत आहेत हे अधिकारवाणीने सांगणारे आणि संशोधनाची नवी दालने उघडून नवीन संशोधकांना दिशा दाखविणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व राव यांच्या निधनाने आपल्यातून निघून गेले आहे. त्यांच्या कर्तृत्वाने आपणा सर्वांचा ऊर अभिमानाने भरून येतो.

□ □

## मराठी अर्थशास्त्र परिषद
### देणगीदारांची नावे

78 'क्ष' रु. 200

**श्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

## परिशिष्ट

# व्ही. के. आर. व्ही. राव यांची निवडक ग्रंथसंपदा

संकलन : सु. गो. भानुशाली *


1 AGRICULTURAL LABOUR IN INDIA, Institute of Economic Growth, Studies in Economic Growth No. 3, Asia Publishing House, Bombay, 1962.

2 BEGGAR PROBLEM IN METROPOLITAN DELHI, 1959.

3 BANGLA DESH ECONOMY : PROBLEMS AND PROSPECTS, Institute of Economic Growth, Studies in Economic Growth No. 15, Vikas Publications, Delhi, 1972.

4 CENTRE-STATE FINANCIAL RELATIONS IN INDIA, Institute for Social and Economic Change, Staff Papers No. 1, Institute for Social and Economic Change Bangalore, 1973.

5 CO-OPERATION : TWO PERSPECTIVES (Co-author: B. Venkatappiah), Pune, 1982.

6 CURRENT INDIAN CRISIS : DARKNESS BEFORE DAWN, Govind Ballabh Pant Memorial Lecture No. 3, Vohra Publishers, Allahabad, 1984.

7 DEFICIT FINANCING, CAPITAL FORMATION AND PRICE BEHAVIOUR IN AN UNDERDEVELOPED ECONOMY, Eastern Economist Pamphlets, New Delhi, 1953.

8 ECONOMICS OF INDIAN FOREIGN TRADE (Co-author : P. A. Wadia), Bombay Swadeshi League, 1931.

9 AN ESSAY ON INDIA'S NATIONAL INCOME, (1925-1929), George, Allen and Unwin, London, 1939.

10 ESSAY ON THE NATURE AND PURPOSE OF ECONOMIC ACTIVITY, Delhi, 1943.

11 AN ECONOMIC REVIEW OF REFUGEE REHABILITATION IN INDIA - A STUDY OF KINGSWAY CAMP, Delhi School of Economics, Monograph No. 5, Delhi University Press, 1955.

12 EDUCATION AND ECONOMIC DEVELOPMENT, Panikkar Memorial Lecture, 1964, National Council of Educational Research and Training and Regional College of Education, 1964.

13 ESSAYS IN ECONOMIC DEVELOPMENT, Asia Publishing House, 1964.

14 EDUCATION AND HUMAN RESOURCE DEVELOPMENT, Allied Publishers, Bombay 1966.

15 EMPLOYMENT AND UNEMPLOYMENT Indian Society of Labour Economics Publication No. 2, Allied Publishers Pvt. Ltd., Bombay, 1968.

16 FOOD, NUTRITION AND POVERTY IN INDIA, Vikas Publishing House Pvt. Ltd., 1982.

17 FOREIGN AID AND INDIA'S ECONOMIC DEVELOPMENT, (Co-author : Dharam Narain), Asia Publishing House, Bombay, 1963,

18 THE GANDHIAN ALTERNATIVE TO WESTERN SOCIALISM, Bharatiya Vidyabhavan, Bombay, 1970.

19 GREATER DELHI : A STUDY IN URBANIZATION, (1940-57), (Co-author : P. B. Desai), Asia Publishing House, Bombay, 1965.

20 "Growth and structural change in Indian Economy" in THE DEVELOPMENT PROCESS OF INDIAN ECONOMY, Ed. P. R. Brahmananda and V. R. Panchamukhi.

21 HUMAN FACTOR IN INDIAN ECONOMIC LIFE, (Co-author : P. A. Wadia, Bombay Swadeshi League, 1930.

22 INDIAN ECONOMY (Leaflets 1 to 7), (Co-author : P. A. Wadia), Bombay Swadeshi League, 1930.

23 INDIA AND INTERNATIONAL CURRENCY PLANS, Delhi, 1944.


* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर आणि सहायक संपादक, 'अर्थसंवाद'.

24 INTENSIVE EDUCATIONAL DISTRICT DEVELOPMENT PROJECT : BELLARY DISTRICT, Inaugural Address, (Ministry of Education and Youth Services, 1970.

25 INFLATION AND INDIA'S ECONOMIC CRISIS, Vikas Publishing House, New Delhi, 1973.

26 INDIAN SOCIALISM : RETROSPECT AND PROSPECT, Concept Publishing Company, New Delhi, 1982.

27 INDIA'S NATIONAL INCOME–1950–1980, AN ANALYSIS OF ECONOMIC GROWTH AND CHANGE, Sage Publications, New Delhi, 1983,

28 LANGUAGE AND INTEGRATION : THE PROBLEM OF INDIA'S MULTILINGUAL SOCIETY, Mahatma Gandhi Memorial Lectures, Bombay, 14-16 January 1978, Hindustani Prachar Sabha, Bombay, 1978, (cyclostyled).

29 MODERN INDIA : (Six Talks broadcast over the Network of Australian Broadcasting Commission, October - November 1959), Asia Publishing House, Bombay, 1960.

30 MANY LANGUAGES, ONE NATION : THE PROBLEM OF IMTERGRATION, Mahatma Gandhi Memorial Lecture Series, 1978, Mahatma Gandhi Memorial Research Centre and Library, 1979.

31 NATIONAL INCOME OF BRITISH INDIA : 1931–32, Macmillan, London, 1940.

32 National Seminar on GANDHIAN VALUES IN INDIAN EDUCATION, Address, Ministry of Educatino and Youth Services, New Delhi, 1970.

33 THE NEHRU LEGACY, Popular Prakashan, 1971.

34 NATIONAL POLICY FOR INTEGRATED URBAN AND RURAL DEVELOPMENT, Barfiwala Memorial Lecture Series, Lecture No. 1, All-India Institute of Local-Self Government, Bombay, 1980.

35 NATIONAL INTEGRATION : SOME UNSOLVED ISSUES, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1985.

36 PLANNING ECONOMIC TRANSITION FROM WAR TO PEACE IN INDIA, Vora and Company, Bombay, 1945.

37 THE POST-WAR RUPEE : AN ESSAY ON PRICES AND EXCHANGE IN INDIA DURING POST-WAR PERIOD, Indian Council of World Affairs, New Delhi, 1945.

38 PAPERS ON NATIONAL INCOME AND ALLIED TOPICS, 1960, Volumes I and II, 1962.

39 PLANNING FOR CHANGE : ISSUES IN MYSORE DEVELOPMENT, Institute for Social and Economic Change, Monograph 1, Vikas Publishing House, New Delhi, 1975.

40 PLANNIG IN PERSPECTIVE : POLICY CHOICES IN PLANNING FOR KARNATAKA (1973-74 to 1988-89), Allied Publishers, Bombay, 1978.

41 REPORT OF THE SPECIAL COMMITTEE FOR EDUCATION, All-India Council for Technical Education, New Delhi, 1961.

42 REPORT OF THE COMMITTEE ON UTILISATION OF EXTERNAL ASSISTANCE, Government of India, New Delhi, 1964.

43 REPORT OF THE WORKING GROUP ON EVALUATION IN STATES, Government of India, New Delhi, 1964.

44 REPORT OF THE TARIFF COMMISSION REVIEW COMMITTEE, Government of India, New Delhi, 1967.

45 SOCIAL PLANNING : THE THEME AND SOCIAL PLANNING : THE INDIAN CONTEXT B. R. Ambedkar Memorial Lectures, Institute for Social and Economic Change, Bangalore (reprint)-

46 STATE DOMESTIC PRODUCTS AND NATIONAL DOMESTIC PRODUCTS : C. N. Vakil Endowment Lectures, Institute for Social and Economic Change, Bangalore, 1973.

47 " Taxation and Income in India " in STUDIES IN INDIAN ECONOMICS, Ed. C. N. Vakil, Longmans Green and Company, 1931.

48 Two Papers on National Income : (1) CHANGING STRUCTURE OF INDIAN ECONOMY AS SEEN THROUGH NATIONAL INCOME DATA, (2) SAVINGS, CAPITAL FORMATION AND NATIONAL INCOME. Institute of Social and Economic Change, Bangalore.

49 UNIVERSITY EDUCATION AND EMPLOYMENT : A CASE STUDY OF DELHI GRADUATES, Institute of Economic Growth, Occassional Papers No. 3 Asia Publishing House, Bombay, 1961.

50 VALUES AND ECONOMIC DEVELOPMENT: THE INDIAN CHALLENGE, Vikas Publications, New Delhi, 1971.

51 VIVEKANAND'S MESSAGE TO THE YOUTH, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1970.

52 WHAT IS WRONG WITH INDIAN ECONOMIC LIFE ?, Vora and Company, Bombay, 1938.

53 WAR AND INDIAN ECONOMY, Kitabistan, Allahabad, 1943.

## व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या सन्मानार्थ प्रकाशित ग्रंथ

1 DEVELOPMENT PLANNING AND POLICY, Ed. D. B. Gupta and others, New Delhi, 1982

2 INDIA:EMERGING CHALLENGES, Ed. M. V. Nadkarni and others, Sage Publications, New Delhi, 1991.

3 REFLECTIONS ON ECONOMIC DEVELOPMENT AND SOCIAL CHANGE, Ed. C. H. Hanumantha Rao and P. C. Joshi, Bombay, 1979.

(**टीप :** अ. चिं. टिकेकर, ग्रंथपाल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ यांनी पुरविलेल्या यादीबद्दल आभार.)

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## पंधरावे वार्षिक अधिवेशन

परिषदेचे पंधरावे वार्षिक अधिवेशन दिनांक 29, 30 नोव्हेंबर आणि 1 डिसेंबर, 1991 या दिवशी नांदेड येथे होणार आहे. प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड यांच्या विद्यमाने हे अधिवेशन भरत असून **त्यामध्ये परिषदेच्या सदस्यांनाच फक्त सहभागी होता येईल.** अधिवेशनाच्या संयोजकांकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात आलेले आहे. प्रतिनिधी **शुल्क रुपये एकशे साठ** फक्त मनी ऑर्डरने / डिमांड ड्राफ्टने " **मराठी अर्थशास्त्र परिषद, पंधरावे अधिवेशन समिती** " या नावाने स्थानिक कार्यवाहांकडे **14 नोहेंबर 1991** पूर्वी पोहोचेल अशा बेताने पाठवावे. **नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली सदस्यत्वाची वर्गणी** ( वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रु. 80 किंवा आजीव सदस्य वर्गणी रु. 600 ) **नांदेड येथेच प्रतिनिधी शुल्काबरोबर पाठवावी.** या रकमेची रीतसर पावती यथावकाश संबंधितांकडे परिषदेच्या कार्यालयाकडून पाठविली जाईल.

आयत्या वेळेचा विषय (चौथ्या चर्चासत्रासाठी) खालीलप्रमाणे राहील.

" **भारताचे नवे औद्योगिक धोरण** "

अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशिलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

प्रा. एन. आर. देशमुख, स्थानिक कार्यवाह,
मराठी अर्थशास्त्र परिषद, पंधरावे वार्षिक अधिवेशन,
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, **नांदेड**–431 601

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

# भारतातील राजकोषीय व्यवस्थापन *


बी. बी. भट्टाचार्य **

अनुवाद :

प्र. न. चित्रे ***


## 1

## प्रास्ताविक

भारतीय अर्थव्यवस्था एका गंभीर अरिष्टातून जात आहे. आर्थिक अभिवृद्धी टिकविण्याकरिता व विदेशी कर्जाचे संधारण (servicing) करण्याकरिता आयात आवश्यक आहे. पण त्याकरिता लागणाऱ्या विदेशी चलनाचा साठा निर्णायक पातळीपेक्षा ( critical minimum) कितीतरी कमी आहे. व्यापारातील तफावत रुंदावत आहे आणि विदेशी कर्ज संधारणाचा दर वाढत आहे. सध्या विदेशी कर्जाचे प्रमाण स्थूल आंतर्देशीय उत्पादनाच्या ('स्थूआंउ'–GDP) जवळजवळ 25 टक्के आहे. राजकोषीय शेषदेखील धोकादायक वाटत आहे. शासकीय खर्च चालू महसुलापेक्षा जास्त वेगाने वाढत आहे. सध्या सार्वजनिक गुंतवणुकीकरिताच नव्हे तर चालू खर्च भागविण्याकरितादेखील शासन मोठ्या प्रमाणावर कर्ज घेत आहे. राजकोषीय तूट 'स्थूआंउ' च्या (GDP) 8 टक्क्यांपेक्षाही जास्त आहे आणि पैसाधिष्ठित (monetised) तूट 3 टक्के आहे. शासकीय कर्जाचा व्यय व सार्वजनिक गुंतवणुकीवरील प्राप्तीचा दर यात बरीच तफावत आहे. व्याजाची देय रक्कम देशाच्या चालू महसुलाच्या 40 टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. आणि हे प्रमाण तीव्रतेने वाढत आहे. ही सारी लक्षणे नजिकच्या काळात देशांतर्गत कर्जाचा सापळा तयार होत आहे याचीच द्योतक आहेत. चलन अतिवृद्धीचा (inflation) दर सध्या दरसाल 12 टक्के आहे. पैशाचा वाढता ओघ, प्रबंधित (administered) किमती व प्रापण (procurement) किमती यांची जलद वाढ आणि रुपयाचा मूल्यऱ्हास या कारणांमुळे ही चलन अतिवृद्धी अधिक वेगाने होण्याचा संभव आहे. म्हणूनच तातडीने पर्यायी धोरणात्मक कार्याचा अवलंब केला पाहिजे. या धोरणाच्या साहाय्याने प्रथम आंतर–राष्ट्रीय व्यवहार ताळेबंद आणि विदेशी ऋण संधारण यावरील आर्थिक गंडांतर निवारता आले पाहिजे आणि त्यानंतर आर्थिक धोरणात संरचनात्मक बदल झाले

* इंडियन इकनॉमिक असोसिएशन ट्रस्ट फॉर रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे येथे 'Fiscal Managemet in the Indian Economy : Issues and Policy Options' या विषयावर 17 ऑगस्ट, 1991 रोजी झालेल्या चर्चासत्रात सादर केलेला प्रमुख निबंध.


** प्राध्यापक, इन्स्टिट्यूट ऑफ इकनॉमिक ग्रोथ, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

*** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.

तक्ता 1

**केंद्र, राज्य व केंद्रशासित प्रदेशातील सरकारांचा महसूल आणि खर्च**
**( स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी–GDP–टक्केवारी )**

| वर्ष | एकूण खर्च | चालू महसूल | करांपासून महसूल | प्रत्यक्ष करांपासून महसूल | अप्रत्यक्ष करांपासून महसूल | करेतर चालू महसूल | तूट (1–2) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1980–81 | 27.1 | 18.1 | 14.6 | 2.4 | 12.2 | 3.5 | 9.0 |
| 1983–84 | 29.4 | 19.8 | 15.2 | 2.4 | 12.8 | 4.6 | 9.6 |
| 1984–85 | 31.5 | 20.4 | 15.5 | 2.3 | 13.2 | 4.9 | 11.1 |
| 1985–86 | 32.0 | 21.7 | 16.5 | 2.4 | 14.1 | 5.2 | 10.4 |
| 1986–87 | 34.5 | 22.2 | 17.0 | 2.4 | 14.6 | 5.2 | 12.3 |
| 1987–88 | 33.7 | 22.1 | 17.1 | 2.2 | 14.9 | 5.0 | 11.6 |
| 1988–89 | 32.9 | 21.7 | 16.9 | 2.5 | 14.4 | 4.8 | 11.2 |
| 1989–90 (सुधारित अंदाज) | 36.0 | 23.2 | 17.3 | 2.5 | 14.8 | 5.9 | 12.8 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1990-91 आणि अर्थसंकल्प, 1991-92.

पाहिजेत.

भारतीय अर्थव्यवस्थेत नवा जोम यावा म्हणून नव्याने स्थापन झालेल्या सरकारने धोरणात्मक मोठे बदल केलेले आहेत. पहिले पाऊल म्हणजे रुपयाचे मूल्य 20 टक्क्यांनी कमी केले, आणि विदेशी व्यापारावरील बंधने शिथील केली. जाहीर केलेल्या नवीन औद्योगिक धोरणात काही वगळता बहुतेक उद्योगांचे नियंत्रण काढून टाकले, मक्तेदारी कायद्यातील गुंतवणुकीवरील बंधने रद्द केली आणि भागभांडवलात 51 टक्के विदेशी सहभाग मान्य केला. तसेच, केंद्रीय अर्थसंकल्पात घोषित केले की, रासायनिक खताच्या अर्थसाहाय्यात कपात होईल, निर्यात व साखरेकरिता अर्थसाहाय्य बंद होईल, आयात कर कमी होतील आणि चैनीच्या वस्तूंच्या उत्पादन करात वाढ होईल. या सर्वांचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होऊ शकेल. आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या 'संरचनात्मक समायोजन कार्यक्रमा' खाली (structural adjustment programme) 5 ते 7 अब्ज डॉलर कर्ज मिळविण्याकरिता वाटाघाटी करण्यास शासनाने अनुमती दिलेली आहे. प्रस्तुत निबंध राजकोषीय शेवासंबंधी आहे. यामध्ये प्रथमतः सध्याच्या आर्थिक अरिष्टाचे सर्वसाधारण विश्लेषण करून राजकोषीय असमतोलाचे निरुपण केलेले आहे. त्यानंतर राजकोषीय अरिष्टासंबंधी प्रमुख धोरणात्मक पर्यायांची चर्चा केलेली आहे.

## 2

## आर्थिक अरिष्टाचे स्वरूप

भारतात यापूर्वी मुख्यतः पुरवठ्याच्या धक्क्यामुळे (supply shock) मोठाली आर्थिक अरिष्टे निर्माण झाली. 1960 नंतरच्या दशकाच्या मध्यावधीला पाठोपाठ आलेल्या दुष्काळांनी आणि चीन व

तक्ता 2

केंद्रीय अर्थसंकल्पातील तुटीची विविध मापने
( स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी टक्केवारी )

| वर्ष | महसुली तूट | अर्थसंकल्पी तूट | पैसाधिष्ठित तूट | स्थूल राजकोषीय तूट |
|---|---|---|---|---|
| 1975–76 | – | 0.5 | 0.3 | 4.1 |
| 1980–81 | 0.6 | 1.8 | 2.6 | 6.2 |
| 1981–82 | 0.1 | 0.9 | 2.0 | 5.4 |
| 1982–83 | 0.7 | 0.9 | 1.9 | 6.0 |
| 1983–84 | 1.2 | 0.7 | 1.9 | 6.3 |
| 1984–85 | 1.8 | 1.6 | 2.6 | 7.5 |
| 1985–86 | 2.2 | 2.0 | 2.4 | 8.3 |
| 1986–87 | 2.8 | 2.8 | 2.4 | 9.0 |
| 1987–88 | 2.7 | 1.7 | 2.0 | 8.1 |
| 1988–89 | 2.7 | 1.4 | 1.6 | 7.8 |
| 1989–90 | 2.7 | 2.4 | 3.1 | 8.0 |
| 1990–91 (सुधारित अंदाज) | 3.4 | 4.1 | 3.0 | 8.4 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण 1989-90 आणि 1990–91.

पाकिस्तान यांच्याबरोबर झालेल्या युद्धांनी विदेशी चलनाची समस्या निर्माण झाली; यातून औद्योगिक मंदीची लाट आली. 1973–74 साली दुसऱ्यांदा अरिष्ट आले. सलग दोन वर्षांचा दुष्काळ व जोडीला कच्च्या तेलाचा पहिला धक्का त्याला कारणीभूत होता. यानंतर पुन्हा एकदा लागोपाठ दोन वर्षे दुष्काळ आणि कच्च्या तेलाचा दुसरा धक्का या कारणांनी 1979–80 मध्ये तिसऱ्यांदा अरिष्ट निर्माण झाले. वरील सर्व अरिष्टांच्या काळात विदेशी चलनाचा साठा वेगाने घटला आणि भाववाढीचा दर द्विसंख्यात्मक झाला. यावेळी राजकोषीय परिस्थिती जरी फार घाबरण्यासारखी नव्हती तरी, प्रभावी मागणी कमी करण्याकरिता सार्वजनिक खर्च व पैशांचा पुरवठा आवळावा लागला. या नियंत्रणाचा परिणाम सरकारी चालू खर्चावर न होता सार्वजनिक गुंतवणुकीवर झाला. परिणामतः शेतीव्यतिरिक्त उत्पादनाचा अभिवृद्धी दर कमी झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तीनही अरिष्टांनंतर अर्थव्यवस्थेत जे पुनरुत्थान झाले ते त्यानंतर आलेल्या भरघोस शेती उत्पादनामुळे होय.

पूर्वीच्या सर्व मोठ्या अरिष्टांच्या उलट आताच्या अरिष्टामागे पुरवठ्याच्या भयंकर तुटवड्याचे कारण आढळत नाही. गेल्या तीन वर्षांतील शेतीचे उत्पादन समाधानकारक होते. 1987 च्या बहुचर्चित दुष्काळातदेखील सुरुवातीच्या अंदाजापेक्षा अंतिम उत्पादन जास्तच झाले. अलीकडच्या आखाती युद्धामुळे विदेशी चलनाच्या समस्येची तीव्रता वाढली असेलही, पण युद्ध झाले नसते तरीदेखील परिस्थिती गंभीर झाली असतीच.

1980 च्या दशकातील अभिवृद्धीच्या तंत्राची मूलभूत समस्या म्हणजे तिची वित्तव्यवस्था मोठ्या

तक्ता 3

केंद्र व राज्य सरकारांचा चालू महसूल

(अब्ज रुपये)

| वर्ष | आयकर व कंपन्यांवरील कर | सीमाशुल्क (customs) | अबकारी कर | विक्री कर | इतर कर | करेतर महसूल |
|---|---|---|---|---|---|---|
| 1980–81 | 28 | 34 | 65 | 40 | 31 | 47 |
| 1985–86 | 54 | 95 | 130 | 87 | 67 | 135 |
| 1986–87 | 60 | 115 | 145 | 100 | 76 | 153 |
| 1987–88 | 66 | 137 | 164 | 116 | 86 | 165 |
| 1988–89 | 87 | 158 | 188 | 137 | 99 | 188 |
| 1989–90 | 98 | 179 | 221 | 156 | 114 | 261 |
| 1990–91 (अर्थसंकल्पी अंदाज) | 116 | 215 | 251 | 179 | 132 | 287 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1990-91.

कर्जांवर आधारलेली होती. त्यापूर्वीच्या दशकापेक्षा या दशकात 'स्थूआंउ' ( GDP ) व औद्योगिक अभिवृद्धीचा दर जास्त चांगला होता म्हणून अर्थ–व्यवस्थेचे संपादनात्मक कार्य ( performance ) जास्त चांगले होते. या दशकात औद्योगिक अभिवृद्धीचा दर पूर्वीच्या दशकापेक्षा जवळजवळ दुप्पट होता. आणि विशेष म्हणजे, गुंतवणुकीचा दर विशेष न वाढविता ही प्रगती साधता आलेली होती : 1970 च्या दशका–तील 19.1 टक्क्यांच्या तुलनेने 1980 च्या दशकातील गुंतवणुकीचा सरासरी दर 21.9 टक्के होता. तथापि, या काळात वित्तव्यवस्थेची धाटणी मात्र बरीच बदलत होती. (1) निव्वळ भांडवल अंतर्देशी प्रवाहावर (Net Capital Inflow ) जास्त भर देण्यात आला. तो प्रवाह सत्तरीत 'स्थूआंउ' च्या ( GDP ) फक्त 0.1 टक्का होता तो ऐंशीच्या दशकात 1.9 टक्क्यांवर पोचला. ऐंशीच्या दशकाच्या शेवटी विदेशी भांडवला–वर जास्त भर दिल्याकारणाने हे प्रमाण 3 टक्के झाले. (2) दुसरा महत्त्वाचा बदल सार्वजनिक गुंतवणुकी–साठीच्या वित्तप्रबंधात झाला. सत्तरीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बचत आणि गुंतवणूक यातील सरासरी तूट 'स्थूआंउ' च्या 4.7 टक्के होती, ती ऐंशीच्या दश–कात 6.5 टक्क्यांपर्यंत पोचली. ऐंशीच्या दशकात स्थूल बचत दर 1980–81 मधील 4.5 टक्क्यांवरून 1989–90 मध्ये 'स्थूआंउ' च्या 1.7 टक्क्यांपर्यंत घसरला. सत्तरीमध्ये सामान्यतः शासनाची बचत धन स्वरुपाची होती ती 1983–84 नंतर ऋण स्वरुपाची झाली. सार्वजनिक क्षेत्राची निव्वळ बचतदेखील ऋणच आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणातील व्यापाराची तूट काय किंवा राजकोषीय तूट काय, फार काळ सहन करणे अशक्य आहे ही गोष्ट उघड आहे. या दोन्ही तुटी सांकलिक संतुलनाच्याद्वारे परस्परांशी संबंधित आहेत; कारण, एक तूट भरून काढावयाची झाल्यास दुसऱ्या तुटीवर उपाययोजना करणे आवश्यक ठरते. जगातील विकसनशील देशांचा अलीकडचा अनुभव पाहिल्यास लक्षात येते की, परराष्ट्रीय देण्याघेण्यातील तूट व राज–कोषीय तूट प्रमाणाबाहेर गेल्यास त्यामुळे कालौघात सौम्य स्वरुपाची मंदी ( recession ), सुसाट अतिवृद्धी ( hyper–inflation ) आणि आंतर्देशीय व विदेशी कर्जांच्या सापळ्यात देश गुरफटला जातो.

**तक्ता 4**

**केंद्र सरकारचा चालू महसूल आणि खर्च**
**( स्थूल आंतर्देशीय उत्पादनाशी टक्केवारी )**

| वर्ष | चालू खर्च | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिलेले व्याज | अर्थसाहाय्य | संरक्षण | राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना अनुदान | इतर | एकूण | चालू महसूल |
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1980–81 | 2.0 | 1.2 | 2.6 | 2.1 | 2.2 | 10.0 | 9.4 |
| 1981–82 | 2.0 | 1.2 | 2.6 | 1.7 | 2.4 | 9.9 | 9.8 |
| 1982–83 | 2.2 | 1.3 | 2.7 | 2.0 | 2.6 | 10.9 | 10.2 |
| 1983–84 | 2.3 | 1.3 | 2.7 | 2.1 | 2.6 | 11.1 | 9.9 |
| 1984–85 | 2.6 | 1.6 | 2.8 | 2.3 | 2.8 | 12.1 | 10.6 |
| 1985–86 | 2.9 | 1.8 | 2.9 | 2.7 | 3.0 | 13.3 | 11.2 |
| 1986–87 | 3.2 | 1.9 | 3.4 | 2.7 | 3.3 | 14.4 | 11.7 |
| 1987–88 | 3.4 | 1.8 | 3.0 | 2.8 | 3.3 | 14.3 | 11.5 |
| 1988–89 | 3.6 | 2.0 | 2.9 | 2.6 | 3.0 | 14.1 | 11.4 |
| 1989–90 | 4.0 | 2.5 | 2.7 | 2.0 | 3.8 | 14.9 | 12.2 |
| 1990–91 (सुधारित अंदाज) | 4.3 | 1.8 | 2.4 | 2.2 | 4.2 | 14.9 | 11.5 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1989–90 आणि 1990–91.

## 3

## राजकोषीय असंतुलन

भारतीय राजकोषीय व्यवस्थेचा मूलभूत प्रश्न उत्पन्नापेक्षा शासकीय खर्च जास्त वेगाने वाढतो आहे हा आहे. तक्ता 1 प्रमाणे 1980–81 मध्ये शासनाचा खर्च 'स्थूआंउ' च्या 27.1 टक्के होता तो 1989–90 मध्ये 36 टक्क्यांपर्यंत वाढला. तर शासनाचा चालू महसूल याच वर्षात 18.8 टक्क्यांवरून 23.2 टक्क्यांपर्यंतच वाढला. कर– 'स्थूआंउ' ( GDP ) गुणोत्तर 2.7 टक्केवारी बिंदूंनी वाढले; याचे श्रेय पूर्णतया अप्रत्यक्ष करांना द्यावे लागते.

राजकोषीय असंतुलनाची विविध मोजमापे आहेत. (1) अर्थसंकल्पातील तूट हे पारंपरिक मोजमाप. ही तूट रोख शेष (cash balance) व राजकोष पत्रे (treasury bills) यातील वाढ दाखविते. (2) शासकीय अंदाजपत्रकानुसार चलनपुरवठ्यात जी प्रत्यक्ष वाढ होते ती वित्तीय तूट. यामध्ये अर्थसंकल्पातील तूट आणि रिझर्व्ह बँकेने शासनाच्या बाजारातील कर्जासाठी केलेले योगदान ( म्हणजेच, रिझर्व्ह बँकेने शासनाला दिलेले निव्वळ कर्ज ) यांचा

**तक्ता 5**

**सार्वजनिक उपक्रमांचा नफातोटा**

(कोटी रुपये)

| वर्ष | केंद्रीय उपक्रम : निव्वळ नफा | | राज्यांचे उपक्रम निव्वळ तोटा (रुपये) |
|---|---|---|---|
| | रुपये | भांडवलाशी टक्केवारी | |
| 1985–86 | 1172 | 2.7 | –548 |
| 1986–87 | 1771 | 3.4 | –862 |
| 1987–88 | 2060 | 3.7 | –1065 |
| 1988–89 | 2994 | 4.4 | –1578 |
| 1989–90 | 3782 | 4.5 | –1898 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1990–91.

समावेश होतो. (3) महसुली तूट. यामध्ये शासनाने चालू खर्च भागविण्याकरिता काढलेल्या कर्जाचा समावेश होतो. (4) राजकोषीय तूट. यामध्ये एकंदर शासकीय कर्जाचा [खाजगी, वित्तसंस्था (रिझर्व्ह बँकेसहित) आणि विदेशी कर्जे] अंतर्भाव होतो.

तक्ता 2 नुसार वरील सर्व प्रकारांची तूट वाढत गेल्याची प्रवृत्ती स्पष्टपणे आढळते. सध्या केंद्राची महसुली तूट 'स्थूआंउ' च्या (GDP) 3.4 टक्के आहे. राजकोषीय आवश्यक प्रमाणकानुसार महसुलामध्ये आधिक्य असले पाहिजे. सत्तरीच्या अखेरपर्यंत अशी प्रथा होती, परंतु ऐंशीच्या दशकात ती मोडली गेली. 'स्थूआंउ' च्या वाढीपेक्षाही महसुली तूट अधिक वेगाने वाढू दिली गेली ही तर दुर्दैवाची गोष्ट आहे. वित्तीय तूट अर्थसंकल्पातील तुटीपेक्षाही जास्त असून ती सध्या 'स्थूआंउ' च्या 3 टक्के झालेली आहे. राजकोषीय तूट 1975–76 मधील 'स्थूआंउ' च्या 4.1 टक्क्यांवरून 1990–91 मध्ये 8.4 टक्क्यांपर्यंत वाढलेली आहे. शासकीय अर्थसंकल्पात अंतर्यामी गतिशीलता आहे : तुटीमुळे कर्ज वाढते, साहजिकच व्याजाच्या पोटी देय रक्कम वाढते व त्याकारणाने नंतरच्या वर्षांत तूट वाढते. हे दुष्टचक्र मोडून काढण्यासाठी एक तर खर्चात कपात केली पाहिजे किंवा चालू महसुलात वाढ केली पाहिजे.

जर सार्वजनिक गुंतवणुकीच्या खर्चात कपात केली व त्याची भरपाई खाजगी गुंतवणुकीच्या खर्चात वाढ करून झाली नाही तर त्यामुळे उत्पादकतेत बाधा येईल. भारतामध्ये सार्वजनिक व खाजगी गुंतवणुकीत अगदी चिवट अशी संपूरकता (complementarity) आहे. विशेषतः शेतीमध्ये तशी स्थिती आहे. जोपर्यंत मूलभूत भांडवली वस्तू व आधारभूत संरचना सार्वजनिक क्षेत्राच्या अखत्यारीत आहेत तोपर्यंत ही संपूरकता अशीच घट्ट बनून राहिलेली असेल. अलीकडेच घोषित करण्यात आलेल्या नवीन औद्योगिक धोरणानुसार भांडवली वस्तूंच्या उत्पादनाकरिता खाजगी गुंतवणुकीत वाढ होणार आहे, पण याचा परिणाम अर्थव्यवस्थेमध्ये दिसून येण्यास अवधी लागणार आहे. तोपर्यंत भांडवली वस्तू व आधारभूत संरचना यांचे नियंत्रण सार्वजनिक क्षेत्रानुसारच होत राहणार आहे. म्हणूनच राजकोषीय तूट कमी करण्यासाठी चालू महसूल वाढवावा लागेल किंवा चालू खर्च कमी करावा लागेल.

1991-92 च्या अर्थसंकल्पात सर्व प्रकारच्या तुटीत कपात सुचविलेली आहे. राजकोषीय तूट 1990–91 मध्ये 'स्थूआंउ' च्या 8.4 टक्के होती, ती 1991–92 मध्ये 6.6 टक्क्यांपर्यंत कमी व्हावी अशी अपेक्षा आहे. तद्वतच महसुली तूट 3 टक्क्यांवरून 1.9 टक्क्यांपर्यंत कमी केली जाणार आहे. ही उपाययोजना स्वागतार्ह आहे. असे असले तरी, पूर्वीच्या वर्षांत अर्थसंकल्पातील तुटीपेक्षा प्रत्यक्षातील तूट कितीतरी जास्त दिसून येत असे. याबाबतीत चालू वर्षाचा अर्थसंकल्प यापूर्वीच्या अर्थसंकल्पांपेक्षा वेगळा आहे काय हे पहावे लागेल. या अर्थसंकल्पाने एकाच वेळी करमहसूल वाढविणे आणि चालू खर्च कमी करणे अशा दुहेरी उपाययोजनेतून तूट भरून काढण्याचे ठरविले आहे. खर्च कमी करण्यासाठी साखर आणि निर्यात यावरील अर्थसाहाय्याचा त्याग करणे, संरक्षणावरील खर्चाची वाढ मर्यादित करणे आणि इतर काही खर्च कमी करणे असे प्रस्ताव मांडलेले आहेत. योजनांवरील वास्तव खर्च जवळजवळ स्थिर ठेवण्यात येणार आहे. तरीही रुपयाचा मूल्यऱ्हास झाल्याने वाढणाऱ्या किमती, मूलभूत अबकारी करात वाढ आणि पेट्रोल व वाहतुकीच्या दरात

तक्ता 6

केंद्र, राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील सरकारांच्या खर्चाची रचना (composition)

(अब्ज रुपये)

| वर्ष | एकूण | विकास | विकासेतर | संरक्षण | दिलेले व्याज | अर्थसाहाय्य अन्न | अर्थसाहाय्य रासायनिक खते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1980–81 | 338 | 244 | 124 | 39 | 30 | – | 5 |
| 1985–86 | 840 | 534 | 306 | 85 | 80 | 17 | 19 |
| 1986–87 | 1008 | 638 | 370 | 112 | 106 | 20 | 19 |
| 1987–88 | 1122 | 688 | 434 | 132 | 130 | 20 | 22 |
| 1988–89 | 1300 | 794 | 505 | 149 | 165 | 22 | 32 |
| 1989–90 | 1596 | 998 | 598 | 161 | 206 | 25 | 45 |
| 1990–91 (अर्थसंकल्पी अंदाज) | 1762 | 1080 | 682 | 157 | 244 | 22 | 44 |

**संदर्भ** : (1) आर्थिक सर्वेक्षण, 1990-91.
(2) Indian Economic Statistics, Public Finance, 1990.

वाढ या कारणांमुळे अर्थसंकल्पात योजलेले लाभ कमी होण्याची शक्यता आहे.

## 4

## चालू महसुलासंबंधी धोरण

चालू महसूल वाढविण्यासाठी तीन प्रमुख साधने आहेत : (अ) प्रत्यक्ष कर, (आ) अप्रत्यक्ष कर आणि (इ) सार्वजनिक वस्तू व सेवा यांच्या किमती ठरविणे.

शासकीय चालू महसुलाचा अप्रत्यक्ष कर हा अत्यंत महत्त्वाचा स्रोत आहे. अप्रत्यक्ष कर व 'स्थूआंउ' यांचे गुणोत्तर सध्यास खूप आहे (15 टक्के). त्यामध्ये यापुढे वाढ करणे दोन कारणांकरिता इष्ट वाटत नाही. (1) बराच मोठा महसूल मिळवून देणारे कर भांडवली वस्तू व अर्धसिद्ध वस्तूंवर बसविलेले असतात परंतु त्यांचे परिणाम बरेच व्यापक असतात. (2) हे कर प्रतिगामी स्वरुपाचे असतात. या पार्श्वभूमीवर जास्त आयातघनता ( high import intensity ) असलेल्या चैनीच्या उपभोग्य वस्तूंवरील अबकारी कर वाढवून महसूल वाढविण्यास वाव आहे. परंतु एकंदरित अशा वस्तूंचे प्रमाण कमी असल्याने केवळ याच करांच्या साहाय्याने राजकोषीय तूट लक्षणियरीत्या कमी करणे कठीण आहे. याउलट, अर्थव्यवस्थेतील व्यय संरचना कमी करण्याकरिता अर्धसिद्ध व भांडवली वस्तू यावरील अबकारी कर कमी करणे जास्त हितावह असू शकेल. सीमा शुल्क हा अप्रत्यक्ष करांचा एक चांगला स्रोत आहे. तरीही अर्धसिद्ध व भांडवली वस्तूंवरील अतिरिक्त सीमा शुल्कामुळे उत्पादनव्यय व किंमत पातळी वाढते. विक्री कर हे राज्य शासनांचे महसुलाचे सर्वांत मोठे साधन असले तरी विक्रीकरात सरसकट वाढ केल्यास भाववाढ आणि करचुकवेगिरीला प्रोत्साहन मिळते. तसे पाहता या गोष्टी सध्याच फार वाढलेल्या आहेत.

## तक्ता 7

### निवडक समष्टीय निर्देशक

| वर्ष | स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) | पैशाचा पुरवठा टक्के | घाऊक किमतीतील बदल | 'स्थूआंउ' शी टक्केवारी राजकोषीय तूट | चालू खात्याची तूट | रुपया–अमेरिकी डॉलर दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1980–81 | 7.3 | 18.1 | 16.7 | 6.2 | 1.2 | 7.9 |
| 1981–82 | 5.8 | 12.5 | 2.4 | 5.4 | 1.5 | 9.0 |
| 1982–83 | 2.6 | 16.1 | 7.2 | 6.0 | 1.3 | 9.7 |
| 1983–84 | 7.9 | 18.1 | 7.2 | 6.3 | 1.1 | 10.0 |
| 1984–85 | 3.8 | 18.9 | 6.0 | 7.5 | 1.2 | 11.9 |
| 1985–86 | 4.1 | 15.9 | 4.8 | 8.3 | 2.3 | 12.2 |
| 1986–87 | 3.6 | 18.6 | 5.1 | 9.0 | 2.0 | 12.8 |
| 1987–88 | 4.2 | 15.9 | 10.7 | 8.1 | 1.9 | 13.0 |
| 1988–89 | 10.6 | 17.8 | 5.7 | 7.8 | 2.7 | 14.5 |
| 1989–90 | 5.2 | 19.4 | 9.1 | 8.0 | 2.3 | 16.6 |
| 1990–91 | 5.0 | 15.1 | 12.1 | 8.4 | n.a. | 17.9 |

**संदर्भ** : आर्थिक सर्वेक्षण, 1990–91.

भूतकाळात अप्रत्यक्ष कर धोरणावर वाटपाच्या कार्यदक्षतेच्या ( allocative efficiency ) महत्तमीयकरणाऐवजी करमहसुलाच्या महत्तमीकरणाचा प्रभाव होता. जर आपल्याला उत्पादनव्यय कमी करून निर्यात ( विशेषतः कारखान्यातील वस्तूंची निर्यात ) वाढवावयाची असेल आणि दुसऱ्या बाजूने आयात कमी करावयाची असेल तर अप्रत्यक्ष करांच्या धोरणात वाटपाच्या कार्यदक्षतेच्या महत्तमीकरणाच्या उद्दिष्टाला अधिक महत्त्व द्यायला हवे.

प्रत्यक्ष कराचे 'स्थूआंउ' शी असलेले गुणोत्तर जवळजवळ एक दशकापेक्षाही जास्त काळ स्थिर राहिलेले आहे; खरे तर सत्तरीच्या मध्यापासून ते घटले आहे. या प्रवृत्तीची तीन कारणे सांगता येतील : (1) पायाभूत दरात कपात, (2) भत्ते व सूट यांच्यात वाढ आणि (3) व्यापक प्रमाणावरील कर चुकवेपणा. कराच्या दरात कपात केल्यानंतर महसुलामध्ये वाढ झालेली नसली तरी, दर वाढविणे दोन कारणांकरिता इष्ट नाही. (अ) दर वाढविल्यास उत्पादन व उत्पन्न वाढविण्यास प्रतिकूल परिस्थिती निर्माण होईल. (आ) जे प्रामाणिक करदाते आहेत त्यांच्यावरील करभार वाढेल व इतरांना कर चुकविण्यास प्रोत्साहनच मिळेल. करविषयक धोरणांमुळे करांचा पाया रुंद व्हावा, करांचे प्रमाण वाढू नये, राजकोषीय प्रोत्साहने व सवलती कमीत कमी असाव्यात आणि विमा व भविष्यनिर्वाह निधी यासारख्या सामाजिक सुरक्षेपुरत्या त्या सीमित रहाव्यात. प्रत्यक्ष करांच्या इतर सवलती करांची संरचना बिघडवतात, विधिग्राह्य सूट मिळविण्याच्या पळवाटा निर्माण करतात आणि श्रीमंत व्यक्तींवरील करभार कमी झाल्यामुळे कराधान परागामी बनते. (श्रीमंत व्यक्ती बचत जास्त करू शकतात हे लक्षात ठेवले पाहिजे.) प्रत्यक्ष करांवर सूट दिली की सरकारची कर्जे वाढतात, व्याजाचा भार वाढतो आणि परिणामी राजकोषीय तूट वाढत जाते. सध्याच्या कर–बचत धोरणाचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. तूर्त शेती उत्पन्नावरील कराचा विचार करणे शक्य नाही,

कारण करांचे मूल्यांकन व कर गोळा करणे ही एक समस्याच आहे. असे असले तरी, शेतसारा ( विशेषतः सिंचनाखालील जमिनीचा शेतसारा) वाढविणे अति-गरजेचे आहे. गेली तीन दशके शेतसाऱ्याचे दर गोठविले गेले आहेत, मात्र याच काळात जमिनीची उत्पादनक्षमता खूपच वाढलेली आहे.

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर चुकविण्याची प्रवृत्ती विस्तृत प्रमाणात दिसते हे सर्वांना माहीतच आहे. जर करविषयक नियम गुंतागुंतीचे व संदिग्ध असतील तर कर चुकविणे सोपे जाते. करांचे नियम सोपे व तर्कसंगत असावेत, म्हणजे त्यांचा अन्वयार्थ सरळपणे लावता येतो ही एक अनेक वर्षांपासूनची अपेक्षित गरज आहे. करांचे नियम सुटसुटीत केल्यास व यंत्रणा पक्की केल्यास कर-महसूल वाढविण्यास बराच वाव आहे. अगदी साध्या अंकगणितावरून लक्षात येईल की, कमी कर-दरांच्या संरचनेमुळे आणि अधिक वसुलीमुळे केवळ सध्याचे राजकोषीय असंतुलन नाहीसे होईल एवढेच नव्हे तर अर्थव्यवस्थेमधील उत्पादनव्यय संरचनादेखील कमी होईल.

सार्वजनिक वस्तू व सेवा यांच्या किमती ठरविणे ही एक काटेरी समस्या आहे. या किमती वाढविल्या तर एकीकडे सार्वजनिक उपक्रमांचे आधिक्य वाढते व राजकोषीय तूट कमी होते, मात्र त्याच वेळी दुसऱ्या बाजूने सर्वसाधारण किमतीची पातळी वाढल्याने शासकीय अर्थसंकल्पावर अनिष्ट परिणाम होतात. सद्यःस्थितील केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांतून 14 टक्के लाभ मिळतो तो प्राधान्येकरून तेल कंपन्यांमुळे होय. राज्यांचे सार्वजनिक उपक्रम मात्र खूप तोटयात चालताहेत (तक्ता 5 पहा). सार्वजनिक उपक्रम तोटयात चालतात किंवा त्यातील गुंतवणुकीवर अल्पसा लाभ मिळतो याला काही अंशी त्यांच्या किमती खर्चापेक्षा कमी ठेवण्याचे धोरण आणि काही अंशी कमी उत्पादकता व उपलब्ध उत्पादनक्षमतेचा अपूर्ण वापर या गोष्टी कारणीभूत आहेत. रस्ते वाहतूक, शहरी रेल्वे, पाणी, ग्रामीण वीजपुरवठा आणि जलसिंचन यांच्या किमती सर्वसाधारणपणे कमी ठेवल्या जातात; बहुतेक वेळा त्या बदलत्या व्ययापेक्षाही कमी असतात. त्यांच्या किमती वाढविण्याचे जोरदार समर्थन करता येईल. मात्र सार्वजनिक उपक्रमांच्या किमती प्रत्यक्ष व्ययानुसार न वाढविता आदर्शानुसारी व्ययानुसार (normative cost) वाढवाव्यात, कारण अतिरिक्त रोजगार आणि कमी उत्पादकता यामुळे प्रत्यक्षातील व्यय जास्त असू शकतो. यासंदर्भात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे सारख्याच किमती आकारून खाजगी उपक्रमांना नफा मिळतो तर सार्वजनिक उपक्रमांना तो मिळत नाही. पोलाद, रस्ते वाहतूक, कागद, सिमेंट आणि रासायनिक खते ही या प्रकारच्या भिन्न वर्तनाची उत्तम उदाहरणे आहेत. सर्वसाधारणपणे, सार्वजनिक उपक्रमांचे आधिक्य वाढवावयाचे झाल्यास किमती वाढविण्यापेक्षा उत्पादकता वाढविणे व उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर करणे यावर भर द्यायला हवा. राज्य सरकारांच्या उपक्रमांमध्ये व्यय जास्त असण्याचे मुख्य कारण अतिरिक्त रोजगार हेच आहे. राज्य वीज मंडळे व रस्ते वाहतूक महामंडळे यामध्ये बराच अतिरिक्त नोकरवर्ग आहे. सार्वजनिक क्षेत्रात असा रोजगार देण्यापेक्षा रोजगार-भत्ता देण्याचा विचार करणे अधिक बरे.

1989–90 साली केंद्र व राज्यांच्या सार्वजनिक उपक्रमांचा निव्वळ नफा 2,000 कोटी रुपयांपेक्षा कमी होता; आणि तो या उपक्रमांतील भांडवली गुंतवणुकीच्या 1 टक्क्यापेक्षाही कमी होता. हा लाभदर अल्पसा वाढवून 3 टक्क्यांइतका केला तर एकंदर महसूल 10,000 कोटी रुपयांनी वाढेल. ही रक्कम केंद्र आणि राज्य शासनांच्या एकत्रित महसुली तुटीच्या दोन-तृतीयांश इतकी भरते.

खाजगीकरण (privatisation) हा राजकोषीय तूट भरून काढण्याचा आणखी एक मार्ग आहे. सध्याच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत उद्योग व आधारभूत संरचना (infrastructure) या क्षेत्रांतील अतिमहत्त्वाच्या सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करणे समर्थनीय ठरणार नाही. परंतु जे उपक्रम श्रीमंत व मध्यम वर्गाच्या चैनीच्या गरजा भागवितात (उदाहरणार्थ, पंचतारांकित हॉटेले, पर्यटकांसाठी संकुले, विमान वाहतूक इत्यादी) अशा तोटयात चाललेल्या उपक्रमांचे खाजगीकरण करण्याविषयी विचार करणे योग्य होईल. कमी महत्त्वाच्या ग्राहकोपयोगी वस्तू उत्पादन करणारे आजारी कारखानेही बंद करण्यास हरकत नाही. असे उद्योग स्थावर संपदा (real estate) असे समजून विकून टाकावे आणि येणाऱ्या पैशातून कामगारांना

योग्य मोबदला द्यावा. शहरी मार्ग परिवहन आणि ज्या उपक्रमांत खाजगी क्षेत्र जास्त कार्यक्षम ठरू शकते तिथे निर्गुंतवणूक (disinvestment) करण्यास वाव आहे.

## 5

## चालू खर्चासंबंधीची धोरणे

चालू खर्च स्थूलमानाने दोन प्रकारात विभागता येईल : उद्दिष्टांशी बांधलेला (committed) आणि विवेकाधीन असलेला (discretionary). एखाद्या वर्षात व्याजापोटी दिलेली रक्कम, वेतन आणि निवृत्ती वेतन ही पहिल्या प्रकारात मोडतात.

सरकारी खर्चाचा वेगाने वाढणारा भाग म्हणजे व्याजापोटी दिलेली रक्कम. केंद्र, राज्ये आणि केंद्र-शासित प्रदेश यांच्या खर्चातील या रकमेचे प्रमाण 1980–81 सालच्या 8 टक्क्यांवरून 1990–91 मध्ये 14 टक्क्यांपर्यंत वाढले (तक्ता 6). केंद्रीय अर्थसंकल्पात हे प्रमाण 1980–81 मध्ये चालू खर्चाच्या 20 टक्के होते ते 1990–91 मध्ये 30 टक्के झाले (तक्ता 4).

व्याजापोटी दिलेली रक्कम आणि महसुली तूट यांच्यात एक गतिमान संबंध आहे. इतर गोष्टी स्थिर राहता, जेव्हा व्याजापोटी दिलेली रक्कम वाढते तेव्हा महसुली तूट वाढते. जेव्हा महसुली तूट वाढते तेव्हा कर्जे वाढतात आणि त्यामुळे भविष्यकाळात महसुली तूट आणखी वाढते. ही कार्यकारणभावाची साखळी तोडायला हवी. याकरिता एक तर व्याजेतर तूट (प्राथमिक तूट) कमी करावी लागेल. यातील पहिला मार्ग अनिवार्य आहे. दुसरा मार्ग विचार करण्यासारखा आहे.

ऐंशीच्या दशकात अर्थव्यवस्थेतील सर्वच व्याजाचे दर वाढले; परिणामी, शासकीय कर्जाचा सरासरी व्यय 1980–81 मध्ये प्रतिवर्षी 6 टक्के होता तो 1989–90 मध्ये 10 टक्क्यांपर्यंत पोचला. याच काळात सार्वजनिक गुंतवणुकीवरील लाभाचा दर जवळपास स्थिर राहिला. त्याकारणाने भांडवल कर्जाऊ घेण्याचा व्यय आणि सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीवर मिळणारा लाभ यातील दरी आणखी रुंदावली. 1990 आणि 1991 या दोन वर्षांत तर व्याज दराची संरचना आणखी उंचावली. याचा अर्थ असा होतो की, भावी काळात ही तूट वाढतच जाणार आहे. आता गरज आहे ती व्याजाचे दर वाढविण्याऐवजी कमी करण्याची.

यावर कुणी प्रतिवाद करू शकेल की, व्याजाचे दर कमी झाले तर बचतीस खीळ बसेल, पैशाची मागणी वाढेल आणि श्रमाऐवजी भांडवलाचा वापर अधिक करण्याची प्रवृत्ती वाढेल. हे तीनही मुद्दे थोडेसे अतिरंजितपणे मांडलेले आहेत. कारण, पहिली गोष्ट म्हणजे, भारतात घरगुती बचत आणि पैशाची मागणी यांची व्याज-लवचिकता कमी आहे. दुसरे ऐंशीच्या दशकात व्याजाचे दर वाढूनदेखील श्रमाऐवजी भांडवलाचा वापर जास्त झालेला दिसत नाही. या काळात कारखानदारीतील रोजगारवाढीत लक्षणीय घट झाली असल्याचे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ( NSS ) अलीकडील सांख्यिकी माहितीवरून स्पष्ट होते.

इतर सार्वजनिक खर्चाची कपात करण्यापेक्षा व्याजाचे दर कमी करणे राजकीयदृष्ट्यादेखील कमी त्रासाचे आहे. शिवाय, सर्वसाधारण व्याजदर कमी केल्यास आंतर्देशीय खाजगी गुंतवणुकीलादेखील प्रोत्साहन मिळेल आणि विशेषतः ज्या संस्था कर्जाऊ भांडवलावर जास्त अवलंबून असतात त्यांचा उत्पादनव्ययदेखील कमी होईल.

सरकारी खर्चामध्ये अर्थसहाय्य ( subsidy ) ही एक महत्त्वाची बाब आहे. 1990–91 मध्ये केंद्राच्या नियोजनबाह्य महसुली खर्चात अर्थसाहाय्याचा वाटा 17 टक्के होता. प्रामुख्याने अन्न, रासायनिक खते आणि निर्यातीं यासाठी रोख स्वरूपाचे अर्थसाहाय्य दिले जाते. ( त्यापैकी निर्यातीसाठीचे अर्थसाहाय्य आता रद्द करण्यात आले आहे. ) सर्वात जास्त अर्थसाहाय्य रासायनिक खतांसाठी दिले जाते. त्यात झपाट्याने वाढ झाली आहे. 1980–81 मध्ये ते जेमतेम 505 कोटी रुपये होते; त्याने 1990–91 मध्ये 4,388 कोटी रुपयांची उंची गाठली. हे अर्थसाहाय्य पूर्णपणे बंद करावे; अर्थात ते थेट 3 ते 4 वर्षांत क्रमशः मागे घेणे सोईचे ठरेल. त्यामुळे खत उद्योग आणि शेतकरी यांना अर्थसाहाय्य मागे घेतलेले आहे याची सवय होईल.

( म्हणजेच, खतांच्या वाढत्या किमतींची त्यांना हळू-हळू सवय होईल. ) मात्र असे करताना प्रापण किमती ( procurement prices ) वाढवून खतावर कमी केलेले अर्थसाहाय्य धान्यावरील अर्थसाहाय्याकडे वळविले जाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. 1991–92 च्या अर्थसंकल्पात रासायनिक खतांच्या अर्थसाहाय्यात कपात सुचविण्यात आलेली आहे. पण रासायनिक खतांच्या किमती वाढल्याकारणाने ( 40 टक्के ) अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे प्रापण किमती वाढल्या तर, एक तर अन्नावरील अर्थ-साहाय्य वाढेल किंवा शिधावाटपातील अन्नाच्या किमती वाढतील; या दोन्हींचाही अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल.

अन्न अर्थसाहाय्य दोन कारणांकरिता आवश्यक आहे : (1) अन्न व सर्वसाधारण किमतींच्या वाढीला प्रतिबंध करणे; (2) गरिबांच्या हिताचे रक्षण करणे. काही का असेना, अन्न वाटपाचा कार्य-व्यय ( operational cost ) कमी करण्याकरिता सार्वजनिक शिधावाटप व्यवस्था जास्त कार्यदक्ष व्हावयास पाहिजे. ( कारण अन्न वाटपाचा व्यय हा अन्नसाहाय्यामधील एक महत्त्वाचा भाग आहे. ) त्याचप्रमाणे, ग्रामीण भागातील खन्याखुऱ्या गरिबांना सामावून घेण्याइतपत ही व्यवस्था अधिक व्यापक बनली पाहिजे.

रोख अर्थसाहाय्याव्यतिरिक्त फार मोठे असे छुपे अर्थसाहाय्य प्रत्यक्षात आहे. ते सार्वजनिक वस्तू व सेवा यांच्या किमती कमी ठेवून पुरविले जाते. काही किमती कित्येक दशके बदललेल्या नाहीत. तसेच वस्तू व सेवा यांच्या उत्पादनव्ययाचा आणि किमतींचा संबंधच राहिलेला नाही. उच्च शिक्षण, सरकारी दवाखान्यातील खाजगी खोल्या, जलसिंचनाचे दर, शासकीय कर्मचाऱ्यांना घरे व मोटारी यांच्याकरिता मिळणारे कर्ज इत्यादींचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करता येईल. सर्वच सार्वजनिक वस्तू व सेवांच्या किंमत धोरणाचा पुनर्विचार करून सामाजिक अर्थसाहाय्य त्यापैकी कोणासाठी असावे आणि कोणासाठी नसावे याचा निर्णय करावा.

सामान्यपणे संरक्षण खर्च अर्थशास्त्रीय सिद्धान्तांच्या पलिकडे असतो असे समजण्यात येते. राष्ट्राचे अंतर्गत व बाह्य संरक्षण आणि संरक्षणाचा अर्थसंकल्प यांचा प्रत्यक्ष संबंध नसतो. जर संरक्षणाच्या अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्था बिघडली तर त्यामुळेच देशाची सुरक्षितता धोक्यात येईल. जरी भारतात संरक्षण खर्च आणि ' स्थूआंउ ' यांचे गुणोत्तर फार जास्त नसले तरी, राजकोषीय तूट आटोक्यात येईपर्यंत संरक्षण खर्च गोठविला जावा.

रोजगार वाढल्याने आणि सरासरी पैशातील वेतन वाढल्याने सरकारचा वेतनखर्च सतत वाढलेला आहे. केंद्र शासनात रोजगार माफक प्रमाणात वाढलेला आहे ( 1980–89 या काळात 6.6 टक्के ), याउलट राज्यसरकारांत रोजगार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे ( 1980–89 या काळात 26 टक्के ). निम-सरकारी संस्थांमध्ये तो 38 टक्क्यांनी वाढला आहे. जर रोजगार एवढ्या वेगाने वाढविणे आवश्यक असेल तर वेतनदर कमी प्रमाणात वाढविला गेला पाहिजे. कदाचित सार्वजनिक सेवांमध्ये मुळातच अतिरिक्त नोकरवर्ग भरलेला असल्यामुळे रोजगारवाढीचे प्रमाण कमी करण्याचे धोरण योग्य होईल. हे धोरण अनुसरल्यानंतर बेकारांना सामाजिक सुरक्षेचे लाभ द्यावेत.

अपव्यय टाळून आणि लाचलुचपत कमी करून सार्वजनिक वस्तू व सेवा कमी किमतीला पुरविण्यास वाव आहे हे सर्वमान्य झाले आहे. दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम आणि भांडवलगुंतवणुकीच्या योजना यांमध्ये लाचलुचपतीला ऊत आलेला आहे. या लाचलुचपतीपोटी सार्वजनिक गुंतवणुकीचे वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर ( ICOR ) हेतुतः जास्त सांगितले जाते. सार्वजनिक खर्चातील लाचलुचपत आणि अकार्यदक्षता कमी करण्यासाठी दृढतापूर्वक परिश्रम घेतले पाहिजेत. यामुळे राजकोषीय तूट तर भरून येईलच, त्याचबरोबर अर्थव्यवस्थेच्या अभिवृध्दीच्या दरातही भरीव वाढ होईल.

## 6

## राजकोषीय ताळेबंद, वस्तूव्यापार ताळेबंद आणि चलन अतिवृध्दी

समष्टीय स्तरावर असलेले असमतोल परस्प-

रांशी निगडित असतात. राजकोषीय असमतोल चलन अतिवृध्दीस (inflation) कारणीभूत ठरतो; त्याचा शासकीय महसूल व खर्चावर विभिन्न परिणाम होऊन वित्तीय तूट निर्माण होते. चलन अतिवृध्दीमुळे आयात वाढते तर निर्यातीला खीळ बसते. प्रतिकूल वस्तूव्यापार ताळेबंदामुळे (trade balance) विनियम दर घसरतो आणि तो आपल्या परीने चलन अतिवृध्दीचे कारण ठरतो. राजकोषीय असमतोल आणि प्रतिकूल वस्तू-व्यापार ताळेबंददेखील परस्परांशी संबंधित आहेत. राज-कोषीय धोरण, वस्तूव्यापार धोरण, चलन अतिवृध्दी आणि किंमत निश्चितीचे धोरण यात सुसंगतता असली पाहिजे.

1990–91 मध्ये घाऊक किंमत निर्देशांक 12 टक्क्यांहूनही अधिक वाढला तर प्राथमिक वस्तूंच्या किमती 17 टक्क्यांनी वाढल्या. भूतकाळात तीव्र स्वरूपाच्या शेती उत्पादनाच्या कमतरतेमुळे द्विअंकी चलन अतिवृद्धी निर्माण झाली होती. परंतु सध्याची सुसाट अतिवृद्धी ( hyper-inflation ) लागोपाठ तीन चांगल्या हंगामानंतर निर्माण झाली आहे. पैशाच्या पुरवठ्याच्या वाढीचा दरदेखील 1990–91 मध्ये तसा जास्त नाही; वास्तविक पाहता, गेल्या काही वर्षांपेक्षा तो कमीच आहे ( तक्ता 7 पहा ). चालू चलन अतिवृद्धी ही प्रामुख्याने तीन कारणांचा परिपाक आहे : (अ) प्रापण ( procurement ) आधारभूत किमती वेगाने वाढल्या ( गहू 17.5 टक्के, तांदूळ 11 टक्के, भुईमूग 16 टक्के, मोहरी 25 टक्के ); (आ) आयात किमती भरमसाठ वाढल्या; (इ) विनिमय दर घसरला. जर प्रापण किमती ( procurement prices ), प्रशासित किमती ( administered prices ) आणि आयात किमती सतत वेगाने वाढत राहिल्या आणि विनिमय दर कमी झाला तर वित्तीय तूट न वाढतासुद्धा चलन अतिवृद्धीचा दर त्वरण गतीने वाढू लागले. खरे तर, चलन अतिवृद्धीचा दर वाढल्यामुळे शासकीय महसूल व खर्च यावर विभिन्न परिणाम होऊन वित्तीय तूट वाढते. या बाबतीत वित्तीय तूट हे चलन अतिवृद्धीचे कारण न ठरता परिणाम असतो.

काही वेळा असे मानले जाते की, जेव्हा राज-कोषीय असमतोल नाहीसा केला जातो तेव्हा आपो-आपच चालू खात्यातील तूट भरून निघते. परंतु या दोन घटकांत इतका सरळसरळ संबंध असत नाही. अमेरिकेत चालू खात्यातील तूट ही राजकोषीय तुटीचे प्रतिबिंब असते. याउलट ब्रिटनमध्ये ऐंशीच्या दशकात राजकोषीय तूट भरून निघाली तरी वस्तूव्यापार ताळेबंद बिघडत गेला. इतर विकसित आणि विकसनशील देशांतसुद्धा राजकोषीय तूट आणि चालू खात्यातील तूट यामध्ये असा प्रत्यक्ष संबंध दिसत नाही. तक्ता 7 वरूनही भारतात असा काही संबंध असल्याचे आढळत नाही.

ऐंशीच्या दशकात रुपयाचा विनिमय दर सतत घसरत गेला आहे ( तक्ता 7 पहा ). मात्र आतापर्यंत चालू खात्यातील तुटीच्या दरावर त्याचा काहीही परि-णाम झालेला दिसत नाही. जुलै 1991 मध्ये आणखी 20 टक्क्यांनी रुपयाचे मूल्य कमी करण्यात आले. याचा किंमत पातळीवर तात्काळ परिणाम होण्याची शक्यता आहे, आणि त्यातून वस्तू व्यापार ताळेबंद आणि राजकोषीय ताळेबंद यावर प्रतिकूल परिणाम संभवतात. उत्पादकता आणि कार्यदक्षता वाढविण्या-करिता अलिकडे जे काही धोरणात्मक बदल केलेले आहेत ते किमती व विनिमय दराची धोरणे आणि इतर समष्टीय धोरणे यांच्यातील विसंगतीमळे काही प्रमाणात अथवा पूर्णपणे निष्प्रभ होण्याची दाट शक्यता आहे. जर सर्वसाधारण किंमत पातळी स्थिर करा-वयाची असेल तर क्षेत्रीय किमतीही स्थिरावल्या पाहिजेत.

## 7

## समारोप

चालू आर्थिक अरिष्ट हे पुरवठ्याच्या धक्क्यामुळे उद्‌भवले नसून ऐंशीच्या दशकातील समष्टीय आर्थिक धोरणातील विसंगतीमुळे निर्माण झाले आहे. आखाती युद्धामुळे हा प्रश्न काहीसा जटिल बनला असेलही, परंतु हे काही या प्रश्नाचे मूळ कारण म्हणता येणार नाही. तीन प्रकारची समष्टीय असंतुलने आहेत : (1) अतिरिक्त राजकोषीय तूट, विशेषतः महसुली तूट; (2) चालू खात्यावरील तूट आणि (3) चलन अतिवृद्धीचा उच्च दर. या परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी जर तातडतोब पावले उचलली नाहीत तर अर्थव्यवस्था आंतर्देशीय व विदेशी कर्जाच्या

सापळ्यात आणि सुसाट अतिवृद्धीच्या विळख्यात सापडेल. धोरणातील दुरुस्ती दोन स्तरांवर करावी लागेल : (अ) सध्याच्या अरिष्टाची तीव्रता कमी करून परिस्थिती निवळणे; (आ) अभिवृद्धीचा व्यूह आणि गुंतवणूक वित्तव्यवस्था यामध्ये संरचनात्मक समायोजन घडवून आणणे.

राजकोषीय तूट कमी करण्याकरिता एका बाजूने व्याजापोटी द्यावयाची रक्कम आणि वेतन यांची वाढ मंदावणे, खते व निर्यातीवरील अर्थसाहाय्य हळूहळू कमी करणे आणि खर्चातील अपव्यय कमी करणे असे उपाय योजावयास पाहिजेत, तर दुसऱ्या बाजूने प्रत्यक्ष करांपासूनचा महसूल आणि सार्वजनिक उपक्रमांचे आधिक्य वाढविण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. संरक्षण खर्च तात्पुरत्या काळाकरिता गोठवावा आणि महसुली तूट नाहीशी झाली म्हणजे वाढवावा. सार्वजनिक उपक्रमांचे आधिक्य वाढविण्याकरिता उत्पादकता, कार्यदक्षता आणि उत्पादनक्षमतेचा वापर हे वाढवावेत; सार्वजनिक वस्तू व सेवांच्या किमती त्यासाठी वाढवू नयेत. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष करांपासून महसूल वाढविण्याकरिता करांचा पाया रुंद करावा. कर चुकवेगिरी व सवलती नियंत्रित कराव्यात; करांचे दर वाढवू नयेत. उद्योग, आधारभूत संरचना आणि शेती यामधील सार्वजनिक गुंतवणूक कमी करू नये. चलन अतिवृद्धीचा दर नियंत्रित करण्यासाठी फक्त राजकोषीय तूट कमी करून भागणार नाही; त्याचबरोबर प्रशासकीय व प्रापण किमतीच्या वाढीवरही मर्यादा घालाव्या लागतील आणि पुरवठ्याचे व्यवस्थापन सुधारावे लागेल.

□ □

## *महत्त्वाचा खुलासा आणि दुरुस्ती*

'Billion' ही संज्ञा इंग्लंडमध्ये एक दशलक्ष दशलक्ष (a million million), म्हणजेच एक महापद्म (= 1000 अब्ज), एवढी मानली जाते. याउलट अमेरिकेत ही संख्या एक हजार दशलक्ष (a thousand million), म्हणजेच एक अब्ज (= 100 कोटी) एवढी मानली जाते. **सद्यःस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यवहारात 'BILLION' ही संज्ञा अमेरिकेच्या अर्थाने वापरली जाते.** (पहा : J. L. Hanson : A DICTIONARY OF ECONOMICS AND COMMERCE, Fifth Edition, English Language Book Society, London, 1977, पृ. 42).

'अर्थसंवाद' च्या याच अंकातील काही लेखांत तसेच यापूर्वीच्या दोन अंकांतील लेखांत 'Billion' साठी 'महापद्म' ही संज्ञा वापरली गेली आहे. कारण, इंग्रजी–मराठी कोशांतून फक्त तीच संज्ञा दिलेली आहे, दुसरी दिलेली नाही. तथापि, आताच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारातील उपयोगाप्रमाणे ती चूक आहे. म्हणून **वाचकांनी सर्व ठिकाणी 'महापद्म' ऐवजी 'अब्ज' असे वाचावे** ही नम्र विनंती.

**प्रमुख संपादक**

# आर्थिक वार्ता *

संकलन :

**सु. गो. भानुशाली ***

## 1

### रवीन्द्र दोशी याना प्रथम क्रमांकाचे ' विकास वार्ता पारितोषिक '

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख तसेच 'अर्थसंवाद' चे प्रमुख संपादक रवीन्द्र दोशी यांची 'विकास वार्ता पारितोषिक स्पर्धा 1989' मधील पुणे विभागीय स्तरावरील मराठी भाषेच्या सर्वसाधारण गटातील प्रथम पारितोषिकासाठी निवड झाल्याचे महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून अलीकडेच जाहीर करण्यात आले आहे. या पारितोषि-कात रोख तीन हजार रुपये, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र यांचा समावेश आहे.

या पारितोषिकासाठी रवीन्द्र दोशी यानी "कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखा-नदारी" हा आपला संशोधनपर लेख सादर केला होता. हा लेख 'अर्थसंवाद' च्या जुलै–सप्टेंबर, 1989 या अंकात प्रथमतः प्रसिद्ध झाला. या लेखाच्या आधारावर 'महाराष्ट्र टाइम्स' ने 28 ऑगस्ट, 1989 च्या अंकात 'अकरा साखर कारखाने' या मथळ्याखाली एक दीर्घ अग्रलेख लिहिला होता.

विकासविषयक वार्ता, वार्तापत्र, लघुलेख यांना अधिक वाव मिळण्याच्या हेतूने व अशा प्रकारच्या लिखाणासाठी पत्रकार लेखकांना प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेतून महाराष्ट्र शासनाने आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षापासून, म्हणजे 1985 पासून, 'विकास वार्ता पारि-तोषिक योजना' सुरू केली आहे. विभागीय स्पर्धेमध्ये मराठी भाषेतील वृत्त, वार्तापत्र, लेख/निबंध, स्फुट आणि अग्रलेख यांचा समावेश होता.

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर आणि सहायक संपादक 'अर्थसंवाद'.

## 2

### कृषीतज्ज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांना 'टायटलर' आणि 'होंडा' पुरस्कार

मोनकोंबु संबसिवन स्वामिनाथन (जन्म 7 ऑगस्ट, 1925) यांना 1991 चा 'टायटलर' पुरस्कार अमेरिकेचे भूतपूर्व महाशल्य चिकित्सक सी. ई. कूप यांच्याबरोबर विभागून देण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे स्वामिनाथन यांना 1991 चा 'होंडा' पुरस्कारही मिळाला आहे. 1 कोटी येनचा (70 हजार डॉलर) हा पुरस्कार जपानच्या होंडा मोटर्सचे संस्थापक सोईची होंडा यांनी 1977 पासून देण्यास सुरुवात केली.

केंब्रिज विद्यापीठाची पी. एच. डी. पदवी मिळविल्यानंतर स्वामिनाथन 1952–53 मध्ये विस्कॉन्सिन विद्यापीठात उत्पत्तीशास्त्र विभागात सहसंशोधक म्हणून दाखल झाले. 1954 ते 1961 या कालावधीत कटक येथील मध्यवर्ती भात संशोधन केंद्रात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय शेती संशोधन संस्थेत कार्य करीत असताना मेक्सिकोतील बुटक्या गव्हाच्या जातीचे भारतीयीकरण करून ही जास्त पीक देणारी जात लोकप्रिय करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यादृष्टीने 'भारतातील हरित क्रांतीचे जनक' म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. या बुटक्या गव्हाच्या जातीचे संशोधक नॉर्मन बोर्लाग यांना त्या शोधाबद्दल 1970 चे नोबेल शांतता पारितोषिक मिळाले. असे असले तरी, या बुटक्या गव्हाच्या जातीचे मोल जाणून ती भारतात लोकप्रिय करण्याचे मौलिक कार्य स्वामिनाथन यांनी केल्यामुळेच आपल्याला नोबेल पुरस्कार प्राप्त झाला असे बोर्लाग यांनी म्हटले आहे.

स्वामिनाथन यांच्या महनीय कार्याबद्दल त्यांना 'शांतीस्वरूप भटनागर पारितोषिक' (1961), 'बिरबल सहानी' तसेच 'मॉडेल स्मृती पारितोषिक' (1965) समाजविकास कार्यासाठी 'रॅमन मॅगसेसे पारितोषिक' (1971), 'भारतीय राष्ट्रीय विज्ञान संस्थान रौप्य-महोत्सव पारितोषिक', 'तिसरे जग पारितोषिक' (1982), एशियाटिक संस्थेचे 'बर्कले पारितोषिक' असे विविध बहुमान मिळाले आहेत. त्यांना 'पद्मभूषण', 'कृषी रत्न' व 'आल्बर्ट आइन्स्टाइन जागतिक विज्ञान पारितोषिक' देऊन गौरविण्यात आले आहे. सर्वसाधारण धान्य निधीचा 1987 चा 'जागतिक धान्य पुरस्कार' ही त्यांना देण्यात आला होता.

1979–80 या काळात ते भारत सरकारच्या कृषी व ग्रामीण विकास विभागाचे सचिव व 1980–81 मध्ये नियोजन मंडळाचे सभासद होते. फिलिपिन्समधील जागतिक भात संशोधन संस्थेचे डायरेक्टर जनरल म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

इंग्लंडच्या रॉयल सोसायटीचे, अमेरिकेच्या नॅशनल अ‍ॅकॅडेमी ऑफ सायन्सेसचे, रशियाच्या लेनिन अ‍ॅकॅडेमी ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल सायन्सचे सन्माननीय सभासदत्व त्यांना बहाल करण्यात आले आहे.

## 3

### भारतीय नियोजन मंडळाचे सभासद

1 पी. व्ही. नरसिंह राव (पंतप्रधान) – पदसिद्ध अध्यक्ष
2 प्रणब मुखर्जी – उपाध्यक्ष

पूर्णवेळ सभासद:
3 चित्रा नाईक
4 डी. स्वामिनाथन
5 व्ही. कृष्णमूर्ती
6 सी. रंगराजन
7 एस. झेड. कासिम
8 जे. एस. बजाज
9 जयंत पाटील

निमंत्रित सभासद:
10 शरद पवार (संरक्षण मंत्री)
11 मनमोहन सिंग (वित्त मंत्री)
12 बलराम जाखड (कृषी मंत्री)

## 4

### नवे औद्योगिक धोरण : उद्योगांचे दोन गट

(अ) सार्वजनिक क्षेत्रासाठी संरक्षित आठ उद्योग

1 शस्त्रे, दारूगोळा व तदनुषंगिक इतर संरक्षण साहित्य, युद्धविमाने व युद्धनौका

2 परमाणू ऊर्जा

3 कोळसा व लिग्नाइट

4 खनिज तेले

5 लोह, मँगनीज व क्रोम धातू, जिप्सम, गंधक, सोने आणि हिरे यांचे खाणकाम

6 तांबे, शिसे, जस्त, कथील, मोलिब्डिनम आणि वोलफ्राम यांचे खाणकाम

7 1953 च्या अणुऊर्जा ( उत्पादन व वापर नियंत्रण ) आदेशातील अनुसूचित निर्देशित केलेली खनिजे

8 रेल्वे वाहतूक

(आ) परवाना आवश्यक असलेले 18 उद्योग

1 कोळसा व लिग्नाइट

2 खनिज तेल व्यतिरिक्त पेट्रोलियम आणि त्याची अर्कोत्पादने

3 मद्यार्कयुक्त पेये गाळणे व अर्क काढणे

4 साखर

5 जनावरांची चरबी व तेले

6 तंबाखूपासून तयार करण्यात येणाऱ्या सिगरेटी व चिरूट आणि प्रक्रियायुक्त तंबाखूची इतर उत्पादने

7 अ‍ॅस्बेस्टॉस आणि अ‍ॅस्बेस्टॉस आधारित उत्पादने

8 प्लायवूड, सुशोभित आकर्षक लाकडे, त्याचप्रमाणे लाकूड आधारित कण-फळी, मध्यम घनता तंतु-फळी आणि टोकळ्यांची फळी यासारखी उत्पादने

9 कच्ची हाडे व चामडी, कातडी, मृदू कातडे आणि सनद ( patent ) मिळालेली चर्मोत्पादने

10 कमावलेली व संकरित लोकरी कातडी

11 मोटारी

12 चिपाडापासून कागद तयार करणाऱ्या उद्योगसंस्था वगळून इतर कागदांचे व वृत्तपत्र कागदाचे उत्पादन

13 सर्व प्रकारची अवकाश व संरक्षणात्मक विद्युत्-सामग्री

14 स्फोटासाठी लागणारी तार, संरक्षक तार, बंदुकीची दारू, नत्रयुक्त लाकूड व कार्बाईडचा यासारख्या वस्तूंसह औद्योगिक स्फोटके

15 घातक रसायने

16 औषधी द्रव्ये व औषधे ( औषधी द्रव्ये धोरणानुसार )

17 व्ही. सी. आर., रंगीत दूरचित्रवाणी संच, सी. डी. प्लेअर, टेपरेकॉर्डर यासारखी करमणुकीची साधने

18 घरगुती शीतपेटी, भांडी धुण्याची घरगुती यंत्रे, कपडे धुण्याची स्वयंनियंत्रित घरगुती यंत्रे, सूक्ष्म-लहरी भट्ट्या आणि वातानुकूलित यंत्रे.

## 5

## मिश्र परिवहन पद्धती : विकसनशील देशांची गरज

मोटारीचा शोध परिवहन पद्धतीत क्रांतिकारक ठरला. रस्त्यावरील वाहतूक आरामदायी, वेगवान आणि सोईस्कर झाली. पण हीच मोटार वाहतूक अनेक समस्यांचे मूळ ठरू पहात आहे. मोटार वाहतुकीचे तोटे तिच्यापासून मिळणाऱ्या लाभांपेक्षा वरचढ ठरत आहेत. वाहतुकीची कोंडी होणे, आवाज व हवा प्रदूषण या तोट्याबरोबरच असेही जाणवत आहे की, मोटार वाहतुकीला सोईस्कर ठरण्यासाठी आखलेली शहरे माणसाला घातक ठरत आहेत. मोटार वाहतूक सुरळीत राखण्यासाठी पेट्रोलच्या आयातीवर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे देशांची अर्थव्यवस्था परावलंबी व तकलादू बनत आहे.

पाश्चिमात्य व पौर्वात्य विकसित देशांतील शहरांना या समस्येने ग्रासले आहेच, पण विकसनशील देशांतील शहरांनाही ही समस्या भेडसावू लागली आहे. दरवर्षी 3.5 कोटी नवीन मोटारी रस्त्यावर येत असल्यामुळे ही समस्या दिवसेंदिवस आणखी गंभीर होत जाणार आहे. न्यूयॉर्क व लंडनसारख्या शहरांना यापेक्षा मोटार वाहतुकीचा भार पेलणार नाही. कैरो व दिल्लीतील परिवहनव्यवस्था स्फोटक अवस्थेत आहेत. मोटार वाहतुकीच्या समस्येचे स्वरूप इतके स्पष्ट आहे की, त्यासाठी कोणताही पुरावा सादर करण्याची जरूरीच नाही. म्हणून समस्येचा जास्त ऊहापोह करण्यापेक्षा ही

समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेवर जास्त लक्ष केंद्रित केले पाहिजे.

जगातील अनेक शहरे इतकी वाढली आहेत की, परिवहन व्यवस्था नव्याने निर्माण करण्यासाठी लाग-णारी गुंतवणूक करणे व त्यासाठी करावा लागणारा त्याग सहन करणे अशक्य आहे. अशा शहरांची संख्या विकसित व विकसनशील देशांत मोठी असल्यामुळे शहररचना फारशी न बदलता परिवहन समस्या सोड-विण्यासाठी अमलात आणावयाच्या उपायांचा विचार करावा लागेल.

(1) शहराचे वेगवेगळे विभाग पाडून काही विभागातच मोटार वाहतुकीला परवानगी देणे. शह-राच्या मध्यवर्ती विभागात मोटार वाहतुकीवर निर्बंध घालणे.

(2) बस आणि आगगाड्या या सार्वजनिक वाह-नांचा परिवहनासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे. या परिवहन व्यवस्थेला पूरक म्हणून लोकांना पायी चालण्यास व सायकलने प्रवास करण्यास उद्युक्त करणे. अशी परिवहन व्यवस्था वेगवान, सुरक्षित, सुखकर व प्रदूषणाला आळा घालण्याच्यादृष्टीने आदर्श ठरेल.

ज्या देशांनी सार्वजनिक परिवहनव्यवस्थेची संकल्पना मध्यवर्ती मानून आपल्या शहरांची नव्याने आखणी केली त्यांना नागरी परिवहनाची समस्या आज तर भेडसावत नाहीच पण भविष्यातही ही समस्या निर्माण होण्याची शक्यता नाही. स्टॉकहोम शहर याचे उत्तम उदाहरण होय. मुख्य शहराभोवती 25,000 ते 50,000 लोकसंख्येची उपनगरे विकसित करून ती मुख्य शहराशी व परस्परांशी रेल्वे व द्रुतमार्गांनी जोडली आहेत. हॉलंड व पश्चिम जर्मनीमध्ये रस्ते जास्त गोलाकार करून व झाडे लावून मोटारींचा वेग कमी करण्यात यश मिळविले आहे. पण सर्वच शहरांमध्ये एवढे परिवर्तन करणे शक्य नसते.

टोरांटो व कोपनहेगन यासारख्या शहरांच्या मध्यवर्ती भागात मोटारी चालविण्यावर व रस्त्याच्या कडेला मोटारी उभ्या करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. विकसित देशांतील शहरांतून विकसनशील देशांतील शहरांपेक्षा जास्त प्रमाणात सार्वजनिक परि-वहन व्यवस्थेचा वापर केला जातो. टोकियोमध्ये एकूण प्रवासी – किलोमीटर प्रवासाच्या 95 टक्के प्रवास रेल्वेनेच केला जातो. याविरुद्ध दक्षिण अमेरिका व आफ्रिकेतील देशांतील अनेक शहरांत, ही राष्ट्रे अविक-सित असूनही, 50 ते 80 टक्के लोक मोटारीतून प्रवास करतात.

आपल्या शहरांची बांधणी मोटारींच्या वाहतु-कीला सोईस्कर अशी असल्यामुळे पादचारी व साय-कलस्वार शहरांतील रस्त्यावरून जाताना बिचकतात. शहरांतील रस्त्यावरील मोटारधारकांची मक्तेदारी मोडून काढून हे रस्ते पादचारीं व सायकलस्वारांना जास्त सुरक्षित करून देणे जरुरीचे आहे. त्यासाठी तीन ते पाच किलोमीटर पर्यंतच्या परिघातील प्रवासाकरिता पायी चालणे व सायकल चालविणे याला उत्तेजन दिले पाहिजे.

यापेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी दुहेरी प्रवासाची पद्धत विकसित केली पाहिजे. घरापासून रेल्वे अथवा बस स्टेशनपर्यंत पायी अथवा सायकलने येणे; तेथे सायकली ठेवून रेल्वेने अथवा बसने कामाच्या ठिकाणी पोहोचणे. हा सर्वमान्य व कमीत कमी खर्चात अमलात आणता येण्याजोगा मार्ग होय. एका मोटारी-साठी लागणाऱ्या जागेत वीस सायकली ठेवता येतात; त्यांना इंधन लागत नाही; त्या वापरणे काटकसरीचे व आरोग्यदायी असते आणि त्यांच्यापासून कोणतेही प्रदू-षण होत नाही. शासनाने सायकल वापरणाऱ्यांना अनु-दान देऊन प्रोत्साहन देणे लाभदायक ठरेल. अशी परिवहनव्यवस्था यशस्वी व लोकप्रिय करण्यासाठी सार्वजनिक परिवहनव्यवस्था कार्यक्षम, नियमित व भरवशाची करणे मात्र अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्यक्षात विकसनशील देशांतील शासनांकडून मोटारधारकांनाच सवलती व उत्तेजन मिळत असते. मोटारधारकांवर व मोटारींसाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनावर जबर कर बसवून त्यापासून होणाऱ्या उत्प-न्नातून पादचारी पथ, सायकल पथ व सार्वजनिक परिवहनव्यवस्था विकसित करणे जास्त लाभकारक ठरेल. त्यातून इंधनाच्या आयातीमुळे आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदात येणारी तूटही कमी होईल. आंतर-

राष्ट्रीय संस्था व विकसित राष्ट्रांनी विकसनशील देशांना अशी परिवहनव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक ते वित्तीय साहाय्य व तांत्रिक तसेच व्यवस्थापकीय सल्ला दिला पाहिजे.

अशा मिश्र परिवहन पद्धतीचे यश विकसनशील देशांतील शासनांपुढील एक आव्हान आहे.

( **संदर्भ :** Worldwatch Paper No. 98, October 1990, Worldwatch Institute, USA. )

## 6

सोव्हिएत रशियाने आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या सभासदत्वासाठी अर्ज केला आहे. वास्तविक पाहता ब्रेटन वूड्स येथे झालेल्या बैठकीला रशियाचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांनी नाणे निधी स्थापन करण्यासंबंधीच्या चर्चेत प्रामुख्याने भाग घेतला होता. पण त्यावेळी रशियाने नाणे निधीचे सभासदत्व स्वीकारले नव्हते. आणि आज सत्तेचाळीस वर्षानंतर रशिया निधीचे सभासदत्व मागत आहे. रशियाच्या या सभासदत्वाला अमेरिकेचा सर्वांत जास्त विरोध आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रशियाने पूर्ण सभासदत्व मागण्याऐवजी सहसभासदत्व स्वीकारावे. त्यातून रशियाला नाणे निधीपासून सर्व आवश्यक लाभ मिळतील. सात राष्ट्रांच्या समुदायानेसुद्धा हीच भूमिका घेतली आहे. नाणेनिधीचे सभासदत्व मागण्यापूर्वी रशियाने बाजारपेठ अर्थव्यवस्था पूर्णपणे निर्माण करावी व आपले चलन परिवर्तनीय करावे अशी अमेरिकेची मागणी आहे. मात्र नाणे निधीच्या घटनेत नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्राने परिवर्तनीय चलनव्यवस्था निर्माण करण्याची हमी द्यावी एवढीच अट आहे. नियोजित अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांना सभासदत्व देऊ नये असे कलम निधीच्या घटनेत नाही. रुमानिया, युगोस्लाव्हियासारखी नियोजित अर्थव्यवस्था असलेली राष्ट्रे निधीची सभासद आहेत.

असे असूनसुद्धा अमेरिका अशी आडवळणाची भूमिका घेत आहे, कारण रशियाचे सभासदत्व श्रीमंत राष्ट्रांना गैरसोयीचे ठरणार आहे. त्यामागची भूमिका अशी :

(1) 1990 मध्ये पन्नास टक्क्यांनी वाढविण्यात आलेली सभासद राष्ट्रांची वर्गणी देण्यास अमेरिकेच्या काँग्रेसने अजून संमती दिलेली नाही. या परिस्थितीत रशियाच्या सभासदत्वाची वेळ अमेरिकेला गैरसोयीची वाटते.

(2) रशियाच्या वर्गणीची रक्कम अमेरिका, जपान व जर्मनी यांच्या खालोखाल असेल. त्यामुळे सत्तातोलाची आजची परिस्थिती पालटेल.

(3) नाणे निधीचे सभासदत्व मिळाल्यास निधीच्या सात प्रमुख सभासद राष्ट्रांपैकी रशिया हे एक राष्ट्र होईल. त्यामुळे रशियाला निधीच्या कार्यकारी मंडळाच्या कायम सभासदात स्थान मिळेल. परिणामी आत्ताच्या शेवटच्या कायम सभासदाला कार्यकारी मंडळातून बाहेर पडावे लागेल.

(4) निधीला द्यावयाची रशियाची वर्गणी किमान 600 कोटी डॉलर असेल. म्हणजे येत्या तीन वर्षांत रशियाला निधीकडून 1,800 कोटी डॉलरची उचल करता येईल. निधीची आत्ताची एकूण येणी 3,400 कोटी डॉलर असून त्यात मेक्सिकोकडील कर्ज सर्वांत जास्त म्हणजे 61 कोटी डॉलर आहे. रशियाला सभासदत्व मिळाल्यास तो निधीचा सर्वांत मोठा ऋणको असेल. भांडवलशाही राष्ट्रांना हे मानवण्याची शक्यता नाही.

(**संदर्भ :** दि इकॉनॉमिस्ट, 3-9 ऑगस्ट 1991, पृ. 57).

□ □

# ' अर्थसंवाद ' च्या लेखकांसाठी

1 ' अर्थसंवाद ' साठी पाठविलेला लेख अन्यत्र प्रसिद्ध झालेला अथवा अन्यत्र प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा. मात्र एखादा प्रकाशित लेख ' अर्थसंवाद ' च्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करणे आवश्यक वाटल्यास तसे करण्याचे अधिकार प्रमुख संपादकांना राहतील.

2 परभाषेतील अत्युत्तम लेखांचे अनुवाद ' अर्थसंवाद ' मध्ये प्रसिद्ध होऊ शकतात. मात्र त्यासाठी प्रमुख संपादक यांनी अनुवाद स्वीकृत केल्यानंतर भाषांतर वगैरेचे अधिकार ज्यांच्याकडे असतील त्यांची लेखी अनुमती मिळवून भाषांतरकाराने ती प्रमुख संपादकांकडे पाठविली पाहिजे.

3 लेख वगैरे मजकूर टंकलिखित अथवा सुवाच्य हस्ताक्षरात निदान 1/3 समास सोडून कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेला असावा. लेखात खाडाखोड टाळावी.

4 पाठविलेला मजकूर प्रकाशित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण असावा. लेखाच्या अग्रभागी मथळा देऊन त्याखाली लेखकाने आपले नाव लिहावे. नाव लेखाच्या शेवटी देऊ नये. लेखकाने नावाखालीच आपला हुद्दा आणि संस्था यांचा आवर्जून उल्लेख करावा. ग्रंथ परीक्षणाच्या बाबतीत मात्र प्रस्तुत अंकातील मांडणी पद्धत अनुसरावी.

5 लेखात उल्लेख होणाऱ्या सर्व व्यक्तींचा उल्लेख ( भारतीय वा परकीय, हयात वा दिवंगत ) आदरार्थी बहुवचनी करण्याचा ' अर्थसंवाद ' चा संकेत आहे. त्याप्रमाणे लेखातील व्यक्तींच्या नावामागे ' प्रा. ', ' डॉ. ', ' श्री. ' वगैरे उल्लेखही टाळण्याचा संकेत आहे. लेखकांनी या बाबींची विशेष नोंद घ्यावी.

6 ' अर्थसंवाद ' मधील सर्व संख्यांक (numerals) आंतरराष्ट्रीय पद्धतीने– उदा. 1, 2, 3, 4 असे– दिले जातील. उपशीर्षकांना अ, आ, इ, ई असे क्रम द्यावेत. लेखकांनी आपल्या सर्व लेखनात याच पद्धतीने लिहावे.

7 लेखात तक्ते असल्यास खालील बाबींविषयी लेखकाने काटेकोर रहावे.

(अ) प्रत्येक तक्त्यास क्रमांक देऊन त्यातील माहितीची संपूर्ण कल्पना देणारा मथळा द्यावा.

(आ) तक्त्यातील स्तंभाचे मथळेही परिपूर्ण असावेत.

(इ) तक्त्यातील माहिती कोठून घेतली याचा पूर्ण संदर्भ मान्य पद्धतीने देणे आवश्यक आहे.

8 लेखात आकृत्या असल्यास त्या पांढऱ्या शुभ्र कागदावर काळ्या शाईने सुबकपणे आरेखित करून तसेच मजकुरातील त्यांचे नक्की स्थळ निर्देशित करून पाठवाव्यात.

9 लेखातील ' संदर्भ टीपा ' लेखाच्या अखेरीस द्याव्यात. त्यांचा तपशील लिहिताना तो पुढीलप्रमाणे क्रमशः द्यावा : (अ) **ग्रंथाचा संदर्भ असल्यास :** ग्रंथकर्त्यांचे नाव (प्रथम आडनाव), ग्रंथाचे नाव (अधोरेखित), प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष आणि पृष्ठ क्रमांक. (आ) **लेखाचा संदर्भ असल्यास :** लेखकाचे नाव (प्रथम आडनाव), लेखाचे नाव (अवतरण चिन्हांत), तो लेख प्रसिद्ध झालेले पुस्तक अथवा नियतकालिक यांचे संपूर्ण नाव, प्रकाशन वर्ष / महिना / सप्ताह, खंड व अंक क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक. सर्वत्र विरामचिन्हांचा योग्य तो वापर करावा.

10 लेखास ' संदर्भ सूची ' (Bibliography) द्यावयाची असल्यास ती ' संदर्भ टीपा ' नंतर द्यावी. सूचीतील सर्व नोंदी ग्रंथकर्ता वा लेखकर्ता यांचे बाबतीत अकारविल्हे आणि यापूर्वी 9 मध्ये उल्लेखिलेल्या आवश्यक तपशिलासह द्याव्यात. ' संदर्भ टीपा ' आणि ' संदर्भ सूची ' मधील सर्व तपशीलाचे लेखन इंग्रजीमध्ये न करता देवनागरी लिपीतच करावे.

11 लेखातील परिभाषा महाराष्ट्र शासनाच्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोशा' नुसार वापरली जावी. तशी न वापरल्यास आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार प्रमुख संपादकांना राहतील. लेखात वापराव्या लागणाऱ्या कोशातील एखाद्या मराठी प्रतिशद्बास लेखकाचा आक्षेप असल्यास त्याने आपली त्याविषयीची भूमिका स्पष्ट करणारे टिपण पाठवावे. त्यातील विवेचनाचा दर्जा 'अर्थसंवाद' मधील साहित्याच्या किमान पातळीएवढा असल्यास ते टिपण 'अर्थ शद्बाची वाट पाहे' या सदरात प्रसिद्ध केले जाईल. **लेखात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञांसाठीचे इंग्रजी प्रतिशद्ब कंसात द्यावेत.**

12 लेखकांनी शुद्धलेखनाकडे पुरेसे लक्ष द्यावे. त्यासाठी जरूर तर मो. रा. वाळंबे यांच्या 'मराठी शुद्धलेखन प्रदीप' या पुस्तकाचा वापर करावा.

13 पाठविलेल्या मजकुराची पोच देण्यात येईल. परंतु परतीचे पुरेसे टपाल हशील लावून स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा मजकुरासोबत जोडलेला असल्यासच अस्वीकृत मजकूर परत पाठविला जाईल, अन्यथा नाही. लेखकांनी आपल्या लेखाची स्थळप्रत स्वतःकडे राखून ठेवावी.

14 लेख 'अर्थसंवाद' मध्ये प्रसिद्ध झाल्यावर त्यात लेखकास महत्त्वाचे मुद्रणदोष आढळल्यास ते त्याने प्रमुख संपादकांच्या नजरेस आणून द्यावेत. म्हणजे पुढील अंकात चुकीची दुरुस्ती करता येईल.

15 लेखन साहित्याच्या 'अर्थसंवाद' मधील प्रकाशनाबाबत प्रमुख संपादकांचा निर्णय अखेरचा राहील.

16 स्वतंत्र लेख आणि ग्रंथ परीक्षण यांच्याच सुट्या 10 प्रती लेखकांना दिल्या जातील; इतर मजकुराच्या दिल्या जाणार नाहीत. एखादा लेख दोन वा अधिक लेखकांनी संयुक्तपणे लिहिलेला असल्यास प्रथम क्रमांकाच्या लेखकाकडे त्या प्रती पाठविल्या जातील.

□ □

## चुकीची दुरुस्ती

'अर्थसंवाद', एप्रिल–जून 1991, खंड 15, अंक 1 मध्ये नी. वि. सोवनी यांच्या 'अर्थ–सिद्धान्त : चुकीचे आणि / वा चकवे' या सदरातील लेखामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.

| पान | ओळ | चूक | बरोबर |
|---|---|---|---|
| 22 | खालून दुसरी | नाही असे नाही | नाही असे आहे |
| 24 | डावा स्तंभ, खालून पाचवी | तर्कशुद्ध कप्पा | तर्कशुद्ध कल्प |
| 24 | उजवा स्तंभ, वरून बाविसावी | अप्रकालखंडात | अल्पकालखंडात |

# सांख्यिकी परिशिष्ट*

## रुपयाच्या विनिमय दरातील बदल

### ( अधिकृत व्यापाऱ्यांशी व्यवहार करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ठरविलेले दर )

| शेवटचा शुक्रवार | हजर मध्य दर ( spot middle rate ) 1 पौंड = रुपये | हजर खरेदी दर ( spot buying rate ) | | |
|---|---|---|---|---|
| | | 1 अमेरिकी डॉलर = रुपये | 1 मार्क = रुपये | 1 येन = पैसे |
| नोव्हेंबर, 1987 | 26.55 | 16.91 | 9.44 | 11.82 |
| डिसेंबर, 1987 | 27.23 | 16.96 | 10.04 | 11.83 |
| जानेवारी, 1990 | 28.55 | 16.96 | 10.05 | 11.76 |
| फेब्रुवारी, 1990 | 28.75 | 17.00 | 10.04 | 11.44 |
| मार्च, 1990 | 28.30 | 17.15 | 10.12 | 10.89 |
| एप्रिल, 1990 | 28.30 | 17.33 | 10.32 | 10.88 |
| मे, 1990 | 29.35 | 17.33 | 10.29 | 11.39 |
| जून, 1990 | 30.40 | 17.44 | 10.43 | 11.42 |
| जुलै, 1990 | 32.10 | 17.32 | 10.78 | 11.75 |
| ऑगस्ट, 1990 | 33.50 | 17.45 | 11.17 | 12.09 |
| सप्टेंबर, 1990 | 33.85 | 18.00 | 11.48 | 13.04 |
| ऑक्टोबर, 1990 | 35.35 | 18.04 | 11.89 | 13.97 |
| नोव्हेंबर, 1990 | 35.16 | 18.05 | 11.00 | 13.60 |
| डिसेंबर, 1990 | 34.33 | 18.12 | 11.89 | 13.20 |
| जानेवारी, 1991 | 36.35 | 18.55 | 12.44 | 14.12 |
| फेब्रुवारी, 1991 | 36.60 | 19.00 | 12.50 | 14.39 |
| मार्च, 1991 | 34.05 | 19.53 | 11.40 | 13.97 |
| एप्रिल, 1991 | 34.31 | 20.19 | 11.52 | 14.70 |
| मे, 1991 | 35.85 | 20.86 | 12.12 | 15.13 |
| जून 7, 1991 | 35.31 | 20.90 | 11.90 | 15.00 |
| जून 14, 1991 | 34.45 | 21.00 | 11.68 | 14.86 |
| 3 जुलै, 1991 रोजी दुसऱ्यांदा मूल्यऱ्हास केला तेव्हा ठरविलेला दर | 41.59 | 25.95 | 14.15 | 18.68 |

**संदर्भ** : FINANCIAL EXPRESS, July 4, 1991, पृ. 1 आणि 7.

*** संकलन** : रवीन्द्र दोशी, प्रमुख संपादक, ' अर्थसंवाद '.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले कोश व भाषाप्रवेश

| अनु. | कोश | संपादक | किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| ( 1 ) | इंग्रजी–मराठी स्थापत्य शिल्पकोश | श्री. रा. वि. मराठे | 15 |
| ( 2 ) | उर्दू–मराठी शब्दकोश | श्री श्रीपाद जोशी<br>श्री. एन. एस. गोरेकर | 50 |
| ( 3 ) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत-संस्कृत ) | पं. वेणी माधवशास्त्री<br>जोशी व पं. ना. ह. जोशी | 50 |
| ( 4 ) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत–संस्कृत–मराठी ) | ,, ,, | 75 |
| ( 5 ) | वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा<br>( वनस्पतीशास्त्र व्याख्यासंग्रह ) | डॉ. गो. रा. परांजपे | 10 |
| ( 6 ) | मराठी वाङ्मयकोश खंड 1 | श्री. गं. दे. खानोलकर | 50 |
| ( 7 ) | तामिळ–मराठी शब्दकोश | सौ. रमाबाई जोशी<br>श्री. पु. दि. जोशी | 74 |
| ( 8 ) | मराठी–कन्नड शब्दकोश | श्री. गुरुनाथ दिवेकर | 74 |
| ( 9 ) | गुजराती–मराठी शब्दकोश | श्री. स. ज. धर्माधिकारी | 15 |
| (10) | कन्नड भाषा प्रवेश | श्री. गु. व्यं. दिवेकर | 13 |
| (11) | बंगाली भाषा प्रवेश खंड 1 | श्री. स. ग. सुखटणकर | 16 |
| (12) | बंगाली भाषा प्रवेश खंड 2 | ,, ,, | 16 |
| (13) | मल्याळम भाषा प्रवेश | श्री. रा. बं. जोशी | 28 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रावर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नीरोड, मुंबई–400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद–431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे–411 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर–440 001.

# राजारामबापू सहकारी बँक लि., पेठ

[ रजि. ऑफिस : पेठ, ता. वाळवा, जि. सांगली ]

स्थापना : 20-6-1981

अल्पावधीत प्रगतीची गरूडझेप घेणारी अग्रगण्य नागरी सहकारी बँक

## संस्थापक : मा. लोकनेते राजारामबापू पाटील

[आकडे लाखात]

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | : | 39.98 [दि. 30-6-1991] |
| निधी | : | 97.24 |
| ठेवी | : | 1,000.08 |
| कर्जे | : | 873.34 |
| नफा | : | 33.57 |

**आमची वैशिष्टये**

- 0 राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा ठेवींवर 1 टक्का जादा व्याज
- 0 ग्राहकांस तत्पर व कार्यक्षम सेवा
- 0 ठेवीदारांचे ठेवींना विम्याचे संरक्षण
- 0 ऑडिटमध्ये सतत " अ " वर्ग

**कार्यालये**

(1) प्रधान कार्यालय (2) मेन शाखा : पेठ (3) शाखा ; इस्लामपूर
(4) पे ऑफीस : साखराळे (5) शाखा ; बावची

| आर. एस. जाखले | एस. आर. वाटेगांवकर | एस. डी. पाटील | डी. जी. पाटील |
|---|---|---|---|
| बी. कॉम. | | | बी. ए., एल. एल. बी. |
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | प्रभारी चेअरमन | चेअरमन |

**संचालक मंडळ**

| | |
|---|---|
| (1) रामचंद्र विठू पाटील | (2) जनार्दन यशवंत पाटील |
| (3) प्रतापसिंह हिरोजीराव घोरपडे | (4) प्रा. बाळासो विठ्ठल पाटील |
| (5) बाबासो यशवंत पाटील | (6) सुभाष श्रीपाल करांडे |
| (7) जनार्दन कृष्णा जाधव | (8) हिंदुराव गणपती पाटील |
| (9) परशराम संभाजी देसाई | (10) रामचंद्र लक्ष्मण खोत |
| (11) आनंदराव कृष्णाजी पाटील (तज्ज्ञ स्वीकृत) | (12) नामदेव तुकाराम पाटील (तज्ज्ञ स्वीकृत) |

(13) उत्तम दत्ताजी पाटील
(कामगार प्रतिनिधी)

Registration No. R. N. 319 8/77

गोकुळ

☐ श्रीखंड ☐ आम्रखंड ☐ टेबल बटर
☐ लोणी ☐ तूप ☐ मिल्क पावडर या
सारख्या

आपल्या दर्जेदार उत्पादनासाठी
सर्वमान्य

1990-91 सालातील उत्पादनाचे काही
बोलके आकडे

| | | |
|---|---|---|
| गोकुळ दूध | 8,21,00,000 | लिटर्स |
| गोकुळ लोणी | 490 | मे. टन |
| गोकुळ तूप | 132 | ,, |
| गोकुळ श्रीखंड | 79 | ,, |
| गोकुळ टेबल बटर | 11 | ,, |
| गोकुळ मिल्क पावडर | 796 | ,, |

उत्पादक

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर.**

**विजय ब. वैद्य**
कार्यकारी संचालक

**अरुण द. नरके**
चेअरमन

**संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग**

डॉ. त्र्यं. सु. पाटणकर यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक हेमंत मुद्रण, 26, प्रतिभा–नगर मार्केट, कोल्हापूर–416 008, येथे छापून 'मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : 'संपदा', प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे, 424 002 येथे प्रसिद्ध केले.